**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**<u>अर्धा तास चर्चेबाबत</u>**

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी आपली अर्धा तास चर्चा मांडावी.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मराठा समाजाला आरक्षण देणे हा धोरणात्मक विषय आहे तसेच राज्याच्या दृष्टीने आणि मोठया प्रमाणावर असलेल्या मराठा समाजाच्या दृष्टीने हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. राज्यातील कोटयावधी लोकांचे लक्ष या चर्चेकडे आणि माननीय शासनाच्या उत्तराकडे लागलेले आहे. तेव्हा या अर्धा तास चर्चेला माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले तर अधिक बरे होईल. सन्माननीय मंत्र्यांनी उत्तर देण्याची तयारी केलेली आहे आणि ते उत्तर देण्यास समर्थ आहेत याबद्दल दुमत नाही परंतु हा विषय मोठा आणि महत्वपूर्ण असल्यामुळे माननीय मुख्यमंत्री येथे उपस्थित राहिले आणि त्यांनी जर उत्तर दिले तर जास्त चांगले होईल असे मला वाटते म्हणून माननीय मुख्यमंत्री सभागृहात येईपर्यत पाच दहा मिनिटे कामकाज थांबविण्याबाबत आपण निर्णय घ्यावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी या अर्धा तास चर्चेला उत्तर द्यावे अशी सन्माननीय सदस्यांची इच्छा आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, हे प्रकरण मागासवर्ग आयोगाकडे असून आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती आहेत हे प्रकरण ते तपासून पहात आहेत त्यांचा अहवाल आल्यानंतर यासंबंधीचा विचार होऊ शकतो.त्यामुळे या संदर्भात वेगळे उत्तर देण्याची आवश्यकता नाही असे मला वाटते.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, मला हे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, कालच्या कामकाजपत्रिकेमध्ये माझी अर्धा तास चर्चा दाखविण्यात आली होती. काही अर्धा तास चर्चा पुढे ढकलण्यात आल्या होत्या परंतु आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये माझी कालची अर्धा तास चर्चा दाखविण्यात आलेली नाही.

**उप सभापती** : उद्या वा परवा ही अर्धा तास चर्चा घेण्यात येईल. तसेच माननीय मंत्र्यांनी खुलासा केलेला असल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी आता आपली अर्धा तास चर्चा उपस्थित करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मराठा समाजाला आरक्षणाचा लाभ मिळण्याबाबत

**मु.शी.**: मराठा समाजाला आरक्षणाचा लाभ मिळण्याबाबत श्री.विनायक मेटे, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"मराठा समाजातील बहुसंख्य लोक गरीब असल्याने ते शिक्षणापासून वंचित असणे, तसेच आर्थिकदृष्टया दुर्बल असल्याने त्यांना उच्च शिक्षण घेता येत नसणे, मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मा.न्या.सराफ आयोगाचा अहवाल प्राप्त न होणे, मराठा समाजातील बहुसंख्य तरुण आरक्षण नसल्याने नोकरीपासून वंचित असणे, त्यामुळे मराठा समाजाला आरक्षणाची नितांत गरज असणे, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया "

सभापती महोदय, राज्यामध्ये मराठा समाज मोठया प्रमाणावर आहे हे आपणा सर्वानाच माहीत आहे. पूर्वीच्या काळी मराठा समाज अतिशय सधन होता. मराठा समाजाकडे जमीन असल्यामुळे त्याची आर्थिक परिस्थिती चांगली होती त्यामुळे खाऊन पिऊन तो सुखी होता. शेतीशी संबंधित व्यवसाय तो समाज करीत होता. शेती हेच त्यांच्या जगण्याचे मुख्य साधन होते. त्या काळात या समाजातील काही व्यक्तींकडे 100 किंवा 200 एकर जमीन होती. आर्थिक परिस्थिती चांगली असल्यामुळे या समाजाचा शिक्षणाकडे ओढा राहिलेला नव्हता. त्यामुळे आधुनिकतेची कास धरुन शैक्षणिक , आर्थिक वा अन्य परिवर्तन या समाजाकडे लवकर येऊ शकले नाही आणि जेव्हा हे परिवर्तन या समाजाकडे आले तेव्हा वेळ निघून गेली होती. पूर्वीच्या काळी या समाजामधील काही व्यक्तींकडे 100 वा 200 एकर जमीन होती परंतु एका कुटुंबाची दोन कुटुंबे आणि दोन कुटुंबाची चार कुटुंबे होत असल्यामुळे शेतीचीसुध्दा विभागणी होत गेली आणि पूर्वी जो 100 एकर शेती असलेला मालक होता तो आता अल्प भू धारक वा अत्यल्प भूधारक झाला आहे. एका बाजूला त्याच्याकडील शेती दिवसेंदिवस कमी होत गेली आणि दुस-या बाजूला वेळी अवेळी पडणा-या पावसाचा फटका त्याच्या शेतीला बसू लागला.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे...

नैसर्गिक आपत्ती, शेती कमी, शिक्षण कमी अशाप्रकारच्या चक्रव्यूहामध्ये मराठा समाज सापडला. आपल्याला शिक्षणाशिवाय पर्याय नाही असे जेव्हा त्याला समजले तेव्हा अलीकडच्या काळात मोठया प्रमाणावर हा समाज शिक्षणाकडे वळला. त्यामुळे या समाजातील मुले शिकली-सवरली, मोठी होत चालली. त्यांनी शिक्षण घेऊन नोकरी करण्याचे ध्येय उराशी बाळगले परंतु शासकीय नोकरी,उद्योग व्यवसायामध्ये सर्व ठिकाणी त्याला दारे बंद होत गेली . याचे कारण त्याने मराठा समाजामध्ये जन्म घेतला. ज्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनेने आरक्षण दिले त्या लोकांना सर्व काही मिळाले. त्यामुळे तो समाज शिक्षणामुळे, आरक्षणामुळे आणि त्यांच्या कर्तबगारीमुळे प्रगती करु शकला. परंतु ती संधी मराठा समाजातील गरीब लोकांना मिळाली नाही. मागास वर्गामधील दबलेल्या, खचलेल्या लोकांना आरक्षण मिळाले पाहिजे त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. त्यामधील गरीब वर्गाला अलीकडच्या काळात शासनाने आरक्षणाच्या कक्षेमध्ये सामावून घेतले आहे. या राज्यामध्ये 35 ते 40 टक्के एवढा मोठा मराठा समाज आहे. या राज्याला सर्व क्षेत्रामध्ये पुढे न्यायचे असेल, या देशाला जगासमोर आणायचे असेल तर या 35 ते 40 टक्के असलेल्या समाजाला आपल्याला बाजूला ठेवून चालणार नाही. त्याला विकासापासून वंचित ठेवून चालणार नाही, त्याला आपण संधी नाकारु शकत नाही. त्यामुळे या समाजाला बरोबर घेऊन जाण्यासाठी त्याला आरक्षणाचा आधार दिला गेला पाहिजे, तो त्यांचा हक्क आहे असे मी निश्चितपणे मानतो. या समाजातील तरुणांचे आयुष्य सुजलाम-सुफलाम होण्यासाठी त्यांना नोकरीची, उच्च शिक्षणाची संधी दिली तर त्याचा निश्चितच आर्थिक फायदा होणार आहे. त्याला अनेक वेगवेगळया प्रकारचे फायदे आरक्षणामधून मिळू शकतात.

सभापती महोदय, या राज्यामध्ये अनेक वर्षापासून वेगवेगळया प्रकारच्या संघटना मराठा समाजासाठी काम करीत आहेत, काही लोक संघटनेशिवाय काम करीत आहेत अशा सर्व समाज सुधारकांची हीच मागणी आहे. इतकेच नव्हेतर रिपब्लिकन पार्टीचे अध्यक्ष श्री. रामदास आठवले यांनी देखील कोल्हापूर येथे मराठा परिषद घेतली होती आणि त्यामध्ये मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे अशी एकमुखी मागणी केली होती. एकंदरीत मराठा समाजाच्या बाहेरील लोकांनी सुध्दा अशाप्रकारची मागणी केली आहे. या करिता मराठा समाजातील जो गरीब आणि खालच्या पातळीवरील वर्ग आहे, जो आर्थिकदृष्टया अतिशय नागवला आहे, जो विकासापासून वंचित राहिलेला आहे त्याला आरक्षणाच्या कक्षेमध्ये आणण्याची मागणी अनेक वर्षापासून सातत्याने

श्री. विनायक मेटे...

शासनाकडे करीत आहोत. दिनांक 21.7.2004 रोजी महाराष्ट्र शासनाने आयोगाला एक पत्र पाठविले की, मराठा समाजाचा समावेश इतर मागास वर्गामध्ये करावा याबाबत धोरण ठरविण्यासाठी आपण पहाणी करुन व निष्कर्ष काढून अहवाल सादर करावा. त्यानुसार न्यायमूर्ती श्री. बापट साहेबांच्या अध्यक्षतेखाली आयोग नियुक्त करण्यात येऊन त्यावर अनेक माननीय सदस्यांची नियुक्ती करण्यात आली. सदर आयोगाने काही ठिक्‌ाणी पहाणी केली तर काही ठिकाणी केली नाही. काही ठिकाणी त्यांनी पूर्वग्रहदूषित पध्दतीने परीक्षण करुन माहिती घेतली. त्यापैकी अनेक जणांनी पहाणी करीत असतांना मराठा समाजाविरोधात वक्तव्ये केली. त्याबाबतच्या कात्रणांची फाईल माझ्याकडे आहे. त्यात म्हटले आहे की, "मराठा समाजाने हातामध्ये भीक मागण्यासाठी कटोरी घेतली आहे काय?" तर कुणी असेही म्हणाले की, "तुम्ही तुमच्या मराठा समाजाच्या मोठ-मोठया नेत्यांना सांगा की, अगोदर मागासवर्ग लावून घ्या आणि नंतर आमच्याकडे मागणी करा".

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे . . . .

अशा पध्दतीचे स्टेटमेंट आयोगाचे सन्माननीय सदस्य आणि अध्यक्ष यांनी अहवाल येण्यापूर्वी केले म्हणजेच त्यांचा दृष्टीकोन पूर्वग्रहदूषित होता आणि तो दृष्टीकोन ठेऊन आयोगाने जुलै मध्ये अहवाल दिला.

सभापती महोदय, या आयोगामध्ये अध्यक्षांसह एकूण 7 सदस्य होते. त्यापैकी 5 सदस्यांनी मराठा समाजाच्या बाजूने मते दिली आणि या पाच सदस्यांमध्ये मराठा समाजाचा कोणीही नव्हता. पण तरी देखील त्यांना असे वाटले की, हे लोक खेड्यापाड्यामध्ये रहात आहेत. त्यांना त्या भागातील परिस्थिती माहिती होती. या समाजाची परिस्थिती माहिती आहे. तेथील विद्यार्थ्यांची, युवकांची परिस्थिती माहिती आहे आणि या समाजातील लोक किती वाईट अवस्थेमध्ये दिवस काढत आहेत हे देखील त्यांना माहिती असल्यामुळे या आयोगातील सन्माननीय सदस्यांनी मराठा समाजाबद्दल चांगली भूमिका घेतली आणि एकूण 7 सदस्यांमधील 5 सदस्यांनी मराठा समाजाचा इतर मागासवर्गीयांमध्ये समावेश करावा अशा प्रकारची शिफारस केली. परंतु तरी देखील पूर्व ग्रहदूषित दृष्टीकोनातून या आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती श्री.बापट साहेब यांनी या संबंधातील बहुमत बाजूला ठेवले आणि मराठा समाजाच्या विरोधामध्ये अहवाल दिला आणि एक अध्याय संपला. मग याच्या विरोधात संपूर्ण राज्यभरामध्ये फार मोठे आंदोलन झाले. शिवाजी पार्कला लाखो लोकांचा मेळावा झाला.त्यावेळी शासनाला याबाबत सांगण्यात आले आणि या बाबतीत आम्ही सहानुभूतीपूर्वक विचार करु असे शासनाकडून आश्वासन देण्यात आले म्हणून ते आंदोलन स्थगित झालेले आहे, परंतु हे आंदोलन थांबलेले नाही. आज सुध्दा सर्व गावांमधून, सर्व वाड्यांमधून आणि सर्व जिल्ह्या मधून मागणी होत आहे की, शासनाने याबाबतीत लवकरात लवकर भूमिका जाहीर करावी आणि ताबडतोब निर्णय घ्यावा अन्यथा हे झाले नाही तर आम्हाला आमच्या पुढील आंदोलनाचा जास्त कडक मार्ग स्विकारावा लागेल आणि तसे झाले तर या राज्यातील सामाजिक, राजकीय आणि कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडल्याशिवाय रहाणार नाही.जर राज्यातील परिस्थिती बिघडली तर त्याला शासन सर्वस्वी जबाबदार असेल, बाकी कोणी असणार नाही. म्हणून आमची सातत्याने अशी मागणी आहे की, न्यायमूर्ती श्री.बापट साहेब यांनी या समाजाच्या विरोधात अहवाल दिला होता. तो अहवाल पुनर्विचार करण्यसाठी आयोगाकडे परत विचारार्थ पाठविण्यात यावा, तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण साहेब यांनी ती मान्य केली होती. त्यांनी असे सांगितले होते की, आम्ही हा अहवाल निश्चितपणे परत विचार करण्यासाठी पाठवू. पण कधी-कधी शासन कशा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे . . . .

प्रकारे काम करते याचे मला आश्चर्य वाटते.

सभापती महोदय, पूर्वी दि.21-08-2004 मध्ये शासनाने आयोगाला पत्र पाठविले की, मराठा समाजाचा इतर मागासवर्गीय समाजामध्ये समावेश करावा. पण दिनांक 13 फेब्रुवारी 2009 मध्ये नेमके त्याच्या विरुध्द पत्र फेर विचारासाठी पाठविण्यात आले. बाकी त्याबद्दल काही सांगत नाहीत. हे पत्र ज्यांनी लिहिले त्यांची यामध्ये चूक नाही. त्यांना कॅबिनेटमध्ये आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी ज्या सूचना दिल्या, त्याप्रमाणे त्यांनी पत्र लिहिले असेल. त्यांनी पत्रामध्ये असे लिहिले की,"सदर अहवालावर शासनास प्रस्ताव पाठवित असताना सध्या असलेल्या इतर मागासवर्गीय, भटक्या विमुक्त व विशेष मागास प्रवर्ग यांच्या यादीमध्ये मराठा समाजाचा समावेश न करता तसेच सध्याच्या इतर मागासवर्गीय, भटके व विमुक्त व विशेष मागास प्रवर्ग यांच्यासाठी असलेल्या 32 टक्के आरक्षणास बाधा न आणता," पुढील वाक्ये महत्वाची आहेत की,"मराठा समाजाला शैक्षणिक आणि नोकरीतील आरक्षण व आर्थिक सहाय्य देता येईल किंवा कसे या बाबतीत राज्य मागासवर्ग आयोगाला अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात यावे". आता ज्यांना या बाबतीत अधिकारच नाही त्यांना त्या बाबत काम करण्यास सांगितले आहे. यामध्ये दोन विरोधाभास आहेत. एक म्हणजे आपला आयोगाकडे मूळ प्रस्ताव कोणता होता तर इतर मागासवर्गीयांमध्ये मराठा समाजाचा समावेश करण्यात यावा. मग तो प्रस्ताव तसाच फेर विचार करण्यासाठी पाठविणे गरजेचे होते. तो आपण पाठविलेला नाही. कारण आयोगाची जी कार्यकक्षा आहे, त्यानुसार एखाद्या समाजाला आरक्षण देता येईल किंवा कसे किंवा जर आरक्षण दिले असेल तर ते काढावयाचे किंवा कसे हे ठरविण्याचा अधिकार आयोगाला आहे. तुम्हाला शिक्षणाच्या बाबतीत किंवा नोकरीच्या बाबतीत किंवा आर्थिक बाबींमध्ये आरक्षण द्यावयाचे आहे काय आणि ते किती टक्के द्यावयाचे आहे हे ठरविण्याचा अधिकार आयोगाला नाही.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ KTG/ प्रथम सौ. रणदिवे.... 11:15

श्री. विनायकराव मेटे.....

जे अधिकारच आयोगाला नाहीत ते काम आयोगाला करण्यास सांगण्यात येते. जे शासनाच्या हातामध्ये आहे ते शासन करीत नाही, म्हणजे हा सगळा विरोधाभास आहे.

सभापती महोदय, आयोगाचा दहा वर्षाचा कालावधी संपला म्हणून दिनांक 24 नोव्हेंबर, 2008 रोजी न्यायमूर्ती डॉ. बी. पी. सराफ यांची आणि या आयोगाच्या सदस्यांची नियुक्ती केली. सन 2008 पासून सन 2011 पर्यंत या आयोगाच्या या संदर्भात फक्त चार ते पाच बैठका झाल्या. प्रत्येक वेळी आयोगाकडून शासनाला असे कळविले जाते की, या संदर्भात आम्ही नक्की काय निर्णय घ्यावयाचा ते आम्हाला कळवावे. त्यांच्या काही टेक्निकल अडचणी आहेत त्यामुळे ते या संदर्भात विचार करु शकत नाहीत, निर्णयही घेऊ शकत नाहीत. या संदर्भातील अनेक पत्रे माझ्याकडे आहेत, त्या बद्दल मी या ठिकाणी बोलणार नाही. पण जे ते करु शकत नाहीत ते तुम्ही करा, तुम्ही पाठवा असे त्यांना वारंवार सांगण्यात येते. पण काय पाठवावयाचे आहे हे त्यांना सांगितले पाहिजे. ते क्लीअर करावयास पाहिजे. ते क्लीअर करण्यात येत नाही, काय पाठवावयाचे आहे ते सांगण्यात येत नाही, असे असतांना त्यांच्याकडून अहवाल मात्र मागितला जातो. शासनाच्या अधिकाऱ्यांनी एक गोष्ट चांगली केलेली आहे, सातत्याने स्मरणपत्र पाठविलेली आहेत. तुम्ही आम्हाला अहवाल द्या, हे करा, ते करा असे सांगितलेले आहे. परंतु त्यांनी नेमके काय करावयाचे आहे, हे जो पर्यंत त्यांना क्लीअर सांगण्यात येत नाही, तो पर्यंत ते काही करु शकणार नाहीत? म्हणून माझी विनंती आहे की, शासनाने फेर विचार करण्याकरिता जे पत्र पाठविलेले आहे, त्यामध्ये दुरुस्ती करुन पत्र पाठविणे गरजेचे आहे. तसेच आयोगाला निश्चितपणे एक मुदत दिली पाहिजे. आयोगाच्याही काही अडचणी आहेत. त्यांच्या जाण्या-येण्याच्या, राहण्याच्या अशा अनेक प्रकारच्या अडचणी आहेत. या सगळया अडचणी शासनाने जरुर दूर कराव्यात, अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, केवळ मराठा समाजाच्या संदर्भातील अहवालच त्यांच्याकडून येत नाही असे नाही तर त्यांच्या काही टेक्निकल अडचणी असल्यामुळे त्यांच्याकडे इतर मागासवर्ग असेल, एस.सी. असेल, एन.टी. असेल, एस.टी. असेल, व्ही.जे.एन.टी. असेल ज्या ज्या समाजाने आरक्षणाच्या संदर्भात मागणी केलेली आहे ते सगळे अहवाल यावयाचे राहिले आहेत. आयोग या संदर्भात काम करु शकत नाही, त्यामुळे त्यासंबंधीचे अहवाल पाठवू शकत नाही. कारण त्यांच्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ KTG/

श्री. विनायकराव मेटे....

काही टेक्निकल अडचणी आहेत. या टेक्निकल अडचणी दूर करण्याची नितांत गरज आहे. म्हणून माझी मागणी अशी आहे की, कोणत्याही परिस्थितीत ताबडतोब या चार ते पाच दिवसामध्ये फेर विचार करण्यासाठी न्यायमूर्ती बापट यांचा अहवालासोबत दिनांक 13 फेब्रुवारी रोजी जे पत्र पाठविलेले आहे त्या संदर्भातील दुरुस्ती पत्र शासनाला पाठवावे लागेल आणि शासनाने ते पाठवावे. त्या पत्रामध्ये स्पष्टपणे लिहावे लागेल. कारण मूळ पत्रात "मराठा समाजाचा इतर मागासवर्ग समाजामध्ये समावेश करावा किंवा कसे याची पाहणी करुन अहवाल द्यावा." असे म्हटलेले आहे. असेच पत्र परत पाठविण्याची आवश्यकता आहे. त्यांनी त्याबाबत नि:पक्षपातीपणे काय करावयाचे हा त्यांचा अधिकार आहे, त्याबद्दल मी बोलत नाही. या आयोगावर आणि माननीय न्यायमूर्तीवर आमचा विश्वास आहे. अर्थात या आयोगातील काही सदस्य जाहीरपणे मराठा समाजाच्या विरोधात बाजू मांडतात, त्याबद्दल मी जास्त बोलणे योग्य नाही. पण जे सदस्य उघडपणे एखाद्या समाजाच्या विरोधात भूमिका घेतात, अशा सदस्यांना त्या आयोगामध्ये ठेवावयाचे काय या बद्दलही शासनाने विचार करणे गरजेचे आहे. जर ते सदस्य शासनाच्या विरोधात असतील तर शासनाच्या बाजूने निकाल देण्याचा किंवा मत मांडण्याचा प्रश्नच येत नाही. अशा सदस्यांना या आयोगात ठेवणार काय आणि अशा माणसांना या आयोगामध्ये ठेवू नये अशी माझी स्पष्टपणे शासनाला विनंती आहे. माननीय मुख्यमंत्री आता या ठिकाणी आले तर त्यांनी किंवा माननीय मंत्र्यांनी ताबडतोब याची दखल घेऊन पत्र पाठवावे, अशी माझी नम्र विनंती आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी या सभागृहात उपस्थित राहिले पाहिजे असा आग्रह मी यासाठी धरला होता की,

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे .....

याच अधिवेशनामध्ये 16 तारखेला अनुक्रमांक 55 वर या संदर्भातील प्रश्न होता. त्या प्रश्नाला ठोकळेबाज उत्तर दिलेले आहे. कदाचित आताही माननीय मंत्री महोदय तशाच प्रकारचे उत्तर देतील. पण तसे उत्तर दिल्याने काहीही साध्य होणार नाही. या समाजातील कोट्यवधी लोक शासनाच्या उत्तराकडे पाहात आहेत.

**उप सभापती** : ही अर्धा-तास चर्चा आहे आणि आपण भाषण सुरु करुन 20 मिनिटे झालेली आहेत.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मी दोन मिनिटांमध्ये माझे भाषण संपविणार आहे. शासनाने दुरुस्तीसह परत पत्र पाठविण्याचे पहिले काम करावे. दुसरी बाब अशी की, जो काही अहवाल द्यावयाचा असेल तो अमुक एवढ्या दिवसांमध्ये देण्याबाबत शासनाने आयोगाला कालमर्यादा ठरवून द्यावी. याकरिता शासनाने परत पत्र पाठवावे अशी माझी आपल्या मार्फत शासनाला विनंती आहे. सभापती महोदय, मराठा समाजाला आरक्षण द्यावे म्हटल्यानंतर अनेक लोक डोळे, नाक, कान मुरडतात. पण आज या राज्यामधील अनेक समाजाची आर्थिक परिस्थिती मराठा समाजापेक्षा चांगली आहे. कोणत्याही समाजाच्या आरक्षणाची टक्केवारी कमी करुन किंवा काढून मराठा समाजाला आरक्षण द्यावे असे आमचे कधीही म्हणणे नाही आणि पुढेही असणार नाही.

आमची अशी स्पष्ट मागणी आहे की, मराठा समाजाचा समावेश इतर मागासवर्गामध्ये करुन आज इतर मागासवर्गासाठी राज्यात जे 52 टक्के आरक्षण आहे त्यामध्ये आणखी 25 टक्के आरक्षण वाढवून मराठा समाजाला आरक्षण द्यावे. या देशातील अनेक राज्यांनी 50 टक्क्याची मर्यादा ओलांडून आपापल्या राज्यांमध्ये आरक्षण दिलेले आहे. तामीळनाडूमध्ये 69 टक्के, कर्नाटकमध्ये 73 टक्के, केरळमध्ये 62 टक्के, आंध्र प्रदेशमध्ये 66 टक्के, राजस्थानमध्ये 78 टक्के आरक्षण आहे. अनेक राज्यांमध्ये 50 टक्क्याची मर्यादा ओलांडलेली आहे. महाराष्ट्राने सुध्दा आज आपण ज्यांना ज्यांना आरक्षण देतो ते तसेच ठेऊन मराठा समाजाला इतर मागासवर्गामध्ये 25 टक्के आरक्षण द्यावे, अशी आमची स्पष्ट मागणी आहे. माझ्याकडे तामीळनाडूतील सर्टिफिकेट आहे. मराठा समाजाच्या श्री. श्रेयस चव्हाण नावाच्या मुलाला तामीळनाडूमध्ये बॅकवर्ड क्लासचे सर्टिफिकेट

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे ...

दिलेले आहे. ते सर्टिफिकेट माझ्या हातामध्ये आहे. कर्नाटकमध्ये हा समाज ओबीसीमध्ये आहे. अनेक राज्यांमध्ये त्या त्या प्रवर्गामध्ये या समाजाचा समावेश केलेला आहे. महाराष्ट्रामध्ये सुध्दा विदर्भातील 80 टक्के समाज ओबीसीमध्ये आहे. या ठिकाणी विदर्भातील श्रीमती शोभाताई फडणवीस तसेच इतर सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत. विदर्भातील जो मराठा समाज आहे त्यांना कुणबी म्हणून ओबीसीमध्ये घातलेले आहे. बाकीच्या भागात थोडासा समाज राहिलेला आहे. मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणामध्ये मराठा समाज आहे. असा जो थोडासा समाज राहिलेला आहे त्या समाजाला सुध्दा ओबीसीमध्ये घालण्याचे काम शासनाने करावे ही माझी आपल्यामार्फत शासनाला नम्र विनंती आहे. शासनाने कोणत्याही परिस्थितीमध्ये आयोगाला पत्र पाठवून, मुदत देऊन ओबीसीच्या संदर्भामध्ये अहवाल मागवून घ्यावा, अशी माझी नम्र विनंती आहे. आपण जर असे केले नाही तर दुर्दैवाने शासनाच्या विरोधात समाजामध्ये खूप मोठा रोष निर्माण होईल आणि त्यानंतर ज्या काही गोष्टी होतील, आंदोलने होतील आणि त्या आंदोलनातून काही गोष्टी निष्पन्न झाल्या किंवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर त्यामध्ये शासनाचा दोष राहील, त्यामध्ये समाजाचा दोष राहणार नाही, असे मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. मला ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्याला मन:पूर्वक धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. शिवाजीराव मोघे ( सामाजिक न्याय, विमुक्त, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग कल्याण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनायकराव मेटे यांनी मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे. या संदर्भात त्यांनी आपले सविस्तर विचार सुध्दा मांडलेले आहेत. या राज्यामध्ये 13.10.1967 पर्यंत ओबीसीमध्ये फक्त 180 जाती होत्या. 1983 मध्ये ओबीसीमधील जातींची संख्या 201 झाली, 1995 ला ओबीसीमधील जातींची संख्या 307 झाली आणि आता ओबीसीमध्ये 346 जाती आहेत. म्हणजे यामध्ये कोणाचीही अडवणूक करण्याचा प्रश्न नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे....

जस जसे व्हेरिफिकेशनमध्ये सिध्द झाले त्याप्रमाणे त्यांचा त्या जातीत समावेश केलेला आहे. अशा प्रकारे ही संख्या 346 पर्यंत पोहोचली आहे. जाणूनबुजून कोणत्याही जातीच्या लोकांना अडविले जाते असे होत नाही. आयोगाला ठराविक कालमर्यादा घालून दिली पाहिजे, असे सन्माननीय सदस्यांनी म्हटले आहे आणि ते बरोबरही आहे. या आयोगाला आतापर्यंत 5 वेळा अहवाल सादर करण्याबाबत पत्रे पाठविण्यात आलेली आहेत. दिनांक 13.2.2009 ते दिनांक 28.2.2011 पर्यंत 5 वेळा स्मरणपत्रे दिलेली आहेत. एवढेच नाही तर दिलेल्या मुदतीपूर्वी आयोगाने अहवाल सादर करण्यासाठी शासनाकडून प्रयत्न करण्यात आलेले आहेत. यापूर्वीच्या न्या.बापट आयोगातील 6-7 सदस्यांपैकी 6 सदस्य फेवरमध्ये होते. माझ्याकडे असलेल्या माहितीनुसार या आयोगाचे अध्यक्ष व 3 सदस्य अशा एकूण 4 सदस्यांनी विरोधी मत नोंदविले होते. 2 सदस्यांनी अनुकूल मत नोंदविले होते व 1 सदस्य गैरहजर होते. त्यानंतर न्या.सराफ आयोग यांच्याकडे हे प्रकरण पाठविलेले आहे. यामध्ये 2-3 त्रुटी आढळून आल्या आहेत. एक म्हणजे एका जिल्ह्यातून 50 प्रश्नावली यावयास पाहिजे होती, ती आली नव्हती. दुसरे असे की, शिफारस करण्यापूर्वी मराठा महासंघाच्या लोकांना भेटले पाहिजे होते, परंतु या लोकांना ते भेटले नव्हते. ज्याच्या आधारावर कोणत्याही जातीला आरक्षण दिले जाते त्याचे सामाजिक दृष्टया 3 मुद्दे असतात. शैक्षणिक दृष्ट्या 4 मुद्दे आहेत व आर्थिक दृष्ट्या 3 मुद्दे असे 23 मुद्दे दिलेले असतात. या 23 गुणांपैकी 12 गूण मिळाले तर त्या लोकांना त्या जातीत समाविष्ट केले जाते. या आयोगाचे अर्धवट राहिलेले काम पूर्ण होईल अशी मला अपेक्षा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी त्या पत्रात असे नमूद केले आहे की, व्हीजेएनटी ही कॅटेगरी या प्रवर्गाच्या बाहेर असल्यामुळे त्याचा विचार करु नका. या विषयाला स्पष्टता यावी म्हणून त्यांनी असे म्हटलेले आहे. त्याच प्रमाणे राज्यात 50 टक्के आरक्षण असावयास पाहिजे होते, पण ते 52 टक्के झालेले आहे. म्हणून त्यांनी वेगळी कॅटेगरी सुचविली आहे. परंतु आता ते सुध्दा शक्य होणार नाही. त्या दृष्टीने शासनाने काळजी घ्यावी असे म्हटलेले आहे. यासाठी आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या जे पॉईण्ट आहेत त्या निकषात बसत असतील तर त्यांची शिफारस करावी असे म्हटलेले आहे. हे निकष सर्व जातींसाठी लागू केले जातात. त्या दृष्टीकोनातून हे पत्र पाठविलेले आहे.

2....

NTK/ D/ KTG/

श्री.शिवाजीराव मोघे....

सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, एखाद्या जातीचा समावेश आंध्र प्रदेशमध्ये एका कॅटेगरीत आहे तर कर्नाटकमध्ये त्याच जातीचा समावेश वेगळ्या कॅटेगरीत आहे. अनुसूचित जाती व जमातीसाठी राज्य हे युनिट मानलेले आहे. विमुक्त भटक्या जमातीचे लोक राज्यात विमुक्त भटक्या जमातीमध्ये आहेत. पण याच लोकांचा समावेश आंध्र प्रदेशमध्ये अनुसूचित जमातीमध्ये आहे, कर्नाटक, दिल्ली व हरियाणामध्ये अनुसूचित जातीमध्ये आहे. त्यामुळे निकष ठरविताना राज्य हे युनिट मानलेले असते. म्हणून राज्यामध्ये जी व्यवस्था ठरविलेली असते त्यानुसारच कार्यवाही होत असते.

सन्माननीय सदस्यांनी राज्यात आरक्षणाची टक्केवारी वाढली असल्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. परंतु काही राज्यात मागासवर्गीयांसाठी एकूण 69 टक्के आरक्षण आहे. कर्नाटकमध्ये 72 टक्के आहे. या आरक्षणाला चॅलेंज झालेले आहे ही गोष्ट खरी आहे. सुप्रीम कोर्टाने एस.व्ही.जोशी विरुध्द कर्नाटक राज्य या प्रकरणातील दिनांक 13.7.2010 रोजीच्या आदेशानुसार ज्यांना 50 टक्के पेक्षा जास्त आरक्षण दिलेले आहे त्यांच्यासाठी 1 वर्षाची मुदत दिलेली आहे. एक वर्षामध्ये त्यांनी व्हेरिफिकेशन करावे. या कालावधीत मागासलेपणा असल्याचे पटवून दिले तर तुमच्या सवलती पुढे चालू राहतील असे त्यात नमूद केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी चांगला विषय मांडलेला आहे. ही बाब शासनाच्या अखत्यारीत नाही. या विषयातील जे तज्ज्ञ आहेत, त्यांनी या संबंधी शिफारस केल्याशिवाय शासनाला पुढे जाता येत नाही. धन्यवाद.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी माझ्या चर्चेला समर्पक असे उत्तर दिलेले नाही. आयोगाकडे मुळात जी मागणी केलेली आहे की, ओबीसीमध्ये मराठा समाजाचा समावेश करावा. ही मागणी शासनाने मागासवर्गीय आयोगाकडे 2004 साली पाठविली आहे. त्या आयोगाने अभ्यास करुन अहवाल दिला आहे. त्या आयोगामध्ये 5 सदस्य होते. त्यांची नावे वाचून दाखविता येतील. त्या बाबतचा इतिहास मंत्री महोदयांना किती माहीत आहे हे मला माहीत नाही. परंतु लोकांना इतिहास माहीत आहे. ज्यांचे पत्र होते त्यांना डावलून न्या.बापट यांनी आपला हेकेखोरपणा चालविला.

यानंतर श्री.शिगम...

अनुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विनायक मेटे...

त्यावर मी जास्त बोलणार नाही.

मूळ मुद्दा असा आहे की, इतर मागासवर्गीयामध्ये मराठा समाजाचा समावेश करण्यासाठी जी मागणी केलेली आहे त्याबाबत फेर विचार करण्याची गरज आहे. इतर मागासवर्गीयांच्या यादीमध्ये मराठा समाजाचा समावेश न करता तुम्ही निकष तपासण्यासाठी आयोगाला सांगितले आहे. शासन आयोगाकडे ही बाब कशासाठी पाठविते ? कारण मराठा समाजाचा समावेश इतर मागासवर्गीयामध्ये करण्याचा अधिकार शासनाचा आहे. तो अधिकार आयोगाचा नाही. मराठा समाजाला शिक्षणामध्ये आरक्षण द्यायचे की नोकरीत आरक्षण द्यायचे हे ठरविण्याचा अधिकार शासनाला आहे. आरक्षण कोणत्या कॅटगरीमध्ये द्यायचे हे ठरविण्याचा अधिकार आयोगाला आहे. शासन आपले काम आयोगाला सांगून आपली जबाबदारी झटकू पहात आहे हे काही योग्य नाही. म्हणून दुरुस्ती करुन ते पत्र पाठविले तर तो अहवाल येईल अन्यथा येणार नाही. असे जर शासन करणार नसेल तर, शासनाच्या मनामध्ये मराठा समाजाबद्दल अढी आहे, जो गरीब आणि पिचलेला आणि नेस्तनाबूत होण्याच्या मार्गावरील समाज आहे त्याबद्दल शासनाला प्रेम नाही, कळवळा नाही, जिव्हाळा नाही, त्यांना मुख्य प्रवाहात आणायचे नाही, महाराष्ट्राच्या विकासात त्यांना बरोबर घ्यायचे नाही असा त्याचा अर्थ होईल. म्हणून दुरुस्तीसह हे पत्र पाठविणे गरजेचे असून तसे पत्र शासन पाठविणार आहे काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे कोणत्याही समाजाबद्दल, गरीब माणसाबद्दल शासनाच्या मनात अढी नाही. मी आधीच सांगितलेले आहे की, इतर मागासवर्गीयांमध्ये 346 जातींचा समावेश झालेला आहे. मराठा महासंघाने इतर मागासवर्गीयामध्ये समावेश करण्यासंबंधीचा अर्ज दिनांक 26.6.2004 रोजी सादर केलेला आहे. इतकी वर्षे अशा प्रकारचा अर्ज त्यांच्याकडून आला नव्हता. मागासवर्गीय आयोगाचे एकच काम आहे की, ते मागास वर्गीयाच्या निकषामध्ये बसतात की नाही हे पहाणे. ते निकषात बसतात हे सिध्द झाल्यानंतर इतर मागासवर्गीयांच्या 346 जातीमध्ये आणखी एका जातीची भर पडून 347 जाती होतील. त्याबाबतीत ॲम्बिग्युईटी काही नाही. आमचे स्पष्ट म्हणणे असे आहे की, मागासवर्गीयामध्ये मराठा समाज मोडतो अशी शिफारस आली तर शासन त्याचा जरुर विचार करील.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे : शासनाने तसे पत्र पाठविले तरच ती शिफारस येईल. कोणत्या कॅटेगरीमध्ये मराठा समाज बसतो हे ठरविण्याचा अधिकार आयोगाला आहे. ते आरक्षण किती द्यायचे हे ठरविण्याचा अधिकार शासनाला आहे. म्हणून त्यानुषंगाने शासनाने आयोगाला नवीन पत्र पाठविण्याची आवश्यकता आहे. ते पत्र शासन पाठविणार आहे काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : मराठा समाज हा इतर मागासवर्गीयामध्ये येतो किंवा नाही हे पाहण्यासाठी शासनाने पत्र पाठविलेले आहे. त्यामध्ये सन्माननीय सदस्यांना ॲम्बिग्युईटी वाटत असेल तर तसे पत्र पाठविण्यात येईल.

श्री. भगवान साळुंखे : प्रस्तुत चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी मराठा समाजाच्या आरक्षणाकडे लक्ष वेधलेले आहे. त्यांचा जोर या मुद्यावर आहे की, आज मराठा समाजातील विद्यार्थी हा वाढलेल्या शैक्षणिक फी मुळे बाजूला फेकला जात आहे. अत्यंत गरीब राहिलेला, मजुरी करणारा असा 70 ते 80 टक्के मराठा समाज आहे. वडिलोपार्जित थोड्या फार जमिनी होत्या त्यांच्या वाटण्या झाल्या. आता कुठे 5-10 गुंठ्यावर हा शेतकरी समाज आलेला आहे. आज या मराठा समाजातील मुले शाळा शिकू शकत नाहीत अशी त्यांची स्थिती आहे. मी या निमित्ताने शासनाला अशी विनंती करतो की, ज्याप्रमाणे एससी,एसटी,एनटी,व्हीजेएनटी, मायनॉरिटी मधील मुलांना स्कॉलरशीप दिली जाते तशा प्रकारची काही ना काही शैक्षणिक सुविधा महाराष्ट्रातील मराठा समाजाच्या सर्व विद्यार्थ्यांना या वर्षापासून दिली जाणार आहे काय ? आज मराठा समाजातील विद्यार्थी कमालीचा वैफल्यग्रस्त झालेला आहे, व्यसनाधीन होत आहे आणि तो गुन्हेगारीकडे झुकण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही अंशी तो गुन्हेगारीकडे झुकलेला सुध्दा आहे. त्याला मूळ प्रवाहात आणण्याची नितांत आवश्यकता आहे. तेव्हा या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करुन मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये सवलत, आरक्षण देण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने शासन कृती करील काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : आयोगाचा रिपोर्ट आल्यानंतर मंत्रिमंडळापुढे हा विषय जाईल आणि त्यानंतर सवलती लागू होऊ शकतील.

श्री. हुसेन दलवाई : सर्व सत्ता मराठा समाजाकडे केंद्रीत झालेली आहे. तरीही मराठा समाजामध्ये प्रचंड प्रमाणामध्ये गरिबी आहे ही वस्तुस्थिती आहे.

....नंतर श्री. गिते....

अमुद्रित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई...

त्यांची हलाखीची अवस्था आहे. सन्माननीय सदस्यांनी मराठा समाजाचा ओ.बी.सी. मध्ये समावेश करण्यासंबंधी मुद्दा मांडला. मराठा समाजाला आरक्षण द्यावे अथवा देवू नये असे मी म्हणणार नाही. सभापती महोदय, सगळया मुसलमांना सवलती दिल्या जात नाहीत, मुसलमानांमध्ये जे गरीब आहेत, त्यांना सवलतीचा लाभ दिला जातो. त्याप्रमाणे मराठा समाज वेगळा करुन त्यातील जे गरीब आहेत, त्यांना या सवलती दिल्या गेल्या तर त्यांची आजची अवस्था तरी दूर होईल. मराठा समाजातील गरिबांना या सवलती देण्याबाबत माननीय मंत्री महोदय काही सकारात्मक भूमिका घेणार काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, व्ही.जे.एन.टी. आणि ओ.बी.सी.ला आज सवलती देतो, परंतु त्यासाठी रुपये 4.50 लाखाची नॉन क्रिमीलेअरची मर्यादा घालून दिलेली आहे. या मर्यादेच्या खाली जे आहेत, त्यांनाच नोकरी किंवा इतर सवलतींचा लाभ देण्यात येतो आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, या सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेर सन्माननीय सदस्य श्री. मेटे साहेब या प्रश्नाच्या बाबतीत अनेक वर्षापासून लढा देत आहेत, या गोष्टीची आपल्याला सुध्दा माहिती असेल. या प्रश्नाच्या बाबतीत त्यांनी मध्यंतरी पदाचा देखील त्याग केला होता. वास्तविक पाहता आज ग्रामीण भागामध्ये मराठा समाजाची अत्यंत हलाखीची परिस्थिती आहे. मराठा समाजातील छोटे छोटे जमीनदार आहेत. त्यांची जमीन कोरडवाहू असल्यामुळे व पाऊस वेळेवर पडत नसल्यामुळे अत्यंत अडचणीचे दिवस ते काढत आहेत. आरक्षणाचा निकाल आयोगाकडून लागेल तेव्हा लागेल. किमान मराठा समाजातील गरीब विद्यार्थी आहेत, त्यांना शिक्षणातल्या सवलती देण्याबाबतचा निर्णय शासन तातडीने घेईल काय ? माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी कबूल केले की, आम्ही आयोगाकडे पत्र पाठविणार आहोत. सदर पत्र अधिवेशन संपण्यापूर्वी पाठविण्यात येईल काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे सवलती त्याच वेळा मिळू शकतात, ज्यावेळी ते मागासवर्गीय प्रवर्गात येतात. या बाबतीत मागासवर्गीय म्हणून सगळी प्रक्रिया पूर्ण होईल, त्यावेळी या समाजातील विद्यार्थ्यांना सवलतीचा लाभ मिळू शकेल. सन्माननीय सदस्य श्री. मेटे साहेब हे फक्त मराठा समाजासाठी भांडतात असे म्हणून सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारताना छोटीशी चूक केली आहे. सन्माननीय सदस्य श्री. मेटे साहेब हे सर्व समाजासाठी भाडतात असे माझे मत आहे.

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे : आयोगाकडे सदर पत्र अधिवेशन संपण्यापूर्वी पाठविले जाईल काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : अशा विषयांच्या बाबतीत मंत्रिमंडळाच्या सब कमिटीकडे जावे लागते. मी या ठिकाणी पत्राच्या बाबतीत माहिती सांगतो आहे की, अशा विषयाबाबतचे पत्र विभाग पाठवू शकत नाही. त्यास मंत्रिमंडळाच्या सब कमिटीचे ॲप्रूव्हल घ्यावे लागते.

श्री. विनायक मेटे : सन्माननीय मंत्री महोदयांकडून दिशाभूल करणारे उत्तर दिले जात आहे. पत्र पाठविण्यासाठी मंत्रिमंडळाची अथवा मंत्रिमंडळाच्या सब कमिटीची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही. शासनाच्या तिजोरीवर आर्थिक भार पडेल असाही हा विषय नाही. सब कमिटीची मान्यता घेण्याचा आणि या विषयाच्या पत्राचा काहीही संबंध नाही.

श्री. शिवाजीराव मोघे : असे विषय अतिशय महत्वाचे असतात, तसेच ते प्रश्न नाजूकही असतात. सभापती महोदय, अशा विषयांच्या बाबतीत पत्र पाठविण्यास प्रोसीजर ठरवून दिलेली आहे. त्या प्रोसीजर प्रमाणे सदरहू पत्राच्या मसुद्यास मंत्रिमंडळाच्या सब कमिटीचे ॲप्रूव्हल घेणे आवश्यक असते.

श्री. विनायक मेटे :सन्माननीय मंत्री महोदय हे चुकीचे उत्तर देत आहेत...

श्री. शिवाजीराव मोघे : मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर विषयांचा जो अजेंडा असतो, त्यासाठी मंत्रिमंडळाच्या सब कमिटीचे ॲप्रूव्हल घ्यावे लागते.

श्री. विनायक मेटे : आपण आयोगास पत्र पाठविले आहे, त्यास मंत्रिमंडळाच्या सब कमिटीचे ॲप्रूव्हल घेतले होते काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर जो अजेंडा असतो, त्यास मंत्रिमंडळाच्या सब कमिटीचे ॲप्रूव्हल घ्यावे लागते. आमच्या विभागाकडून पत्र पाठविले जात असले तरी त्यास मंत्रिमंडळाच्या सब कमिटीचे ॲप्रूव्हल घ्यावे लागते.

श्री. विनायक मेटे : माझ्या माहिती प्रमाणे एकही पत्र मंत्रिमंडळाच्या सब कमिटीच्या ॲप्रूव्हलने गेलेले नाही. आतापर्यंत कोणत्या पत्रासाठी मंत्रिमंडळाच्या सब कमिटीचे ॲप्रुव्हल घेतले गेले आहे याची माननीय मंत्री महोदयांनी माहिती सांगावी.

यानंतर श्री. भोगले

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ D/ 11:40

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, माननीय सदस्यांचा गैरसमज होत आहे. स्मरणपत्र पाठवायचे असेल तर ते विभागामार्फत पाठविले जाते. परंतु विषय बदलण्याची बाब असेल तर कॅबिनेट सब कमिटीची मान्यता घ्यावी लागते.

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, मराठा समाजाने आतापर्यंत कायद्याच्या चौकटीत राहून आंदोलने केली आहेत. आज शहरीकरणामुळे एकत्र कुटुंब पध्दती नामशेष होत आहे. सर्वसामान्य मराठा समाज कायद्याच्या चौकटीत राहूनच काम करतो. मराठा समाजाने उग्र आंदोलन केल्यानंतरच मागण्या मान्य केल्या जातील अशी शासनाची भूमिका आहे का?

श्री.शिवाजीराव मोघे : प्रश्न समजला नाही.

श्री.अनिल भोसले : मराठा समाजाने या प्रश्नासंबंधी तीव्र आंदोलन केल्यानंतरच त्यांचे प्रश्न सुटतील काय?

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदय सभागृहात आल्यानंतर त्यांनी या प्रश्नाचे उत्तर द्यावे, म्हणजे हा प्रश्न मिटेल. तोपर्यंत ही अर्धातास चर्चा राखून ठेवावी.

श्री.विक्रम काळे : पत्र केव्हा पाठविले जाईल याचे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे.

**उप सभापती** : या अर्धा तास चर्चेच्या अनुषंगाने माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी ज्या पत्राचा संदर्भ दिला आहे, अशा प्रकारचे पत्र पाठविण्याची बाब सन्माननीय मुख्यमंत्र्याच्या निदर्शनास आणून द्यावी व सदरचे पत्र शक्यतो ताबडतोब पाठविले जाईल एवढी व्यवस्था करावी.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, होय.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री सभागृहात येईपर्यंत ही अर्धातास चर्चा राखून ठेवावी.

**उप सभापती** : या अर्धा तास चर्चेसंबंधी विस्तृत चर्चा झाली असल्यामुळे माननीय मुख्यमंत्री सभागृहात येईपर्यंत हा विषय राखून ठेवणे योग्य होणार नाही. माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी विचारलेल्या प्रश्नासंबंधी मी मंत्री महोदयांना निर्देश दिले असून त्यांनी ते मान्य केले आहे, त्यामुळे हा विषय संपला आहे.

सदर अर्धा तास चर्चा संपली आहे. माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांची अर्धा तास चर्चा पुढे ढकलण्यात येत आहे.

-----

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>कामकाजपत्रिकेतील सातव्या क्रमांकाची लक्षवेधी सूचना प्राधान्याने चर्चेला घेण्यासंबंधी</u>

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेत जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पासंबंधी चर्चा सुरु आहे. रत्नागिरी जिल्हयाचा पालकमंत्री या नात्याने मला विधानसभेत उपस्थित राहणे आवश्यक असल्यामुळे कामकाजपत्रिकेवरील पहिल्या क्रमांकाची लक्षवेधी सूचना प्रथम चर्चेला घेण्याऐवजी नगरविकास विभागाशी संबंधित अनुक्रमांक-7 वरील लक्षवेधी सूचना प्राधान्याने चर्चेला घेण्यात यावी, अशी माझी विनंती आहे. कामकाजपत्रिकेवरील पहिल्या क्रमांकाची लक्षवेधी सूचना देणारे माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि वस्त्रोद्योग विभागाचे मंत्री यांना देखील मी विनंती केली असून त्यांनी सातव्या क्रमांकावरील लक्षवेधी सूचना प्राधान्याने घेण्यास मान्यता दिली आहे.

**उप सभापती** : ठीक आहे. माननीय मंत्री महोदयांनी केलेल्या विनंतीनुसार कामकाजपत्रिकेवरील सातव्या क्रमांकाची लक्षवेधी सूचना प्राधान्याने चर्चेला घेण्यात येत आहे.

------

..नंतर जे.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ D/ KTG/ पूर्वी श्री. भोगले...... 11:45

**पृ. शी.** : औरंगाबाद सिडको प्राधिकरणाने आराखडा तयार करताना बाजूच्या 28 खेड्यात चुकीचे आरक्षण लावणे

**मु. शी.** : औरंगाबाद सिडको प्राधिकरणाने आराखडा तयार करताना बाजूच्या 28 खेड्यात चुकीचे आरक्षण लावणे यासंबंधी सर्वश्री सतीश चव्हाण, विक्रम काळे, एम.एन.शेख, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"औरंगाबाद सिडको विशेष प्राधिकरणाने 28 खेड्यातील 15,184 हेक्टर जागांवर झालर क्षेत्र विकासाच्या नावाखाली तयार केलेला आराखडा, त्यात धनदांडग्यांच्या मनाप्रमाणे आरक्षण टाकण्यात आले असल्याचा स्थानिक शेतकरी व इतर ग्रामस्थांनी व्यक्त केलेला संशय, आरक्षण देतांना 25 खेड्यातील गायरान जमिनी यलो झोनमध्ये तर शेतक-यांची नापीक जमीन ग्रीन झोन मध्ये घेणे, सध्या राहत असलेल्या घरांवर ग्रीन आरक्षण घेणे, सर्व आरक्षणे अल्प भूधारकाच्या जमिनीवर घेणे, धार्मिक स्थळाजवळ कचरा ठिकाणाचे आरक्षण, बिल्डरांच्या जमिनी यलो झोन करणे, काही राहत्या घरांवर स्मशान भूमीचे आरक्षण करणे, सदर आराखडा तयार करतांना मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार झालेला असणे, परिणामी सर्व स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांमध्ये पसरलेले चिंतेचे व संतापाचे वातावरण, सदर आरक्षणाबाबत योग्य चौकशी करुन संबंधितांना योग्य न्याय देण्याकरिता शासनाने केलेली वा करावयाची कारवाई."

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------

2......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण : महोदय, औरंगाबादच्या जवळपास असलेल्या 28 गावांचा विकास आराखडा तयार करताना सिडकोला नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त करण्यात आले. पण सिडकोने कोणत्याही ठिकाणी स्थळ पाहणी न करता केवळ कार्यालयात बसून आणि वेबसाईटचा आधार घेऊन प्रारुप आराखडा तयार केला. त्यात ठराविक बिल्डरांच्या शेकडो एकर जमिनी रहिवासी क्षेत्रात घेतल्या आणि ज्या शेतकऱ्यांनी बिल्डरांना जमीन देण्यास विरोध केला, नकार दिला अशा अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या जमिनीवर आरक्षण दाखविण्यात आले. अशा प्रकारे सिडकोच्या अधिकाऱ्यांनी एकरी लाखो रुपये घेऊन विकसित जमिनीवर आरक्षणे टाकली अशी आमची तक्रार आहे. तसेच आराखड्यात सध्या राहत असलेल्या घरांच्या ठिकाणी स्मशान भूमीसाठी आरक्षण दाखविले अशा बाबींच्या संदर्भात आक्षेप व सूचना मागवून त्यांच्या आधारे पडताळणी करण्यात आली, असे सांगण्यात आले, पण त्यानुसार सध्या जो नकाशा प्रसिध्द झाला आहे त्याप्रमाणे राहत्या घरांवर धार्मिक स्थळांचे आरक्षण टाकण्यात आले आहे. एकूणच शाळा, मंदिर व घरे या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे नियम न पाळता आराखडा तयार करण्यात आला आहे. मंत्री महोदयांनी हरकती व सूचना मागविल्याचे निवेदनात म्हटले आहे. सध्या जो आराखडा प्रसिध्द झाला त्याच्या आधारे रहिवासी क्षेत्रात आता परवानगी देण्यात येईल. या निमित्ताने माझा प्रश्न असा आहे की, हा आराखडा पूर्ण चौकशी होईपर्यंत स्थगित ठेवणार आहे काय, तसेच ज्या अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार करुन आराखडा बनविला त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, सध्या शहरांमध्ये नागरीकरण मोठ्या प्रमाणात होत असून दिवसेदिवस शहराची लोकसंख्या वाढत आहे. ही वाढती लोकसंख्या व जमिनीचे वाढलेले भाव विचारात घेता शहरात राहण्यासाठी घरे विकत घेणेही अवघड जाते. म्हणून नागरिक शहराच्या हद्दीच्या बाहेर, नगरपालिका किंवा महापालिका हद्दीच्या बाहेर पण शहराजवळच्याच भागात राहतात आणि संपूर्ण व्यवहार मात्र शहरातच करतात. अशा प्रकारे अगदी नियोजनशून्य व बकाल वस्त्या शहराच्या बाजूबाजूला वाढत आहेत. हीच परिस्थिती औरंगाबाद शहराची झालेली आहे. या शहराच्या बाजूच्या 28 गावांचा सिडकोने आराखडा तयार करावा असा निर्णय शासनाने घेतला व दि. 13 डिसेंबर, 2008 च्या गॅझेटमध्ये नियम 23 अन्वये त्याला प्रसिध्दी देण्यात आली होती.

....3.....



PFK/ D/ KTG/ पूर्वी श्री. भोगले...... 11:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ..........

यासंबंधीची पध्दत अशी आहे की, या सर्व गावांचे गाव नकाशे एकत्र जोडले जातात तेव्हा त्याला आर.पी. लागू होता. पूर्वीचे झोन्स चेंज न करता आहे तसाच आराखडा तयार करण्याचा प्रयत्न नगरविकास विभागाने केलेला आहे. पण सन्माननीय सदस्यांनी असा आराखडा तयार करताना अत्यंत गंभीर तक्रार केलेली आहे. त्यात काही अधिकाऱ्यांनी पैसे घेऊन विकसित जागांवर आरक्षणे टाकण्यात आली. काही अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या जागेवर आरक्षणे टाकली, अशा अनेक गंभीर तक्रारी त्यांनी केल्या. तसेच राहत्या घरांवर स्मशान भूमीचे आरक्षण दाखविण्यात आले आहे. सन्माननीय सदस्यांनी उदाहरणादाखल एखादा पुरावा दिला तर निश्चितपणे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी केली जाईल. तसेच आराखडा अंतिम करण्यापूर्वी नियम 26 अन्वये लोकांच्या हरकती व सूचना मागविण्यात आल्या असून त्यानंतर हा आराखडा शासनाकडे येईल. अधिकचे आक्षेप असतील तर त्यांचाही विचार आराखडा तयार करताना केला जाईल. तसेच ज्या सूचना आलेल्या आहेत किंवा यापुढे येतील त्यांच्या बाबतीत सुध्दा नंतरच्या काळात सुनावणी घेण्यात येईल व त्यानंतरच या आराखड्याला अंतिम मान्यता देण्यात येईल.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, हरकती आल्यानंतर विचार करण्यात येईल असे मंत्री महोदयांनी या ठिकाणी सांगितलेले आहे. यासंदर्भात जो नकाशा पब्लिश करण्यात आलेला आहे त्याच्या खाली असे म्हटले आहे की, "सध्या प्रारुप आराखडयानुसार परवानग्या देण्यात येतील ." सर्व परवानग्या देऊन झाल्यानंतर हरकतीचा काय उपयोग राहणार आहे ? रहिवाशी क्षेत्रामध्ये बिल्डर लोकांना धडाधड परवानग्या देऊन टाकतील. या ठिकाणी बिल्डरांनी इमारती बांधल्यानंतर तुम्ही आरक्षणाचे काय करणार आहात ? प्रारुप आराखडयानुसार परवानगी देणे सुरु आहे. आराखडा पब्लिश होईपर्यंत कोणत्याही प्रकारची परवानगी दिली जाणार नाही असे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, जोपर्यंत यासंदर्भातील आराखडयाला अंतिम स्वरुप दिले जात नाही तोपर्यंत येथील नियोजन प्राधिकरणाला अशा प्रकारच्या परवानग्या देण्याचा कोणताही अधिकार राहणार नाही.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, यासंदर्भात पुरावा दिला तर त्यासंदर्भात चौकशी केली जाईल. यासंदर्भात आमचे म्हणणे असे आहे की, या 28 गावामध्ये छोटे छोटे शेतकरी राहतात. या ठिकाणी सामान्य शेतक-यांच्या जमिनी जाणार आहेत. या विषयाच्या संदर्भात अनेक तक्रारी असून मी व सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण औरंगाबादर शहराचे रहिवासी आहोत. त्यामुळे या प्रश्नाच्या संदर्भात वरिष्ठ अधिका-यांच्या मार्फत सविस्तर चौकशी करुन व लोकांच्या हरकतीचा समावेश करुन या सर्व प्रकरणाची चौकशी केली जाणार आहे काय ? जनतेच्या प्रारुपाबद्दल ज्या काही हरकती आहेत त्याची दखल घेऊन नंतरच हे प्रारुप अंतिम केले जाणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, यासंदर्भात आतापर्यंत 2282 हरकती प्राप्त झालेल्या आहेत त्यामुळे हरकती स्वीकारण्याचे काम सुरु आहे असा त्याचा अर्थ होतो. याही उपर ज्या वेळेला हा आराखडा शासनाकडे येईल त्यावेळेस सन्माननीय सदस्यांना सुध्दा बोलावले जाईल हे सुध्दा मी अगोदर सांगितले आहे तसेच आपल्याकडे यासंदर्भात जर पुरावे असतील तर त्या पुराव्याचीही चौकशी केली जाईल हे सुध्दा मी अगोदर सांगितलेले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी उत्तर देत असतांना नवीन आराखडयाला अंतिम मान्यता देण्यात येत नाही तोपर्यंत परवानगी दिली जाणार नाही असे या ठिकाणी सांगितलेले आहे. जोपर्यंत नवीन आराखडा मंजूर होत नाही तोपर्यंत आपण परवानगी थांबवू शकत नाही. तोपर्यंत मागच्या आरखडया प्रमाणे परवानगी देत असतो. यासंदर्भात शासनाचे अंतिम धोरण काय असणार आहे ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, आदरणीय गुजराथी साहेबांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न उपस्थित केला असून त्यामध्ये मी थोडेस करेक्शन करु इच्छितो. ज्या महानगरपालिकेमध्ये ही 28 गावे जाणार आहेत त्या महानगरापालिकेला परवानगी देण्याचा अधिकार राहणार नाही असे मी म्हटलेले आहे. हे सर्व रिजनल प्लॅनिंगमध्ये येते, त्याला रिझर्व्हेशन नसून झोनिंग असते. आता झ ोनिंगचे कन्र्व्हसेशन डीपीमध्ये केले जाणार आहे. त्यामुळे आपण म्हटल्या प्रमाणे आरपी आणि आताचा डीपी यामधील ज्या तरतुदी आहेत त्या आरपी मधील तरतुदीचा परिणाम हा उद्याच्या प्रपोज डीपीवर होणार नाही याची काळजी घेऊनच निर्णय घेतला जाईल व त्याबाबत सक्त सूचना दिल्या जातील.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, आरपीमध्ये आपण ॲडीशनल विकास आराखडा तयार करीत आहोत असे मंत्री महोदयांनी या ठिकाणी सांगितलेले आहे. जी शासकीय गायरान जागा आहे त्यावर अनेक ठिकाणी रेसीडेंशियल झोन दाखविण्यात आलेले आहे. जी जागा आपल्याला भविष्यात ॲक्वायर करण्याची गरज राहणार नाही अशा जागेवर आपण रेसीडेंशियल झोन दाखविलेले आहे तसेच जी जागा खाजगी आहे त्यावर शाळा, ग्राऊंड, हॉस्पिटल, स्मशानभूमी अशा प्रकारची अनेक आरक्षणे दाखविण्यात आलेली आहेत. जी शासकीय जागा आहे त्यावर म्हणजे आरक्षण दाखविले तर आपल्याला भविष्यात भूसंपादनाची जास्त गरज भासणार नाही त्यामुळे रहिवासी जागेवर जास्तीत जास्त रेसीडेंशियल झोन दाखविला जाणार आहे काय ? अर्बन एरियाचा विकास आराखडा तयार झालेला आहे. आरपी मध्ये आपण दुसरा विकास आराखडा तयार करीत आहोत त्यामुळे यासंदर्भात आपण वाढीव हद्दीचे नोटीफिकेशन काढलेले आहेत काय ?

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, अशा प्रकारचे रिझर्व्हेशन दाखविण्याची आताची स्टेज नाही.आता हरकती आणि सूचना मागविण्याची स्टेज आहे. ज्यावेळी हा आराखडा पुन्हा शासनाकडे येईल आणि सन्माननीय सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे अधिकचे बदल करणे आवश्यक वाटले तर त्याचा विचार निश्चितपणे केला जाईल. ज्यावेळी हा आराखडा शासनाकडे येईल त्यावेळी बदल केला जाईल परंतु आता तो आराखडा तयार करण्यात आला असून तो प्रसिध्दही झाला आहे.त्याचबरोबर या संदर्भात हरकती आणि सूचना मागविण्यात आलेल्या आहेत. त्या हरकती आणि सूचनेमध्ये अशा प्रकारची हरकत घेतली असेल वा सूचना केली असेल तर निश्चितपणे हा विषय पुढे येईल परंतु जरी हा विषय समोर आला नाही तरी ज्यावेळी अंतिम मंजुरीसाठी हा आराखडा शासनाकडे येईल त्यावेळी आपल्या सूचनेचा विचार करता येईल.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, मला प्रश्न विचारावयाचा आहे.

**उप सभापती** : या लक्षवेधी सूचनेवर पुष्कळ प्रश्न विचारण्यात आलेले आहेत त्यामुळे यानंतर सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांची लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. :नागपूर येथील एम्प्रेस मिलमधील कामगारांचे अनिर्णीत प्रश्न

मु.शी.:नागपूर येथील एम्प्रेस मिलमधील कामगारांचे अनिर्णीत प्रश्न
या संबंधी सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुडकर,
ना.गो.गाणार यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वस्त्रोद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"नागपुरातील एम्प्रेस मिल सन २००२ मध्ये बंद करण्यात आलेली असणे, मिल बंद झाल्यानंतर शासनाच्या धोरणानुसार कामगारांना तीन महिन्याचे अग्रीम वेतन देण्याचे बंधनकारक असतानाही फक्त एक महिन्याचे वेतन देण्यात येणे, त्याचप्रमाणे, एका वर्षात कामगारांना १२० दिवसांचे वेतन देण्याचा शासनाचा धोरणात्मक निर्णय असतानाही फक्त ६० दिवसांचेच वेतन देण्यात येणे, एम्प्रेस मिल कामगारांच्या सोसायटीमध्ये रुपये पाच ते दहा कोटी जमा असतानाही कामगारांची देणी अद्यापपावेतो त्यांना देण्यात आलेली नसणे, राज्यातील गिरणी कामगारांना ज्याप्रमाणे पिवळी शिधावाटप पत्रिका देण्यात आली त्याचप्रमाणे एम्प्रेस मिल कामगारांना सुद्धा कायमस्वरुपी पिवळी शिधावाटप पत्रिका देण्याची कामगारांनी केलेली मागणी, नागपुरातील एन.टी.सी.च्या मालकीची मॉडेल मिल बंद झाल्यावर तेथील कामगारांना २२५ चौ.फुटाची सदनिका मोफत देण्याचा एन.टी.सी. कडून निर्णय घेण्यात येणे, त्याच धर्तीवर एम्प्रेस मिल कामगारांना सुद्धा युनिट क्र.३ मधील सध्या मोकळी असलेल्या जागेवर घरे उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, एम्प्रेस मिल कामगारांच्या संदर्भात शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे कामगारांवर आलेली उपासमारीची पाळी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया ."





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नसीम खान (वस्त्रोद्योग मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे

निवेदन

( प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथै छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



- निवेदना नंतर -

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नागपूरच्या एम्प्रेस मिलसबंधीची अत्यंत महत्वाची ही लक्षवेधी सूचना आहे. 2002 साली एम्प्रेस मिल बंद झाली होती आणि त्या मिलच्या जागेचा ताबा महाराष्ट्र वस्त्रोद्योग महामंडळाने घेतला होता. 2002 पासून 2010 पर्यत तेथील कामगारांचे प्रश्न अजून पर्यत सुटलेले नाहीत. माननीय मंत्र्यांनी लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने जे निवेदन दिलेले आहे ते नकारात्मक आहे. लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने आम्ही जे प्रश्न विचारले होते त्याचे समाधानकारक उत्तर या निवेदनामध्ये देण्यात आलेले नाही. त्यावेळेला कामगारांना तीन महिन्याचे अग्रिम वेतन देण्याचे शासनाचे धोरण असतांना कामगारांना फक्त 60 दिवसांचे वेतन दिले होते. नागपूरची मॉडेल मिल बंद झाल्या नंतर तेथील कामगारांना वर्षाला प्रती दिन 103 या प्रमाणे व्ही.आर.एस.ची रक्कम देण्यात आली होती परंतु एम्प्रेस मिलमधील कामगारांना वर्षाला प्रती दिन 65 याप्रमाणे व्ही.आर.एस.ची रक्कम देण्यात आली होती.उरलेली रक्कम केव्हा देण्यात येणार आहे?. एम्प्रेस मिलमधील कामगारांना पुरेसे वेतन दिलेले नाही त्याचबरोबर व्ही.आर.एस.ची रक्कम देखील पूर्णपणे दिली गेली नाही. गुजराथ पॅटर्न स्वेच्छा निवृत्ती योजनेअंतर्गत सुरुवातीला 25 अधिक 35 अधिक 60 प्रतीवर्ष याप्रमाणे वेतन देण्यात आले होते हे मी मान्य करतो त्याचबरोबर तेवढयाच स्वरुपात अंशदान रोख देण्याचा निर्णय झालेला असतांना आजपर्यत या कामगारांना ही रक्कम मिळालेली नाही.त्याचबरोबर भविष्य निर्वाह निधीची योजना 1995 सालापासून लागू करण्यात आली होती परंतु वाढीव रक्कम या कामगारांना देण्यात आली नाही. या एम्प्रेस मिलच्या कामगारांची एक सोसायटी असून त्या सोसायटीमध्ये कामगारांच्या गंगाजळीचे 10 ते 11 कोटी रुपये जिल्हा उप निबंधकाकडे जमा आहेत.हे पैसे कामगारांना अजून मिळालेले नाहीत. आठ वर्षापासून सदर सोसायटीचा दैनंदिन व्यवहार बंद आहे. काही राजकीय व्यक्तीच्या प्रभावाखाली सदर सोसायटीचे पदाधिकारी कामगारांकडून अजूनही कर्जाच्या पोटी रक्कम वसूल करीत आहेत. वस्त्रोद्योग महामंडळाने या सोसायटीला जवळजवळ 7 कोटी रुपये दिलेले आहेत . या 7 कोटी रुपयाची नोंद सोसायटीच्या रेकॉर्डमध्ये नाही तेव्हा या निधीचा अपहार झाला काय अशी परिस्थिती निर्माण झ ालेली आहे. एम्प्रेस मिलच्या कामगारांचे अनेक प्रश्न 2002 सालापासून प्रलंबित आहेत. या मिलमधील कामगारांना बी.पी.एल.चे कार्ड देण्यात आलेले नाही. ज्याप्रमाणे

5..



श्री.पांडुरंग फुंडकर ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईतील गिरणी कामगारांना पिवळे बी.पी.एल.चे कार्ड देण्यात आले होते तशा प्रकारचे पिवळे बी.पी.एल.चे कार्ड एम्प्रेस मिलमधील कामगारांना देण्यात आलेले नाही. मी जे चार पाच मुद्दे उपस्थित केलेले आहे त्याबाबतीत माननीय मंत्र्यांनी समाधानकारक उत्तर दिले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री नितीन गडकरी एम्प्रेस मिलसंबंधीचा प्रश्न प्रत्येक अधिवेशनामध्ये उपस्थित करीत होते परंतु अजूनपर्यत त्या कामगारांचे प्रश्न सुटलेले नाहीत मी जे चार पाच मुद्दे उपस्थित केलेले आहे त्याबाबतीत सरकारचे काय म्हणणे आहे ?

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापती स्थानी तालिका सभापती श्री. रामनाथ मोते)**

श्री. नसीम खान : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी कामगारांना पैसे मिळाले नाहीत असे म्हटले आहे ते चुकीचे आहे. मी या बाबत स्पष्टपणे सांगू इच्छितो की, सन 2002 पासून ही मिल बंद करण्याची प्रक्रिया सुरु झाल्यानंतर राष्ट्रीय मिल मजदूर या कामगार संघटनेने लेबर कोर्टामध्ये धाव घेतली. त्यानंतर एमएसटीसी इंडस्ट्रियल कोर्टामध्ये गेल्याचे समजल्यानंतर पुन्हा राष्ट्रीय मिल मजदूर संघाने उच्च न्यायालयामध्ये धाव घेतली. त्यावेळी उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार एमएसटीसीने त्याची संपूर्णपणे अंमलबजावणी केली. यामध्ये एकूण 2814 कामगार असून त्यांच्या बाबतीत कोर्टाने असे निदेश दिले की, आपल्या राज्यामध्ये असलेल्या सेंट्रल इंडस्ट्रिअल डिस्पूट ॲक्टमधील तरतुदीनुसार कोणतीही मिल बंद होत असेल तर कामगारांना 90 दिवसांचा पगार दिला जातो. परंतु त्या बाबतीत विवाद झाल्यानंतर कोर्टाने असा मार्ग सुचविला की, गुजरात राज्यामध्ये नवीन पॅटर्न स्वीकारण्यात आला असून तो गुजरात पॅटर्न कामगारांना मान्य असेल तर त्यांनी शपथ पत्र लिहून ध्यावे. मला याठिकाणी स्पष्ट करावेसे वाटते की, सेंट्रल इंडस्ट्रिल डिस्पूट ॲक्टमधील तरतुदीनुसार लाभ देण्याबाबत कामगारांनी शपथ पत्र लिहून दिले असते तर त्यांना जास्त फायदा झाला असता. परंतु त्यांनी गुजरात पॅटर्नप्रमाणे आम्हाला लाभ देण्यात यावा अशाप्रकारे शपथ पत्र लिहून दिले. त्याप्रमाणे 2814 कामगारांना एकूण 64 कोटी रुपयांचे प्रदान करण्यात आले असून कुणाचेही पैसे बाकी राहिलेले नाहीत.

दुसरा प्रश्न या कामगारांना पिवळे कार्ड देण्याबाबतचा आहे. या 2814 कामगारांना कार्ड देण्याचे शासनाचे धोरण असून त्याप्रमाणे नागपूरच्या एफडीओ यांना सूचना दिल्या आहेत. मी या बाबत अधिकाऱ्यांकडून माहिती घेतल्यानंतर या सर्वांना तात्पुरते कार्ड देण्याची व्यवस्था करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा तात्पुरत्या कार्डचा विषय नाही. मी याठिकाणी असा मुद्दा उपस्थित केला होता की, मुंबईच्या गिरणी कामगारांना ज्या पध्दतीने पिवळे कार्ड देण्यात आले त्याप्रमाणे आपण निर्देश दिल्यानंतर सुध्दा संबंधित अधिकाऱ्यांनी त्या कामगारांना पिवळे कार्ड दिले नाही. सन 2002 मध्ये मिल बंद झाल्यानंतर आज 2011 पर्यंत इतक्या वर्षामध्ये त्यांना कार्ड



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

कां देण्यात आले नाही? त्याचप्रमाणे आपण व्हीआरएसच्या उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबत उत्तर दिले नाही. त्यांना वेतन देण्यात आले नाही असे मी म्हटले नाही, फक्त 60 दिवसांचेच वेतन त्यांना देण्यात आले आहे. या कामगारांना पिवळे कार्ड किती दिवसात देण्यात येईल?

श्री. नसीम खान : सभापती महोदय, जर एफडीओकडून त्यांना पिवळे कार्ड मिळाले नसेल तर ते त्यांना त्वरीत देण्याबाबत निदेश देण्यात येतील. मला देण्यात आलेल्या माहितीनुसार त्यांना कार्डाचे वाटप झाले आहे. तरी सुध्दा माननीय विरोधी पक्षनेते सभागृहामध्ये देत असलेली माहिती ग्राह्य धरुन व या बाबत सखोल माहिती घेऊन ताबडतोब एक आठवडयात त्या कामगारांना कार्डाचे वितरण करण्याचे निदेश त्या विभागाला देण्यात येतील.

श्री. पांडुरंग फुंडकर : मंत्री महोदय, आपल्याला मिळालेल्या माहितीनुसार त्या कामगारांना लाल, पिवळे, पांढरे, गुलाबी यापैकी कोणत्या रंगाचे कार्ड मिळाले ते सांगा?

श्री. नसीम खान : त्यांना बीपीएलचे कार्ड देण्यात आले...

श्री. पांडुरंग फुंडकर : त्यांना अजूनपर्यन्त पिवळे कार्ड मिळाले नाही.

श्री. नसीम खान : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते या ठिकाणी देत असलेली माहिती खरी समजून त्या कामगारांना कार्ड मिळाले नसेल तर त्या विभागाच्या अधिकाऱ्यांशी बोलून त्वरित कार्ड देण्याची व्यवस्था केली जाईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. त्या कामगारांना कार्ड मिळाले होते, मिळाले नाही अशापध्दतीने सभागृहामध्ये उत्तर देता येत नाही. जर त्यांना कार्ड दिले गेले नसेल तर या ठिकाणी देण्यात आलेले उत्तर दुरुस्त करण्यात आले पाहिजे. माननीय विरोधी पक्षनेते या ठिकाणी पिवळे कार्ड मिळाले नाही अशी माहिती देत आहेत आणि मलाही माहीत आहे की, त्या कामगारांना पिवळे कार्ड मिळाले नाही. तरी सुध्दा अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारावर या ठिकाणी सभागृहाची दिशाभूल केली जात असेल तर ते योग्य नाही आणि म्हणून अशाप्रकारे दिशाभूल करणाऱ्या अधिकाऱ्यांवर आपण कारवाई करणार काय?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशोधित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस . . ..

माननीय मंत्री महोदयांना जे उत्तर द्यावयाचे आहे ते त्यांनी ठामपणे द्यावे.जर आपल्या हातामध्ये चुकीचे उत्तर असेल तर संबंधितांवर कारवाई करावी आणि सदरहू लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी.

श्री.नसीम खान : सभापती महोदय, आपल्याला माहिती आहे की, रेशनिंग विभाग हा वेगळा आहे आणि वस्त्रोद्योग विभाग वेगळा आहे. मी या विषयाच्या संबंधात ब्रिफींगच्या वेळेस जी माहिती घेतलेली आहे, ती मी आपल्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांना सांगितलेली आहे आणि तरी सुध्दा त्यामध्ये ॲड केलेले आहे की, जर त्यांना पिवळे कार्ड देण्यात आले नसेल तर त्वरित देण्याची व्यवस्था करण्यात येईल असे स्पष्ट उत्तर देण्यात आलेले आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेब यांनी तेथे रहात असलेल्या कामगारांच्या घराबाबत प्रश्न विचारलेला आहे. शासनाचे जे धोरण आहे, त्याप्रमाणे जे कामगार तेथे रहात होते, त्या सर्वांना घरे देण्याच्या बाबतीत निर्णय घेण्यात आलेला आहे. एम्प्रेस मिलच्या आवारामध्ये जे 177 कामगार रहात होते, त्या सर्वांना घरे देण्याच्या बाबतीत निर्णय झालेला आहे आणि त्यांना घरे देण्याच्या बाबतीत व्यवस्था करण्यात आलेली आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगितले की, तेथील कामगारांना घरे देण्यात येणार आहेत. पण याठिकाणी निवेदनामध्ये पान क्र.3 वर अशा प्रकारे उल्लेख केलेला आहे की,"एम्प्रेस मिल नं.3 येथील जागेवर शासनाने नीतीनिर्धारणानुसार गामेंट पार्क उभारण्याचे प्रायोजित असून तेथे रोजगारांच्या संधी उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे तेथील मोकळी जागा कामगारांना घरे उपलब्ध करुन देण्याकरिता मंजूर करणे शक्य नाही."असे शासनाचे उत्तर आहे आणि आता असे सांगण्यात येत आहे की,आम्ही कामगारांना घरे देणार आहोत.त्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर खरे मानावयाचे की निवेदनामध्ये लेखी स्वरुपामध्ये जे उत्तर दिलेले आहे ते खरे मानावयाचे हा प्रश्न आहे. याठिकाणी शेतकरी असो, कामगार असो त्यांच्या संबंधात सदनामध्ये जेव्हा-जेव्हा प्रश्न उपस्थित होतात, तेव्हा-तेव्हा त्यांच्या प्रत्येक गोष्टीबाबत वाटाण्या अक्षता लावण्याचा जो प्रकार होत आहे ते बरोबर नाही. जर शासनाला या कामगारांना घरे द्यावयाची असतील तर घरे देऊ असे सांगावे. परंतु याठिकाणी आम्ही देऊ शकत नाही, नंतर भविष्यामध्ये जर गिरण्या बंद झाल्या तर तो पायंडा पडेल असे सांगण्याचा प्रयत्न केला जातो. ज्या कामगारांनी त्याठिकाणी एवढी वर्षे नोकरी केली. त्यांनी सरकारी जागा ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस . . . .

उपलब्ध करुन दिली म्हणून तेथे मिल उभी राहिली.परंतु एकीकडे मिल मालकांचे हित सांभाळावयाचे म्हणून तुम्ही येथील मजूरांना वेठीस धरलेले आहे. नऊ वर्षे झाली आहेत . . ..

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते)** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, येथील गिरणी कामगारांना जागा देतो असे जे सांगण्यात आले आहे, ती कोणती जागा देण्यात येणार आहे ? कारण त्यांच्या जागेवर गारमेंट उभे करण्यात येणार आहे, परंतु त्यानंतर आता नऊ वर्षाचा कालखंड झाला आहे तरी देखील या कामगारांना कोणतीही रोजगाराची संधी उपलब्ध नाही. त्यांच्याकडे पैसे नाहीत आणि असे असताना आता त्यांना जागा उपलब्ध करुन देतो असे सांगण्यात येत आहे. तर ती जागा केव्हा उपलब्ध करुन देणार आहात ? याचे उत्तर देण्यात यावे. दुसरी गोष्ट म्हणजे तेथील सोसायटीशी त्या कामगारांचा काहीही संबंध नाही असे म्हटले आहे तर मग सोसायटी कामगारांकडून कर्ज वसुली का करीत आहे? कामगारांचा सोसायटीशी संबंध नाही, काही देणे नाही मग त्यांच्याकडून कसले घेणे आहे? याबाबतीत याठिकाणी स्पष्टपणे उल्लेख झाला पाहिजे आणि त्याचे उत्तर मिळणे आवश्यक आहे.

श्री.नसीम खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या कामगारांच्या पैशाबद्दल प्रश्न उपस्थित केलेला आहे. एम्प्रेस मिलमध्ये कामगारांची क्रेडीट संस्था होती. मिल बंद झाल्यानंतर कामगारांकडून 231 लाख रुपये येणे बाकी होते, त्यानुसार सर्व कामगारांकडून 2 कोटी 31 लाख रुपये वसूल करुन सोसायटीकडे देण्यात आलेले आहेत.

श्रीमती शोभा फडणवीस (खाली बसून) : परंतु सोसायटीकडे कामगारांचे किती पैसे जमा होते ते सांगावे.

श्री.नसीम खान : सभापती महोदय, जे पैसे जमा होते ते 2 कोटी 31 लाख रुपये आहेत.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सोसायटीकडे कामगारांचे किती पैसे जमा होते ? माननीय मंत्री महोदय कामगारांनी घेतलेल्या कर्जाबाबत सांगत आहेत. पण त्या कामगारांचे 11 कोटी रुपये जमा होते आणि ती कामगारांची सोसायटी असल्यामुळे कामगारांच्या घामातून निर्माण झालेला तो पैसा आहे आणि माननीय मंत्री महोदय येथे कर्जाच्या बाबतीत माहिती देत आहेत. कामगारांचे किती पैसे जमा होते याची माहिती द्यावी आणि ती रक्कम त्यांना कधी परत करणार आहात याचेही उत्तर देण्यात यावे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नसीम खान : सभापती महोदय, 231 लाख रुपये जमा होते, त्यासंदर्भात मी सन्मानीय सदस्यांना उत्तर दिलेले आहे. ज्यावेळेला गुजराथ पॅटर्नच्या आधारावर पैसे वितरण करण्याचे काम एम.एस.टी.सी.ने सुरु केले. त्यावेळी याबाबत सोसायटीकडून माहिती मागवून ते पैसे कापून पुन्हा सोसायटीला परत करण्यात आलेले आहेत. मात्र कामगारांचे सोसायटीकडे किती पैसे जमा आहेत याबाबतीत माहिती घेऊन सोसायटीला तशा प्रकारची कारवाई करण्याच्या बाबतीत आपण अधिकाऱ्यांना तसे निर्देश देऊ.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, निवेदेनामध्ये असे म्हटले आहे की,"एम्प्रेस मिल, नागपूर सरु असतांना कामगारांची सहकारी संस्था कार्यरत होती. गिरणी बंद झाल्यानंतर सदरहू सहकारी संस्थेचा व वस्त्रोद्योग महामंडळाचा कसल्याही प्रकारचा संबंध नाही." गिरणी कामगारांनी त्याच ठिकाणी सोसायटी निर्माण केली होती. प्रत्येक कामगाराचा शेअर आणि डिपॉझिट मिळून त्या सोसायटीमध्ये दहा ते अकरा कोटी रुपये गोळा झालेले आहेत. ज्यावेळी ही मिल बंद झाली त्यावेळी हे पैसे जिल्हा उप निबंधकाकडे जमा राहिले. हा पैसा कामगारांचा आहे, तो अद्याप कामगारांना मिळालेला नाही. या कामगारांवर जे कर्ज होते ते त्यांच्याकडून वसूल करण्याची कारवाई करण्यात आली पण कामगारांचा जमा असलेला पैसा अद्याप या कामगारांना मिळालेला नाही. म्हणून जिल्हा उप निबंधकांना असे आदेश देण्यात येतील काय, या कामगारांचा जमा असलेला पैसा एका महिन्याच्या आत,दोन महिन्याच्या आत ताबडतोब सर्व कामगारांना देण्यात यावा. सात कोटी रुपये वस्त्रोद्योग महामंडळाने या सोसायटीला दिलेले आहेत. म्हणजे शासनाचे सात कोटी रुपये आणि कामगारांचे अकरा कोटी रुपये सोसायटीमध्ये जमा आहेत. जिल्हा उप निबंधक याबाबतीत कुठलाही निर्णय घेण्यास तयार नाहीत. त्यामुळे गेली दहा वर्षे कामगार लटकलेले आहेत. या खात्याचे मंत्री म्हणून मंत्री महोदयांनी पुढाकार घेऊन संबंधित जिल्हा उप निबंधकांना ताबडतोब निर्देश देऊन या कामगारांचे पैसे देण्यास सांगण्यात येईल काय?

श्री. नसीम खान : सभापती महोदय, जिल्हा उप निबंधकांचे कार्यालय दुसऱ्या विभागाशी संबंधित आहे तरी सुध्दा कामगारांचा प्रश्न असल्यामुळे शासनाचे धोरण नेहमी कामगारांच्या बाजूने असते. कामगारांना हे पैसे मिळाले नसतील तर हे पैसे लवकरात लवकर मिळावे यासाठी जी काही व्यवस्था करावी लागेल ती नक्की करण्यात येईल.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, कामगारांच्या हक्काची कमाई भविष्य निर्वाह निधी पेन्शन ही 1995 पासून लागू झाली. महागाई वाढली पण या कामगारांची भविष्य निर्वाह निधी पेन्शन वाढलेली नाही. म्हणून मला शासनाला विचारावयाचे आहे की, भविष्य निर्वाह निधी पेन्शन 1995 पासून लागू झालेली आहे. पण त्यामध्ये कुठलीही वाढ लागू झालेली नाही, तेव्हा या बाबातीत शासनाची भूमिका काय? माझा दुसरा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे, वस्त्रोद्योग महामंडळाने सोसायटीला दिलेले सात कोटी रुपये सोसायटीकडे दिसतच नाहीत तेव्हा याची सखोल चौकशी करुन ती सभागृहाच्या पटलावर ठेवणार काय?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नसीम खान : सभापती महोदय, होय.

श्री. पांडुरंग फुंडकर : सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी या ठिकाणी असा प्रश्न विचारला की, या महामंडळाने सात कोटी रुपये या सोसायटीला दिले. या सोसायटीला या महामंडळाने सात कोटी रुपये दिलेले आहेत हे मंत्री महोदयांनी मान्य केलेले आहे. सोसायटीमध्ये जमा असलेले कामगारांचे पैसे देण्यात आलेले नाहीत. जर हा पैसा कामगारांना मिळाला नसेल आणि तो खात्यामध्येही जमा नसेल तर या पैशाचा अपहार झालेला आहे. त्या अपहाराची चौकशी करण्यात येणार आहे काय? हा पैसा शासनाचा आहे. त्याची चौकशी करुन, ज्यांनी कामगारांच्या पैशाचा अपहार केला असेल त्यांच्याकडून तो पैसा वसूल करुन, त्यांच्यावर कारवाई करुन तो पैसा कामगारांना देण्यात येईल काय?

श्री. नसीम खान : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यानी या ठिकाणी दोन-तीन मुद्दे उपस्थित केलेले आहेत. या सर्व मुद्यांची त्वरित आजच्या आज चौकशी करण्याचे निर्देश देण्यात येतील आणि जी शक्य असेल ती कारवाई करण्यात येईल.

=x=

**लक्षवेधी सूचना क्रमांक 2 बाबत**

**तालिका सभापती ( श्री. रामनाथ मोते )** : आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये अनुक्रमांक 2 वर दाखविण्यात आलेली लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आलेली आहे त्यामुळे आता लक्षवेधी सूचना क्रमांक 3 चर्चेला घेण्यात येईल.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ 12:10

**पू. शी.** : मुंबई महानगरपालिकेची इंम्प्रुव्हमेंट स्कीम नं.52 ही विकास योजना वरळी कोळीवाडा गावात राबवित असताना येथील प्लॉट्सना सिटी सर्व्हे क्रमांक देण्यात न येणे.

**मु. शी.** : मुंबई महानगरपालिकेची इंम्प्रुव्हमेंट स्कीम नं.52 ही विकास योजना वरळी कोळीवाडा गावात राबवित असताना येथील प्लॉट्सना सिटी सर्व्हे क्रमांक देण्यात न येणे यासंबंधी सर्वश्री सुभाष चव्हाण,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सुभाष चव्हाण ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई महागनरपालिकेची इंम्प्रुव्हमेंट स्कीम नं-52 ही विकास योजना सन 1918-19 मध्ये वरळी कोळीवाडा गावात राबवित असताना भू-संपादन अधिकाऱ्यांना गावकऱ्यांनी केलेल्या विरोधामुळे येथील प्लॉटना अद्याप सिटी सर्व्हे क्रमांक (CTS) देण्यात न येणे, येथे रहात असलेले मूळ 457 घरमालक व अंदाजे 15,000 भाडेकरु यांच्या मालकी हक्कांबाबत व भाडे पट्टयाबाबत अद्यापही संभ्रमावस्था निर्माण होणे, प्रॉपर्टी कार्डला नाव लावण्यात आले नसल्याने येथील जीर्ण बांधकामे पुनर्विकासाच्या प्रस्तावासाठी दाखल न करता येणे, यामुळे येथील रहिवासी मूलभूत नागरी सुविधांपासून वंचित राहणे, त्याचप्रमाणे वरळी कोळीवाडा लगतच लागून भारतीय तटरक्षक दल, नेव्हीची आय.एन.एस.रडार यंत्रणा असल्याने सरकारने सागरी नियंत्रण क्षेत्र (CRZ) बाबत नियमात शिथिलता केली असून देखील त्याचा फायदा वरळी कोळीवाडा भागातील नागरिकांना न मिळणे, यामुळे येथील नागरिकांत पसरलेली असंतोषाची भावना, याबाबतीत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. प्रकाश सोळंके ( महसूल राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

..4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

**तालिका सभापती** :  निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, मुंबईतील वरळी कोळीवाड्यात राहणाऱ्या लोकांचा हा महत्वाचा प्रश्न आहे. मुंबई शहराची जी इम्प्रुव्हमेंट स्किम 52 आहे ती 1918 मध्ये आली आणि त्या गोष्टीला आता जवळजवळ 100 वर्षे पूर्ण झालेली आहेत. वरळी गाव किंवा वरळी व्हिलेज हा मुंबईचा केंद्रबिंदू आहे. ही सगळी वस्ती समुद्रकिनारी आहे. त्या ठिकाणी जवळजवळ 2 ते 3 लाख लोकांची वस्ती आहे. ते लोक समुद्रकिनारी राहात असल्यामुळे त्या बांधवांना आजतागायत सिटी सर्व्हे क्रमांक, प्रॉपर्टी कार्ड मिळालेले नाहीत. फक्त 224 क्रमांकाचा सिटी सर्व्हे क्रमांक मिळालेला आहे. संपूर्ण कोळीवाड्याला ते मिळालेले नाही. शासनाने जे निवेदन केलेले आहे त्यामध्ये समाधानकारक उत्तर आलेले आहे. म्हणजे लक्षवेधी सूचना दिल्यानंतर हालचाली सुरु झाल्या. 457 पैकी 270 मिळकत पत्रिकांवर त्या लोकांच्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. उर्वरित जे 187 लोक राहिलेले आहेत त्यांना सिटी सर्व्हे नंबर देऊन त्यांच्या नावाचा समावेश प्रॉपर्टी कार्डमध्ये करण्यासाठी शासन पुढाकार घेणार आहे का ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांनी एका महत्वपूर्ण प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधलेले आहे. जी स्किम नंबर 52 आहे त्यामध्ये भूसंपादनाच्या प्रक्रियेतून वगळण्यात आलेल्या 457 पैकी 270 मिळकत पत्रिकांवर टेनंट म्हणून त्यांची नावे लागलेली आहेत. उर्वरित 187 लोकांची नावे लागलेली नाहीत. ज्यावेळी ही भूसंपादनाची कार्यवाही रद्द झाली त्यावेळी जो मोबदला त्यांना देण्यात आला होता तो त्यांनी परत द्यावा आणि मिळकतीवर नाव लावून घ्यावे अशा प्रकारचा ठराव बीआयटीमध्ये झालेला होता. परंतु या गोष्टीला आता बराच कालावधी लोटलेला आहे त्यामुळे या बाबतीत निश्चितपणे महसूल विभाग, मुंबई महानगरपालिका आणि रहिवाशांचे प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक घेऊन त्यांची नावे या मिळकतीवर टेनंट म्हणून कशी लावावयाची या बाबतीत मार्ग काढला जाईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. त्यांनी ज्या ठरावाचा संदर्भ दिला तो स्थायी समितीचा ठराव 1933 साली झालेला आहे. त्यानंतर किती तरी कालावधी गेलेला आहे. त्यानंतर आपण अनेक कायद्यांमध्ये बदल केले, सुधारणा केल्या. अलीकडे आपण सीआरझेडमध्ये सुध्दा सुधारणा

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ....

आणलेली आहे आणि त्या माध्यमातून जे कोळीवाडे असतील किंवा गावठाणे असतील त्यांच्या विकासाची कामे आपण हाती घेतलेली आहेत आणि त्यासाठी शासन अभिनंदनास पात्र आहे. हे 187 लोक इतके दिवस त्यांच्या अधिकारापासून वंचित आहेत. त्याला काही कारणे असतील. येत्या एक महिन्यामध्ये ही प्रक्रिया पूर्ण होईल का आणि त्यांची नावे सीटीएस नंबर आणि प्रॉपर्टी कार्डमध्ये येतील का ? दुसरी बाब अशी की आपण 2011 मध्ये कायद्यात बदल केलेला आहे. तो कायदा या ठिकाणी पारित केल्यानंतर अजूनही त्याची अंमलबजावणी झालेली नाही. ती अंमलबजावणी त्वरित होऊन या ज्या जीर्ण झालेल्या इमारती आहेत किंवा घरे आहेत त्यांच्या पुनर्बांधणीसाठी किंवा दुरुस्तीसाठी शासन मदत करणार का ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी विचारल्याप्रमाणे या मिळकतीवर ज्यांचे टेनंट म्हणून आजपर्यंत नाव लागू शकलेले नाही त्या बाबतीत एक महिन्याच्या आत बैठक घेऊन कोणती कार्यपध्दती अनुसरावयाची आणि कशा पध्दतीने त्यांचे नाव लावले जाईल या बाबतीत निश्चितपणे मार्ग काढला जाईल. सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारलेला आहे त्या बाबत सांगू इच्छितो की, आता सीआरझेडच्या बाबतीत 6 जानेवारी, 2011 रोजी जी अधिसूचना जारी झालेली आहे त्याप्रमाणे कोळीवाडे आणि गावठाणे यांना सीआरझेड म्हणून घोषित करण्यासाठी आणि त्यांच्या एकत्रित विकासासाठी राज्य शासनाने आराखडा तयार करावा असे अपेक्षित आहे. या विकास आराखड्यामध्ये जे कोळीवाडे आणि गावठाणे आहेत त्यांचे नकाशे आणि सीमांचे रेखांकन करणे आवश्यक आहे. त्या संदर्भामध्ये पर्यावरण विभाग आणि महसूल विभाग संयुक्तपणे पहिल्यांदा नकाशे तयार करण्याचे काम हाती घेईल. नकाशे आणि सीमांकन झाल्यानंतर सीआरझेडच्या बाबतीत नोटिफिकेशन काढण्याची कार्यवाही निश्चितपणे आपल्याला करता येईल.

---

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**पृ. शी.** : मुंबईतील जोगेश्वरी येथील शिक्षण निरीक्षक कार्यालयातील भविष्य निर्वाह निधी विभागात बोकाळलेला प्रचंड भ्रष्टाचार

**मु. शी.** : मुंबईतील जोगेश्वरी येथील शिक्षण निरीक्षक कार्यालयातील भविष्य निर्वाह निधी विभागात बोकाळलेला प्रचंड भ्रष्टाचार यासंबंधी सर्वश्री भाई जगताप, चरणसिंग सप्रा, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. भाई जगताप ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबईतील जोगेश्वरी येथील शिक्षण निरीक्षक कार्यालयातील भविष्य निर्वाह निधी विभागात बोकाळलेला प्रचंड भ्रष्टाचार, अनेक वर्षापासून शिक्षकांनी भविष्य निर्वाह निधीतून कर्जाची केलेली मागणी, मागणी रास्त असूनही भविष्य निर्वाह निधी कार्यालयातून शिक्षकांकडून अर्ज मंजूरीसाठी पैशांची होत असलेली मागणी, पैसे न दिल्यास अर्ज नामंजूर करणे, कर्जाचा पहिला हप्ता जरी दिला असला तरी दुसऱ्या हप्त्यासाठी सदर अर्जदाराकडून पैशाची मागणी, पैसे न दिल्यामुळे गेल्या अनेक महिन्यांपासून अनेकांना दुसऱ्या हप्ता न मिळणे, त्यामुळे हक्काच्या पैशांपासून वंचित रहावे लागत असल्याने अर्जदारांचे, शिक्षकांचे होत असलेले प्रचंड नुकसान, या भविष्य निर्वाह कार्यालयात गेल्या अनेक वर्षांपासून कर्मचाऱ्यांच्या न झालेल्या बदल्या, त्यामुळे कामात होत असलेला विलंब, गरज असतांना स्वत:च्या कमाईचा पैसा न मिळाल्यामुळे अर्जदार शिक्षकांमध्ये असलेला प्रचंड असंतोष, याविषयी शासनाची भूमिका."

प्रा. फौजिया खान ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**तालिका सभापती (श्री. रामनाथ मोते)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, भविष्य निर्वाह निधी हा कामगारांचा असो की शिक्षकांचा असो हा त्यांचा अधिकार आहे. मंत्री महोदयांनी या संदर्भात निवेदनात काही गोष्टी नमूद केलेल्या आहेत. माझ्या महत्वाच्या प्रश्नाला या निवेदनात उत्तर मिळालेले नाही. भविष्य निर्वाह निधी कोणत्या कारणासाठी काढला जातो हे सगळयांना माहीत आहे. ते केवळ शिक्षकांनाच माहीत असते असे नाही तर कामगारांना सुध्दा माहीत असते. कारण ती त्यांच्या आयुष्याची पुंजी असते. त्यामुळे या निवेदनातील उत्तर आम्हाला अपेक्षित नव्हते. भविष्य निर्वाह निधी कार्यालयात भ्रष्टाचार होतो हा खरा मुद्दा आहे. हा निधी त्यांचा आहे. तो मिळण्यासाठी एखाद्याने अर्ज केला असेल तर त्यावर संबंधितांना निर्णय दिला पाहिजे. हा निधी एकाच हप्त्यामध्ये दिला पाहिजे. शिक्षकांचा पैसा आहे. त्यांना पैशाची गरज असते दोन हप्त्यात देण्याचे कारण काय, एका हप्त्याचे पैसे दिल्यानंतर त्यांनी दुसऱ्या हप्त्याची वाट बघत बसावयाचे काय, या प्रश्नाचे निवेदनातून उत्तर मिळालेले नाही. त्यामुळे मंत्री महोदय सुधारित उत्तर देणार आहेत काय ? या प्रश्नाची व्याप्ती मोठी आहे. निवेदनात असेही म्हटलेले आहे की, भविष्य निर्वाह निधी कार्यालयात पुरेसा कर्मचारी वर्ग नाही. आज अनेक कार्यालयांमध्ये पुरेसा कर्मचारी वर्ग नाही. पण या कारणास्तव कर्मचाऱ्यांचा पैसा अडवून ठेवला पाहिजे, पैसे दिल्याशिवाय आम्ही त्यांना पैसे देणार नाही असा त्याचा अर्थ होत नाही. म्हणून मंत्री महोदय निवेदनात बदल करणार आहेत काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई पश्चिम विभाग, जोगेश्वरी या कार्यालयाच्या अधिपत्याखाली जे क्षेत्र आहे त्या क्षेत्रांमधून 3 वर्षामध्ये जे अर्ज प्राप्त झाले होते त्याची आकडेवारी मी सांगू इच्छिते. सन 2008-09 मध्ये 618 प्रकरणे प्राप्त झाली होती, त्यापैकी त्या वर्षी 608 प्रकरणे मंजूर करण्यात आली व 10 प्रकरणे प्रलंबित होती. सन 2009-10 मध्ये 420 प्रकरणे आली होती ती सर्व मंजूर करण्यात आली होती. सन 2010-11 मध्ये आलेल्या प्रकरणांपैकी जास्त प्रकरणे प्रलंबित होती. त्याची कारणे मी सांगितलेली आहेत. परंतु आज त्या कार्यालयात एकही प्रकरण प्रलंबित नाही, 380 प्रकरणे मंजूर केलेली आहेत. 30 प्रकरणे त्रुटींच्या पूर्ततेसाठी शाळांना परत पाठविलेली आहेत.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला निवेदनातही उत्तर मिळालेले नाही. त्यामुळे मंत्री महोदय सुधारित उत्तर देणार आहेत का असे विचारले होते. मंत्री महोदय आता जी माहिती देत आहेत त्या बाबत मी प्रश्न विचारलेला नव्हता. मी त्या कार्यालयातील भ्रष्टाचाराबाबत

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.भाई जगताप....

प्रश्न विचारला होता. मंत्री महोदय भविष्य निर्वाह निधी मंजूर करण्याच्या प्रक्रियेची माहिती देत आहेत, तशा प्रकारची प्रक्रिया जवळपास सर्वच कार्यालयामध्ये अनुसरली जाते. त्यामुळे ते सांगण्याची आवश्यकता नाही. भविष्य निर्वाह निधीतील कामगारांचे हक्काचे पैसे दोन हप्त्यामध्ये देण्याचे कारण काय असा माझा प्रश्न होता. त्यांचा स्वत:चा पैसा मिळविण्यासाठी कामगारांना वेगवेगळया स्तरावर पैसे द्यावे लागतात. म्हणून मी प्रश्न विचारला होता.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाला उत्तर देण्यापूर्वी असे सांगावयाचे आहे की, त्या कार्यालयात आज एकही प्रकरण प्रलंबित नाही. त्यांच्याकडे आलेली प्रकरणे त्रुटींची पूर्तता करण्यासाठी परत पाठविलेली आहेत. सन्माननीय सदस्यांनी भ्रष्टाचारासंबंधी उल्लेख केला आहे. त्याबाबत मी त्यांना एवढेच सांगेन की, भ्रष्टाचाराविषयी आपण काही तरी ॲब्स्ट्रॅक्ट द्यावे. भ्रष्टाचाराविषयी शासन काय करणार आहे असे त्यांनी विचारले आहे. आज भ्रष्टाचार प्रत्येक ठिकाणी आहे हे कोणीही नाकारु शकत नाही. परंतु सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक उदाहरण दिले तर त्या बाबत मी उत्तर देऊ शकेन.

( दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. )

श्री.भाई जगताप : मंत्री महोदयांनी सभागृहात अशा प्रकारचे उत्तर देणे योग्य आहे काय, व्हॉट इज द ॲब्स्ट्रॅक्ट ?

( दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. )

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, मंत्री महोदयांना असे म्हणावयाचे आहे की, भ्रष्टाचाराची चर्चा सगळीकडे होते. जोपर्यंत भ्रष्टाचार उघड होत नाही तोपर्यंत त्यावर बोलणे उचित नाही.

श्री.भाई जगताप : मंत्री महोदयांनी ॲब्स्ट्रॅक्ट असा शब्द वापरलेला आहे. त्या शब्दाचा त्यांनीच आम्हाला अर्थ सांगावा.

प्रा.फौजिया खान : ॲब्स्ट्रॅक्टचा अर्थ असा आहे की, सन्माननीय सदस्यांनी आता जो आरोप केलेला आहे त्याचे स्पेसिफिक उदाहरण दिले तर त्यावर मला बोलता येईल.

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

यानंतर श्री.शिगम....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 12:25

श्री. भाई जगताप : भविष्य निर्वाह निधीमधील पैसे दोन वेळा कशासाठी काढावे लागतात ? कर्मचा-याला त्याच्या मुलीच्या लग्नासाठी 15-20 हजार रुपये भविष्य निर्वाह निधीतून काढावयाचे असतील तर ते दोन इन्स्टॉलमेंटमध्ये का मिळावेत असा माझा प्रश्न आहे. या मध्ये ॲब्स्ट्रॅक्ट काय आहे ? राज्य मंत्री महोदयांनी आपले शब्द मागे घ्यावेत. राज्यमंत्री महोदया, महिला आहेत म्हणून मी थोडा संयम पाळतोय. आम्हालाच सर्व काही माहीत आहे असे राज्य मंत्री महोदयांनी समजण्याचे कारण नाही. कोणताही शब्द वापरताना तो विचारपूर्वक वापरला पाहिजे. कर्मचा-यांची नियमानुसार तीन वर्षानी बदली होते. असे असताना काही कर्मचारी 7-7 वर्षे एकाच जागेवर आहेत. त्यांची बदली राज्यमंत्री महोदय करणार आहेत काय ? यामध्ये मी ॲब्स्ट्रॅक्ट असे काही विचारलेले नाही तर स्पेसिफिक विचारले आहे.

प्रा. फौजिया खान : ॲब्स्ट्रॅक्ट याचा अर्थ असा की, जे स्पेसिफीक नाही. या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्यांनी कोणी किती पैसे घेतले, कशासाठी घेतले हे सांगितले तर ते स्पेसिफिक होईल. आमच्याकडे कोणतीही लेखी तक्रार आलेली नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्य येथे जनरल माहिती सांगत आहेत असा त्याचा अर्थ होतो. सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक तक्रार द्यावी.

श्री. रामनाथ मोते : माझा हरकतीचा मुद्दा आहे. स्पेसिफिक तक्रार द्यावी असे राज्य मंत्री महोदयांनी सांगितले. आम्ही स्पेसिफिक तक्रारी दिलेल्या आहेत त्यांच्यावर कोणतीही कारवाई केलेली नाही. ज्या अधिका-यांना ॲण्टी करप्शन मार्फत पकडून दिले त्यांच्यावर कोणतीही कारवाई केलेली नाही. उलट त्यांना प्रमोशन दिले गेले. तेव्हा ज्या अधिका-यांच्या बाबतीत तक्रारी केलेल्या आहेत त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

प्रा.फौजिया खान : सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिलेली आहे ती माझ्याकडे आता उपलब्ध नाही. परंतु सन्माननीय सदस्य जे काही सांगत आहेत त्याबाबतीत आवश्यक ती कारवाई केली जाईल... चौकशी करुन नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

----

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : जळगाव जिल्हा, मुक्ताईनगर परिसरातील गावांचा कर्मचा-यांच्या संपामुळे खंडित झालेला पाणी पुरवठा

**मु.शी.** : जळगाव जिल्हा, मुक्ताईनगर परिसरातील गावांचा कर्मचा-यांच्या संपामुळे खंडित झालेला पाणी पुरवठा यासंबंधी सर्वश्री. अरुण गुजराथी, रमेश शेंडगे,हेमंत टकले, प्रकाश बिनसाळे व दिलीपराव सोनवणे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. अरुण गुजराथी (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो अणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"जळगाव जिल्हा, मुक्ताईनगर परिसरातील 80 गावांना पाणी पुरवठा करणा-या योजनेचे कर्मचारी संपावर गेल्याने पाणी पुरवठा पूर्णपणे खंडित होणे, त्यामुळे ग्रामस्थांचे होणारे हाल, ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण फिरावे लागणे, जळगाव जिल्हा परिषद पाणी पुरवठा कर्मचा-यांच्या न्याय मागण्या पूर्ण न करणे, त्यामुळे ग्रामस्थ आणि कर्मचा-याच्या मनात निर्माण झ ाालेली असंतोषाची भावना व चीड, या संदर्भात शासनाने त्वरित करावयाची कारवाई व उपाययोजना."

श्री.रणजित कांबळे (पाणी पुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...3..



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 12:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी : या लक्षवेधीला दिलेले उत्तर अपूर्ण आहे. एकाच मागणीच्या संदर्भात असे उत्तर देण्यात आलेले आहे की, "उपोषणकर्त्या कर्मचा-यांच्या प्रमुख मागण्यांपैकी त्यांचे थकीत वेतन देण्यात आल्याने त्यांनी उपोषण मागे घेतलेले आहे." कर्मचा-यांच्या एकूण 7 मागण्या असून एकाच मागणीच्या संदर्भात उत्तर दिलेले आहे. खरे म्हणजे या लक्षवेधीला ग्रामविकास विभागाकडून उत्तर यावयास हवे होते. उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "कर्मचा-यांचे वेतन व भत्ते या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या मिळणा-या पाणीपट्टीच्या वसुलीतून भागविण्यात यावेत व आवश्यकता वाटल्यास पाणीपट्टीचे दर वाढवावेत, असे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगाव यांना दिले होते." उत्पन्न 50 लाख रु. आहे आणि खर्च तीन कोटी रु. आहे. मग अडीच कोटी रुपयाचा टॅक्स वाढवायचा काय, पाणीपट्टी 6 पट करायची काय याचा विचार शासनाने केला पाहिजे. या संदर्भात उच्च न्यायालयाने देखील एक आदेश दिलेला आहे की,"... in the reason the writ petition is partly allowed. We direct the Secretary, Water Supply, Sanitation Department and Secretary, Rural Development and Water Conservation Department of Govt. of Maharashtra to take action and inform the Zilla Parishad about the equivalent post wherein the incumbation of persons of Rural Water Supply Sewerage department projects are to be absorbed and accommodated." जिल्हा परिषदेच्या आकृतिबंधामध्ये या कर्मचा-यांचा समावेश करण्याच्या संदर्भात सर्व संबंधित सचिवांनी एकत्र येऊन या संदर्भातील निर्णय घ्यावा असे उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. या संदर्भात शासन काय कारवाई करणार आहे ? या प्रश्नाच्या संदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे मंत्री महोदय उत्तर देऊ शकणार नाहीत. परंतु ग्रामविकास विभागाचे सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे सचिव,युनियनचे पदाधिकारी, जिल्हा परिषदेचे पदाधिकारी यांनी एकत्र येऊन या संदर्भात निर्णय घेणे आवश्यक आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, हा प्रश्न जळगांव जिल्हा परिषदेचा असून तो ग्रामविकास विभागाशी संबंधित आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी सूचना केल्याप्रमाणे ग्रामविकास सचिव,पाणी पुरवठा सचिव, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि युनियनचे पदाधिकारी यांची संयुक्त बैठक एका महिन्याच्या आत माझ्या कार्यालयीन दालनात घेण्यात येईल,

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : जलविद्युत व पवनऊर्जा प्रकल्पाव्दारे वीज निर्मितीकडे यंत्रणेचे होत असलेले दुर्लक्ष.

**मु.शी.** : जलविद्युत व पवनऊर्जा प्रकल्पाव्दारे वीज निर्मितीकडे यंत्रणेचे होत असलेले दुर्लक्ष याबाबत श्री.मनीष जैन, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित. )

--------

**लक्षवेधी सूचनेसंबंधी**

**उप सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या 8, 9, 10 वरील लक्षवेधी सूचनेशी संबंधित असलेले मंत्री महोदय विधानसभेच्या सभागृहात व्यस्त असल्यामुळे त्या लक्षवेधी सूचना नंतर घेण्यात येतील.

------------

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात निवासी वैद्यकीय अधिकारी व इतर संवर्गातील पदे रिक्त असणे.

**मु. शी.** : यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात निवासी वैद्यकीय अधिकारी व इतर संवर्गातील पदे रिक्त असणे यासंबंधी सर्वश्री संदीप बाजोरिया,राजेंद्र जैन,विक्रम काळे, सतीश चव्हाण, अनिल भोसले,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संदीप बाजोरिया ( यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"यवतमाळ येथे वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथील पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेल्या रेसिडेंट डॉक्टरांची पदे रिक्त असणे, तसेच 28 परिचारीकांची पदे रिक्त असणे, याबाबतचा तपशील आरोग्य संचालनालयाकडे पाठविण्यात येऊनही अद्यापही यावर निर्णय घेण्यात न येणे, याचा रुग्णसेवेवर होत असलेला विपरित परिणाम, या महाविद्यालयातील सिटीस्कॅन, सोनोग्राफी व एक्सरे ही यंत्रसामुग्री नादुरुस्त अवस्थेत असणे,तेथील ऑपरेशन थिएटरमधील वातानुकुलीत यंत्र बंद असल्यामुळे ऑपरेशन करणे बंद असणे, औषधी व सर्जिकल साहित्याची कमतरता असणे, आवश्यक साहित्य व औषधे आय.एस.आय. मार्क नसलेले दुय्यम व निकृष्ट दर्जाचे वापरण्यात येणे, अतिदक्षता विभागातील अवस्था अतिशय गंभीर असणे, त्यामुळे त्या परिसरातील रुग्णांची होत असलेली हेळसांड याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, तेथील रुग्णांत व त्यांच्या नातेवाईकात पसरलेला तीव्र असंतोष,याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रया. "

डॉ.विजयकुमार गावीत ( वैद्यकीय शिक्षणमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तरामध्ये थोडी दुरुस्ती करु इच्छितो. निवेदनातील ओळ क्रमांक 4 मध्ये "तसेच पदव्यूत्तर पदवी आणि पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता 17 इतकी आहे." हे वाक्य वगळावे.

4...



ABG/ प्रथम श्री.शिगम 12:30

डॉ.विजयकुमार गावीत....

सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी दुरुस्तीसह निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संदीप बाजोरिया : सभापती महोदय, लक्षवेधी सूचने संदर्भात जे निवेदनात जे उत्तर दिलेले आहे ते चुकीचे व अपूर्ण आहे. परिचारिकांची एकूण 183 पदे असून 160 पदे भरलेली आहेत असे उत्तरात नमूद केलेले आहे. ही 183 पदे 303 वैद्यकीय शिक्षण खात्यातील विविध विभागांकरिता होती. आता विविध विभागांची संख्या 594 एवढी झालेली आहे. त्यासाठी 284 पदे आवश्यक आहे. ती पदे अद्याप का भरण्यात आली नाहीत, ही पदे केव्हा भरण्यात येतील ? या वैद्यकीय महाविद्यालयास पदव्यूत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मान्यता मिळालेली आहे. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी एकूण 24 पदांना मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे. हा प्रस्ताव केव्हा पासून विचाराधीन आहे, या प्रस्तावावर केव्हा निर्णय घेण्यात येईल, ऑपरेशन थिएटरमधील सेंट्रल ए.सी.गेल्या दहा वर्षापासून बंद आहे. ते ए.सी. कधी चालू करण्यात येतील, त्यासाठी निधीची तरतूद केली जाईल काय, सदर कामासाठी निधी कधी उपलब्ध करुन दिला जाईल ? यवतमाळ जिल्हयात सन 1989 साली श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु झाले. त्या ठिकाणी प्रथम 50 विद्यार्थ्यांची क्षमता होती. ती प्रवेश क्षमता 100 एवढी करण्यात आली. 2001 पर्यंत या महाविद्यालयात पदव्यूत्तर अभ्यासक्रम सुरु करणे आवश्यक होते. परंतु तो अभ्यासक्रम अद्यापपर्यंत सुरु करण्यात आला नाही. नांदेड जिल्हयातील वैद्यकीय महाविद्यालयात सर्वच अभ्यासक्रम सुरु करण्यात आलेले आहेत. परंतु यवतमाळ वैद्यकीय महाविद्यालयात अनेक विषय सुरु झालेले नाहीत, ते अभ्यासक्रम केव्हा सुरु करणार ?

डॉ. विजयकुमार गावीत : सभापती महोदय, या यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न असलेल्या रुग्णालयात नर्सेसची 183 पदे मंजूर आहेत. नर्सेसची 20 पदे रिक्त आहेत.शासनाच्या नर्सेस कोर्स मधून पास झालेल्या विद्यार्थिनींना घ्यावयाचे की बाहेर नर्सेसचा कोर्स केलेल्या विद्यार्थिनींना घ्यावयाचे या बाबतीत कोर्टात केस चालू आहे. नर्सेसची पदे भरण्यासाठी परीक्षा झालेल्या आहेत. फक्त आदेश निर्गमित करावयाचे राहिले आहे. विभागामार्फत स्टे उठविण्याचा प्रयत्न केला जात आहे. सरकारी असतील वा बाहेरील कोर्स झालेल्या नर्सेस असतील यांना मेरीट बेसीसवर घेण्यासंबंधी ॲफिडेव्हीट करतो आहोत.

यानंतर श्री. भोगले...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 12:35

लक्षवेधी सूचना क्रमांक-11...... डॉ.विजयकुमार गावीत....

त्यामुळे त्याचा निर्णय लवकर होईल. तो निर्णय झाल्यानंतर महिनाभरात सर्व पदे भरली जातील. मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, राज्यात जी मेडिकल कॉलेज हॉस्पिटल्स आहेत तेथे एमसीआयच्या आणि इंडियन नर्सिंग कौन्सिलच्या नॉर्म्सप्रमाणे जितकी पदे आवश्यक आहेत ती पदे निर्माण करण्यास शासनाने सुरुवात केली आहे. नर्सिंग कौन्सिलच्या नॉर्म्सप्रमाणे 284 पदे आवश्यक आहेत. ही 284 पदे निर्मितीसाठी प्रक्रिया सुरु केली असून हे काम अंतिम टप्प्यात आहे. आजच्या स्थितीत राज्यातील मेडिकल कॉलेज हॉस्पिटल्समध्ये 6000 पदे मंजूर असून नॉर्म्सप्रमाणे 8000 पदांची निमिर्ती करीत आहोत. फार कमी पदे भरावयाची आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, पदे मंजूर असणे आणि पदे भरली जाणे हे वेगळे विषय आहेत. मंत्री महोदयांनी सभागृहाची दिशाभूल करु नये. पटलावर माहिती येणे महत्वाचे असते. अन्यथा नंतर गोंधळ होतो. भविष्यात असे सांगितले जाते की, आम्ही असे बोललो नाही. ती पळवाट असते. 6 हजार मंजूर पदांपैकी किती पदे भरली आहेत हे सभागृहाला सांगावे. माननीय गृहमंत्री सांगतात की, 4000 पोलिसांची पदे भरली, 5000 पोलिसांची पदे भरली. परंतु आम्हाला पोलीस सापडत नाहीत.

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, राज्यातील मेडिकल कॉलेज हॉस्पिटल्समध्ये 6000 पदे पूर्वी निर्माण केलेली आहेत. त्यापैकी फार कमी पदे रिक्त आहेत. रिक्त पदे भरण्यासाठी परीक्षा घेतली असून ती रिक्त पदे ताबडतोब भरणार आहोत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, उत्तर देण्याची ही पध्दत योग्य नाही. 6 हजार मंजूर पदांपैकी किती व कोणती पदे रिक्त आहेत हे सभागृहाला कळले पाहिजे.

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, ही 6000 पदे नर्सेसची आहेत. यवतमाळ येथील वैद्यकीय महाविद्यालयात 183 पैकी 160 पदे भरली असून 23 पदे रिक्त आहेत. राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयासाठी एकूण 6000 पदे मंजूर केलेली आहेत. इंडियन नर्सिंग कौन्सिलच्या नॉर्म्सप्रमाणे एकूण 8000 पदे आवश्यक आहेत. त्यासाठी प्रस्ताव सादर केला असून मान्यता मिळाल्यानंतर पदे भरली जातील. रेसिडेंट डॉक्टरबद्दलचा उल्लेख केला आहे. एकूण 3 पी.जी.कोर्सेस सुरु आहेत. त्यासाठी 1:3 या प्रमाणात 12 पदे मंजूर असून 24 पदे मंजूर करण्याची गरज आहे. ही 24 पदे पुढील एक-दोन महिन्यात मंजूर करु. त्याचप्रमाणे 8

..2..

लक्षवेधी सूचना क्रमांक-11...... डॉ.विजयकुमार गावीत....

कोर्सेस आहेत, या 8 कोर्सेससाठी मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाकडे प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविला आहे. मंजुरी मिळाल्यानंतर पदे भरण्यात येतील. माननीय सदस्यांनी ओ.टी.मधील ए.सी.यंत्रणा बंद असल्याचे सांगितले आहे. यंत्रणा बंद पडली असेल तर दुरुस्त केली जाईल. परंतु माझ्या माहितीप्रमाणे ए.सी.यंत्रणा सुरु आहे.

नंतर यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 11....

डॉ. रणजित पाटील : महोदय, जनतेला आरोग्य सेवा देणे हे कायद्याने सक्तीचे आहे. पण वैद्यकीय महाविद्यालयांना शासनाकडून जी ट्रिटमेंट मिळते ती योग्य नाही. कारण सन 1989 मध्ये सुरु झालेल्या यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात अद्यापही तेथे पदव्युत्तर अभ्यासक्रमाची व्यवस्था केलेली नाही. तसेच अकोला मेडिकल कॉलेजमध्ये 91 पदे सँक्शन आहेत तरी सुध्दा तेथे रिक्त पदांची भरती करण्यासाठी मुलाखती घेतल्या जात नाहीत. तसेच पदे भरताना फक्त 60 लोकांना कॉल दिले जातात अशी परिस्थिती आहे. यासंदर्भात मी तेथील अधिष्ठाता यांना भेटलो असता ते म्हणाले की, माझ्याकडेच या पदाचा चार्ज आहे. मीच प्रभारी आहे तसेच मीच वाट पाहतो की माझी येथून बदली झाली पाहिजे. अशा परिस्थितीत मी आपल्याला काय सांगू शकतो, अशी स्थिती आहे. तसेच या दोन्ही कॉलेजेसमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी आवश्यक असलेले प्रोफेसर व असोसिएट प्रोफेसर्स जेवढ्या विभागांचे उपलब्ध आहेत तेवढ्याच विभागांपुरते पदव्युत्तर शिक्षण दिले जाते. म्हणून शासन सर्वच विषयांची पदव्युत्तर शिक्षण मिळेल यासाठी आवश्यक ती पदसंख्या व साधने उपलब्ध करुन देणार काय ?

श्री. दिवाकर रावते : महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्याप्रमाणे मेडिकल कॉलेजेसची व्यथा सांगितली तसे मंत्री महोदयांनी सुध्दा प्रामाणिकपणे शासनाचा मुखवटा सभागृहासमोर सादर केला पाहिजे. आपण आताच उत्तर देताना सांगितले की, 6000 पदे मंजूर आहेत. त्यावर मी विचारले की, पदे मंजूर असणे हा भाग वेगळा आणि प्रत्यक्षात भरती केलेली पदे हा भाग वेगळा आहे. तसेच यवतमाळ वैद्यकीय महाविद्यालयातील ए.सी. प्लांट चालू करीत नाहीत ही अत्यंत गंभीर बाब आहे. सन्माननीय सदस्य माहिती देत आहेत की, यासंदर्भात ते अकोला मेडिकल कॉलेजमध्ये गेले असता तेथील अधिष्ठाता स्वत:च म्हणाले की मी सुध्दा येथे प्रभारीच आहे, मी आपल्याला काय माहिती देऊ शकतो. याचाही खुलासा मंत्री महोदयांना करावा लागेल. कारण अशा प्रकारचा संदेश संपूर्ण वैद्यकीय क्षेत्रात जाणे योग्य नाही. वास्तविक आपल्याला वित्त विभागाकडून पदे भरण्याची परवानगीच मिळत नाही म्हणून ती भरली जात नाहीत. आता एमसीआयच्या नॉर्म्सप्रमाणे तर 8 हजार पदे कमी आहेत. याचा अर्थ महाराष्ट्र राज्यातील आरोग्य खात्याला सुध्दा लकवा इ ालेला आहे, ते चालू शकत नाही म्हणून 8 हजार पदे सोडाच पण आहे तीच पदे भरता येत

......2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ........

नाहीत. अशा प्रकारे अर्थ खात्यात जे झारीतील शुक्राचार्य बसलेले आहेत त्यांच्यामुळे राज्यातील आरोग्य सेवेचा असा खेळ चालला आहे, हे गंभीर आहे. यातून मार्ग काढून शासन राज्यातील जनतेला आरोग्याची शाश्वती देणार काय ?

डॉ. विजयकुमार गावित : महोदय, राज्यात एकूण 6424 नर्सिंगची पदे असून त्यापैकी 5755 पदे भरलेली आहेत व 759 पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्याची प्रक्रिया सुरु असून त्याच्या मुलाखती झालेल्या आहेत व यादी तयार आहे. पण कोणी तरी एक व्यक्ती कोर्टात गेल्यामुळे या भरतीवर स्टे आलेला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आरोग्य सेवा खंडित होत असल्यामुळे आम्हाला पदे भरण्याची आवश्यकता आहे असे आपण कोर्टामध्ये जाऊन सांगा. स्टे आहे म्हणून थांबणे काही योग्य नाही. आरोग्य सेवेची स्थिती गंभीर असल्यामुळे आरोग्याची पदे तात्पुरती स्वरुपात भरण्याची मान्यता देण्यात यावी असे आपण कोर्टाला सांगा मला वाटते असे आपण कोर्टाला सांगितले तर आपल्याला पदे भरण्याची मान्यता मिळू शकेल. आरोग्याशी वर्षानुवर्षे आपण खेळू नका.

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, आम्ही कोर्टाला लिहून दिले आहे की, आपण जो काही निर्णय द्याल तो आम्हाला मान्य राहील. त्यामुळे यासंदर्भात मला असे वाटते की, या प्रकरणाचा बहुतेक 15 दिवसात निकाल लागण्याची शक्यता आहे. हे काही जास्त दिवसाचे प्रकरण नसून एक महिन्यापूर्वीचेच प्रकरण आहे. त्यामुळे ही पदे भरली जातील असे मला वाटते. सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, ज्यावेळेस मी वैद्यकीय शिक्षण खात्याचा पदभार घेतला त्यावेळेस पर्मनंट डीनची संख्या केवळ दोनच होती. एमसीआयच्या नियमाप्रमाणे पदे भरली गेली पाहिजेत. पूर्वी पासूनची प्रथा अशी आहे की, मेडिकल कॉलेजेस, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सुरु करतांना आहे त्या स्टाफवरच सर्व काम सुरु करीत होतो. वास्तविक नॉर्म्स प्रमाणे कॉलेजेस सुरु केली पाहिजेत आणि ही अवस्था बहुतांशी ठिकणी सारखीच आहे. त्यामुळे एमसीआयच्या नॉर्म्सप्रमाणे पदे निर्माण करण्याच्या दृष्टीने आम्ही प्रयत्न सुरु केले आहेत. यामुळे लकवा झालेली कॉलेजेस सुटसुटीत आणि गुटगुटीत राहतील यासाठी प्रयत्न सुरु करण्यात आलेला आहे.

ज्यावेळेस मी या खात्याचा पदभार स्वीकारला त्यावेळी प्राध्यापकांची पदे केवळ 35 ते 40 टक्केच भरलेली होती परंतु आता ही पदे 70 टक्के भरण्यात आलेली आहेत. ही पदे सुध्दा कमीच आहेत. त्यामुळे ही पदे एमपीएससी व प्रमोशनच्या माध्यमातून भरण्याची प्रक्रिया सुरु केलेली आहेत. प्रमोशनच्या संदर्भात काही नॉर्म्स सुध्दा कमी करण्यात आलेले आहेत. प्रमोशनसाठी 4-5 वर्षाची मर्यादा होती परंतु ही मर्यादा आम्ही एक वर्षाने कमी केलेली आहे. या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात ज्या सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केलेले आहेत त्या सर्वांना मी सांगू इच्छितो की, मी प्रत्येक कॉलेजला भेट देतो व त्या ठिकाणचे लोकप्रतिनिधी, मंत्री यांना कॉलेजमध्ये बोलावून एक ते दीड तास चर्चा करतो, अडचणी समजून घेतो त्यानंतर विद्यार्थ्यांशी, प्राध्यापकांशी तसेच

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित....

वर्ग 3 व वर्ग 4 च्या कर्मचा-यांशी तसेच सर्वसामान्य जनतेशीही चर्चा करतो व अडचणी समजून घेतो. प्रत्येक ठिकाणी ज्या काही अडचणी असतात त्या सोडविण्याचे काम आता केले जात आहे. मराठवाडयातील कॉलेजच्या संदर्भातील सर्व माहिती घेतली असून आता विदर्भ, यवतमाळ व अकोल्याला येऊन त्या ठिकाणचे सर्व प्रश्न निश्चितपणे सोडविले जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. या ठिकाणी आम्ही मे महिन्यातच भेटी देणार असून या सर्व ठिकाणसाठी निधीची सुध्दा तरतूद करण्यात आलेली आहे. यवतमाळ व अकोल्यामध्ये कोणत्याही प्रकारच्या अडचणी शिल्लक राहणार नाही याची मी ग्वाही देतो. या ठिकाणी पर्मनंट डीन अधिवेशन संपण्याच्या अगोदर मिळू शकेल एवढे या निमित्ताने सांगू इच्छितो.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : जलविद्युत व पवनऊर्जाद्वारे वीज निर्मितीकडे यंत्रणेचे होत असलेले दुर्लक्ष .

**मु. शी.** : जलविद्युत व पवनऊर्जाद्वारे वीज निर्मितीकडे यंत्रणेचे होत असलेले दुर्लक्ष यासंबंधी श्री. मनीष जैन ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. मनीष जैन (जळगाव स्थानिक प्राधिकारी संस्था ): सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अपारंपारिक मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"जलविद्युत व पवनऊर्जा प्रकल्प क्लीन एनर्जी (स्वच्छ ऊर्जा) म्हणून मानले जात असून सिंधुदुर्ग जिल्ह्यात जलविद्युत व पवन ऊर्जा प्रकल्पाद्वारे वीज निर्माण होत असणे, मात्र, या यंत्रेणेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याने या प्रकल्पावर पूर्ण क्षमतेची वीज निर्मिती होत नसणे, या प्रदूषण विरहित वीज निर्मिती प्रकल्पांकडे शासनाने केलेले दुर्लक्ष, जिल्ह्याची विजेची गरज भागवून अन्यत्र वीज पुरवठा करण्याची क्षमता असूनही या प्रकल्पांकडे होत असलेले दुर्लक्ष, यामुळे पर्यावरण प्रेमींमध्ये पसरलेली नाराजी, याविषयी शासनाने करावयाची ठोस कारवाई व प्रतिक्रिया."

श्री. डी.पी.सावंत ( अपारंपारिक ऊर्जा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मनीष जैन : माननीय सभापती महोदय, मी उपस्थित केलेल्या लक्षवेधीच्या संदर्भात मंत्री महोदयांनी निवेदनात असे म्हटले आहे की, "मौजे गिर्ये-विजयदुर्ग ता. देवगड येथे 1.50 मे.वॅ.(6x250कि.वॅ.) क्षमतेचे पथदर्शी पवन ऊर्जा प्रकल्प सन 1994-95 मध्ये कार्यान्वित केलेले आहेत". मी वर्तमानपत्रात असे वाचले आहे की, पवन ऊर्जेसाठी जी यंत्रणा लावण्यात आलेली आहे त्या ठिकाणी भरपूर जागा उपलब्ध आहे. शासनाने या ठिकाणी युनिटची संख्या न वाढविता सिंधुदुर्ग जिल्हयात छोटया छोटया युनिट्स खाजगी कंपनीला विकलेले आहेत. त्यामुळे यासंदर्भात मला दोन प्रश्न विचारावयाचे आहे की, आपण खाजगी कंपनीला जे युनिट विकलेले आहेत त्यासाठी आपल्याला अगोदर वीज तयार करण्यासाठी किती खर्च येत होता ? आता आपण ज्या खाजगी कंपनीला हे युनिट विकलेले आहे त्यांच्याकडून आपण कोणत्या दराने वीज खरेदी करीत आहात, यामध्ये शासनाचा फायदा झालेला आहे की, नुकसान झालेले आहे ?

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनीष जैन ..

त्याचबरोबर या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की मालवण, सावंतववाडी इत्यादी ठिकाणी हवेचा वेग किती आहे यासबंधीचा अभ्यास सुरु आहे. तेव्हा हा अभ्यास केव्हा पूर्ण होणार आहे ? आतापर्यंत तेथे पवनचक्की लावलेली आहे आणि वीज निर्मिती होत आहे असे असतांना अजून अभ्यास कसा काय चालू आहे ?

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री मनीष जैन यांनी सांगितल्याप्रमाणे 250 किलोवॅटसचे एकूण सहा प्रकल्प 1994-95 पासून कार्यान्वित झालेले आहे यासंबंधीची माहिती निवेदनामध्ये देण्यात आलेली आहे. तसेच ज्यावेळी आपण पवन ऊर्जा प्रकल्प सुरु करतो त्यावेळी कमीत कमी दोन वर्षे अभ्यास करावा लागतो त्याप्रमाण् अनेक ठिकाणी अभ्यास चालू आहे. त्याची नावे निवेदनामध्ये देण्यात आलेली आहेत. तेव्हा हा कालावधी संपल्यानंतर त्या ठिकाणी प्रकल्प सुरु करु शकतो किंवा नाही यासंबंधीचा निर्णय घेण्यात येईल.

श्री.मनीष जैन : सभापती महोदय, प्रायव्हेट कंपनीकडील पर्चेस कॉस्टच्या संदर्भात मी प्रश्न विचारला होता त्याचे उत्तर देण्यात आलेले नाही. त्याचबरोबर दोन वर्षापासून अभ्यास सुरु आहे असे माननीय मंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. परंतु ते उत्तर देखील समाधानकाराक नाही.1994-95 मध्ये त्या एरियामध्ये पवनचक्की लावण्यात आलेली आहे. त्या ठिकाणी जर एखादा माणूस उभा राहिला तर त्याच्या डोक्यावरील टोपीसुध्दा हवेने उडून जाते . इतका तेथे वा-याचा जोर आहे. असे असतांना अजूनही अभ्यास काय करण्यात येत आहे ?

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे कमीत कमी दोन वर्षे अभ्यास करावा लागतो त्याचबरोबर कॉस्ट ऑफ प्रॉडक्शन किती आहे आणि कोणत्या दरानें वीज विकत आहे यासंबंधीची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही ही माहिती उपलब्ध झाल्यानंतर ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : दोन वर्षामध्ये कोण कोणत्या विषयाचा अभ्यास करण्यात येणार आहे ?

( उत्तर देण्यात आले नाही )

श्री.अरुण गुजराथी :12 मेगॅवॅट वीज निर्मिती करणे शक्य आहे. त्यासाठी 10 कोटी रुपये लागणार आहे. कोळशापासून तसेच पाण्यापासून एक मेगॅवॅट वीज निर्मिती करण्याकरिता दोन

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी..

ते तीन कोटी रुपये लागतात. पवन चक्कीव्दारे 12 मेगॅवॅट वीज निर्मितीसाठी 10 कोटी रुपये लागत असल्यामुळे ही वीज निर्मिती करणे स्वस्त आहे. आपण दोन वर्षे अभ्यास केल्यानंतर जर निर्णय घेतला तर त्याची किंमत आणखी वाढू शकेल तेव्हा या संदर्भातील निर्णय शासन त्वरित घेणार आहे काय ?

श्री.डी.पी.सावंत :महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाकडून प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर निविदा मागवून काम सुरु करण्यात येईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. चेंबूर (मुंबई) येथील अक्षय को.ऑप.सोसायटीच्या पुनर्विकासात अधिका-यांनी केलेली अनियमितता

मु.शी. : चेंबूर (मुंबई) येथील अक्षय को.ऑप.सोसायटीच्या पुनर्विकासात अधिका-यांनी केलेली अनियमितता यासंबंधी सर्वश्री धनंजय मुंडे, सय्यद पाशा पटेल,संजय केळकर, रामनाथ मोते, रामदास कदम,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.धनंजय मुंडे (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्याचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"चेंबूर (मुंबई) येथील टिळकनगरच्या वादग्रस्त अक्षय को.ऑप.सोसायटीच्या पुनर्विकास प्रकरणी म्हाडाच्या चार अधिका-यांसह महानगरपालिका, पोलीस व सहकार खात्यातील अधिका-यांनी प्रथमदर्शी अधिकाराचा गैरवापर व अनियमितता केल्याबद्दल 28 जणांविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दिनांक 11 फेब्रुवारी 2011 रोजी दाखल करण्यात आलेला गुन्हा, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने या प्रकरणी आवश्ययक ती कागदपत्रे ताब्यात न घेणे, तसेच चौकशीस हेतूत: विलंब केल्याने अर्जदाराने उच्च न्यायालयामध्ये दाद मागणे, उच्च न्यायालयाने या प्रकरणी सर्व तक्रारदारांच्या विरोधात त्वरित चौकशी करुन दोषी व्यक्तींविरुध्द कारवाई करण्याच्या शासनाला दिलेल्या सूचना, झालेल्या अन्यायाची दाद मागण्याकरिता नागरिकांनी शासनाच्या अनेक खात्यांमध्ये वर्षानुवर्षे हेलपाटे मारणे, या राज्यात शासकीय अधिका-यांचा सुरु असलेला बेबंदशाही कारभार, गुन्हे करणा-या अधिका-यांना परस्पर वाचविण्याची भूमिका, प्रशासनातील प्रत्येक खाते घेत असल्याची लाचलुचपत प्रतिबंधक खात्याची कार्यपध्दतीमुळे जनमानसात निर्माण झालेली भावना याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना आणि त्यावर शासनाची प्रतिक्रिया "

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय,चेंबूर येथील टिळकनगरच्या वादग्रस्त अक्षय को ऑप.हौ.सोसायटी मधील वादग्रस्त पुनर्विकासासंबंधी मी ही लक्षवेधी सूचना मांडली आहे. हा विषय मोठा असल्यामुळे मी आपल्याकडे थोडा वेळ मागत आहे. या इमारतीच्या पुनर्बांधणीत कलम 33/5 या नियमाचे उल्लंघन केलेले आहे. दिनांक 11.2.2010 रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो मुंबई विभागाने म्हाडा, बृन्हमुंबई महानगरपालिका, सहकार विभाग, टिळकनगर पोलीस ठाणे येथील 28 सरकारी कर्मचारी व अधिकारी विकासकाला फायदा मिळवून देण्यासाठी आपल्या पदाचा दुरुपयोग करीत आहेत. त्यामुळे त्यांच्याविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 च्या कलम 13 (एक) ड सह 13 (2), भा.द.वि. कलम 109,465,471,474, 120 अंतर्गत गुन्हा क्रमांक 11/2010 हा नोंदविण्यात आला आहे. परंतु अत्यंत योजनाबध्द रीतीने जाणीवपूर्वक व सर्वसामान्य जनतेला कायद्याचे ज्ञान नसते याचा फायदा घेऊन ....................

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

या गुन्ह्यामध्ये 347, 386, 409, 420, 511 ही आयपीसी 1860 ची कलमे मनामध्ये काहीतरी उद्देश ठेवून जाणीवपूर्वक लावण्यात आलेली नाहीत काय? या प्रकरणामध्ये श्री. मंगेशकर नावाच्या गृहस्थाने टिळक नगर पोलीस स्टेशनमध्ये जाऊन अनेक वेळा तक्रारी करुन सुध्दा हा गुन्हा रजिस्टर करण्यात आला नाही. इतकेच नव्हेतर श्री. मंगेशकर यांनी राज्याचे सन्माननीय गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील साहेबांना देखील निवेदन दिले आहे.

**उप सभापती** : सभागृहाच्या विशेष बैठकीची वेळ संपण्यासाठी पाच मिनिटे शिल्लक आहेत तेव्हा सन्माननीय सदस्यांनी लांबलचक माहिती न देता प्रश्न विचारावा नाही तर आपल्याला उत्तर मिळणार नाही.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने मी अधिकची माहिती देत आहे. माननीय गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील साहेबांनी ते निवेदन स्वीकारुन व त्यावर रिमार्क लिहून त्यावेळचे चेंबूर झोनचे ॲडिशनल कमिशनर श्री. नितीन कौशिक यांच्याकडे पाठविले. परंतु श्री. कौशिक साहेबांनी माननीय गृहमंत्र्यांनी दिलेल्या आदेशाला केराची टोपली दाखविली. सभापती महोदय, हे प्रकरण नंतर ॲंटी करप्शन ब्यूरोकडे गेले, त्यावेळी श्री. कौशिक साहेब त्याचे प्रमुख होते. कोर्टाने हा गुन्हा रजिस्टर करण्याचे आदेश देऊन आणि गुन्हा रजिस्टर होऊन 14 महिने झ ाले तरी अद्यापि कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात न्यायालयाने याचिका फेटाळल्याचे म्हटले आहे. ॲंटी करप्शन ब्यूरोने या प्रकरणी कोणतीही कारवाई करावयाची नाही असा मनात उद्देश ठेवल्यानंतर श्रीमती मंगेशकर या महिलेने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली की, हे प्रकरण ॲंटी करप्शन ब्यूरोकडून काढून घेऊन ते सी.बी.आय.कडे सुपूर्द करण्यात यावे आणि या गुन्हयाचा इन्व्हेस्टिगेशन ऑफेन्स बदलण्यात येऊन सदरचा गुन्हा तीन महिन्यात निकाली काढण्यात यावा. या गुन्ह्याबाबत करण्यात आलेले अपिल कोर्टाने फेटाळले असतांना कोर्टाने संपूर्ण प्रकरणच फेटाळून लावले असे शासनाने या निवेदनामध्ये म्हटले आहे. यामध्ये ॲंटी करप्शन ब्यूरोला एकदा संधी द्यावी असे कोर्टाने सांगितले होते तरी सुध्दा आजपर्यंन्त कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. निवेदनामध्ये कागदपत्रे जमा करण्यात आल्याचे म्हटले आहे, परंतु त्या शिवाय शासनाने कोणतीही कारवाई केली नाही. म्हणून माझे दोन प्रश्न आहेत की, शासनाचे ॲंटी करप्शन ब्यूरो सलग 14 महिने कारवाई करीत नसेल

श्री. धनंजय मुंडे....

तर त्या बाबत कुणाला जबाबदार धरावयाचे, यामध्ये अँटी करप्शन ब्यूरोचे प्रमुख श्री. नितीन कौशिक यांना जबाबदार धरावयाचे की आणखी कुणाला जबाबदार धरावयाचे? तसेच, दुसरा प्रश्न असा आहे की, गुन्हा नोंदवीत असतांना 347, 336, 409, 420 व 511 ही आयपीसी ची कलमे जाणीवपूर्वक काढीत असतांना त्या मागे विकासकाला मदत करण्याचा उद्देश होता काय?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, अक्षय को-ऑपरेटिव्ह सोसायटीचा पुनर्विकास करीत असतांना जवळ जवळ 34 फ्लॅटधारकांनी त्याला संमती दिली होती. यामध्ये फिर्यादी श्री. संजयराज मंगेशकर यांच्या आई श्रीमती मंगेशकर यांनी देखील स्वत: त्यामध्ये कन्सेंट दिली होती. त्याप्रमाणे त्या इमारतीचा पुनर्विकास करणाऱ्या विकासकाबरोबर करारनामा झाला होता. त्याचबरोबर या फ्लॅटधारकांची दुसरीकडे राहण्याची व्यवस्था विकासकाने केली होती. त्या ठिकाणी हे सर्व रहिवाशी त्या काळात रहावयास गेले होते. त्या इमारतीच्या पुनर्विकासाचे काम सुरु झाल्यानंतर सोसायटीमधील अंतर्गत वादामुळे काही गोष्टी निष्पन्न झाल्या. माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे श्री. मंगेशकर यांनी वेगवेगळया खात्याच्या मंत्र्यांना निवेदने व पत्रे देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्याकडून देण्यात आलेली पत्रे त्या त्यावेळी व्हिजिलन्स डिपार्टमेंटकडे पाठविण्यात आली. त्यानंतर दिनांक 11.2.2010 रोजी हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला. यामध्ये कोणतीही कलमे मुद्दामहून कमी करण्याचा शासनाचा उद्देश नाही. यामध्ये 81 लोकांचे जाब जबाब घेण्यात आले आहेत. त्यामध्ये म्हाडा, बीएमसी, सहकार खाते यांचा समावेश आहे, त्याचप्रमाणे स्थानिक पोलीस ठाण्याबाबत त्यांनी आक्षेपार्ह सांगितले आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील . . . .

आपण या सगळ्या घटनेचा तपास पूर्ण केलेला आहे आणि जवळजवळ 81 साक्षीदार तपासलेले आहेत. आपण या बाबतीत ॲडव्हायझर यांच्याकडून लिगल अभिप्राय घेण्यात येईल. सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे काही कलमे कमी लावण्यात आली आहेत. तरी देखील याबाबतीत मी सांगू इच्छितो की, आपण योग्य ती कलमे लावलेली आहेत. मात्र ती जर कमी असतील तर लिगल ॲडव्हाईज घेऊन ही कलमे निश्चितपणे वाढविली जातील.

**उप सभापती** : आता 1.00 वाजला आहे. मी सभागृहाची वेळ फक्त पाच मिनिटांसाठी वाढवित आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आताच माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की, विकासकाने फ्लॅटधारकांची दुसरीकडे राहण्याची व्यवस्था केल्याने ते घर सोडून गेले. परंतु दि.30-01-2006 रोजी उप पोलीस आयुक्त परिमंडळ - 6 मुंबई येथे स्वत:श्री. मंगेशकर यांनी पत्र दिले होते की, या सगळया परिस्थितीत इमारत बेकायदेशीररित्या पाडली जात आहे.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी थोडक्यात प्रश्न विचारावा. आपण फार पसारा लावता.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी पसारा लावत नाही पण प्रश्न समजला तर पाहिजे.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण जे सगळे भारुड सांगता त्यापूर्वीच माननीय मंत्री महोदयांना प्रश्न समजलेला असतो.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, याठिकाणी एकतर उत्तरामध्येच दिशाभूल केलेली आहे आणि आता माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये जे सांगितले ते सुध्दा चुकीचे आहे. मी आपल्या माहितीसाठी सादर करतो की, 2006 मध्ये श्री.मंगेशकर यांनी पत्र दिले होते. एकतर चौदा महिने होऊन सुध्दा याबाबतीत आरोपपत्र दाखल झालेले नाही. माझा असा प्रश्न आहे की, शासन याबाबत आरोपपत्र कधी दाखल करणार आहे? सुरुवातीलाच ॲन्टीकरप्शन ब्युरोचे अधिकारी श्री.नितीन कौशिक यांच्याबाबत तक्रार केल्या नंतर जर श्री.नितीन कौशिकच चौकशी करणार असतील तर ते बरोबर नाही. त्यांना बाजूला सारुन दुसऱ्या अधिकाऱ्याने या प्रकरणाची चौकशी केली पाहिजे आणि तशा प्रकारे चौकशी होणार आहे काय ? हा खरा प्रश्न आहे.

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले, त्याप्रमाणे हा प्रश्न



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चार विभागांशी संबंधित असल्यामुळे यासाठी एवढा वेळ घेतला असला तरी देखील याबाबत लिगल ॲडव्हायझर यांचा अभिप्राय घेऊन यामध्ये लवकरात लवकर दोषारोपपत्र दाखल केले जाईल आणि याबाबतीत आपण नि:पक्षपातीपणे चौकशी पूर्ण केलेली आहे, त्यामुळे पुन्हा नव्याने चौकशी करण्याची आवश्यकता नाही.

------

. . . .वाय-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : मुलुंड (पश्चिम) येथील साल्पादेवी पाडा येथे विकासकाने

अधिकाऱ्यांना हाताशी धरुन मूळ आदिवासींना बेधर करणे.

**मु.शी.** : मुलुंड (पश्चिम) येथील साल्पादेवी पाडा येथे विकासकाने अधिकाऱ्यांना हाताशी धरुन मूळ आदिवासींना बेधर करणे.

यासंबंधी श्री.चरणसिंग सप्रा, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.चरणसिंग सप्रा (नामनियुक्त) : सभापती महोदय,मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुलुंड पश्चिम येथील साल्पादेवी पाडा येथे मोठ्या प्रमाणात मूळ आदिवासी वस्ती असून सदरील आदिवासी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाचे काम मे.सिद्धार्थ कन्स्ट्रक्शन यांना देण्यात आलेले असणे, शासनाच्या धोरणानुसार आदिवासींना संरक्षण देणे बंधनकारक असतांनाही या विकासकाने संबंधित अधिकाऱ्यांना हाताशी धरुन येथील आदिवासींना कोणतीच पूर्व कल्पना न देता दि.27-08-2010 रोजी अचानक बुलडोझरद्वारे या आदिवासींचे झोपडे तोडून त्यांचे संसार रस्त्यावर टाकून त्यांना बेघर करणे, आदिवासी कुटुंबातील वयोवृध्द महिलांना मारहाण करणे, तसेच दि. 15-05-2011 रोजी सकाळी 10.30 वाजता या आदिवासी वस्तीमध्ये गुंड पाठवून झोपड्या खाली केल्या नाही तर झोपड्यांना आग लावून तुम्हाला जिवंत सोडणार नाही अशी वारंवार धमकी देणे, त्यामुळे या आदिवासी लोकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण, आदिवासीवर अन्याय करणाऱ्या विकासकावर तात्काळ दंडात्मक कारवाई करण्याची आणि येथील आदिवासीचे पात्र अपात्रतेचा निर्णय होणार नाही तोपर्यंत या प्रकल्पास स्थगिती देण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने तातडीने कारवाई कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)



श्री.चरणसिंग सप्रा : सभापती महोदय, याठिकाणी लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने जे निवेदन करण्यात आलेले आहे ते दिशाभूल करणारे आहे. एकीकडे आपण महाराष्ट्र राज्याचा सुवर्ण

महोत्सव साजरा करीत आहोत आणि दुसरीकडे आदिवासींवर अन्याय होत आहे. मुलूंड मध्ये आदिवासी रहातात आणि ते मूळ आदिवासी आहेत आणि आदिवासींना त्याठिकाणी जागा मिळण्यासाठी पात्रता मिळालेली नाही असे दर्शविलेले आहे.निवेदनामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे या ठिकाणी तीन आदिवासी आहेत आणि तीन आदिवासी नाहीत. एकूण 12 लोक असून त्यामध्ये 10 आदिवासी आहेत.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.चरणसिंग सप्रा : सभापती महोदय, याठिकाणी 178 लोकांपैकी डेव्हलपरने किंवा जिल्हाधिकाऱ्यांच्या कर्मचाऱ्यांनी 20 ते 25 बोगस पुरावे घेऊन या लोकांना पात्रता यादीमध्ये दाखविण्यात आलेले आहे आणि आदिवासींना बाहेर ठेवण्यात आलेले आहे. या आदिवासींवर मोठ्या प्रमाणात अन्याय झालेला आहे. त्यांचे सामान देखील बाहेर फेकण्यात आले होते. गुढीपाडव्याच्या दिवशी बिल्डरने या आदिवासींच्या जागेवर बुलडोझर पाठविला होता. या आदिवासींना कोणीही संरक्षण देत नाही. त्यांना संरक्षण देणे गरजेचे आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, बिल्डरने बोगस पुरावे देऊन 20 ते 25 लोकांना पात्र केलेले आहे, त्यांच्या बाबतीत शासन चौकशी करणार आहे काय, त्यांच्यावर कारवाई करणार आहे काय ? तसेच याठिकाणी जे 10-12 आदिवासी आहे त्यांनी 19 ऑक्टोबरला अपील दाखल केलेले आहे. त्यांच्या अपिलाचा निर्णय लागेपर्यंत शासन या प्रोजेक्टला स्थगिती देणार आहे काय ? तसेच त्याठिकाणी लोकल गुंडांचे प्रमाण देखील वाढलेले आहे. ते सातत्याने आदिवासींना धमक्या देतात की, तुमच्या झोपड्या जाळून टाकण्यात येतील. तसेच तुम्हाला उद्ध्वस्त करण्यात येईल. ज्या आदिवासींच्या अंगावर कपडे नाहीत त्यांना धमकावले जात आहे. आदिवासींनी पोलीस स्टेशनमध्ये देखील तक्रार केलेली आहे पण पोलिसांनी त्याबाबत काहीही कार्यवाही केलेली नाही. तेव्हा याबाबतीत पोलीस कारवाई करणार आहे काय ? असे माझे प्रश्न आहेत.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे, त्याबाबत सांगावयाचे तर संबंधितांनी बोगस पुरावे घेऊन काही लोकांना पात्र करण्यात आले असल्याची बाब आमच्या निदर्शनास आणून दिली किंवा याबाबत तक्रार दिली तर अशा लोकांच्या बाबतीत फेर तपासणी करुन उचित कारवाई केली जाईल.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर......

सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जो दुसरा प्रश्न विचारला आहे त्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, या योजनेसाठी जे सहा लोक असहकार्य करीत होते, त्यातील तीन आदिवासी होते आणि तीन बिगर आदिवासी होते, असे स्पष्ट नमूद केलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे आदिवासींनी अपील फाईल केलेले आहे. मुळात हे आदिवासी अपात्र होण्याचे कारण असे की, त्यांनी कुठलीच कागदपत्रे प्राधिकरणाकडे दिलेली नाहीत. सन्माननीय सदस्यांनी थोडया वेळा पूर्वीच सांगितल्याप्रमाणे हे आदिवासी जर अपिलामध्ये गेले असतील तर ती सुनावणी पूर्ण होई पर्यत आदिवासींचे झोपडे तोडण्याच्या संदर्भातील कारवाईला स्थगित देण्याचा प्रयत्न निश्चितपणे शासनामार्फत केला जाईल.

. सन्माननीय सदस्यांनी धमकीच्या संदर्भात जो तिसरा प्रश्न विचारला आहे त्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, तशी तक्रार पोलीस स्टेशनमध्ये दाखल करण्यात आली तर त्यावर उचित कारवाई केली जाईल. पोलिसांनी दखल घेतली नाही तर राज्य शासन त्यामध्ये हस्तक्षेप करील.

**उप सभापती** : सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1 वाजून 15 मिनिटांनी पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 1.05 ते 1.15 वाजेपर्यंत स्थगित झाली )

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत**

**सभापती** : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या एकूण 3 सूचना आलेल्या आहेत. त्यापैकी सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना दिलेली आहे ती मागे घेण्याच्या बाबतीत त्यांनी आज मला पत्र दिलेले आहे. त्याचप्रमाणे सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि इतर सन्माननीय सदस्यांनी कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अनुषंगाने नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना दिलेली आहे ती मागे घेण्याबाबत सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी आज मला पत्र दिलेले आहे. त्यानंतर एका अत्यंत महत्वाच्या आणि गंभीर विषयाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र. पाटील, दिवाकर रावते, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. गोपीकिसन बाजोरिया यांनी सकाळी 9.40 वाजता नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे तसेच सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, रामदास कदम, संजय केळकर, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री गोपीकिसन बाजोरिया, रामनाथ मोते यांनी सकाळी 11 वाजून 22 मिनिटांनी नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन पुढील विषयावर चर्चा करण्यास अनुमती मिळण्याबाबतच्या प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. त्यांनी प्रस्तावामध्ये जैतापूर या ठिकाणी काल झालेल्या गोळीबाराच्या अनुषंगाने गंभीर बाबीचा उल्लेख केलेला आहे. ही बाब खरी आहे की, ही अत्यंत गंभीर बाब आहे की ज्यामध्ये दुर्दैवाने त्या ठिकाणी गोळीबार होऊन एका आंदोलकाचा मृत्यू झालेला आहे. त्यामुळे जरी आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेत....

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, आपण आपला निर्णय देण्याच्या अगोदर आमचे म्हणणे ऐकून घ्यावे.

**सभापती** : मी लगेच निर्णय देत नाही. माझे प्रास्ताविक सांगून झाल्यानंतर मी आपल्याला बोलण्याची संधी देतो आणि त्यानंतर मी निर्णयाप्रत येणार आहे. अशा पध्दतीचा हा अतिशय गंभीर

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**सभापती** ......

विषय आहे म्हणून नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत जी विनंती केलेली आहे त्या अनुषंगाने मी माननीय विरोधी पक्ष नेते यांना विनंती करतो की, त्यांनी हा विषय नियम 289 च्या प्रस्तावाचा कसा होतो हे थोडक्यात सांगावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, रत्नागिरी जिल्ह्यातील जैतापूर येथे एक नियोजित अणुऊर्जा प्रकल्प होऊ घातलेला आहे. सुरुवातीपासूनच कोकणातील जनतेने त्याला विरोध दाखविलेला आहे आणि विरोध करीत आहेत. त्या विरोधाची काही कारणे आहेत. जपानमध्ये नुकत्याच झालेल्या भूकंपामुळे तेथील अणुभट्टयांमध्ये स्फोट झाल्यामुळे जैतापूर प्रकल्पामध्ये देखील असे स्फोट होण्याची भीती तेथील जनतेच्या मनामध्ये निर्माण झालेली आहे. कोकणातील पर्यावरणाचा प्रश्न आहे. जैतापूर परिसरातील नागरिक त्यामुळे असुरक्षित झालेले आहेत. हा प्रकल्प होऊ नये म्हणून त्यांनी अर्ज, विनंत्या, निवेदने अशा लोकशाही मार्गाने त्या ठिकाणी आंदोलन सुरु केलेले आहे आणि त्या प्रकल्पाच्या बांधकामाला त्यांनी विरोध केलेला आहे. सभापती महोदय, कोकणातील जनता ही स्वत:च्या अस्तित्वासाठी झगडणारी आहे. कोकणातील या जनतेने तो प्रकल्प होऊ नये म्हणून निवेदन देण्यासाठी 18 एप्रिल, 2011 रोजी काढलेला मोर्चा शांततेच्या मार्गाने जात असताना त्यावर पोलिसांनी गोळीबार केला.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

त्या गोळीबारामध्ये एका नागरिकाला आपला जीव गमवावा लागला आहे आणि जवळपास 6 व्यक्ती जखमी झालेल्या आहेत. एखादा प्रकल्प व्हावा की होऊ नये यासंबंधी लोकशाही जनमताला महत्व असते. असे असताना दडपशाही करुन अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु असताना आंदोलकांवर गोळीबार करण्याचे आदेश देणे हे हुकूमशाही प्रवृत्तीचे लक्षण आहे. सभापती महोदय, एखाद्या ठिकाणी गोळीबार झाला असेल, त्यामध्ये माणसे मेली असतील तर त्यासंबंधी सभागृहात अनेकदा चर्चा झालेली आहे. त्याची अनेक उदाहरणे देता येतील. ती सांगून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. सभापती महोदय, आजचे सर्व कामकाज बाजूला ठेवण्यासंबंधी आम्ही नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे, ती स्वीकृत करण्यात यावी. पोलिसांनी केलेल्या गोळीबारात नागरिक मृत्युमुखी पडले असतील तर या सभागृहात त्यावर चर्चा करण्यापेक्षा अन्य महत्वाचे कामकाज असू शकत नाही. म्हणून आपण या चर्चेला परवानगी द्यावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय,...

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी गंभीर प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनाही आपले मत मांडावयाचे आहे, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनाही बोलावयाचे आहे. या विषयावर आता बोलण्यापेक्षा माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जी मागणी केलेली आहे आणि त्याला सत्ताधारी पक्षाचा सुध्दा पाठिंबा आहे. त्यामुळे प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन या विषयाची चर्चा सुरु करावी. आता चर्चा सुरु केली तर मुद्दे रिपीट होणार नाहीत. ही चर्चा सुरु करण्यापूर्वी माझी सभागृहाला विनंती आहे. त्या ठिकाणी गंभीर घटना घडलेली आहे. ही घटना सरकारने सुध्दा गांभीर्याने घेतलेली आहे. या ठिकाणी चर्चा सुरु झाल्यावर माननीय गृह मंत्री एक तास सभागृहात उपस्थित राहू शकणार नाहीत. परंतु माननीय गृह राज्यमंत्री उपस्थित राहतील. या चर्चेतील मुद्यांची ते नोंद घेतील तसेच इतरही कॅबिनेट मंत्री उपस्थित राहतील. कारण आज सकाळी विधानसभेत 11 वाजता या विषयावर चर्चा सुरु झालेली आहे. या चर्चेसाठी तेथे 3 तासाची वेळ निश्चित केलेली होती. विधानसभेत माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांचे उत्तर संपल्यानंतर तेच या

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.अजित पवार....

सभागृहात सुध्दा उत्तर देतील. या चर्चेच्या वेळी सन्माननीय विरोधी पक्ष नेते, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम, जयंत पाटील आपापली मते मांडतील तसेच दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्यही या चर्चेत भाग घेतील. ही घटना वेगळी आहे. सभापती महोदय, आता त्यावर बोलून वेळ घालविण्यापेक्षा आपण या चर्चेला मान्यता द्यावी व चर्चेला ताबडतोब सुरुवात करावी अशी माझी विनंती आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, नियम 289 च्या निकषामध्ये हा विषय कसा बसतो ते सांगण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे. या विषयावर आता भाषण करण्यासाठी मी उभा नाही. या घटनेचे गांभीर्य किती आहे ते मी फक्त सांगणार आहे. त्यानंतर निर्णय देण्याचा आपल्याला अधिकार आहे. सभापती महोदय, आता अधिवेशन सुरु आहे, घटना नुकतीच घडली असल्यामुळे या विषयात तातडी आहे, गोळीबाराच्या घटनेशी शासनाचा सरळ संबंध आहे. या गोळीबारामध्ये तबरेज सैदकर हा मुलगा मृत्युमुखी पडलेला आहे. त्यामुळे या विषयावर चर्चा होण्याची तातडी निर्माण झाली आहे.

सभापती महोदय, या राज्याला विजेची आवश्यकता आहे हे आम्हाला सुध्दा मान्य आहे. परंतु शासनाने विदर्भात 55 हजार मेगावॅटचे प्रकल्प, कोकणामध्ये 50 हजार मेगावॅटचे प्रकल्प ज्या पध्दतीने आणण्याचा प्रयत्न केला आहे तो योग्य नाही. राज्याला केवळ 6 हजार मेगावॅट विजेची आवश्यकता असताना सुपारी घेऊन संपूर्ण कोकणाला उद्ध्वस्त करण्याचा घाट घातला जात आहे. कोकणातील माणसांना गोळ्या घालून ठार करण्याचे धाडस हे शासन करीत असेल तर त्या बाबत नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव मंजूर झाला पाहिजे व त्यावर सभागृहात चर्चा झाली पाहिजे.

सभापती महोदय, मी यापूर्वी सुध्दा सांगितलेले आहे. खेड येथे एचपीसीएल या कंपनीला 9 गावातील जागा देण्यासाठी लोकांवर दबाव आणला जात आहे. त्या लोकांना जागा रिकामी करण्यासाठी नोटिसा दिलेल्या आहेत. त्याच पध्दतीने जैतापूरमध्ये प्रयत्न होत आहेत हे कालच्या घटनेतून सिध्द झालेले आहे. त्याच प्रमाणे सबंध देशातील पहिला भूगर्भीय औष्णिक प्रकल्प कोकणात आणण्याचा घाट घातला जात आहे, त्यासाठी बैठका झालेल्या आहेत. त्या बाबतचा अहवाल शासनाला सादर झालेला आहे, शासनाने तो अहवाल दडपून ठेवलेला आहे.

यानंतर श्री.शिगम....

अमुद्रित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

भूगर्भीय औष्णिक ऊर्जा प्रकल्प कोकणामध्ये आणला जात आहे. कोकणामध्ये काही शिल्लक ठेवायचे नाही, कोकण उद्ध्वस्त करण्याचा घाट या शासनाने घातलेला आहे....

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांना सांगू इच्छितो की, या प्रस्तावावरील चर्चेला मी मान्यता दिल्यानंतर त्यांनी त्या चर्चेच्या वेळी बोलणे योग्य होईल.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, या विषयाला तातडी आहे. जैतापूर येथे गोळीबार होऊन त्यामध्ये एकाचा मृत्यू झालेला आहे. तेव्हा नियम 289 अन्वये प्रस्ताव स्वीकारुन त्यावर चर्चा घ्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 289 अन्वये मांडलेल्या प्रस्तावाला सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी पाठिंबा दिलेला आहे. सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी देखील चर्चेला मान्यता दिलेली आहे. विषय अत्यंत गंभीर आहे. दुर्दैवाने तेथे झालेल्या गोळीबारामध्ये एक निष्पाप आंदोलक मारला गेला आहे. घटना अतिशय गंभीर आहे. सभागृहातील सत्तारुढ पक्षाने देखील या विषयावर तातडीने चर्चा घ्यावी असे सांगितलेले आहे. किंबहुना त्यांनी असेही सांगितले आहे की, आजचा प्रश्नोत्तराचा तास देखील अपवाद म्हणून तहकूब करावा. या पूर्वी या सदनामध्ये असा निर्णय घेतलेला होता की, अशा प्रकारच्या प्रस्तावावर प्रश्नोत्तराचा तास संपल्या नंतर चर्चा घ्यावी. प्रश्नोत्तराचा तास तहकूब करु नये असे यापूर्वीचे सदनाचे मत आहे...

श्री. जयंत प्र. पाटील : या घटनेचे गांभीर्य वेगळे आहे...

**सभापती** : या घटनेचे गांभीर्य वेगळे असल्यामुळे या प्रस्तावाच्या अनुषंगाने दोन्ही बाजूकडून गांभीर्याने विचार केला गेला आहे. आजच्या चर्चेसाठी मी हा प्रस्ताव स्वीकारतो. मी नियम 97 अन्वये चर्चेला परवानगी देत आहे.

श्री. रामदास कदम : या घटनेशी सरकारचा थेट संबंध आहे आणि अधिवेशन चालू असताना अशा प्रकारची गंभीर घटना घडलेली आहे. तेव्हा नियम 289 अन्वये या प्रस्तावावर चर्चा व्हावी अशी आमची आपणास विनंती आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेते आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावनांशी मी सहमत आहे. सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी अशा प्रकारची चर्चा व्हावी अशी सूचना केलेली आहे. मी नियम 97 खाली चर्चेला परवानगी देत आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : धटना अतिशय गंभीर आहे. स्थगन प्रस्तावाच्या स्वरुपात या सदनामध्ये चर्चा झाली पाहिजे. या सभागृहामध्ये अनेक वेळा अशा प्रकारची चर्चा झालेली आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य घोषणा देतात.)

**सभापती** : मी सदनाचे कामकाज 10 मिनिटासाठी तहकूब करीत आहे. मी सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या गटनेत्यांना माझ्या दालनात बोलावतो व त्यांच्याशी चर्चा करुन निर्णय घेतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.30 ते 1.40 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

--

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>स्थगितीनंतर</u>**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.मोहन जोशी)**

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी )** : सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी तहकूब करण्यात येत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजून 50 मिनिटांनी पुन: भरेल.

( **सभागृहाची बैठक दुपारी 1.41 ते 1.50 वाजेपर्यंत स्थगित झाली.** )

---------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहात कॅबिनेट दर्जाचे एकही मंत्री उपस्थित नाहीत, ही पध्दत योग्य नाही. आपण आसनस्थ झाल्यानंतरही कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित झ ाालेले नाहीत. त्यामुळे आपण सभागृहाची बैठक पाच मिनिटासाठी तहकूब करावी, अशी मी विनंती करतो.

**सभापती** : मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.50 ते 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगिती नंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**सभापती** : सभागृहात एकही मंत्री महोदय उपस्थित नसल्याने नुकतीच सभागृहाची बैठक दहा मिनिटांसाठी मला स्थगित करावी लागली होती. यापुढे सभागृहात कॅबिनेट मंत्र्यांची उपस्थिती अनिवार्य असावी, याची नोंद सत्तारुढ पक्षाने घ्यावी.

सभागृहात प्रश्नोत्तराचा तास बाजूला सारुन जैतापूर प्रकल्पाला विरोध करणाऱ्या आंदोलनकर्त्यांवर झालेल्या गोळीबाराच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये स्थगन प्रस्तावाची जी सूचना दिलेली होती त्या सूचनेला अनुसरुन माझ्या दालनात माननीय विरोधी पक्ष नेते, विरोधी पक्षाचे इतर सन्माननीय सदस्य तसेच सभागृहाचे नेते यांच्याबरोबर चर्चा केल्यानंतर असे ठरले की, जैतापूर येथील प्रकल्पाला विरोध करणाऱ्या आंदोलकांवर जो गोळीबार झाला त्या अनुषंगाने नियम 97 अन्वये चर्चा घ्यावी अशी सूचना मी केली होती. पण झालेल्या चर्चेनुसार आणि ही अत्यंत महत्वाची बाब असल्याने मी नियम 93 अन्वये ही चर्चा स्वीकारतो. या विषयावर सभागृहात दोन तासाची चर्चा होईल. त्यानंतर 30-35 मिनिटांसाठी सभागृहाची बैठक स्थगित करण्यात येईल. आता 2 वाजून दोन मिनिटे झालेली आहेत. बरोबर चार वाजून दोन मिनिटांनी मंत्री महोदयांच्या उत्तरासह चर्चा संपविण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : महोदय, आम्हाला यावर "पोल" मागायचे आहे.

**सभापती** : ते नंतर पाहू. पण आता चर्चा करीत असताना सत्तारुढ आणि विरोधी पक्ष अशा दोघांनाही 45-45 मिनिटांचा वेळ मिळेल.

श्री. रामदास कदम : महोदय, मी चर्चेला सुरुवात करतो म्हणून आमच्या पक्षाला एक तासाची वेळ देण्यात यावी.

**सभापती** : ठीक आहे.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाला विरोध करणाऱ्या आंदोलकांवर पोलिसांनी केलेल्या अमानुष लाठीमार व गोळीबारात एका आंदोलकाचा झालेला मृत्यू

**मु.शी.**: जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाला विरोध करणाऱ्या आंदोलकांवर पोलिसांनी केलेल्या अमानुष लाठीमार व गोळीबारात एका आंदोलकाचा झालेला मृत्यू या विषयावर सर्वश्री रामदास कदम, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री जयंत प्र. पाटील, पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, विनोद तावडे, संजय केळकर, गोपीकिशन बाजोरिया, रामनाथ मोते यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : या प्रस्तावावर एकूण दोन तासाची चर्चा होईल. त्यात निम्मा वेळ विरोधी पक्षाला आणि निम्मा वेळ मंत्री महोदयांच्या उत्तरासह सत्तारुढ पक्षाला मिळेल. सन्माननीय सदस्यांनी भाषण करताना वेळेचे बंधन पाळून मला सहकार्य करावे.

आता प्रस्तावावर चर्चा सुरु होईल.

श्री. रामदास कदम ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो :--

"जैतापूर येथील नियोजित अणुऊर्जा प्रकल्पाला तेथील स्थानिकांचा असलेला विरोध, त्यातच, जपान येथे नुकत्याच झालेल्या भूकंपामुळे तेथील अणुभट्टीमध्ये स्फोट झाल्याने नियोजित जैतापूर प्रकल्पामध्ये देखील असा स्फोट होण्याच्या भीतीमुळे परिसरातील नागरिकांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण पसरणे, भूगर्भीय औष्णिक ऊर्जा प्रकल्पामुळे होणारे कोकणाचे नुकसान, परिणामी या प्रकल्पाला स्थानिकांनी प्रकर्षाने विरोध करणे, या विरोधाला दिनांक 18 एप्रिल, 2011 रोजी हिंसक वळण लागणे, हा विरोध डावलून माडबन येथे प्रकल्पाच्या नियोजित स्थळावर कुंपण व इतर बांधकामाची कामे सुरु केल्याने प्रकल्पविरोधी आंदोलक व तेथील प्रकल्पग्रस्त मोठ्या संख्येने प्रकल्पस्थळी चालून येणे, संतप्त जमावामध्ये महिलांचा मोठ्या प्रमाणावर असलेला समावेश, या महिला आंदोलकांवरही झालेला लाठीमार, जैतापूर वासियांनी केलेल्या आंदोलनावर पोलिसांनी केलेला लाठीमार व गोळीबारात तरबेज अब्दुल्ला सैदकर या आंदोलकाचा जागीच झालेला मृत्यू, अनेक जण गोळीबारात जखमी होणे, परिणामी तेथील जनतेमध्ये पसरलेला संताप व त्या परिसरातील दिवसेदिवस वाढत असलेली चिंताजनक परिस्थिती"

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

सभापती महोदय, मला प्रथमत: एक गोष्ट सांगावयाची आहे की, जेव्हा मुख्यमंत्र्यांनी या अणुऊर्जेच्या प्रकल्पाचे समर्थन केले होते त्यावेळी त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, जगात अणुभट्टीने कोठेही अपघात झालेला नाही. त्यावेळेस आम्ही टाहो फोडून सांगत होतो की, या अणुभट्टीचा स्फोट भविष्यात होऊ शकतो. ज्यावेळी जपानमध्ये भूकंप झाला, त्सुनामी आली त्यावेळेस तेथील अणुभट्टीमध्ये स्फोट झाल्यानंतर केंद्रीय मंत्री श्री. जयराम रमेश यांना नाइलाजाने आपले स्टेटमेंट बदलावे लागले होते. काल दिनांक 18 एप्रिल, 2011 रोजी जैतापूर येथे जी दुर्दैवी घटना घडली त्या घटनेच्या निमित्ताने या ठिकाणी चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, दिनांक 9 एप्रिल, 2011 रोजी शिवसेनेच्या वतीने जैतापूर येथे माननीय उध्दवजी ठाकरे यांच्या उपस्थितीत सभा आयोजित करण्यात आली होती व त्या सभेत मी सुध्दा उपस्थित होतो. सभेच्या ठिकाणी आंदोलक माननीय उध्दवजी ठाकरे यांना अडचणी सांगत होते. ज्यावेळेस आंदोलक अडचणी सांगत होते त्यावेळेस त्या अडचणी मी सुध्दा ऐकत होतो. आंदोलक सांगत होते की, या ठिकाणी अजित पवार नावाचा एक प्रांत अधिकारी आहे. आमच्या राज्याच्या उप मुख्यमंत्र्यांचे जे नाव आहे तेच नाव या ठिकाणच्या प्रांत अधिका-याचे आहे हे मला दुर्दैवाने येथे सांगावे लागत आहे. हा प्रांत अधिकारी तेथील आंदोलकांना सांगत होता की, तुम्ही तुमच्या जागा प्रकल्पाला दिल्या नाहीत तर पोलीस तुम्हाला कधीही गोळया घालतील. जैतापूरच्या सभेत या गोष्टीचा मी उल्लेख केला होता. या ठिकाणच्या प्रांत अधिका-याने आंदोलकांना अशी धमकी दिली आहे की, ज्या ज्या वेळी मी मंत्रालयात जाईल त्याच्या अगोदर मला दोन व्यक्तींची नावे दिली तर मी त्यांना तडीपार करण्याची नोटीस देईन. मंत्रालयात जातांना मी प्रत्येक वेळी दोघांना तडीपार करुन आलेलो आहे याची माहिती द्यावी लागते कारण मला तसे मंत्र्यांचे आदेश मिळालेले आहेत. अशा प्रकारे तेथील आंदोलकांवर प्रांत अधिकारी अत्याचार करीत आहे.

या ठिकाणच्या 750 जमीन मालकांपैकी 120 जमीन मालकांनी गुपचूप जाऊन पैसे घेतलेले आहेत, तर काहींना धाकदपटशा दाखवून पैसे घ्यावयास लावले आहेत. ज्या जमीन मालकांना जबरदस्तीने चेक हातात दिले चेक बँकेत अद्यापही टाकलेले नाहीत. जैतापूर पॉवर प्रोजेक्टचे कंपाऊंड घालण्याचे काम सुरु आहे याची माहिती आंदोलकांना समजल्यानंतर आंदोलक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

प्रल्कपावर जाऊन धडकले. या आंदोलकांमध्ये महिलांची संख्या अधिक प्रमाणात होती. या आंदोलनामध्ये विशेषत: मुस्लीम मच्छीमार बांधव मोठया प्रमाणात होते. कालच्या घटनेमध्ये ज्या सहा आंदोलकांना गोळया लागल्या होत्या ते सर्व मुस्लीम बांधव आहेत. कालच्या गोळीबारात तबरेजचा मृत्यू झालेला आहे. तरबेजची पत्नी सांगत होती की, तरबेजच्या पोटामध्ये केवळ एक गोळी लागली होती. तरबेजला जेव्हा पोलिसांनी गाडीत घातले तेव्हा त्याची पत्नी सांगत होती मला सुध्दा त्यांच्या बरोबर गाडीत यावयाचे आहे परंतु पोलिसांनी तिला गाडीत न घेता तिला लाथ मारुन गाडीच्या बाहेर काढून दिले. तरबेजच्या पत्नीचे असे म्हणणे आहे की, त्याला गाडीत घेतल्यानंतर पोलिसांनी अजून त्याच्या पोटात दोन गोळया घातल्या. असा भयानक अत्याचार जैतापूरमध्ये आंदोलकांवर सुरु आहे. मोगलशाही, जुलूमशाही, ब्रिटिशशाही सारखे काम जैतापूरमध्ये चालले आहे. जालियानवाला बागमध्ये जशी घटना घडली तशा प्रकारची घटना काल जैतापूरमध्ये घडलेली आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम ..

सभापती महोदय, नाटे ते रत्नागिरी पर्यंतचा प्रवास फक्त एक तासाचा आहे. परंतु नाटे या गावातून तरबेजला घेऊन 3.00 वाजता गाडी निघाली आणि रत्नागिरीच्या सिव्हील हॉस्पिटलमध्ये संध्याकाळी 6.15 वाजता ती गाडी पोहोचली होती. एक तासाच्या प्रवासाला सव्वा तीन तास लागले होते. कदाचित तो जीवंत राहील म्हणून गाडीमध्ये पोलिसांनी त्याचा खून पाडण्याचे काम केले होते. एखादा माणूस आजारी पडला तर त्याचा प्राण वाचावा म्हणून त्याला लवकरात लवकर हॉस्पिटलमध्ये कसे घेऊन जाता येईल यासाठी प्रयत्न केला जातो व त्याला घाई घाईने हॉस्पिटलमध्ये नेले जाते परंतु या प्रकरणामध्ये मात्र नाटे ते रत्नागिरी हा एक तासाचा प्रवास असतांना सव्वा तीन तास लागले आहेत. तरबेजची बॉडी गोणीमध्ये घालून जीपमध्ये ठेवण्यात आली होती व त्यावर पोलिसांनी पाय ठेवले होते. ही बाब मी अत्यंत जबाबदारीने सांगत असून माझ्याकडे त्यासंबंधीची माहिती आहे आणि मी सतत तेथील लोकांबरोबर संपर्कामध्ये आहे.आज दहा हजार लोक सिव्हील हॉस्पिटलजवळ जमलेले आहेत. शासनाचा निषेध करण्यासाठी आज रत्नागिरी जिल्हा पूर्णपणे बंद ठेवण्यात आला आहे. त्या आंदोलकाला नाटेहून रत्नागिरीला आणण्यासाठी तीन तास लावण्यात आले व त्याला गोणपाटामध्ये गुंडाळून पायाखाली ठेवण्यात आले होते.दगडाचे काळीज असलेल्या व्यक्तीप्रमाणे पोलीस वागले आहेत.अशा प्रकारचे काम त्या ठिकाणी शासनाच्या वतीने करण्यात आले होते.

सभापती महोदय, पहिल्या दिवसापासून आम्ही असे सांगत आहोत की तेथील शेतक-यांबरोबर चर्चा करावी व गोड बोलून त्यांच्याकडून जागा मिळत असेल तर ती जागा निश्चितपणे घ्यावी त्याबाबतीत आमचे काहीही म्हणणे नाही. परंतु पोलिसांच्या बळाचा वापर करुन शासन आंदोलन चिरडत आहे .तेथील गरीब शेतक-याला अशा प्रकारे संपविणार असाल आणि त्याला उद्ध्वस्त करणार असाल तर शिवसेना त्यांच्या बरोबर आहे ही भूमिका शिवसेनेचे कार्याध्यक्ष श्री. उध्दवजी ठाकरे यांनी जाहीरपणे सांगितली होती आणि मी नागपूरच्या अधिवेशनामध्ये तेच सांगितले होते. राजकीय दृष्टया या प्रकल्पाला आमचा विरोध नाही. तेथील शेतक-यांबरोबर शिवसेना आहे. एवढीच आमची भूमिका होती. त्या भागातील शेतक-यांना तुम्ही समजावून सांगा असे आम्ही सांगितले होते परंतु तसे झालेले नाही. त्या भागात महिन्यातील 30 दिवसापैकी 25 दिवस जमावबंदी असते. लोकांनी जमावयाचे नाही. लोकशाही

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम ..

पध्दतीने लोकांनी जमा व्हावयाचे नाही तसेच लोकांनी आंदोलन करावयाचे नाही. हम करेसो कायदा अशी भूमिका शासनाने घेतली होती. त्या जिल्हयातील जिल्हाधिकारी आणि एस.पी. महिन्यातील 25 ते 28 दिवस 144 कलम लावतात. तेव्हा आपण मोगलशाहीत आहोत काय असे वाटू लागते .लोकशाही पध्दतीने तेथील लोकांना त्यांचे म्हणणे मांडण्याचा सुध्दा अधिकार दिला जात नाही. लोकशाही पध्दतीने मोर्चा आणि आदोलन करण्याचा तेथील लोकांना अधिकार नाही ही कोणती जुलूमशाही सुरु आहे ? तुम्ही कोणत्या पध्दतीने सरकार चालवत आहात ? पोलिसाच्या बंदुकीने प्रश्न का सोडवत आहात ?

राज्यात विजेची आवश्यकता आहे हे मी समजू शकतो परंतु गेल्या आठ दहा वर्षापासून माननीय ऊर्जा मंत्र्यांनी दिलेली उत्तरे आपण काढून बघा. 1999 सालापर्यत म्हणजेच जोपर्यत राज्यामध्ये शिवसेनेची सत्ता होती तोपर्यत राज्यात 100 टक्के वीज होती. आता राज्यावर 2 लाख 39 हजार कोटी रुपयांचे कर्ज झालेले आहेत. त्यातील 50 हजार कोटी रुपये जरी वीज निर्मितीसाठी खर्च केले असते तरी राज्यातील विजेची गरज भागवता आली असती. 2 लाख 39 हजार रुपये कोठे गेले हे समजत नाही. रत्नागिरी, ठाणे, रायगड आणि सिंधुदुर्ग या चार जिल्हयात 55 हजार मे.वॅ. वीज निर्मितीचे प्रकल्प सुरु करण्यात आलेले आहेत विदर्भामध्ये फक्त 50 हजार मे.वॅ. वीज निर्मितीचे प्रकल्प सुरु करण्यात आलेले आहेत.अशा प्रकारे कोकण आणि विदर्भ हे दोन्ही प्रांत संपवून टाकण्याचा व उद्ध्वस्त करण्याचा हा प्रयत्न आहे. शासनाला मला साधा प्रश्न विचारावयाचा आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

राज्याला सध्या 6 हजार मेगावॅट विजेची गरज असतांना तुम्हाला 1 लाख 20 हजार मेगावॅट विजेची आवश्यकता कां वाटत आहे? हा रु.1 लाख हजार कोटींचा प्रकल्प आपण कुणासाठी उभारीत आहात. या रु.1 लाख हजार कोटींपैकी आमच्या खिशामध्ये किती जातील, आमच्या घशामध्ये किती जातील याकडे लक्ष ठेवून तुम्ही हा प्रकल्प उभा करीत आहात असे आम्ही समजायचे काय? ही तुमची दंडुकेशाही, तुमचा गोळीबार फक्त रु.1 लाख हजार कोटींवर लक्ष ठेवून चालला आहे काय? तुम्ही मनात आणले तरी आणि 35 हजार कोटी रुपये खर्च केले तरी त्यामधून राज्यामध्ये 20 हजार मेगावॅट वीज निर्माण होणार नाही . आज तुम्हाला 10 हजार मेगावॅट इतकी वीज मिळत आहे. दोन महिन्यानंतर, तीन महिन्यानंतर आणखी वीज मिळेल. तर मग तुम्हाला या 1 लाख 20 हजार मेगावॅट विजेची आवश्यकता कशासाठी आहे हा माझा शासनाला सवाल आहे? आपण कोकणामध्ये 55 हजार मेगावॅट विजेचे प्रकल्प आणीत आहात. ज्या कोकणाला तुम्ही फलोद्यान जिल्हा म्हणून जाहीर केला. या जिल्ह्यामध्ये तुम्ही लाखो-कोटयावधी रुपयांची झाडे लावली, फळबागा लावल्या, आंबा लावला, चिंच लावली, आवळा लावला, चिकू लावला, काजू लावला या झाडांचे पीक आमच्या तोंडामध्ये यायला लागले त्यावेळी आमच्या हातामध्ये चार पैसे येणार अशी लोकांमध्ये आशा निर्माण झाली. त्या अनुषंगाने कोकणामध्ये फळ प्रकिया कारखाने आल्यानंतर आमचे दारिद्रय नष्ट होईल आणि आमच्या हाताला काम मिळेल असे लोकांना वाटू लागले. अशा प्रकारच्या आशा लोकांच्या मनामध्ये पल्लवीत होत असतांना नेमके त्याच वेळी तुम्ही अशाप्रकारचा अणु ऊर्जा प्रकल्प आणून या लोकांना काय मिळवून दिले? अगोदरच तुम्ही कोकणासाठी काही देत नाही, स्वातंत्र्याचा सूर्य कधीही कोकणामध्ये उगवला नाही. या संदर्भातील विधेयक ज्यावेळी सभागृहामध्ये चर्चेला येईल त्यावेळी मी सविस्तरपणे त्यावर बोलणार आहे. एका बाजूला विकासाच्या बाबतीत कोकणावर सतत अन्याय करीत आहात तर दुसऱ्या बाजूला जगाच्या पाठीवर जपानमध्ये काय झाले ते आपण पाहिले आहे. ते चांगले झाले असे मी म्हणत नाही परंतु ते संपूर्ण जगाने उघडया डोळयांनी पाहिले आहे.

सभापती महोदय, मला एक गोष्ट समजली पाहिजे की, रसायनी असो, महाड असो, सावित्री नदी असो या परिसरामध्ये केमिकल झोन निर्माण करण्यात आले आहेत. या केमिकल झोनमुळे तेथील खाडीमधील मासे मरत आहेत. आमच्या आजूबाजूच्या सर्व गावामधील पिण्याचे पाणी नष्ट झाले. लोटे औद्योगिक वसाहतीच्या बाजूला असलेल्या शाळेमधील मुले अनेक वेळा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. रामदास कदम.....

बेशुध्द पडलेली आहेत. मी त्या भागामध्ये 20 वर्षे आमदार म्हणून काम केल्यानंतर या ठिकाणी जबाबदारीने बोलत आहे. मी विधानसभेमध्ये किमान 100 वेळा तरी हा विषय उपस्थित केला होता त्यावेळी मला 100 वेळा शासनाकडून आश्वासने मिळाली. एकदा तर माननीय मंत्री श्री. गणेश नाईक यांनी तावातावाने सांगितले होते की, यापुढे जर समुद्रातील मासे मेले, पाण्याचे प्रदूषण झाले, हवेचे प्रदूषण झाले तर आमच्या अधिकाऱ्यांना ते मासे खायला घालीन. आज आपल्याला रसायनी असो, महाड असो, सावित्री नदी असो सर्व ठिकाणी प्रदूषण झालेले पहावयास मिळत आहे. कोणताही नवीन प्रकल्प कोकणामध्ये आणीत असतांना या प्रकल्पामुळे प्रदूषण होणार नाही असे आपण सांगता आणि तो प्रकल्प सुरु झाल्यानंतर आमच्या वाटयाला आलेले दु:ख आम्ही भोगतो.

सभापती महोदय, आतापर्यन्त आपल्यासमोर न आलेली एक बाब मला या ठिकाणी सांगितली पाहिजे. कोकणामध्ये आणखी एक मोठा प्रकल्प आणण्याचे शासनाचे नियोजन सुरु आहे. त्या प्रकल्पाचे नाव "भूगर्भीय औष्णिक ऊर्जा प्रकल्प" असे आहे. दिनांक 21 जानेवारी, 2011 रोजी झालेल्या बैठकीला अपारंपारिक ऊर्जामंत्री माननीय श्री. गणेश नाईक, माननीय राज्यमंत्री श्री. डी.पी. सावंत, महाऊर्जाचे महासंचालक श्री. आनंद लिमये, महाव्यवस्थापक श्री. एस. आर. चौधरी इत्यादी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. कोकणातील खेड ते राजापूर आणि पाली ते उन्हवरे तसेच कोकनेरे ते अकलोली या भागात भूगर्भीय औष्णिक ऊर्जेपासून वीज निर्मितीचा प्रकल्प उभारण्याचा निर्णय झाला आहे. या भूगर्भीय औष्णिक ऊर्जेला आपण जिओथर्मल म्हणतो त्या पासून वीज निर्मितीचा प्रकल्प उभारण्याचे निश्चित झाले आहे. देशामधील पहिला जिओथर्मल प्रकल्प उभारण्यासाठी महाराष्ट्र महाऊर्जा व थरमॅक्स कंपनी यांच्यामध्ये सामंजस्य करार झालेला असून तो मान्यतेसाठी शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे. एका बाजूला आपण अशापध्दतीने भूगर्भीय औष्णिक ऊर्जा प्रकल्प आणीत आहात आणि दुसऱ्या बाजूला जैतापूरचा अणु ऊर्जा प्रकल्प आणीत आहात, तिसऱ्या बाजूला एचपीसीएलचा प्रकल्प उभा करण्यासाठी लोटेच्या परिसरातील नऊ गावांना नोटिसा देण्यात आलेल्या आहेत. आपल्याला कोकणामध्ये काही शिल्लकच ठेवायचे नाही काय, हे काय चालले आहे? दुसऱ्या बाजूला चार जिल्ह्यांमध्ये 55 हजार मेगावॅट क्षमतेचे वीज प्रकल्प उभारणार आहात. सभापती महोदय, आम्ही यापुढे या शासनाची दादागिरी चालू देणार नाही.

(यानंतर श्रीमती थोरात)

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम.......

या शासनाच्या माध्यमातून, या गोळीबाराच्या माध्यमातून तेथील स्थानिक सहा हजार मच्छीमार कुटुंबे उद्ध्वस्त होणार आहेत. ही सर्व कुटुंबे मुस्लीम आहेत. सभापती महोदय, आपल्या मार्फत मी शासनाला शेवटचे सांगू इच्छितो की, आता आपण थांबा. ज्या 6 लोकांवर गोळया घालण्यात आलेल्या आहेत त्यातील एक अतिशय गंभीर आहे. त्यांच्या डोक्यामध्ये गोळी घुसली आहे. मी देखील या राज्याचा गृह राज्य मंत्री म्हणून काम केलेले आहे.ज्यावेळी असे प्रसंग येत असतात त्यावेळी आंदोलकांवर पहिल्यांदा पाणी मारण्यात येते. त्यानंतर अश्रुधूर सोडण्यात येतो. नाईलाज झ ाला तर रबरी गोळया मिळतात त्याचा वापर करण्यात येतो आणि शेवटच्या क्षणाला अशा प्रकारे गोळया घालण्यात येतात. पण यातील काही झाले नाही. म्हणून ज्या एस.पी.ने गोळीबाराचे आदेश दिलेले आहेत, ज्या अधिकाऱ्याने गोळीबार केलेला आहे त्याला आजच्या आज सस्पेंड करणार काय, असा माझा प्रश्न आहे. अधिवेशन चालू आहे. सदनाचे कामकाज चालू आहे, असे असताना देखील तेथील एस.पी. गोळीबार करतो, निरपराध लोकांचे जीव घेतो, डोक्यामध्ये गोळया घालतो, पोटामध्ये गोळया घालतो.सभापती महोदय, कमरेखाली गोळया घालता आल्या असत्या. पण तसे झाले नाही. कदाचित येथून आदेश दिले असतील. सभापती महोदय, ज्यांनी हे खून पाडले आहेत, त्यांच्या निलंबनाची घोषणा आजच्या आज करण्यात यावी, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, तेथील सर्व स्थानिक मच्छीमारांनी, जमीनदारांनी सांगितले आहे की, जोपर्यंत जैतापूर येथील अणुऊर्जा प्रकल्प रद्द केल्याची घोषणा माननीय मुख्यमंत्री करणार नाहीत तो पर्यंत तरबेजचे प्रेत आम्ही तेथून उचलणार नाही. त्या जमावाच्या माध्यमातून उद्या त्या ठिकाणी आणखी काही घडले तर त्याला जबाबदार हे शासन असेल. सभापती महोदय, लोकांना उद्ध्वस्त करण्याचे हे पाप चालले आहे. एका बाजूला विदर्भ उद्ध्वस्त करण्यात येत आहे आणि दुसऱ्या बाजूला कोकण उद्ध्वस्त करण्यात येत आहे. म्हणून या गोळीबाराची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे. ज्यांनी गोळीबार केलेला आहे त्यांना तात्काळ निलंबित केले पाहिजे. तसेच जैतापूरचा अणुऊर्जा प्रकल्प तात्काळ रद्द झाला पाहिजे, अशी मागणी मी या ठिकाणी करतो आणि माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद. जयहिंद, जय महाराष्ट्र.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, रत्नागिरी जिल्ह्यातील जैतापूरच्या कालच्या दुर्दैवी घटनेमुळे या प्रकल्पासंबंधी आणि या प्रकल्पाच्या सुरक्षेसंबंधी आणि एकूणच तेथील कायदा व सुव्यवस्थेसंबंधी जे प्रश्न निर्माण झालेले आहेत तसेच काल जी दुर्दैवी घटना घडलेली आहे त्या संदर्भात मी माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे. काल जे घडले ती गोष्ट आपणा कोणालाही अभिमानास्पद किंवा चांगली वाटणार नाही. कोणत्याही आंदोलनाच्या बाबतीत मग शेतकऱ्यांचे आंदोलन असेल, कष्टकऱ्यांचे आंदोलन असेल, कामगारांचे आंदोलन असेल, त्या आंदोलनामध्ये एखादा आंदोलक गोळीबारामध्ये बळी पडावा ही गोष्ट कोणालाही भूषणावह नाही. काल रत्नागिरी जिल्ह्यातील जैतापूर या ठिकाणी जी दुर्दैवी घटना घडली त्या घटनेच्या बाबतीत ज्या भावना या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी व्यक्त केल्या तसेच संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सगळ्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत तेवढ्याच आमच्याही भावना तीव्र आहेत. सगळ्यांच्या भावना तशाच आहेत. परंतु हे सगळे करीत असताना एक गोष्ट तुम्हाला आणि आम्हाला नाकारता येणार नाही. ज्या पुरोगामी महाराष्ट्राचा तुम्ही आणि आम्ही नेहमी उच्चार करतो आणि मिरवतो ते मिरवित असताना आणि महाराष्ट्र पुरोगामी आहे असे सांगत असताना या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये 8 तासांचे लोडशेडिंग, 12 तासांचे लोडशेडिंग असणे, शेतकऱ्यांच्या समोर पाणी उपलब्ध आहे पण शेतीच्या सिंचनासाठी जे पाणी द्यावयाचे आहे त्यासाठी त्याच्या पंपाला वीज नाही अशा प्रकारची भाषणे सुध्दा आम्ही दोन्ही बाजूने केलेली आहेत. या सगळ्या एकंदर परिस्थितीमध्ये या पुरोगामी महाराष्ट्राने प्रगती करावयाची की, नाही अशा प्रकारच्या शंका माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याच्या, कोकणातील आणि विशेषत: रत्नागिरी जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या मनामध्ये येऊ लागलेल्या आहेत.

सभापती महोदय, एक गोष्ट मला नम्रपणे या ठिकाणी सांगावीशी वाटते की, आजपर्यंत या देशामध्ये आणि राज्यामध्ये जेवढे प्रकल्प आले त्या प्रकल्पांच्या बाबतीत आम्ही प्रकल्प कागदावर मांडला आणि तो प्रकल्प तशाचातसा कार्यान्वित झाला असे एकही उदाहरण माझ्या तरी ऐकिवात नाही. म्हणून अशा प्रकारचे प्रकल्प येत असताना प्रामुख्याने आम्ही काही गोष्टींची काळजी घेतली पाहिजे. सगळ्यात प्रथम सुरक्षिततेसंबंधीची काळजी घेतली पाहिजे आणि ती योग्य आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. भाई जगताप ......

एखाद्या प्रकल्पामुळे त्या विभागामध्ये, त्या जिल्ह्यामध्ये किंवा राज्यामध्ये असुरक्षितता निर्माण होत असेल तर त्या प्रकल्पाच्या बाबतीत पुनर्विचार करणे योग्य राहील. परंतु सुरक्षिततेसंबंधीच्या आमच्या मनामध्ये असलेल्या ज्या शंका-कुशंका आहेत त्यांची उत्तरे मिळाल्यानंतर सुध्दा त्या बाबतीत जर अशा प्रकारची भूमिका किंबहुना राजकीय भूमिका जर काही लोक घेत असतील तर ती राज्याच्या विकासाच्या दृष्टीने मारक आहे, असे माझे स्वत:चे मत आहे. म्हणून या प्रकल्पाच्या बाबतीत बोलत असताना तुम्ही-आम्ही आज जे बोलू लागलो आहोत त्यामध्ये जपानमध्ये झालेल्या भूकंपानंतर तुम्हाला आणि आम्हाला जास्त तीव्रतेने याची जाणीव झालेली आहे आणि ती गोष्ट खरी आहे. त्यामध्ये काहीही असत्य नाही. जपानमध्ये झालेला भूकंप, त्यानंतर आलेली त्सुनामी, भूकंपानंतर झ ालेला किरणोत्सर्ग आणि विविध ठिकाणी पोहोचत असलेली त्याची व्याप्ती या सगळ्या गोष्टीतून आपण थोडी सावध भूमिका घेऊन सुरक्षेसंबंधी पुनर्विचार करावयास पाहिजे, याबद्दल कोणाच्याही मनामध्ये शंका असता कामा नये. त्यामुळे केंद्रीय पर्यावरण मंत्र्यांनी सुध्दा या बाबतीमध्ये सांगितले आणि त्या बाबतीत एक समिती गठित होऊन त्या बाबतचा अहवाल आलेला आहे.

सभापती महोदय, मला या ठिकाणी मुद्दाम सांगावेसे वाटते की, ज्या वेळेला आपण ऊर्जेच्या बाबतीत विचार करतो तेव्हा आपल्यासमोर पर्याय किती आहेत ? वेळ कमी आहे आणि हा विषय फार मोठा आहे, हे मला माहीत आहे. परंतु हे जाणून घेणे गरजेचे आहे की, जगभरामध्ये प्रामुख्याने अणुऊर्जा वापरली जाते. आपण फ्रान्सचे उदाहरण देतो. अमेरिकेमध्ये अणुऊर्जेचे 104 प्रकल्प आहेत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...

फ्रान्सची 75 टक्के विजेची गरज अणुऊर्जेच्या माध्यमातून भागविली जाते. आजची जी परिस्थिती आहे ती मी सांगत आहे. सभापती महोदय, सगळ्यात महत्वाचा मुद्दा सुरक्षेचा व पुनर्वसनाचा आहे. एकदा सर्वांनी पाठीमागे वळून पाहण्याची गरज आहे. या राज्यात आतापर्यंत जे प्रकल्प झाले आहेत त्या प्रकल्पग्रस्तांचे 100 टक्के पुनर्वसन झाले आहे का, या प्रश्नाचे उत्तर नाही असे येईल. मग त्यात विदर्भातील प्रकल्प असतील, कोकण रेल्वेचा प्रकल्प असेल किंवा कोयना प्रकल्प असेल. कोयना प्रकल्प पूर्ण होऊन बरीच वर्षे झाली आहेत. एवढ्या वर्षानंतरही त्या प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सुटलेले आहेत असे म्हणण्याचे कोणीही धाडस करणार नाही. आज त्या ठिकाणी आंदोलनकर्ते का आंदोलन करीत आहेत, तेथील मच्छीमार का आंदोलन करीत आहेत त्याचा विचार होणे आवश्यक आहे. त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधनच बंद झाले तर त्यांच्या भविष्याचा प्रश्न निर्माण होणार आहे.

**सभापती** : सत्ताधारी पक्षाकडून 3 सन्माननीय सदस्य या चर्चेवर बोलणार आहेत. प्रत्येक सन्माननीय सदस्यांना 5 मिनिटांचा वेळ म्हणजे 15 मिनिटांचा वेळ काँग्रेस पक्षाच्या वाट्याला आलेला आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, या अणुऊर्जा प्रकल्पाच्या निमित्ताने सुरक्षेचा व पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्या बाबत तेथील जनतेमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झ ाालेले आहे. तेथील मच्छीमारांच्या मनामध्ये, बागायतदारांच्या मनामध्ये व शेतक-यांच्या मनामध्ये पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्या प्रश्नाला शासनाला फोकस करावे लागेल. त्यासंबंधी शासनाला या ठिकाणी उत्तर द्यावे लागेल.

सुरक्षेबाबत बोलत असताना मी असे म्हणेन की, आपली बरोबरी जपानशी होऊ शकत नाही. कारण जपानमधील भूगर्भात व आपल्या भूगर्भात फरक आहे. हा फरक असला तरी तेथे त्सुनामीमुळे महाप्रलय झालेला आहे ते विचारात घेऊन जैतापुर अणुऊर्जा प्रकल्पाच्या सुरक्षेसंबंधी शासनाची भूमिका काय आहे ती या ठिकाणी मांडणे गरजेचे आहे. शासनाची भूमिका लोकांसमोर येणे आवश्यक आहे.

2....

NTK/

श्री.भाई जगताप....

सभापती महोदय, राज्याची प्रगती झाली पाहिजे. मी मघाशी गोळीबारासंबंधी बोललो आहे. यासंबंधीच्या भावनेशी सहमत होत असताना मी असे म्हणेन की, एखादे पोलीस स्टेशन जाळले जात असेल, बाकीच्या गोष्टी होत असतील तर त्या देखील अयोग्य आहेत. आपण सर्वजण या सदनामध्ये बसतो. त्यामुळे आपली जबाबदारी वेगळी आहे. तरी सुध्दा गोळीबाराचे समर्थन कोणीही करणार नाही. त्या ठिकाणी जो गोळीबार झालेला आहे, त्यामध्ये एकाचा मृत्यू झालेला असल्यामुळे त्याची न्यायालयीन चौकशी व्हावी किंवा उच्च दर्जाच्या अधिकाऱ्यांमार्फत चौकशी व्हावी. जे अयोग्य वागले असतील त्यांच्याविरुध्द कारवाई केली जावी असे मी येथे नमूद करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य असे म्हणाले की, त्या ठिकाणी गोळीबार झाला, त्यामध्ये एकजण मृत्युमुखी पडला आहे. त्यानंतर पोलीस स्टेशनवर हल्ला झाला आहे. पोलीस स्टेशन जाळले म्हणून गोळीबार झालेला नाही. कृपया आंदोलनकर्त्यांचा अवमान करु नये. मृत व्यक्तीचा अवमान करु नये.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मी माझे मत मांडत आहे, त्यामध्ये काही चूक असेल तर सन्माननीय सदस्यांनी त्याबाबत दुरुस्ती करुन आपले भाषण केले तरी माझी त्याला हरकत नाही. पण त्यांच्याकडे जशी माहिती आहे तशी माझ्याजवळ सुध्दा माहिती आहे. आम्ही फार जबाबदारीने बोलतो. सन्माननीय सदस्य श्री.रावते हे वरिष्ठ आहेत, परंतु आमच्या सुध्दा दोन टर्म झालेल्या आहेत. एखाद्या सेन्सेटिव्ह प्रश्नावर कसे भाष्य करावयाचे हे आम्हाला देखील समजते. त्या प्रकल्पाच्या सुरक्षेचा प्रश्न प्राधान्याने हाताळला गेला पाहिजे. आंदोलनकर्त्यांच्या मनात सुरक्षेचा सगळयात मोठा प्रश्न आहे. मच्छीमारांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न कसा सोडवू शकतो, या सगळया गोष्टीचे उत्तर योग्य पध्दतीने दिले तर या प्रकल्पाला कोकणातील जनतेचा विरोध होईल असे मला वाटत नाही. कोकणातील नागरिक कधीही संकुचित भावनेने वागत नाहीत. तारापूर येथे 1969 सालापासून आजपर्यंत 6 अणुभट्टया कार्यरत आहेत. सुरक्षा व प्रकल्पग्रस्तांचे पुनवर्सन या दोन मुद्यांबाबत सरकारने आपली भूमिका स्पष्ट करावी. या प्रकल्पाच्या बाबतीत लोकांबरोबर समन्वय साधून, आंदोलनकर्त्यांबरोबर समन्वय साधून मार्ग काढण्याचा प्रयत्न करावा अशी सूचना करुन मी येथेच थांबतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

------

यानंतर श्री.शिगम....

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, कोकणातील जैतापूर येथील अणुऊर्जा प्रकल्प कसा योग्य आहे याचे विवेचन सरकारकडून झालेले आहे. त्यासंबंधी या सभागृहामध्ये चर्चा देखील झालेल्या आहेत. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या बाबतीत जेव्हा आश्वासन दिले त्यावेळी मी सुध्दा आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी त्यांचे अभिनंदन केले होते. माननीय मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले होते की, मी स्वत: कोकणात, जैतापूरला जाईन, तेथील लोकांची या प्रकल्पासाठी मानसिकता बनवीन, त्यांचे प्रश्न समजून घेईन,त्या लोकांना आंदोलन करावे लागणार नाही अशा प्रकारचे वातावरण निर्माण करीन आणि त्यानंतर प्रकल्पाचे काम सुरु करीन. जेव्हा माननीय मुख्यमंत्री तेथे गेले त्यावेळी तेथील स्थानिक शेतक-यांनी, मच्छिमारांनी असंतोष प्रकट केला. मंत्री महोदय श्री. नारायण राणे, तसेच माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली हे देखील त्या ठिकाणी गेले होते. परंतु तेथील लोकांचे ते समाधान करु शकले नाहीत. सभापती महोदय, जो पर्यन्त तेथील शेतक-यांचे, मच्छीमारांचे, स्थानिक ग्रामस्थांचे समाधान होत नाही तो पर्यन्त हे काम सुरु करण्याचा प्रयत्न शासनाने का केला, हा माझा पहिला आक्षेप आहे. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे. त्या ठिकाणी किती लोकांचे पुनर्वसन झ ाले हा संशोधनाचा विषय आहे. सभापती महोदय, आपण प्रकल्पग्रस्तांच्या चळवळीतून आला आहात. कोयना प्रकल्पग्रस्तांचे काय धिंडवडे निघाले याची आपणास कल्पना आहे. किंबहुना आपण पुनर्वसन मंत्री म्हणूनही काम केलेले आहे. ते काम करीत असताना आपल्याला ज्या मर्यादा पडल्या त्याचे दु:ख आपण त्या खुर्चीवरुन सांगितलेले आहे. चर्चेला वेळेची मर्यादा आहे याची मला जाणीव आहे.

सभापती महोदय, तेथील जनतेच्या मनामध्ये आपले राज्यकर्ते का विश्वास निर्माण करु शकले नाहीत ? हा प्रकल्प केल्यानंतर त्यांचे शंभर टक्के पुनर्वसन होईल, आर्थिक उन्नती होईल, मुलाबाळांना नोक-या लागतील असा विश्वास त्यांच्या मनामध्ये का निर्माण होऊ शकला नाही ? कारण प्रकल्प सुरु होताना गोडगोड आश्वासने दिली जातात आणि नंतर त्या आश्वासनांना हरताळ कसा फासला जातो हे सभापती महोदय, आपणास माहीत आहे. आपण या चळवळीतील कार्यकर्ते आहात. आम्ही देखील चळवळीतील लोकांना विश्वासात घेऊन, शासनाशी वाटाघाटी करुन प्रकल्प उभे करुन ते सुरु केलेले आहेत. आरसीएफ प्रकल्पासाठी अलिबाग तालुक्यातील साडेपाच हजार

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील...

एकर जमीन घेण्यात आली होती. आम्ही राज्य शासनाला तसेच केन्द्र शासनाला समजावून सांगितले. त्यावेळी केन्द्रामध्ये मोरारजी देसाई हे पंतप्रधान आणि राज्यामध्ये वसंतदादा पाटील हे मुख्यमंत्री होते. आम्ही केन्द्राशी, राज्य शासनाशी वाटाघाटी करुन तोच प्रकल्प 300 एकरामध्ये बसविला. एका बैठकीमध्ये निर्णय झाला. आम्हाला त्यावेळी कुठे आंदोलन करावे लागले नाही की कुठे गोळीबार करावा लागला नाही. आज कोकणामध्ये अणुऊर्जा प्रकल्प करताना तेथील लोकांची मानसिकता बदलली नाही. कोकणातील लोकांचा या प्रकल्पाबाबत भ्रमनिरास झालेला आहे. त्यांचा शासनावर विश्वास राहिलेला नाही.

....नंतर श्री.गिते....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील...

आंदोलकांवर गोळी कशी मारावयाची, कुठे मारावयाची यासंबंधी नियम ठरलेले आहेत. छातीवर गोळी मारावयाची की पायात मारावयाची की डोक्यात मारावयाची यासंबंधी शासनाने नियम ठरवून दिलेले आहेत. त्या नियमाप्रमाणेच आंदोलकांवर गोळी मारावयास पाहिजे. काल आंदोलकाच्या छातीवर पोलिसांकडून गोळी मारण्यात आली आहे. 2 आंदोलक रुग्णालयात अत्यवस्थ अवस्थेत आहेत. ते आंदोलक जगावेत, अशी मी परमेश्वराकडे प्रार्थना करतो. या प्रश्नाच्या बाबतीत राज्य शासन निश्चितपणे अपुरे पडलेले आहेत. आंदोलन करण्यासाठी लोक काही आपोआप येत नसतात. काही झाले म्हणून लोक आंदोलनासाठी जमतात, अशी परिस्थिती आता राहिलेली नाही. ज्यांच्या पायाला काटे टोचतात, तेच लोक एकत्र येतात. कोणी येईल, कोणीही जाईल आणि त्यासाठी लोक जमतील एवढी जनता आता दुधखुळी राहिलेली नाही.

सभापती महोदय, मी तीन मुद्दे उपस्थित करुन माझे या विषयाबाबतचे विचार संपविणार आहे. आपण जैतापूर येथे 1लाख हजार कोटी रुपयांचा अणु ऊर्जा प्रकल्प उभा करीत आहात, करोडो रुपयांचा प्रकल्प उभा करीत असताना शासनाने विशिष्ट अशी स्वतंत्र यंत्रणा उभी करावयास पाहिजे होती. त्या ठिकाणी स्वतंत्र यंत्रणा उभी करुन तेथील जनतेचे प्रबोधन करण्यासाठी जिल्हाधिकारी लेव्हलचे, प्रांत लेव्हलचे, आयुक्त लेव्हलचे अधिकारी नेमले पाहिजेत. होते. परंतु तशी स्वतंत्र यंत्रणा शासनाने त्या ठिकाणी कार्यान्वित केलेली नसल्यामुळे ही घटना घडलेली आहे.

सभापती महोदय, कालच्या आंदोलकांवर गोळीबार करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिले की शासनाने दिले या गोष्टीचा खुलासा या चर्चेच्या निमित्ताने होणे आवश्यक आहे. कालच्या गोळीबाराच्या घटनेची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे व दोषी अधिका-यांविरुध्द कठोर कारवाई झाली पाहिजे. जो पर्यंत या ठिकाणी शांतता नांदत नाही, जो पर्यंत स्थानिक जनतेमध्ये विश्वास निर्माण होत नाही, स्थानिक लोकांची संमती मिळत नाही, तो पर्यंत या प्रकल्पाची कामे थांबविली पाहिजेत अशी मागणी मी या चर्चेच्या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, सर्व राजकीय पक्षातील लोक लोकशाही मानतात. राजकीय पक्षाच्या पुढाऱ्यांना तसेच तेथील विविध संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना प्रकल्पस्थळी येण्यास शासनाकडून बंदी घातली जाते ही दुर्देवाची गोष्ट आहे. माजी न्यायमूर्ती श्री.बी.जे.कोळसे पाटील, श्रीमती वैशाली

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

पाटील यांना शासनाने जिल्हा बंदी घातलेली आहे. ते अतिरेकी आहेत काय, त्यामुळे त्यांच्यावर जिल्हा बंदी घालण्यात आली आहे काय, त्यांच्यावर जिल्हा बंदी का घालण्यात आली आहे याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात करावा. या देशात लोकशाही आहे. लोकशाहीमध्ये सर्वांना बोलण्याचा अधिकार आहे. अशा प्रकारची जिल्हा बंदी घालून शासन प्रकल्प उभा करणार आहे काय ? आंदोलकांवर गोळया घालून, त्यांचे मुडदे पाडून शासन प्रकल्प उभा करणार आहे काय ? या गोष्टींचा देखील खुलासा झाला पाहिजे. या गोळीबाराच्या घटनेमुळे आज रत्नागिरी जिल्हयात बंद पाळला गेलेला आहे. उद्या महाराष्ट्र बंद होण्याची शक्यता आहे.

सभापती महोदय, नागपूरला अधिवेशन चालू होते, त्यावेळी मी नागपूर शहरात उपस्थित होतो. नागपूर अधिवेशन कालावधीत गोवारी हत्याकांड झाले. माननीय मंत्री महोदय, गोवारींना मारणारे राज्यकर्ते सत्तेवर राहू शकले नाहीत. गोवारी हत्याकांड झाल्यानंतर 1995 या वर्षी निवडणुका झाल्या, त्या निवडणुकीत राज्यकर्ते सत्तेवर राहू शकले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. हा अतिशय दुर्देवी प्रकार आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले आहे की, कोणाचीही तक्रार न राहता प्रकल्प पूर्ण करण्यात येईल. माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाचे उत्तर या चर्चेच्या निमित्ताने माननीय गृहमंत्र्यांनी द्यावे अशी मागणी करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, नियम 289 अन्वये जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पग्रस्त आंदोलकांवर पोलिसांनी केलेल्या गोळीबाराच्या संदर्भात सुरु असलेल्या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आज रत्नागिरी येथील परिस्थिती अत्यंत गंभीर बनलेली आहे. आम्ही दर तासाला तेथील लोकांच्या संपर्कात आहोत. रत्नागिरी येथील हॉस्पिटलच्या परिसरात प्रचंड मॉब जमलेला आहे. मोठया प्रमाणात ग्रामस्थ, रत्नागिरी शहर आणि जिल्हयातील जनता जैतापूरकडे कूच करण्याच्या तयारीत आहे. या प्रकल्पाच्या निमित्ताने तबरेज अब्दुल्ला सायेकर हा तरुण हुतात्मा झाला आहे. सरकारने या ऊर्जा प्रकल्पाच्या निमित्ताने पहिला बळी घेण्याचे काम केले असून आणखी दोन आंदोलक अत्यवस्थ आहेत. तबरेज सायेकर या अल्पसंख्य समाजातील व्यक्तीचा शासनाने बळी घेतलेला आहे. इतर दोन आंदोलक अत्यंत गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल आहेत.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी अनवधानाने उल्लेख केला असावा. अल्पसंख्य समाजातील व्यक्तीचा सरकारने बळी घेतला असे वक्तव्य केले आहे. सभापती महोदय, तेथे सर्व ग्रामस्थ आंदोलक म्हणून आले होते. अल्पसंख्य समाजाचे म्हणून आलेले नव्हते. कृपया या घटनेला वेगळा रंग देण्याचा प्रयत्न करु नये. आंदोलक हे कोणत्या जाती, धर्माचे नसतात.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, तबरेज सायेकर हा अल्पसंख्यांक समाजाचा असून त्याच्यावर गोळ्या घालून शासनाने त्याचा बळी घेतला आहे.....(अडथळा).....

**सभापती** : याबद्दलचे रेकॉर्ड तपासून घेण्यात येईल व जे अयोग्य वक्तव्य असेल ते कामकाजातून वगळण्यात येईल.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, या आंदोलनाच्या निमित्ताने सरकार आणखी किती बळी घेणार आहे? हा खरा प्रश्न आहे. तबरेज सायेकर याचा शासनाने बळी घेतला आहे. आजच्या वृत्तपत्रात गृहमंत्र्यांचे स्टेटमेंट छापून आले आहे. आंदोलकांनी पोलीस ठाण्यावर हल्ला केला, त्यामुळे पोलीस ठाणे वाचविण्यासाठी पोलिसांना गोळीबार व लाठीमार करावा लागला हे गृहमंत्र्यांचे म्हणणे धादांत असत्य आहे. पोलिसांनी घराघरामध्ये जाऊन मारहाण केली. पोलिसांनी नाटे गावातील प्रत्येक घरातील भावा-बहिणींना, आया-भगिनींना मारहाण करुन दहशत निर्माण केली. आणीबाणी सदृश परिस्थिती निर्माण करण्यात आली. राज्यामध्ये पुन्हा 1975 च्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर.....

आणीबाणीची पुनरावृत्ती करण्याची शासनाची इच्छा आहे की काय अशा प्रकारचे वातावरण पोलिसांनी निर्माण केले. पोलीस ठाणे वाचविण्यासाठी पोलिसांनी गोळीबार केला हे गृहमंत्र्यांचे म्हणणे धादांत असत्य आहे.

सभापती महोदय, कोकणातील माणसे अतिशय संयमी असली तरी स्वाभिमानी आहेत. अन्यायाच्या विरोधात लढायला उठले तर खाली बसणार नाहीत, अशी ही माणसे आहेत. कोकणाने या राज्याला अनेक स्वातंत्र्य सैनिक, क्रांतीकारक दिले आहेत. त्यामुळे शासनाने कोकणातील माणसांच्या नादी लागण्याचा प्रयत्न करु नये. कोकणातील माणसांनी किती वर्षे अन्याय सहन करायचा? गेल्या सहा महिन्यांपासून शासनाच्या माध्यमातून अशा प्रकारचे दबावतंत्र अवलंबिले जात आहे. तेथे राजकीय नेत्यांना जाण्यास बंदी घातली जाते, आंदोलकांना आंदोलन करण्यास बंदी घातली जाते. स्थानिकांना नोटीसा दिल्या जात आहेत. पोलिसांच्या माध्यमातून तडीपारीची नोटीस दिली जाते.

सभापती महोदय, जैतापूर येथे चेर्नोबिलपेक्षा दहा पटीने मोठा अणुऊर्जा प्रकल्प उभारला जाणार आहे. जपानमधील घटनेनंतर कोकणातील माणूस उद्विग्न झाला आहे, चिंताग्रस्त झाला आहे. आपले पुढे काय होणार, पर्यटनाचे काय होणार, शेतीचे व मच्छीमारी व्यवसायाचे काय होणार? असे अनेक प्रश्न त्यांच्या मनात निर्माण झाले आहेत. त्यामुळेच तेथील जनतेला आंदोलनाची भूमिका घ्यावी लागली. त्यांनी कधीही हिंसेचे आंदोलन केले नाही. उलट पोलीस आणि शासन यांनी हिंसेची भूमिका स्वीकारली. तेथील जनतेच्या अनेक मागण्या आहेत. तबरेज सायेकर याचे प्रेत अजून हॉस्पिटलमधून उचललेले नाही. हा अजित पवार कोण आहे? जो तेथील लोकांना छळत आहे, नोटीसा देण्याचे काम करीत आहे. त्याला कोणी सुपारी दिली? अशा प्रकारचा अत्याचार करणाऱ्या या अजित पवार नावाच्या अधिकाऱ्यावर तातडीने मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे, अशी तेथील ग्रामस्थांची मागणी आहे.

नंतर 2पी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर .......

महोदय, तेथील एस.पी. श्री. रासकर हा खरे तर "रास्कल" आहे की "रासकर" आहे हेच कळत नाही. कारण जेव्हा गोळीबार झाला तेव्हा या एस.पी. ने आणखी बिनदिक्कतपणे सांगितले की, या आंदोलकांवर अजून गोळ्या घाला. त्यामुळे या भागातील परिस्थिती आणखीच चिघळली. ही परिस्थिती चिघळविण्याचे काम खरे तर तेथील पोलीस यंत्रणेने केलेले आहे. हा सर्व प्रकार थांबवावयाचा असेल तर श्री. अजित पवार यांच्यावर गुन्हा दाखल करायला पाहिजे, अशी माझी मागणी आहे. त्याचबरोबर एस.पी. श्री. रासकर यांनाही निलंबित करावे. कारण गेल्या सहा महिन्यापासून हा प्रकार येथे सुरु आहे. या संपूर्ण प्रकरणाची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे, अशी माझी मागणी आहे. ब्रिटिशांनाही लाजवेल अशा प्रकारचा अत्याचार या आंदोलकांवर शासनाने केलेला आहे. त्यात बारा वर्षाच्या मुलीला सुध्दा सोडलेले नाही, तिच्यावर सुध्दा लाठीमार करण्यात आला आहे. अशा प्रकारे विकासाच्या नावाखाली आमच्यावर टीका करुन चालणार नाही. तसेच या भागातील लोकांना विश्वासात न घेता केवळ एके-47 च्या जोरावर लोकांवर शासन दबाव टाकू शकणार नाही, हे लक्षात ठेवावे. तसेच या चर्चेच्या निमित्ताने ज्या ज्या मागण्या करण्यात आल्या त्यांची पुर्तता करावी. एवढे बोलून मला संधी दिली त्याबद्दल पुन्हा आभार मानतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

---------

......2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मला या प्रस्तावावर बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानतो. तसेच आपण म्हणाल्याप्रमाणे मी अत्यंत कमी वेळात माझे भाषण संपविण्याचा प्रयत्न करणार आहे.

महोदय, जैतापूर प्रकल्पाच्या अनुषंगाने काल दि. 18 एप्रिल, 2011 रोजी जी दुर्दैवी घटना या भागात घडली त्यात एका आंदोलकाचा मृत्यू झाला व काही जखमी झाले. अर्थात या घटनेचे मीच काय पण इतर कोणीही समर्थन करणार नाही, त्याचा निषेध केला तेवढा थोडाच आहे. पण हा प्रकल्प जो होऊ घातलेला आहे त्याबाबत शासनाची भूमिका अशी आहे की, प्रकल्प झालाच पाहिजे आणि विरोधातील लोकांची हा प्रकल्प होऊ नये अशीच इच्छा असेल. तसेच तत्पूर्वी त्यांच्या पुनर्वसन अथवा मोबदल्याच्या बाबतीतील काही मागण्या वगैरे असतील. हे सर्व प्रकल्प सुरु करण्यापूर्वी होतेच तसेच त्याला विरोध करणे हा सुध्दा लोकशाहीचाच एक भाग आहे. पण या राज्याला तसेच देशाला ऊर्जेची गरज असताना जैतापूर प्रकल्पाच्या बाबतीत त्या भागातील लोकांनी एक वेगळाच प्रकार केला. अर्थात त्यांच्या पुनर्वसन अथवा इतर मागण्या असतील त्या मी समजू शकतो पण केवळ वेगळा हेतू ठेवून "जैतापूर" चे "मयतापूर" करु, पण प्रकल्प होऊ देणार नाही अशा प्रकारे चिथावणीखोर वक्तव्ये करुन प्रकल्पाच्या विरोधात वातावरण तयार करण्याचे काम करण्यात आले आहे. यापूर्वी सुध्दा या राज्यात एन्रॉन प्रकल्पाच्या बाबतीत अशाच प्रकारे विरोधकांनी प्रयत्न केले होते. एन्रॉन प्रकल्पाला समुद्रात बुडवू अशी वक्तव्ये त्यावेळेस देखील करण्यात आली होती, पण त्याचे परिणाम नंतर काय झाले, आपल्या राज्याला त्याचा केवढा भुर्दंड सोसावा लागला याची आपण सर्वांनाच जाण असेल. असाच प्रकार जैतापूर प्रकल्पाच्या बाबतीतही घडलेला आहे. दि. 9 एप्रिल, 2011 रोजी अशीच वातावरण निर्मिती करण्यात आली व त्याची परिणती कालच्या घटनेत झाली. म्हणून या प्रकल्पाच्या बाबतीत काय चौकशी करायची ती शासनाने करावी, न्यायालयीन चौकशी करायची असेल तर ती देखील करावी पण त्याबरोबरच एक आणखी वेगळी चौकशी सुध्दा शासनाने करावी, अशी माझी मागणी आहे. प्रकल्पाच्या ठिकाणी जे 500-700 लोक चालून आले...

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे ....

हे आंदोलक त्या ठिकाणी कसे आले ? आजूबाजूच्या गावांगावांमध्ये कोणी बैठका घेतल्या होत्या ? कोणी कोणी चिथावण्या दिल्या ? लोकशाहीने जनतेला फिरण्याचा व आपले मत मांडण्याचा अधिकार दिलेला आहे परंतु चिथावणी देण्याचा व कायदा व सुव्यवस्था बिघडवण्याचा अधिकार कोणालाच दिलेला नाही. त्यामुळे यासंदर्भातही चौकशी होण्याची आवश्यकता आहे. आंदोलन झ ााल्यानंतर पोलिसांनी कोणती कारवाई केली पाहिजे यासाठी नियम ठरवून दिलेले आहेत. आंदोलन झाल्यावर प्रथम पोलिसांनी लाठीमार केला पाहिजे, अश्रुधुराच्या नळकांडया फोडल्या पाहिजेत,प्लॅस्टिकच्या गोळयांचा वापर केला पाहिजे व शेवटी आदेश घेऊन पायाच्या खाली गोळीबार केला पाहिजे अशा प्रकारचे पोलिसांसाठी नियम आहेत. मी जी माहिती घेतली आहे त्या माहितीच्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, आंदोलकांनी पोलीस स्टेशनवर केवळ पाच पोलीस असतांना हल्ला केला होता.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सभागृहाला चुकीची माहिती देत आहेत.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मी चुकीच्या माहितीवर माझे विचार मांडत आहेत असे सन्माननीय सदस्य मला म्हणू शकत नाही. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जे विचार मांडलेले आहेत ते सर्व चुकीच्या माहितीवर होते असे मी म्हणू शकतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या घटनेत ज्या इसमाचा मृत्यू झाला आहे त्याच्या संदर्भात असे बोलणे बरोबर नाही.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, गोळीबार करण्यासाठी परिस्थिती कशी निर्माण झाली हे मी सांगत आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना आपण समज द्यावी व आपल्या ज्येष्ठत्वाचा मान राखावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, सदर पोलीस स्टेशनमध्ये केवळ पाच पोलीस असतांना 500-600 आंदोलकांनी पोलीस स्टेशनवर हल्ला करणे, जाळपोळ करणे, दगडफेक करणे, सगळया गोष्टीचा अवलंब करणे हे योग्य आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे आपल्या भाषणाची वेळ संपलेली आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मी केवळ एकच मिनिटात माझे म्हणणे संपविणार आहे. पोलीस स्टेशनवर हल्ला झाला, दगडफेक झाली, जाळपोळ झाल्यानंतर पोलिसांनी अगोदर लाठीमार केला, अश्रुधुराच्या नळकांडया फोडल्या, प्लॅस्टिकच्या गोळया झाडल्या व शेवटी पोलिसांनी गोळीबार केला व त्यामध्ये एका आंदोलकाचा दुर्दैवी मृत्यू झाला तो इसम जेव्हा दगड उचलण्यासाठी खाली वाकला होता त्यावेळी पोलिसांची त्याला गोळी लागली आहे. हा सर्व प्रकार घडविण्यात आलेला आहे त्यामुळे या संदर्भात चौकशी झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, मयत इसम दगड उचलण्यासाठी खाली वाकला होता त्यामुळे पोलिसांची त्याला गोळी लागली. यासंदर्भात मला असे म्हणावयाचे आहे की, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे सदर घटनेची फोटोग्राफी करण्यासाठी गेले होते काय ? या घटनेत ज्या इसमाचा मृत्यू झालेला आहे त्याची येथे टिंगल केली जात आहे.

( दोन्ही पक्षाचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

**सभापती** : या विषयाच्या संदर्भात सभागृहात चांगल्या प्रकारची चर्चा सुरु होती. या विषयाच्या संदर्भात जे जे वक्तव्य सन्माननीय सदस्यांनी केलेले आहे ते तपासून घेण्यात येईल व जे वक्तव्य चुकीचे असेल ते कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

आता सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी. आपल्याला 3 मिनिटात आपले भाषण पूर्ण करावयाचे आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. जैतापूरच्या आंदोलनात तरबेजला गोळी लागल्यामुळे त्याचा मृत्यू झालेला आहे परंतु दुस-या एका व्यक्तीच्या डोक्यात गोळी घुसलेली असल्यामुळे तो सुध्दा अत्यवस्थ आहे एवढेच मला सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांना सांगावयाचे आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील ( मुबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, आज या ठिकाणी आपण जी चर्चा करीत आहोत ती अणु ऊर्जेच्या उपयुक्ततेसंबंधी नाही किंवा अणु ऊर्जा प्रकल्प व्हावा की नाही यासबंधी देखील आपण चर्चा करीत नाही तर जैतापूर येथे जो गोळीबार करण्यात आला होता त्यासंबंधीच्या प्रस्तावावर या ठिकाणी चर्चा सुरु असून त्या चर्चेत भाग घेण्याकरिता मी उभा आहे.

. सभापती महोदय,त्या ठिकाणी हा प्रकल्प व्हावा की न व्हावा या विषयावर रणकंदन होऊ शकते.परंतु ज्यांना प्रकल्प नको आहे त्यांना विरोध करण्याचे स्वातंत्र्य देखील घटनेने दिलेले आहे.सरकार कशा पध्दतीने आंदोलकाशी वागते हा महत्वाचा प्रश्न आहे.दर वेळा सरकारला गोळयांची भाषा का कळते हे मला तरी समजत नाही. श्री.अण्णा हजारे यांच्या आदोलनाच्या निमित्ताने नेहमीच चर्चा होते. त्यांनी संसदीय लोकशाहीला आव्हान दिले म्हणून आपण नेहमीच चर्चा करीत असतो.उपोषण जर संसदीय लोकशाहीला आव्हान होत असेल तर गोळया घालणे ही कोण्ती संसदीय लोकशाही आहे याचे उत्तर शासनाने दिले पाहिजे. स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण झ ालेले राज्य हे ब्रिटीशांचे आहे की लोकशाहीचे राज्य आहे ? असा माझा प्रश्न आहे. ब्रिटीश गोळया घालत होते व आंदोलकांना गोळया घालण्याचा त्यांना अधिकार होता. परंतु या शासनाला हा अधिकार कोणी दिला असा माझा शासनाला प्रश्न आहे.ब्रिटीशांची मानसिकता आज पोलिसांच्या डोक्यातून जात नाही.दुर्देवाने ती राज्यकर्त्यांच्या डोक्यातूनही जात नाही म्हणून गोळीबाराचे समर्थन अशा प्रकारे केले जाते की यास चिथावणी कोणी दिली ? कोणी आंदोलन केले तर त्याला चिथावणी कोणी दिली असे विचारले जाते परंतु पोलिसांनी गोळया घातल्या त्याबाबतीत आम्ही काय म्हणावयाचे ? या देशामध्ये एकत्र येण्यासाठी घटनेने स्वातंत्र्य दिलेले आहे त्याचबरोबर भाषण करण्याचे स्वातंत्र्य घटनेने दिलेले आहे हे स्वातंत्र्य काही शासनाने दिलेले नाही. त्या ठिकाणी माजी न्यायमूर्ती कोळसे पाटील जात असतील तर ते काय बंदूका घेऊन जात होते काय ? वैशाली पाटील एके 47 घेऊन जात होत्या काय ? त्यांना त्या जिल्हयात जाण्यासाठी बंदी का घालण्यात येते ? जेव्हा लोकशाहीने दिलेला अधिकार मोडून काढला जातो त्यावेळी अशा प्रकारचा स्फोट होत असतो. या स्फोटातून पुढची आपत्ती निर्माण होत असते.त्या ठिकाणी शासनाला प्रकल्प उभा करावयाचा आहे आणि आम्ही देखील प्रकल्पाच्या बाजूने आहोत.

2..

सभापती महोदय, तारापूरच्या अणु भट्टयाच्या खाली माझे जन्म गाव गेलेले आहे. तरीसुध्दा अणु ऊर्जा देशाची गरज असल्यामुळे मी अणु ऊर्जेचा समर्थक आहे. परंतु लोकांचे कोणत्याही प्रकारचे समाधान न करता त्यांच्या पुनर्वसनाचा कोणतही विचार न करता शासन ज्या पध्दतीने जैतापूरचा प्रकल्प लादू पाहते त्यासंबंधीचा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे.

सभापती महोदय, ज्या बेशरमपणे आणि निर्लज्जपणे गोळीबाराचे समर्थन केले जाते याचे मला दु:ख वाटते. घटनेच्या कलम 21 नुसार जीवित आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याची हमी घटनेने दिली आहे परंतु जैतापूर प्रकल्पाच्या ठिकाणी तरबेजला मारुन शासनाने घटना मोडीत काढली आहे.घटनेच्या 21 व्या कलमा नुसार तरबेजला जगण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे.त्याचे जगणे आणि त्याचे स्वातंत्र्य याचे संरक्षण सरकारने करावयाचे असून ही जबाबदारी सरकारवरच आहे परंतु सरकार या जबाबदारीपासून दूर गेलेले आहे. कोणतीही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न करता सरळ गोळीबार केला गेला  गोळीबार करण्यापूर्वी मॅजिस्ट्रेटचा आदेश घेतला होता काय ?कोणत्याही प्रकारचा आदेश न घेता गोळीबार कसा काय करण्यात आला होता ? त्याचबरोबर त्याच्या छातीला आणि डोक्याला  कशी काय गोळी लागली  हा खरा प्रश्न आहे. नक्षलवाद्यांचा प्रश्न असो वा अन्य कोणाचाही प्रश्न असो त्या प्रश्नाच्या बाबतीत आम्ही अनेकदा माननीय गृह मंत्र्यांबरोबर चर्चा केली होती. अतिरेक्यांशी बंदुका घेऊन लढा मला त्याबाबतीत काही म्हणावयाचे नाही परंतु जे नागरिक लोकशाही हक्कासाठी लढत असतात वा आपल्या प्रश्नासाठी लढत असतात त्यांना जर बंदुकांनी रोखणार असाल तर त्यामुळे नक्षलवाद वाढणार आहे. म्हणून माझे असे म्हणणे आहे की बंदुकीच्या गोळया  वापरण्या ऐवजी रबरी गोळया वापरावयास पाहिजे होत्या पंरतु त्या देखील वापरल्या गेल्या नाहीत. आपले राज्य हे ब्रिटीशांच्या मानसिकतेतून चालणारे आहे की लोकशाही पध्दतीने चालणारे आहे  हे एकदा स्पष्ट करुन सागितले म्हणजे आम्हाला सुध्दा लढावयाचे कसे हे कळेल. त्याचबरोबर शस्त्राने लढावयाचे की नि:शस्त्रपणे लढावयाचे की,  लोकशाही पध्दतीने लढावयाचे हे नागरिकांनासुध्दा कळेल. जैतापूर प्रकल्पाच्या निमित्ताने जो स्फोट झालेला आहे त्याची संपूर्ण जबाबदारी शासनाची आहे. शेवटी मला एवढेच सांगावयाचे आहे की या सभागृहामध्ये पहिल्या दिवसापासून या विषयावर चर्चा केली होती त्याचबरोबर माननीय मुख्यमंत्र्यांनी चहापानाच्या निमित्ताने  बोलावले होते तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांना मी विनंती केली होती की ज्यापध्दतीने  तुम्ही जमाव बंदी आणि प्रवेश बदी



श्री.कपिल पाटील .....

करीत  आहात ती लोकशाहीच्या विरुध्द असून त्याचा स्फोट झाल्याशिवाय राहणार नाही. जपान मधील भूकंपानंतर येथील लोकांच्या मनात ज्या भावना निर्माण झाल्या आहेत त्याचे समाधान शासनाला करावेच लागेल ,ते न करता  जर गोळया घालणार असाल तर हे लोक तुम्हाला सत्तेवर राहू देणार नाही एवढे सांगून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

----------

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे आपणास बोलण्याकरिता सात मिनिटांचा वेळ दिलेला आहे, आपण आपले भाषण सुरु करावे.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन 2005 सालापासून जैतापूरचे आंदोलन अतिशय शांतपणे सुरु होते. त्यामुळे शिवसेनेचे कार्यकारी अध्यक्ष माननीय श्री. उध्दवजी ठाकरे 9 एप्रिल रोजी जैतापूरला गेले व त्यांनी त्या ठिकाणी चिथावणी दिल्यानंतर हे आंदोलन झाले असे जर आपण म्हणत असाल तर राजकीय ज्ञानामध्ये आपण कोणत्या इयत्तेमध्ये आहात असा प्रश्न मला आपल्याला विचारावयाचा आहे. दादोजी कोंडदेव यांचे पाय जे कापतात त्यांच्या डोक्यामध्ये कांदे बटाटे भरलेले आहेत असे मी म्हणेन. सभापती महोदय, अमजद बोरकर, भिकाजी वागदरे, शमशुद्दीन मीर, प्रेमानंद तिवारी, गवाणकर, श्रीमती वैशाली पाटील, डॉ. मिलिंद देसाई अशा अनेक व्यक्तींनी त्या ठिकाणी आपल्या व्यथा मांडल्या. कालचे आंदोलन कशामुळे निर्माण झाले, हा सर्व विस्फोट कां झाला याची जी कारणे समोर आली आहेत ती या ठिकाणी मांडणे आवश्यक आहे असे मला वाटते. तेथील लोकांच्या तक्रारीनुसार भूसंपादनामध्ये नसलेली 168 एकर जमीन सरकारने ताब्यात घेतली व त्या जमिनीला देण्यात येत असलेले पाणी हळू हळू बंद करण्यात आले. त्या ठिकाणी असलेले 400 हेक्टरवरील मॅनग्रोव्ह नष्ट होण्याची परिस्थिती निर्माण झाली. त्या ठिकाणी प्रकल्पाचे काम सुरु असल्यामुळे गुरांना जाण्यासाठी रस्ता शिल्लक राहिलेला नाही. त्याच प्रमाणे लोकांच्या 40-40 एकराच्या असलेल्या बागांमध्ये पोलीस आंदोलकांना शोधायला जात होते त्यावेळी ज्या प्रमाणे बकऱ्यांना खेचतात त्या प्रमाणे तरुण मुलांना हे पोलीस खेचून नेत होते. अशा प्रकारच्या तक्रारी तेथील अनेक लोकांनी केल्या आहेत.

सभापती महोदय, मी स्वत: 8 तारखेला नाटे गावाला भेट दिली होती. ते गाव अतिशय लहान आहे, त्या गावची परिस्थिती आपण पाहिली तर त्या गावामध्येच एक पोलीस स्टेशन आहे. त्या ठिकाणी घेण्यात आलेल्या सभेला 700 ते 800 लोक आले असतांना आणि एकही पोलीस उपस्थित नसतांना अतिशय शांतपणे ती सभा पार पडली. माझ्या बंदोबस्तासाठी असलेल्या एका पोलिसाला मी माझ्या गाडीजवळ थांबून रहाण्यास सांगितले होते. त्या वेळी मी तेथील लोकांना विचारले की, महाराष्ट्रामधील लोकांच्या वतीने माननीय श्री. उध्दवजी ठाकरे साहेब तुम्हाला भेटण्यासाठी येत आहेत तर मग तुमचा त्यांना काय निरोप आहे? त्यावेळी लोकांनी आम्ही उध्दवजींच्या सभेला येणार आहोत तेव्हा आमचा महाराष्ट्राला असा संदेश आहे की, आम्हा सर्व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

डॉ. नीलम गोऱ्हे ...

कोकणवासियांना सर्वात प्रिय आंबे आणि मासे आहेत ते या ठिकाणी जीवंत राहू देत. अशा प्रकारे नाटे गावातील शेकडो महिला मोर्चासाठी आणि सभेसाठी उपस्थित झाल्या होत्या. काल जे लोक जखमी झाले आहेत त्यामध्ये अल्ताफ रजाक पटेल, अमान अब्दुल्ला मुकादम, नसरुद्दीन शरीफ बोरकर,अकबर जिक्रीया सोलकर, मन्सूर अब्दुल्ला सोलकर, मुस्ताक बिलाल मिरकर यांची नावे आहेत. आंदोलन सुरु असतांना साखरी नाटे गावचे शिवसेनेचे शाखा प्रमुख मजिद गोवलकर यांनी पोलिसांना थांबण्यास सांगितले होते, परंतु पोलीस थांबण्यास तयार नव्हते. ते एका आंदोलकाला अटक करण्यासाठी एका घरामध्ये गेले असतांना एक महिला आपल्या बाळाला दूध पाजत असल्याचे सांगून देखील पोलिसांनी न ऐकता घरामध्ये प्रवेश केला. त्या ठिकाणी असलेली गंभीर परिस्थिती लक्षात घेता शिवसेना त्या ठिकाणी चिथावणी देण्याचे काम करते, त्या पक्षाचा विकासाच्या कामांना विरोध आहे अशाप्रकारचा आक्षेप घेतला जात आहे त्याबाबत मला सांगावे लागेल की, मिहान प्रकल्प असेल किंवा पुण्यामधील एसईझेड असेल किंवा संभाजीनगरचा एसईझेड असेल अशा अनेक विकास प्रकल्पांना शिवसेनेने पाठिंबा दिलेला आहे. परंतु ठिकाणी प्रकल्पग्रस्तांच्या संदर्भात कुणी विचारच करीत नाही. नाटे गावच्या लोकांचे असे म्हणणे आहे की, त्यांना तो प्रकल्प नको आहे. तसेच,त्यांना असेही सांगण्यात येत आहे की, सिंगूर, नंदिग्राम, आणि हरिपूर यांसारखी आंदोलने झाली तर प्रकल्प थांबतात. माननीय श्री. अण्णा हजारे यांच्याबरोबर जंतर मंतर रोडवर मेणबत्त्या पेटलेल्या लोकांना दिसतात, गेट वे ऑफ इंडियाला पेटलेल्या मेणबत्त्या लोकांना दिसतात, परंतु जैतापूरच्या लोकांचा आक्रोश त्यांना दिसत नाही म्हणून तेथील लोकांची नाराजी आहे, ती या ठिकाणी व्यक्त झाली आहे.

सभापती महोदय, हे आंदोलन कशामुळे घडले याचा शोध घेतला असता दोन दिवसापूर्वी केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री. जयराम रमेश यांचे विधान वर्तमानपत्रामध्ये छापून आले की, "कोणत्याही परिस्थितीत जैतापूरचा प्रकल्प होणारच" यामध्ये "होणारच" या शब्दामुळे हे आंदोलन पेटले. काल श्रीमती वैशाली पाटील या देखील म्हणाल्या की, "होणारच" या शब्दामुळे लोकांचा संयम सुटला. त्यानंतर या आंदोलनाचा स्फोट झालेला आहे. मला आपल्याला सांगितले पाहिजे की, हा संपूर्ण प्रकल्प रद्द करुन या घटनेची संपूर्ण न्यायालयीन चौकशी करणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

डॉ. नीलम गोऱ्हे ....

न्यायालयीन चौकशीच्या निमित्ताने मला सांगितले पाहिजे की, या विद्रोहाकरिता आमच्या पक्षाने चिथावणी दिली असे जर आपले म्हणणे असेल तर त्याची देखील आपण चौकशी करावी. आंदोलकांनी अमुक तमुक केले असे या ठिकाणी माननीय सदस्य त्या आंदोलकांबाबत बोलत आहेत, त्या सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांना मी असे आव्हान देते की, तुमच्यामध्ये जर हिंमत असेल आणि तुम्ही खरे शिवाजी महाराजांचे अनुयायी असाल तर जैतापूरला जाऊन हे भाषण त्या ठिकाणी करुन दाखवा. अंधारामध्ये दादोजी कोंडदेव यांचा पुतळा हलविणे सोपे आहे, सभागृहातील वातानुकूलित वातावरणामध्ये आपण हे सर्व बोलत आहात. आंदोलनकर्त्यांकडून काही अतिशयोक्ती झाली असेल तर त्याचे मी समर्थन करणार नाही. परंतु लोकांचे असे म्हणणे आहे की, आमचे आयुष्य शिल्लक राहणार नाही असे वाटल्यानंतर त्या ठिकाणी विद्रोह निर्माण झालेला आहे. बकऱ्याला खेचतात त्या प्रमाणे पोलीस लोकांना खेचत असतील,....

(गोंधळ)

जे लोक जखमी झाले आहेत, जे लोक मृत पावले आहेत...

(गोंधळ)

(अपूर्ण--यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 15:10

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

नाटेगावातील सर्वजण मी तेथून निघत असताना "जय महाराष्ट्र" असे म्हणत होते.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

सभापती महोदय, मला याठिकाणी बोलण्यासाठी जो वेळ दिलेला आहे, त्यावर जर सन्माननीय सदस्य आक्रमण करत असतील मला वेळ वाढवून दिला पाहिजे. याठिकाणी जो गोंगाट केला जात आहे, तो योग्य आहे काय ? पहिली गोष्ट म्हणजे तुम्ही सर्वांनी शांत रहावे. म्हणून मला येथे सांगावयाचे आहे.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

सभापती महोदय, माझ्या भाषणाचा वेळ कारण नसताना घेतला जात आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना सवय लागलेली आहे की, ते बोलून खाली बसल्यावर हसतात. आम्ही चिडलो की त्यांना हसू येते. त्यांना असे वाटते की, आम्हाला चिडविण्यामध्ये मजा आहे. पण तुम्हाला सुध्दा काय खुमखुमी आहे ते आम्हाला माहिती आहे. सभापती महोदय, मला असे सांगावयाचे आहे की, .....

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी या सभागृहाच्या ज्या काही मर्यादा आहेत, त्याचे पालन करुन वागावयाचे म्हटले तर असे प्रश्नच उपस्थित होणार नाहीत.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, शेवटी मी सांगू इच्छिते की, तन्मय पाडेकर या बारा वर्षाच्या मुलाच्या टाचा फाटेपर्यंत मारहाण करण्यात आलेली आहे. मला आपल्याला एवढेच सांगावयाचे आहे की, यासंदर्भात न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे. कोकणवासियांना न्याय मिळण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व जनतेची सहानुभूती त्यांच्याबरोबर आहे. धन्यवाद, जय महाराष्ट्र.

----

2 टी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे नाव घेतलेले आहे म्हणून मी बोलत आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.विनायकजी मेटे यांना सांगू इच्छितो . . ..

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या डोक्यामध्ये भरपूर कल्पना आहेत, सुपीक कल्पना आहेत पण तेवढ्या कल्पना माझ्याकडे नाहीत हे मला मान्य आहे. परंतु मी एक गोष्ट सांगू इच्छितो. मला येथे आव्हान देण्यात आले आहे की, हे भाषण तेथे जाऊन करावे. मला त्यांनी शिवाजी महाराजांचे अनुयायी म्हणून संबोधले आहे. आम्ही खरोखरच शिवाजी महाराजांचे अनुयायी आहोत. अंधारामध्ये कट करणारी आम्ही माणसे नाही, उघडपणे काय ते करणारे आहोत.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांना काही बोलावयाचे आहे काय ?

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, मला बोलावयाचे आहे. पण सन्माननीय सदस्यांचे पूर्ण झाल्यावर बोलणार ना. याठिकाणी दुर्दैवाने ही चर्चा अतिशय दु:खद घटनेच्यावेळी अटीतटीची होत आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई आपल्याला बोलण्यासाठी चार मिनिटांचा वेळ दिलेला आहे. आपण सर्वांनी गांभीर्याने विचार करावा. जर माननीय गृहमंत्री श्री.आर.आर. पाटील यांचे भाषण 03 वाजून 30 मिनिटांनी सुरु करावयाचे असेल तर आता त्यासाठी 18 मिनिटांचा वेळ राहिलेला आहे आणि या वेळेमध्ये अजून पाच सन्माननीय सदस्यांना भाषण करण्यासाठी संधी द्यावयाची आहे. त्यामुळे कृपा करुन सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांना चार मिनिटांमध्ये आपले भाषण संपवावे लागेल.

----

. . .. 2 टी-3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही



APR/ 15:10

श्री.हुसेन दलवाई (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी अगदी थोडक्यात बोलणार आहे. काल जैतापूर येथे दुर्दैवी घटना घडली. याठिकाणी माननीय गृहमंत्री उपस्थित आहेत. मी त्यांना पुन्हा-पुन्हा एक गोष्ट सांगत आहे की, पोलीस विभाग तुमच्या हातात नाही. पोलीस माणसाला मारतात ही घटनाच भयंकर आहे. लोकांच्या संरक्षणासाठी पोलीस आहेत, परंतु जर उद्या त्यांना माणसांना मारण्याची सवय लागली तर मग महाराष्ट्रामध्ये तुम्हाला-आम्हाला काहीही करता येणार नाही. मी आपल्याला सांगू इच्छितो की, पट्टमथानू पिल्लेने शेतकऱ्यांच्या मोर्चावर हल्ला केला. त्यामध्ये काही माणसे मरण पावली. त्याला डॉ.गोयांनी जेलमधून सांगितले की, तू खुर्ची खाली कर. काय आहे ? मला तेथील फॅक्टस् काय आहेत हे माहिती नाही. कदाचित त्याने हल्ला केला देखील असेल.परंतु तरी सुध्दा पोलिसांनी माणसांना मारावयाचे काय ? पोलिसांनी माणसाला मारले हे अतिशय वाईट झाले. त्याचबरोबर मी तुम्हा लोकांना हात जोडून सांगेन की, तुम्ही त्या तरबेजचे प्रेत बाहेर ठेऊ नका, ते दफन करण्यात यावे. आपण कोणती गोष्ट कोणत्या थराला न्यावयाची हे खरेच एकदा ठरविले पाहिजे. मी सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे यांना सरळच सांगतो. ज्यावेळेला

श्री.आर.आर.पाटील (खाली बसून) : प्रेत कोणी ठेवले आहे ?

श्री.हुसेन दलवाई : त्या ठिकाणी दफनविधी होऊ देत नाहीत. अजमेर से मालेगाव तक वही नाम उभरके आते हैं. कधी साध्वीचे नाव, कर्नलचे नाव आणि यांच्या विभागाचे अधिकारी त्या कर्नलला आमच्या पोलिसांना ट्रेनिंग द्यावयास लावतात. तुम्ही त्याला प्रमोशन देता. आमच्या देखील चुका झालेल्या आहेत हे लक्षात घ्यावे. पण ते त्याचा जास्त फायदा घेतात हे चुकीचे आहे. अफसोस मगर आतंक के हर इल्जाम मेरे सर पे आते हैं. त्यावेळेला तुम्ही काही बोलत नाही. ही जी घटना घडलेली आहे, त्यासंदर्भात दोन्ही बाजूने जरा शांतपणे चर्चा करावयास पाहिजे. माननीय मुख्यमंत्री याठिकाणी आलेले आहेत. मी त्यांना आवाहन करतो, मी त्यांना हात जोडून विनंती करतो की, तुम्ही या सर्व पक्षाच्या सन्माननीय सदस्यांबरोबर एकदा चर्चा करावी.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई....

महाराष्ट्र कुठे न्यावयाचा आहे, महाराष्ट्राची प्रगती करावयाची आहे की नाही करावयाची? हे एकदा ठरवा. महाराष्ट्र जेथल्या तेथे ठेवावयाचा असेल तर तो जेथल्या तेथे ठेवा. परंतू अशा रीतीने संघर्ष करणे लोकशाहीमध्ये बसत नाही. हिंसेमधून हिंसा प्रवृत्त होते. पोलिसांची हिंसा ही जास्त निषेधार्ह आहे, हे आपण सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे. मी पुन: एकदा आवाहन करीन की, जे झाले ते पुरे झाले, आता आपण जरा शांतपणे बसू या.

सभापती महोदय, एन्रॉन प्रकल्पाच्या संबंधात मी या ठिकाणी राजकीय बोलणार नाही. पण या सगळया प्रकरणामध्ये राजकारण करण्यात आलेले आहे. जैतापूर येथे निर्माण झालेला प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने माननीय मुख्यमंत्री जैतापूरला गेले. माननीय मुख्यमंत्र्यांनी जैतापूरला भाषण केले, ते लोकांनी शांतपणे ऐकून घेतले आणि त्या ठिकाणी अतिशय चांगले वातावरण निर्माण झाले. मग पोलिसांनी काही लोकांना अटकाव केला, काही लोकांना जिल्हाबंदी घातली, याचा अर्थ आपणच वाढवत रहातो, कशासाठी वाढवत रहावयाचे हे मला कळत नाही. लोकांच्या भावना असतात त्या भावना व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य या देशामध्ये आहे, हे लक्षात घ्यावे. आज माननीय मुख्यमंत्र्यांची प्रतिमा अशी आहे की, ते या सगळयाच्या वर आहेत. गांधीजी म्हणत होते त्याप्रमाणे ते समाजाकडे आईच्या नजरेने पहातात. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांचे लोक ऐकतील. तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात एक मिटिंग घ्यावी. त्या मिटिंगला तेथील लोकांना बोलावण्यात यावे. मी पुन: पुन: एक गोष्ट सांगू इच्छितो की, तेथील मच्छीमार समाजाचे पुनर्वसन झाले पाहिजे. त्यासंदर्भात शासनाने कुठलीही भूमिका घेतलेली नाही. कुणी तरी वैज्ञानिक सांगतात आणि शासन त्यांचे ऐकते, हे बरोबर नाही. जैतापूरच्या संदर्भात चुकीची विधाने झालेली आहेत, त्याचाही तपास करण्यात यावा, माननीय मुख्यमंत्र्यांबद्दल आम्हाला आदर आहे. या आदराचा उपयोग करुन हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने माननीय मुख्यमंत्र्यांनी प्रयत्न करावेत, एवढेच आवाहन करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, जैतापूर येथील अणुऊर्जा प्रकल्पाला जनतेचा विरोध असताना त्या ठिकाणी आंदोलन करणे हा खऱ्या अर्थाने जनतेचा अधिकार आहे. जेव्हा जनतेच्या मागण्या पूर्ण होत नाहीत, तेव्हा त्या शासनासमोर आणण्याचे दुसरे साधन तरी कोणते आहे, कोण जनतेच्या आवाजाकडे लक्ष देतात? म्हणून शांततेने आंदोलन करणाऱ्या जनतेला खऱ्या अर्थाने समजून घेण्याची गरज होती. वास्तविक पहाता हे आंदोलन जैतापूरचा प्रकल्प नको यासाठी होते. याचे कारण असे की, आतापर्यंत जेवढे प्रकल्प झाले मग ते इरिगेशनचे असतील किंवा अन्य कुठले तरी प्रकल्प असतील त्यामध्ये बाधित होणाऱ्या लोकांचा पुनर्वसनाचा प्रश्न असेल, शेतकऱ्यांच्या हक्काचा प्रश्न असेल ते प्रश्न सुटले नाहीत. त्यामुळे लोकांचा सरकारवरचा विश्वास संपलेला आहे म्हणून या प्रकल्पाला मोठया प्रमाणात विरोध झालेला आहे. जपानचे उदाहरण ताजे असल्यामुळे लोकांना स्वतःच्या जीविताची भीती वाटत आहे. म्हणून शांततेने आंदोलन करुन या प्रकल्पाचे काम बंद करण्यासाठी तेथील लोक रस्त्यावर उतरले होते. लोकशाहीमध्ये आंदोलनाच्या माध्यमातून विरोध करणे ही पध्दत आहे. परंतु हे आंदोलन होऊच नये, यासाठी आंदोलन दडपण्याचा जो प्रकार आहे, त्याला हिटलरशाही म्हणतात, लोकशाही म्हणत नाहीत. हिटलरशाहीच्या माध्यमातून पोलीस गोळीबार करीत असतील आणि त्याचे समर्थन या सभागृहात होत असेल तर याला लोकशाही म्हणावयाची काय, लोकांचे अधिकार म्हणावयाचे काय, लोकांच्या आंदोलनाचा विचार करणारे हे सरकार आहे असा विचार करावयाचा काय?

सभापती महोदय, या ठिकाणी एक महत्वाचा प्रश्न निर्माण होतो. जो तरबेज गोळीबारात मेला त्याच्या डोक्यात गोळी लागली आणि आता जो अत्यवस्थ आहे त्याच्याही डोक्यात गोळी लागली आहे. दुसरा महत्वाचा प्रश्न असा की, त्या ठिकाणी गोळीबार करण्यात आल्यामुळे आंदोलन भडकले. मग घराघरात घुसून महिलांवर लाठीचार्ज करण्याची काय गरज होती? लहान मुलाला दूध पाजत असलेल्या महिलेवर देखील लाठीचार्ज करण्यात आला. अशा पध्दतीने लाठीचार्ज करुन या गोळीबाराचे समर्थन करण्यात येत असेल तर ते योग्य नाही. हे लोकशाहीला काळीमा फासणारे प्रकरण आहे. म्हणून माझी विनंती आहे की, या ठिकाणी गोळीबार करण्याचा आदेश कोणी दिला, अशी कुठली परिस्थिती निर्माण झाली होती की, हा गोळीबार करावा लागला. त्या पोलीस

..3..

श्रीमती शोभा फडणवीस....

स्टेशनच्या मागच्या गवताला आग लागली. पोलिसांनी स्वत:चे समर्थन करण्याकरिता कशा वरुन ही आग लावली नसेल? ज्यावेळी आंदोलन सुरु होते त्यावेळी आग लागली नव्हती, असे सर्वाचे म्हणणे आहे. म्हणून पोलिसांनी आपले स्वत:चे पाप झाकण्या करिता ही आग लावली असेल असे म्हणण्यास मला अडचण वाटत नाही.

यानंतर श्री. बरवड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ....

म्हणून कृपा करुन कोणीही या गोळीबाराचे समर्थन करु नये. मयत झालेल्या माणसाला न्याय द्यावा, आंदोलकांना न्याय द्यावा आणि जैतापूर प्रकल्पाच्या बाबतीत त्यांचा जो विरोध आहे तो सामंजस्याने सोडवावा. जर तो विरोध आपण हिटलरशाहीने सोडविण्याचा प्रयत्न केला तर यापेक्षा प्रचंड आंदोलन होऊन या महाराष्ट्रामध्ये वातावरण खराब करण्याचे काम पोलिसांच्याच माध्यमातून होईल. अशा पध्दतीने पोलिसांना पाठीशी घालून सरकार पोलिसांना लोकांच्या विरोधात जाण्याबद्दल चिथावणी देत आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. राजन तेली ( विधानसभेने निवडलेले ) सभापती महोदय, जैतापूरच्या अणुऊर्जा प्रकल्पासंबंधीच्या गंभीर विषयावर या ठिकाणी चर्चा उपस्थित झालेली आहे. सगळ्यांनी या ठिकाणी विविध विषय मांडले. माझी या माध्यमातून शासनाला विनंती आहे की, ही चौकशी करीत असताना त्या ठिकाणी कोणी चिथावणी दिली, गेल्या तीन वर्षात वेगवेगळ्या एनजीओंनी त्या ठिकाणी कशा पध्दतीचे चुकीचे काम केले आणि तेथील लोकांना भडकविण्याचे काम केले, गेल्या आठ दिवसात ज्या लोकांनी चिथावणीची भाषणे केली, गेल्या तीन चार दिवसात ज्या लोकांनी वेगवेगळ्या वाड्यांमध्ये जाऊन बैठका घेऊन भडकविण्याचे काम केले त्यांच्यावर काय कारवाई करणार, असा माझा प्रश्न आहे. आजचा चर्चेचा जो विषय आहे तो गंभीर आहे. कोणीही गोळीबाराचे समर्थन करणार नाही. झालेली घटना निश्चितच दुर्दैवी आहे. परंतु हे घडत असताना त्या प्रकल्पाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी काही गोष्टी या ठिकाणी मांडल्या. पुनर्वसन कसे होणार याबाबत काही सन्माननीय सदस्य या ठिकाणी बोलले. परंतु प्रकल्पाची पूर्ण माहिती न घेता, तेथील वस्तुस्थिती न बघता बरीच विधाने या ठिकाणी करण्यात आलेली आहेत. त्या ठिकाणी एकाही रुपयाचे पुनर्वसन नाही, अशी वस्तुस्थिती आहे. हे सगळे होत असताना या ठिकाणी जपानचे उदाहरण दिले जाते. जपानमध्ये जी माणसे मयत झाली ती त्सुनामीमुळे झाली. आजही जपानमध्ये 50 अणुभट्ट्या चालू आहेत. पण त्याचा विचार न करता राजकीय पोळी भाजण्याच्या दृष्टीकोनातून काही लोक वातावरण बिघडविण्याचे काम सातत्याने या ठिकाणी करतात. माझी या निमित्ताने विनंती आहे की, ज्यावेळी गोळीबाराची चौकशी कराल त्यावेळी हे सर्व घडण्यासाठी ज्यांनी ज्यांनी चिथावणीखोर भाषणे दिली असतील, ज्यांनी ज्यांनी चुकीचे काम केले असेल त्यांच्यावर सुध्दा कारवाई होणे गरजेचे आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, आपला देश महासत्ता व्हावयास पाहिजे असा विचार आपण करतो. भारताला महासत्ता करावयाचे असेल तर विजेच्या बाबतीत काय करणार ? एकविसाव्या शतकाकडे जात असताना आपण विजेच्या बाबतीत विचार केला तर या देशामध्ये प्रत्येक माणूस वर्षाला 650 ते 700 मेगावॅट वीज वापरतो. चीनमध्ये प्रत्येक माणसाच्या दरवर्षीचा विजेचा वापर 2300 मेगावॅटपर्यंत गेलेला आहे. अमेरिकेसारखे जे प्रगत देश आहेत ते 12 हजार मेगावॅटपर्यंत गेलेले आहेत. बरेच देश 10 हजार मेगावॅटपर्यंत गेलेले आहेत. आज त्याची चर्चा नाही. आज या ठिकाणी

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. राजन तेली ......

फक्त गोळीबाराचा विषय आहे. परंतु त्या विषयाची चर्चा करीत असताना एका बाजूला वीज देत नाही म्हणून आंदोलने करावयाची, सरकारला दोष द्यावयाचा आणि दुसऱ्या बाजूला सरकार या ठिकाणी प्रयत्न करीत असताना आपण खरे तर चर्चेला पुढे यावयास पाहिजे. कोकणामध्ये या प्रकल्पाच्या संदर्भात ज्या काही बऱ्यावाईट गोष्टी असतील त्या बाबत सगळ्यांनी मिळून चर्चा केली तर त्यातून मार्ग सुध्दा निघू शकेल. लोकांना भडकविण्यापेक्षा यातून मार्ग काढण्याच्या दृष्टीकोनातून विरोधी पक्षाने सुध्दा प्रयत्न करण्याची गरज आहे, असे मला वाटते. जैतापूरचा जो परिसर आहे त्या संदर्भात माझी शासनाला विनंती आहे की, त्या संपूर्ण परिसराचे व्हिडिओ शुटींग करुन त्या ठिकाणी किती घरे आहेत, किती बागायती आहेत, किती शेती आहे, हे महाराष्ट्रातील आणि देशातील जनतेला बघू द्यावे. मी त्या भागातून गेलो आहे. त्या ठिकाणी अशी परिस्थिती आहे की, त्या प्रकल्पासाठी जी 938 हेक्टर जमीन लागते त्या क्षेत्रामध्ये फक्त 950 कलमे आहेत आणि संपूर्ण 20-25 किलोमीटरच्या परिसरामध्ये घरे सुध्दा दिसत नाहीत. म्हणून राजकारणासाठी राजकारण करुन लोकांना भडकविण्यापेक्षा जैतापूरची जी वस्तुस्थिती आहे ती राज्यातील आणि देशातील सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचावयास पाहिजे. ते पोहोचविण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने हे काम करावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, जैतापूरच्या संदर्भात ज्यांनी ज्यांनी गैरसमज पसरविले तसेच या ठिकाणी विरोधी पक्षाकडून सुध्दा जी चुकीची विधाने झालेली आहेत त्या बाबत सुध्दा शासनाच्या वतीने खुलासा करावा. जाता जाता एवढेच सांगने की, नुकतेच डॉ. अनिल काकोडकर कोकणात येऊन गेले. त्यांनी या प्रकल्पाला त्सुनामीचा कोणताही धोका नाही असे सांगितले. ही चर्चा नंतरची आहे पण त्याचबरोबर या गोष्टीची चर्चा करीत असताना शासनाकडून या सगळ्या गोष्टींची चौकशी व्हावी आणि ही चौकशी करीत असताना दोन्ही बाजू पडताळून बघाव्यात. यामध्ये गोळीबाराची चौकशी होईल पण त्याचबरोबर ज्यांनी चिथावणीखोर भाषणे दिली, ज्यांनी ज्यांनी गैरसमज पसरविले अशा सगळ्यांची चौकशी झाली पाहिजे तसेच त्याचा सूत्रधार कोण आहे हे सुध्दा शासनाने या ठिकाणी जाहीर करावे आणि त्याची चौकशी करावी अशी मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

---

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री मनीष जैन (जलगांव स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापति महोदय, यह जो घटना जैतापूर में हुई है, उस घटना का समर्थन यहां पर कोई भी माननीय सदस्य नहीं करना चाहता. जैतापूर जगह कोंकण में आती है और हमारा कोंकण अल्फांसों नाम के मीठे आमों की वजह से जग प्रसिद्ध है. उन मीठे आमों में प्यार भरा होता है और उस प्यार भरी जगह में यदि गोलीबार होता है तो स्वाभाविक तौर से उस का दर्द सभी लोगों के दिलों में होता है.

सभापति महोदय, वहां पर जो गोलीबारी हुई, उसका मैं समर्थन नहीं करता हू. हमारा कहना है कि वहां पर गोलीबार नहीं होना चाहिए था. हमारा हिन्दुस्तान तो आंदोलनों की ही भूमि रही है. महात्मा गांधी जी ने भी यहां पर अनेक आंदोलन किए थे. इसी तरह का आंदोलन जैतापूर में भी हो रहा था. वहां पर किए जाने वाले आंदोलन की पूरी जानकारी तो मुझे नहीं है. लेकिन मैं इतना जरुर पूछना चाहता हूं कि जो लोग वहां पर आंदोलन कर रहे थे, क्या वे लोग वहां पर अपने हाथों में लाठी और पत्थर लेकर आंदोलन कर रहे थे ? मेरी जानकारी के अनुसार वे लोग अपने हाथो में लाठी और पत्थर लेकर आंदोलन नहीं कर रहे थे. लेकिन अखबारों से मिली जानकारी के अनुसार हमारी पुलिस वहां पर लाठी लेकर गयी थी, प्लास्टिक की बुलेट लेकर गयी थी, बंदूकें और आंसू गैस के गोले लेकर गयी थी. इसलिए कहा जा सकता है कि पुलिस फोर्स वहां पर पूरी तैयारी से गयी थी. क्या पुलिस को पहले से जानकारी थी कि इतना बड़ा आंदोलन वहां पर होने वाला है. मेरा कहना है कि हमारी पुलिस हमेशा इतनी तैयारी से नहीं जाती है. इसलिए हमारी पुलिस को जंगल और खेतो में होने वाले इस आंदोलन के लिए इतनी तैयारी से जाने की क्या जरुरत थी.

यह बात सही है कि हमें बिजली की जरुरत है और महाराष्ट्र का विकास करने के लिए बिजली की बहुत आवश्यकता है. लेकिन यहां पर जो घटना हुई है, इसकी निंदा करते हुए मैं कहना चाहूंगा कि इस घटना की जांच करने के लिए एक समिति गठित की जानी चाहिए और दोषी अधिकारियों को निलंबित किया जाना चाहिए. इतना कहते हुए मैं अपनी बात यहीं पर समाप्त करता हूं. धन्यवाद.

-0-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, कोकणातील एका गंभीर विषयावर सभागृहात चर्चा चालू आहे. या चर्चेत भाग घेण्यासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदय, मी कोकणातील सदस्य आहे व कोकणातील घटना असल्यामुळे मला माझे परखड मत मांडण्यासाठी मला 2 मिनिटे जास्त वेळ द्यावा अशी मी सुरुवातीलाच आपल्याला विनंती करतो. कोकणातील हा विषय आहे. कोकणातील माणसे गरीब आहेत, सुसंस्कृत आहेत. या सभागृहातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांची मी भाषणे ऐकली आहेत. त्यावरुन त्यांना कोकणातील लोकांना काजू, आंबा व मासेमारीवरच जगविण्याचा प्रयत्न करावयाचा आहे का, तेथे विकास करावयाचा नाही का, त्या भागात उद्योग उभे करावयाचे नाहीत काय, तेथील लोकांनी नोक-यांचे अर्ज घेऊन ते सेना भवन मध्ये पोहोचविण्याचेच काम करावयाचे काय, तेथे विकास करावयाचा असेल तर त्यासाठी ऊर्जेची आवश्यकता आहे. तेथील विकासासाठी, प्रकल्पांसाठी ऊर्जा मिळवून देण्यासाठी सरकार प्रयत्न करीत असेल तर त्याला विरोध करणे योग्य आहे काय ? कोकणात एन्रॉन प्रकल्प आणला गेला त्याला विरोध करण्यात आला, जैतापूर अणुऊर्जा प्रकल्प आणला जात आहे, त्याला विरोध केला जात आहे. खाण प्रकल्प आणला तर त्यालाही विरोध करण्यात येतो. देवगड-विजयदुर्ग येथे पारंपरिक पध्दतीने कोळशावर व गॅसवर वीज निर्मिती प्रकल्प होणार होता त्यालाही विरोध करण्यात आला. मग कोकणातील लोकांना काय पाहिजे ? कोकणातील लोकांसमोर भाषणे करावयाची आणि त्यांची माथी भडकावयाची, त्यानंतर कोण मारले गेले की त्याचे प्रेत बाजूला ठेवून रडत बसायचे, हेच तेथे करीत राहणार आहात काय ? या आंदोलनात मृत्युमुखी पडलेले तरबेज सायेकर आहेत, त्यांच्या निधनाबद्दल मी दु:ख व्यक्त करीत आहे. ते सुध्दा महाराष्ट्रातील नागरिक होते. आमच्या कोकणातील नागरिक होते. कोणत्याही नागरिकाचा मृत्यू व्हावा अशा भावना कोणाच्याही नसतील.

सभापती महोदय, मी या विषयाच्या निमित्ताने एका गोष्टीचा खुलासा करु इच्छितो. या महाराष्ट्रात नाही तर देशात सुध्दा कोठे गोळीबार झाला असेल तर त्याची योग्य चौकशी झाली पाहिजे. जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. या सभागृहात मी अनेकांची भाषणे ऐकलेली आहेत. सन्माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्याबाबत सत्ताधारी पक्षातील

3....

श्री.किरण पावसकर....

सदस्यांकडूनच नाही तर विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनांकडूनही विश्वास व्यक्त करणारी भाषणे होतात. या गोळीबाराची योग्य पध्दतीने चौकशी केली जावी. त्यामध्ये जे काही असेल ते आपल्या समोर येईल.

सभापती महोदय, नाटा पोलीस स्टेशनमध्ये जो प्रकार घडला त्या बाबत सन्माननीय सदस्यांची भाषणे चालू असताना माझ्याकडे वृत्तपत्राच्या संस्थांकडून कागदपत्रे आलेली आहेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर...

याचा अर्थ हे कॉंक्रीट आहे असे मला वाटते. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी भाषणे केली.

जैतापूर प्रकल्पाच्या संदर्भात मला एक प्रश्न विचारावयाचा आहे तो म्हणजे हा प्रकल्प जैतापूर येथेच का नेण्यात आला ? या बाबतीत तज्ज्ञांनी थर्मल इकॉलॉजिकल स्टडी केली. त्या स्टडीच्या आधारे हा प्रकल्प कुठे व्हावा हे ठरविण्यात आले. या प्रकल्पाला पाण्याची, ऊर्जेची किती गरज आहे याचा अभ्यास करुन हा प्रकल्प जैतापूर येथे किंवा त्या किनारपट्टीला व्हावा हे ठरविण्यात आले. लोकशाहीमध्ये निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचे मंत्रिमंडळ असते. या मंत्री मंडळातील माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री आणि अन्य मंत्री देखील जनते समोर गेले. त्यांच्याशी प्रत्यक्ष सुसंवाद साधण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांचे म्हणणे जनतेने ऐकून घेतले काय हा त्यामधील महत्वाचा प्रश्न आहे. मंत्रिमंडळ तेथे चर्चेला गेल्यानंतर मंत्रिमंडळाबरोबर शांततेने चर्चा झाली असती तर मला वाटते आज तरबेज सायेकरचा मृत्यू झाला नसता. त्या ठिकाणी मुख्यमंत्री चर्चेला गेल्यानंतर विरोधकांकडून त्यांना चांगला प्रतिसाद मिळाला असता तर आजचा हा मृत्यू टाळता आला असता. मी आपल्याला मुद्दाम सांगू इच्छितो की, जेव्हा जेव्हा अशा प्रकारची चर्चा या सभागृहामध्ये होते त्यावेळी फक्त पोलिसांनाच टारगेट करण्यात येते. 26/11च्या हल्ल्यानंतर या सभागृहामध्ये तीन दिवस चर्चा झाली. 26/11च्या हल्ल्यात कामठे, करकरे, विजय साळसकर या पोलीस अधिका-यांविषयी सर्वजण गळा काढून बोलले. आपले पोलीस मृत्युमुखी पडल्यानंतर त्यांच्या विषयी बोलले जाते. पोलिसांकडून आपण संरक्षणाची अपेक्षा करतो. तसेच त्यांचे मनाधैर्य कसे वाढेल, मनोबल कसे वाढेल या विषयी फक्त येथे भाषणे करतो आणि त्यानंतर दुसरा प्रकार करायला जातो.

आज जी घटना घडली त्याबाबतीत मी सांगेन की, तेथे एकाचा दुर्दैवी मृत्यू झालेला आहे. पण त्याच बरोबर तेथे किती पोलीस जखमी झालेले आहेत हे देखील आपल्याला समजले पाहिजे. मला आता मिळालेल्या माहिती प्रमाणे डीवायएसपी मोरे हे देखील सिरियस आहेत. हा देखील विषय सभागृहासमोर येणे आवश्यक आहे. या गोष्टीला आणखीही काही गोष्टी कारणीभूत आहेत. मी केवळ पोलिसांची चौकशी करा, त्यांच्यावर कारवाई करा असे न सांगता ज्यांनी या आंदोलकांची माथी बिघडविली आहेत, चिथावणीखोर भाषणे केलेली आहेत, जनतेच्या भावना

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर...

भडकविलेल्या आहेत त्यांच्यावर गृहमंत्री काय कारवाई करणार आहेत हे या सभागृहाला समजले पाहिजे. एमएनएस पक्षाच्या अध्यक्षावर चिथावणीखोर भाषणे केल्याबद्दल या सरकारने 80 केसेस दाखल केलेल्या आहेत. या केसेस दाखल करुन किती मेले, कुणावर किती लाठीचार्ज झाला याची चौकशी केली. परंतु हा त्याही पेक्षा गंभीर गुन्हा आहे. या गंभीर गुन्ह्याची दखल घेऊन अशा पध्दतीने आंदोलकांची माथी भडकविणा-या, प्रकल्पाच्या विरोधात भाषणे करणा-या, पोलिसांना गोळीबार करावा लागावा अशा पध्दतीची प्रक्षुब्ध भाषणे करणा-यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई केली जावी आणि त्याही पेक्षा महत्वाची गोष्ट मी सांगू इच्छितो की, ट्विटरवर आताच एक मजकूर प्रसिध्द झालेला आहे. माझ्या हातामध्ये प्रेसचा कागद आहे. "सेना झेलते गोळ्या आणि सेनापती मात्र जंगल सफारीत मग्न" असा मजकूर ट्विटरवर आलेला आहे. हे मी स्पष्ट का करतोय. कारण आज मंगळवार रोजी शिवसेनेने रत्नागिरी बंदची हाक दिली. साहेबांचे आदेश पाळत सैनिक जाळपोळ, तोडफोड करीत असताना शिवसेना कार्याध्यक्ष मात्र कान्हा अभयारण्यात जंगल सफारीसाठी गेलेले आहेत." सभापती महोदय, मी कोकणातील आहे आणि कोणातील जनतेशी मी जोडलेला आहे. तेथील जनतेशी माझी देखील नाळ जोडलेली आहे. परंतु त्याच ठिकाणी अशा पध्दतीने चिथावणीखोर भाषणे करुन तेथील लोकांना लढवत ठेवायचे ही कोणती पध्दत आहे? या पध्दती तुम्हाला थांबवाव्या लागतील. याच्या मुळापर्यन्त आपणाला जावे लागेल. फक्त राजकारणाचा पाया पकडून, चांगली भाषणे करुन यावर पडदा पडणार नाही. म्हणून मी सांगेन की, ज्यांनी गोळीबार केलेला आहे त्या पोलिसांची सखोल चौकशी जरुर करा, आंदोलकांची देखील जरुर चौकशी करा, परंतु ज्यांनी गरीब जनतेची माथी भडकवली आणि ज्यांच्या विचारामुळे मुडदा पडलेला आहे त्यांच्यावर काय कारवाई करणार हे या सदनाला समजू द्या.

श्री. रामदास कदम : सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर हे इकडे होते आता तिकडे गेले हे त्यांनीच येथे सांगितलेले आहे. त्यांनी आपल्या भाषणामध्ये ट्विटरवरचा काही भाग वाचून दाखवला आणि कार्याध्यक्ष श्री. उद्धव ठाकरे हे कुठे आहेत हे सांगितले. जे या सदनाचे सदस्य नाहीत त्यांचे नियमानुसार नाव घेणे योग्य नाही. तेव्हा त्यांच्या नावाचा जो उल्लेख झालेला आहे तो कामकाजातून काढून टाकावा असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

...नंतर श्री. गिते....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, मी नावांचा उल्ल्‌ेख यासाठी केला आहे की, त्या ठिकाणी त्यांचे भाषण झाले होते. 9 तारखेला त्यांचे भाषण झाले आणि त्यानंतर काल हा प्रकार तेथे झालेला आहे. टिक्वटरवर यासाठी बोललो आहे. त्यात भयानक असे लिहिलेले आहे. मी शिवसेनेत असताना मला देखील वाईट वाटले, त्याचे कारण त्यावेळी मी तिकडे होतो. मी शिवसेनेत होतो म्हणून माननीय भाई मला वाईट वाटते. त्यात लिहिले आहे की, 26 नोव्हेंबर रोजी अतिरेक्यांनी मुंबईवर हल्ला केला, त्यावेळी त्यांचे नेते पंचतारांकित हॉटेलमध्ये थांबले होते. (गोंधळ)

**सभापती** : आतापर्यंत ही चर्चा अतिशय गंभीरपणे झालेली आहे. मला वाटते की, या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे वा अन्य सदस्य बोलत होते, त्यावेळीही मी काही निर्णय दिला आहे. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी एक, दोन उल्लेख केले आहेत, ते मी तपासून घेतो आणि मला जे काही करणे शक्य आहे ते करतो.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, मला आपण बोलण्याची परवानगी द्यावी..

**सभापती** : ही चर्चा 4 वाजून 4 मिनिटांनी संपवावयाची आहे. आपण जरुर बोलावे. सन्माननीय गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील यांचे उत्तराचे भाषण होईल, त्यानंतर ज्यांनी हा प्रस्ताव मांडला आहे त्यांना काही वेळ बोलावयास परवानगी द्यावी लागेल. माझ्याकडे आता 28 मिनिटांचा वेळ आहे. नियमाप्रमाणे ही चर्चा एक मिनिट सुध्दा वाढविता येणार नाही. सन्माननीय मंत्री श्री. नारायण राणे यांना बोलण्याची परवानगी देण्यात येत आहे.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, या विषयावर दोन, चार मिनिटे बोलणे हे बरोबर वाटत नाही.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मी सन्माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, हा म.वि.प.नियम 93 चा प्रस्ताव असल्यामुळे त्यावरील चर्चा ही दोन तासात संपलीच पाहिजे.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, जैतापूर येथे आंदोलन झाले, त्या ठिकाणी अतिशय दुर्देवी आणि गंभीर घटना घडली, त्या संदर्भातील प्रस्ताव सभागृहात मांडला गेला आहे आणि त्यावर चर्चा सुरु आहे. जैतापूर अणु ऊर्जा प्रकल्प हा कोकणात आहे. या प्रस्तावावर दोन्ही बाजूच्या काही सदस्यांनी विचार मांडले आहेत, त्यातील काही सदस्यांचे विचार वस्तुस्थितीला धरुन नाहीत. गेल्या 21 वर्षापासून मी अनेक मान्यवर सदस्यांची भाषणे ऐकलेली आहेत. विषयाला धरुन, पुराव्यानिशी, वस्तुनिष्ठ परिस्थिती सभागृहासमोर आणण्याचे काम त्यांनी केलेले आहे. परंतु आताची भाषणे ऐकतो ते ऐकून मला थोडेसे वाईट वाटते. जैतापूर कोठे आहे, तेथील परिस्थिती काय आहे, तेथे प्रत्यक्षात काय घडले, या बाबतची पुरेशी माहिती नसताना देखील सभागृहात काही सदस्यांनी विचार मांडले. त्यामुळे मला देखील या विषयावर बोलावेसे वाटले. आपण मला बोलण्याची परवानगी दिल्याबद्दल आभार व्यक्त करतो.

सभापती महोदय, काल जैतापूर येथे आंदोलन झाले, त्यास आंदोलन म्हणावे काय हा पहिला प्रश्न आहे. आंदोलकांनी आंदोलनाची कोठलीही परवानगी घेतलेली नव्हती. म्हणून त्यास आंदोलन म्हणता येणार नाही. मालवण, जैतापूर या परिसरात 10 गावे आहेत. 17 तारखेस सायंकाळी तेथील 4 गावांमध्ये स्थानिक आमदारांनी बैठका घेतल्या. आपल्याला कोणत्याही परिस्थितीत प्रकल्पाची कामे बंद करावयाची आहेत. आपल्याला तसे आदेश आलेले आहेत. त्यामुळे 18 तारखेस काम बंद करण्यासंबंधी नियोजन करण्यात आले. 12 मार्च रोजी शिवसेना भवनामध्ये बैठक झाली. या बैठकीस कोण कोण उपस्थित होते, त्यांची नावे माझ्याकडे आहेत. त्या बैठकीत ठरले की, जैतापूर येथील प्रकल्पाचे काम बंद करावयाचे. काम बंद करण्याबाबत व्यवस्थितपणे नियोजन करण्यात आले. काल 11 ते 12 वाजेच्या सुमारास 150 ते 200 माणसे वेगवेगळया मार्गाने प्रकल्पाच्या ठिकाणी आली. ती माणसे खाली हाताने आली नव्हती. ती हातात झेंडे घेऊन आली नव्हती...

यानंतर श्री. भोगले...

अपुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे.....

कोणाच्या हातात सळ्या, कोणाच्या हातात काठ्या अशा प्रकारे पूर्ण तयारी करुन ही माणसे आलेली होती. त्यांनी एका बाजूने आगी लावल्या. दुसऱ्या बाजूला पोलीस उभे होते त्यांच्यावर हल्ला केला. पोलिसांवर हल्ला होत असताना पोलीस कर्मचारी मरणार हे पाहिल्यानंतर डी.वाय.एस.पी.श्री.मोरे यांनी स्वत: धाव घेतली. आज त्यांची अवस्था काय आहे? हॉस्पिटलमध्ये 22-23 टाके घातल्यानंतरही त्यांची परिस्थिती गंभीर आहे. आंदोलनाचे समर्थन आम्हीही केले होते. परंतु हल्ले करुन काम बंद पाडायचे, आपली ताकद दाखवायची आणि राजकीय पोळी भाजून घ्यायची यासाठी शिवसेनेने केलेले हे कृत्य आहे. कोकणाच्या भल्यासाठी भाषणे केली, सभा घेतल्या. 19 मिनिटाच्या भाषणात काय मुद्दे होते? कोकणात कोणते प्रकल्प येणार, किती लोकांना रोजगार मिळणार, रोजगार मिळाल्यानंतर दरडोई उत्पन्न किती वाढणार याची माहिती दिली गेली नाही. त्या सभेमध्ये फक्त राजकीय आरोप केले गेले. सत्तारुढ पक्षावर आरोप केले गेले. आम्ही हे करु, आम्ही ते करु असे सांगून वातावरण दूषित करण्यात आले. ही जी घटना घडली त्या घटनेला मागील काळात तेथे जी काही भाषणे झाली ती कारणीभूत आहेत. एका व्यक्तीचा गोळीबारात बळी गेला. यांच्या भाषणामुळेच या व्यक्तीचा बळी गेला आहे. सरकारने याची दखल घेतली आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी भाषण केले. माननीय गृहमंत्री सविस्तर उत्तर देतील. आज राज्याला विजेची गरज किती आहे हा महत्वाचा प्रश्न आहे. कालच्या घटनेमध्ये पोलीस कोणाच्या घरात गेले नव्हते. जैतापूर आणि साखरी नाटे ही गावे कुठे आहेत, या दोन गावांमध्ये समुद्राचा भाग किती आहे, जैतापूर आणि नाटे या गावांमध्ये किती अंतर आहे, याची यांना माहिती आहे का? पहिल्यांदा पोलिसांना धरुन मारण्यात आले. नंतर पोलिसांनी लाठीमार केला, अश्रुधुराची नळकांडी फोडली, त्यानंतर गोळीबाराची घटना घडली.

सभापती महोदय, या राज्यात 5500 मे.वॅट विजेची तूट आहे. राज्याचे औद्योगिकीकरण, राज्याच्या औद्योगिक प्रगतीचा विचार केला पाहिजे. विजेसाठी किती आंदोलने झाली याची माहिती माननीय गृहमंत्री यांनी विधानसभेत दिली. 45 पेक्षा जास्त आंदोलने शिवसेना पक्षाने केली आहेत. एका बाजूला विजेची मागणी करायची आणि दुसऱ्या बाजूला प्रकल्प बंद पाडायचे, प्रकल्प सुरु करु द्यायचे नाहीत. एन्रॉन प्रकल्पाचे उदाहरण मी स्वत: अनुभवले आहे. आम्ही त्यावेळी सत्तेत होतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे.....

त्या प्रकल्पाच्या विरोधात जे आंदोलक होते तेच ठेकेदार बनले. त्यानंतर ती कंपनी सुरु झाली. हा विषय त्याच प्रकारचा आहे. पोलिसांवर हल्ला झाला, पोलीस स्टेशनमध्ये घुसून कागदपत्रे जाळण्यात आली. पोलीस स्टेशनमध्ये घुसून पाच पोलिसांना मारहाण करण्यात आली. अशा परिस्थितीत पोलिसांनी फक्त बघत रहायचे का? माननीय सदस्य म्हणतात, पोलीस बुलेट का घेऊन गेले? पोलिसांनी बुलेटशिवाय बंदुका ठेवायच्या का, आमचे डोके फोडा, आम्हाला ठार मार असे त्यांनी म्हणायचे का? पोलीस हे जनतेच्या रक्षणासाठी आहेत. केवळ अज्ञानापोटी बोलायचे म्हणून बोलू नये.

माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस या ठिकाणी उपस्थित आहेत. मी त्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, पोलीस कोणाच्या घरात गेले नव्हते. आंदोलक पोलीस स्टेशनमध्ये घुसून पोलिसांना खाली पाडून मारणार असतील तर पोलिसांनी काय करायचे, समोर येणारे मरण स्वीकारायचे? शासन त्यांना पगार देत आहे, ते जनतेच्या संरक्षणासाठी आहेत या सगळ्या गोष्टींचा विचार करावा. कोकणामध्ये प्रकल्प येऊ नयेत का? आज पुरेशा विजेअभावी कोकणात हॉस्पिटल काढू शकत नाही. वीज नसल्यामुळे प्रकल्प आणता येत नाहीत. अणुऊर्जा प्रकल्पाची सुरक्षितता हा महत्वाचा विषय निश्चित आहे. जपानमध्ये जी घटना घडली, तेथे भूकंपाचे प्रमाण किती आहे याची यांना माहिती नाही. आतापर्यंत किती रिस्टर स्केलचा भूकंप झाला? आमच्याकडे 8.9 रिस्टर स्केलचा भूकंप झालेला नाही. हिमालयाचा काही भाग सोडला तर अशा प्रकारचा एकही भूकंप झालेला नाही. हा तांत्रिक मुद्दा आहे. परंतु अशा प्रकारे आंदोलन केल्याने माणसे मरणार असतील, जखमी होणार असतील तर कोकणात भविष्यात एकही प्रकल्प येणार नाही याचा विचार यांनी केला पाहिजे. तुम्ही फोटो काढायला गेला. माणूस मेला, त्याचे प्रेत रस्त्यावर ठेवले. या सभागृहातील एक आमदार आणि श्री.कीर्तिकर तेथे गेले.

नंतर 3ए.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे .......

अशा प्रकारे इकडचे तिकडचे सगळे संपल्यानंतर राजकीय पोळी भाजण्याचे काम चालले आहे. अशी केविलवाणी परिस्थिती विरोधकांची झालेली आहे. म्हणून मी असे म्हणेन की कालच्या घटनेत ज्या आंदोलकाचा मृत्यू झाला त्या पापाचे वाटेकरी हेच विरोधक आहेत. कोकणात वीज नको पण शांतता हवी असे म्हणणारे हे विरोधक इच्छा असताना बसल्या जागी आंदोलन करुन प्रकल्प बंद पाडण्याचे काम करीत आहेत, ही प्रवृत्ती योग्य नाही, तिला पायबंद घातला पाहिजे. कालची घटना घडण्यासाठी ज्या प्रवृत्तींनी वातावरणाची निर्मिती केली त्यांच्यापैकी कोणालाही सोडले जाणार नाही. शिवसेना भवनातून किंवा माडबन जैतापूर गावात जाऊन हा प्रकल्प बंद पाडण्याचे आदेश देणारे, आदेशाचे पालन करणारे आणि प्रत्यक्ष गुन्हेगार यांच्यापैकी शासन कोणालाही सोडणार नाही, असे सांगून मी माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

---------

.....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी आता उत्तराच्या भाषणाला सुरुवात करावी. बरोबर चार वाजून दोन मिनिटांपर्यंतच ही चर्चा सुरु राहील. त्या वेळेतच मंत्री महोदयांचे उत्तर आणि ज्यांनी प्रस्ताव दिला त्या सन्माननीय सदस्यांचा राईट ऑफ रिप्लाय सुध्दा संपणे आवश्यक आहे. कारण ही नियम 93 अन्वये चर्चा असल्याने फक्त दोनच तासात चर्चा संपली पाहिजे, अन्यथा यावर पोल मागता येणार नाही.

श्री. दिवाकर रावते : महोदय, हा प्रश्न पीठासीन अधिकारी म्हणून आपला आहे. आम्हाला मात्र या चर्चेवर पोल मागावयाचा आहे.

**सभापती** : चार वाजून दोन मिनिटांच्या आतच मंत्री महोदयांचे उत्तर देखील पूर्ण होणे आवश्यक आहे.

श्री. आर.आर.पाटील : महोदय, मला उत्तर देण्यासाठी अत्यंत कमी वेळ आहे. म्हणून मी अशी विनंती करतो की, खालच्या सभागृहात मी याच चर्चेचे उत्तर दिलेले आहे. तीच प्रत आपल्या परवानगीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : आपण उत्तराच्या भाषणाला सुरुवात करावी.

श्री. आर.आर.पाटील ( गृह मंत्री ) : सभापती महोदय, जैतापूर येथे काल जी दुर्दैवी घटना घडली त्यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी नियम 93 अन्वये सभागृहात चर्चा उपस्थित केली आहे.

महोदय, जैतापूर प्रकल्पाला विरोध करणाऱ्या आंदोलकांवर गोळीबार झाल्यानंतर त्यात एका नागरिकाचा मृत्यू झाला व त्याचे पडसाद दोन्ही सभागृहात उमटणे स्वाभाविकच आहे. आपल्या राज्यात पोलीस दलाची निर्मिती मुळातच जनतेच्या जीवित व मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी करण्यात आलेली आहे. तरी देखील पोलिसांना फायरिंग करावी लागते याचा दोन्ही बाजूच्या सदस्यांनी विचार करणे आवश्यक आहे. आताच मी सभागृहात येत असताना गडचिरोलीमध्ये गोळीबार होऊन तीन पोलीस जखमी झाल्याची बातमी मला मिळाली, सविस्तर वृत्त अजून कळलेले नाही. त्यांनी रात्रंदिवस डोळ्यात तेल घालून जागता पहारा ठेवल्यामुळे 100 टक्के म्हणणार नाही पण थोड्या फार प्रमाणात तरी जनतेला सुरक्षितता मिळत असते.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील....

सभापती महोदय, दिनांक 18.4.2011 रोजी जैतापूर येथे जी घटना घडली त्या घटनेला काही पार्श्र्वभूमी आहे. दि. 15 एप्रिल, 2011 रोजी केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री. जयराम रमेश हे मुंबईला आले होते व त्यांनी "जैतापूर प्रकल्पाचा कोणत्याही परिस्थितीत पुनर्विचार केला जाणार नाही, शासनाने जो विचार केलेला आहे त्यावर केंद्र सरकार ठाम आहे" असे मत व्यक्त केल्यानंतर यासंदर्भातील प्रतिक्रिया या परिसरात थोडी उमटली. यासंदर्भात आमदार श्री. राजन साळवी यांनी केंद्रीय मंत्री श्री. जयराम रमेश यांच्या पुतळयाचे दहन करण्याचाही प्रयत्न केला. पोलिसांना इन्टेलिजन्सकडून 18 तारखेला काम बंद पाडण्याची शक्यता आहे अशी माहिती मिळाली होती त्यानुसार संबंधितांना कलम 101 अनुसार एक दिवस अगोदर नोटीस देण्यात आली होती. मी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचे विचार ऐकलेले आहेत. या ठिकाणी घडलेला सर्व घटनाक्रम बघितल्यानंतर जैतापूर, मयतापूर अशा पध्दतीची वक्तव्ये जैतापूरच्या परिसरात केली गेली होती. जैतापूरचे आंदोलन गेल्या अनेक दिवसापासून सुरु होते. परंतु या आंदोलनाने हिंसक वळण यापूर्वी कधीही घेतले नव्हते.

पर्यावरण मंत्री श्री. जयराम रमेश यांनी केलेल्या वक्तव्यानंतर जैतापूर येथे आमदार श्री. राजन साळवी यांनी ज्या पध्दतीने काम केले होते त्यामुळे या परिसरात संवेदनशील वातावरण तयार झाले होते. दि.18 एप्रिल, 2011 रोजी प्रकल्पाचे काम बंद पाडण्याची माहिती अगोदर मिळाल्यामुळे साईटवर चांगल्या पध्दतीचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. प्रकल्पाच्या साईटवर 1 डीवायएसपी, 5 पीआय, 10 पीएसआय, 150 पोलीस इतका स्टाफ साईटवर प्रत्यक्ष होता. प्रकल्पाची साईट मोठी असून या साईटला कंपाऊंड नसल्यामुळे अनेक पायवाटेने साईटवर येता येते. पोलिसांच्या लक्षात आले की, आंदोलनकर्ते लाठया, काठया घेऊन येत आहेत. आंदोलकांना अडवण्याचा प्रयत्न केल्यानंतर पोलीस ज्या दिशेने होते त्या बाजूच्या गवताला देखील आंदोलकांनी आगी लावल्या होत्या व पोलिसांनी आपल्या पर्यंत येऊ नये यासाठी प्रयत्न केले गेले होते. तरीही मॉब पुढे येत होता हे पाहून त्यांना अडवण्यासाठी काही पोलीस अधिकारी पुढे गेले, लाठीचार्ज करण्याचाही प्रयत्न केला. मोरे नावाच्या डीवायएसपीला आंदोलकांनी फरफटत नेले व काठीने त्यांचे डोकेही फोडले व त्यामध्ये त्यांना 24 टाके पडलेले आहेत. हे काही इंग्रजांचे

..2..

श्री. आर.आर.पाटील....

पोलीस नाहीत तर आपल्याच पोलीस दलातील पोलीस अधिकारी आहेत. सगळया बाजूने आंदोलकांना पोलिसांनी पाठीमागे रेटल्यानंतर आंदोलकांमध्ये वैफल्याची भावना निर्माण झाली की, आपण 700-800 च्या मॉबने येऊनही काम बंद पाडू शकत नाही त्यामुळे जवळच्या नाटे पोलीस स्टेशनच्या दिशेने सर्व आंदोलक वळले. जैतापूरला स्पेशल पोलीस भरती करण्यात आलेली नसून जवळच्या पोलीस स्टेशनमधील पोलीस या ठिकाणी डेप्यूट केले जात असतात. नाटे पोलीस स्टेशनमध्ये केवळ 5 कॉन्स्टेबल घटनेच्या वेळेस होते. 300-400 लोकांचा मॉब नाटे पोलीस स्टेशनवर चालून गेला व त्यांनी पोलीस स्टेशनमधील सर्व रेकार्ड काढून पेटवून दिले, वायरलेसचे सेट तोडण्यात आले, फोनच्या तारा तोडल्या, ऑफीसची नासधूस करुन सर्व जाळपोळ करण्यात आली. या ठिकाणचे 5 कॉन्स्टेबल फक्त वरिष्ठांना माहिती कळविण्यापलीकडे ते काहीही करु शकले नाहीत.

जैतापूरच्या साईटवर जे पोलीस अधिकारी होते त्यांना पोलीस स्टेशनच्या कॉन्स्टेबलने मदतीसाठी बोलावले. मधील काळात डीवायएसपी, डेप्युटी कलेक्टर, कलेक्टर, जिल्हयाचे पोलीस अधीक्षक सर्वच नाटे पोलीस स्टेशनच्या जवळ आले. ज्यावेळी बाहेरची कुमक यावयास लागली त्यावेळेस मॉबने त्यांच्यावरही दगडफेक करण्यास सुरुवात केली. पोलिसांनी घरामध्ये जाऊन अंदाधूंद गोळीबार केला, लोकांना मारले असे जे विरोधी पक्ष सदस्य सांगत आहेत ते कशाच्या आधारावर सांगत आहेत हे मला माहिती नाही. राज्याचे पोलीस काही माणसे मारण्यासाठी नाहीत. पोलिसांनी पहिल्यांदा लाठीचार्ज करुन अंदोलकांना बाजूला करण्याचा प्रयत्न केला तरी अंदोलक पाठीमागे जाण्यास तयार नव्हते. माझ्याकडे जी पक्कीची आणि खात्रीची माहिती आहे त्यावरुन पोलिसांनी अश्रूधुराची नळकांडी फोडली तरी अंदोलक जावयास तयार नव्हते, 45 प्लॅस्टीकच्या गोळया उडवल्या तरीही लोक पाठीमागे जाण्यास तयार नव्हते. शेवटी जी कुमक गेली होती तिच्याच जीवनमरणाचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे पोलिसांना फायरींग करावे लागले. झाडलेल्या प्रत्येक गोळीने नागरिक मरावा या उद्देशाने गोळीबार केला नव्हता. 25 राऊंड फायरींग केल्यानंतर त्यातील 4 लोकांना गोळया लागल्या व त्यातील 3 लोकांच्या पायाला गोळया लागल्या याचा अर्थ पोलिसांनी 25 गोळया झाडून 21 गोळया हवेत उडवल्या असा त्याचा अर्थ

श्री. आर.आर.पाटील....

होतो. त्यामुळे लोकांना मारण्याचा पोलिसांचा उद्देश नव्हता हे सिध्द होते. 4 गोळया लोकांच्या पायावर लागल्या आहेत त्यावरुन लोकांना मारण्याचा उद्देश नव्हता हे सिध्द होते. चुकून एक गोळी पोटात लागली व त्यामध्ये तरबेजचा मृत्यू झाला.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

कोणाचाही मृत्यू होणे ही दु:खदायक गोष्ट आहे आणि राज्याचा गृहमंत्री म्हणून या गोष्टीची मला खरोखरच खंत वाटते. तसेच मला या गोष्टीचे दु:खही आहे. परंतु पोलिसांना कोणत्या परिस्थितीत गोळीबार करावा लागला हे सुध्दा पाहणे तितकेच आवश्यक आहे.

सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री. नारायण राणे यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे. ही घटना घडण्यापूर्वी निरनिराळया राजकीय पक्षांच्या झालेल्या सभा, त्या सभेपूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांनी लोकांबरोबर चर्चा करण्याची घेतलेली भूमिका, लोकांना नुकसान भरपाई म्हणून आणखी काही पाहिजे असेल तर त्याबाबतीत सरकारने व्यक्त केलेली मते या सर्व पार्श्र्वभूमीवर राज्यामध्ये विकासाचे प्रकल्प होऊ द्यावयाचे किंवा नाही याचा देखील विचार केला जाण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मी खालच्या सभागृहात सुध्दा हे सांगितले होते की, विजेच्या टंचाईच्या बाबतीत गेल्या वर्षी कॉंग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी 17 आंदोलने केली होती,राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी 27 आंदोलने केली होती,शिवसेना पक्षाच्या कार्यकर्त्यांनी 45 आंदोलने केली होती , भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी 15 आंदोलने केली, मनसेने 8 आंदोलने केली आणि भारिप व अन्य पक्षाच्या कार्यकर्त्यांनी 13 आंदोलने केली होती, एका बाजूने राज्यामध्ये जी वेगवेगळी आंदोलने झाली होती त्यातील विजेच्या प्रश्नाच्या बाबतीत सगळयात जास्त आंदोलने
झाली होती. ग्रामीण भागात पुरेशी वीज नसल्यामुळे शेती ओस पडावयास लागली आहे, पिके जळावयास लागली असून कारखानदारी वाढत नाही. अन्य राज्ये मात्र वाढावयास लागली आहेत. केवळ वीज नसल्यामुळे राज्याचा विकास खुंटणार आहे किंवा काय अशी स्थिती निर्माण झाली आहे.आज राज्यामध्ये साडेचार हजार मेगॅवॅटस विजेची कमतरता आहे. ग्रामीण भागात फक्त आठ तास वीज मिळते आणि बाकीचे 15-16 तास भार नियमन केले जाते. मुंबईमध्ये राहणा-या लोकांना हा त्रास जाणवत नाही परंतु ग्रामीण भागात विजेच्या बाबतीत अत्यंत वाईट स्थिती आहे. तेव्हा वीज निर्मितीच्या बाबतीत आपण जर काही प्रयत्न केले नाही तर भविष्यात राज्य विकास कामामध्ये सगळया राज्यापेक्षा मागे पडेल. विजेचा प्रकल्प उभा करण्याचा राज्य शासनाने प्रयत्न करावयाचे ठरविले तर कोठल्या तरी भागातील लोक सांगतात की आमचे पाणी वापरता कामा नये, काही

2..

काही भागातील लोक असे सांगतात की, पर्यावरणाला धोका निर्माण होता कामा नये, कोळशावर आधारित वीज निर्मिती प्रकल्प सुरु करण्याचा प्रयत्न केला तर कोळश्यामुळे धूर होतो त्यामुळे हा प्रकल्प सुरु करता कामा नये असे तेथील लोक सांगतात. अणु ऊर्जा प्रकल्प सुरु करण्याचे शासनाने ठरविले तर त्यातून धोका निर्माण होतो म्हणून तोही प्रकल्प होता कामा नये असे त्या भागातील लोक सांगत असतात. राज्यात वीज नसली तरी चालेल ,शेतातील पिके जळाली तरी चालतील ,बेरोजगारांना काम मिळाले नाही तरी चालेल, उद्योग धंदे नसले तरी चालतील परंतु वीज निर्मिती प्रकल्प होता कामा नये अशा प्रकारचा ठराव तुम्ही आणू शकता काय असे मी सन्माननीय सदस्यांना विचारु इच्छितो.अशा प्रकारची भूमिका आपल्या राज्यात आपण घेऊ शकतो काय ? शेवटी सहमतीने वीज निर्मितीचे प्रकल्प घेतले तरच राज्य पुढे जाईल. प्रत्येक प्रकल्पाच्या ठिकाणी जर आपण राजकारण आणले तर त्यात महाराष्ट्राचे भले होणार नाही. त्यामुळे कदाचित हा भावनात्मक मुद्दा जरी आपण हातामध्ये घेतला असला तरी त्या परिसरतील काही लोक तुमच्या पाठीशी उभे राहतील पण महाराष्ट्राच्या नजरेतून तुम्ही उतरुन जाल त्यामुळे अशा प्रकारची भूमिका स्वीकारु नका अशा प्रकारचे आवाहन मी आपल्याला या निमित्ताने करु इच्छितो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री कपिल पाटील यांनी तारापूरच्या अणु ऊर्जा प्रकल्पाचा उल्लेख केला होता.अणु ऊर्जा प्रकल्पाच्या बाबतीत सांगावयाचे तर तारापूर येथे सहा अणुभट्टया कार्यरत आहेत. त्या ठिकाणी कोणत्या प्रकारचा धोका निर्माण झाला आहे तेथील माशांचे प्रमाण कोठे कमी झाले होते ?

सभापती महोदय, केन्द्र सरकारने जैतापूर,गुजराथ, आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल,मध्य प्रदेश, हरियाणा या सगळया राज्यात अणु ऊर्जा प्रकल्प घ्यावयास सुरुवात केलेली आहे. गुजराथ राज्यामध्ये प्रकल्प होत असेल तर विरोध होत नाही पंरतु महाराष्ट्रात प्रकल्प होत असेल तर त्याला विरोध केला जातो.अशा प्रकारची भूमिका निश्चितपणे घेऊन चालणार नाही. केन्द्र सरकार या प्रकल्पासाठी संपूर्ण पैसे खर्च करणार आहे.तसेच आपल्याला वीज देखील मिळणार आहे.

सभापती महोदय, भूकंपाच्या बाबतीत तज्ज्ञांनी अभ्यास करुनच हा प्रकल्प मंजूर केलेला आहे त्यामुळे केवळ राजकारणासाठी कोणी तज्ज्ञांपेक्षा तज्ज्ञ व्हावयाची गरज नाही.

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

अमेरिका,फ्रान्स,कोरिया,रशिया,इंग्लड, कॅनडा,जर्मनी,युक्रेन चीन इत्यादी देशामध्ये अणु ऊर्जा प्रकल्प आहेत आपल्या देशात तर अशा प्रकारचे फक्त 18 प्रकल्प घेण्याचे ठरविले आहे. चीनमध्ये 45 प्रकल्प करावयाचे ठरविले आहे.राजकीय भूमिकेतून या प्रकल्पाला कोणी विरोध करता कामा नये.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम हे काही दिवस गृह मंत्री होते. मी त्यांना माझ्याकडील सर्व आकडेवारी दाखविण्यास तयार आहे. महाराष्ट्रामध्ये पोलिसांच्या गोळीबारामुळे नागरिकांच्या झालेल्या मृत्यूची सर्वात कमी सख्या 2010 मधील आहे. माझ्याकडे 1988 सालापासूनची सर्व आकडेवारी आहे. मी त्यांच्या काळातील आकडेवारी सांगणार नाही परंतु पोलिसांच्या गोळीबारामुळे नागरिकांचे सर्वात कमी मृत्यू 2010 मध्ये झालेले आहेत.एवढेच मी या निमित्ताने आपल्याला सांगतो.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . . .

अध्यक्ष महाराज, आमचा नेहमीच असा दृष्टीकोन राहिला आहे की, पोलिसांच्या गोळीबारामध्ये नागरिकांचा मृत्यू होता कामा नये. लोकशाहीमध्ये विरोधकांचा आंदोलन करण्याचा हक्क मान्य केला पाहिजे. पण आंदोलने देखील योग्य कारणासाठी केली पाहिजेत. जैतापूर येथे जो गोळीबार झालेला आहे, तो वाजवीपेक्षा जास्त झाला आहे काय ? याबाबतीत आपण आपल्या पध्दतीप्रमाणे जरुर मॅजिस्ट्रेटमार्फत चौकशी करु आणि याठिकाणी वाजवीपेक्षा अधिक बळाचा वापर केला असल्याचे चौकशीमध्ये आढळून आले तर मी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई देखील करीन.

सभापती महोदय, मी या बाजूची देखील भाषणे ऐकलेली आहेत. इतके दिवस तेथील आंदोलक शांत होते. मग आताच का आक्रमक झाले, त्यांना कोणी भरीला घातले आहे काय, कोणी प्रोत्साहित केले आहे काय ? या आंदोलनामध्ये काही विध्वंसक लोकांनी घुसून हे आंदोलन बदनाम होईल अशा प्रकारे काही केले आहे काय ? याचाही तपास करुन जर असे कोणी लोक असतील तर त्यांचाही पर्दाफाश करण्याचे काम पोलीस दलामार्फत निश्चितपणे करण्यात येईल. आज आपण येथे भाषणे करीत आहोत. पण तेथील परिस्थिती अजूनही तंग आहे.म्हणून मी राज्य शासनाच्या वतीने रत्नागिरी जिल्ह्यातील जनतेला सुध्दा आवाहन करतो की, पुनर्वसित लोकांचे काही प्रश्न असतील तर तडजोडीमधून आपण ते जरुर सोडवू शकतो. त्याबाबत चर्चा होऊ शकते. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम साहेब हा आपल्या जिल्ह्यातील प्रश्न आहे. याबाबतीत आपण मध्यस्थी करावी. या प्रकल्पामुळे तेथील लोकांची रोजीरोटी बुडणार आहे असे त्यांचे मत आहे, तसेच पर्यावरणाच्या बाबतीत लोकांच्या ज्या शंका आहेत, त्या दूर करण्यासाठी आपण काय करु शकतो याबाबतीत जरुर विचार करु या. याबाबतीत शासनाने चर्चेचे दरवाजे बंद केलेले नाहीत. जर शासकीय प्रकल्पामुळे कोणाचे नुकसान होत असेल तर त्याची पूर्णपणे भरपाई करण्याची शासनाची तयारी आहे. पण राज्यामध्ये प्रकल्प झाले पाहिजेत आणि विजेच्या टंचाईच्या प्रश्नामधून राज्याची मुक्तता झाली पाहिजे. यासाठी राजकारणासाठी राजकारण अशा प्रकारची भूमिका विरोधकांनी देखील सोडली पाहिजे अशा पध्दतीने मी सर्वांना आवाहन करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

. . . .3 डी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आता मी सदरहू प्रस्ताव मतास टाकतो.

अनुकूल असतील त्यांनी "होय" म्हणावे ("होय" चे आवाज) प्रतिकूल असतील त्यांनी "नाही" म्हणावे ("नाही"चे आवाज) "नाही" चे बहुमत आहे . . ..

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी विभाजन मागतो.

**सभापती** : ठीक आहे.

यानंतर कु.थोरात . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विभाजनाची घंटा वाजल्यानंतर आणि अनुकूल/प्रतिकूल सदस्यांची मोजणी झाल्यानंतर )

**सभापती** : विभाजनाचा निकाल असा आहे.

अनुकूल : 14
प्रतिकूल : 40

प्रस्ताव असंमत झाला.

---

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 4.30 वाजता पुन: भरेल.

( दुपारी 4.10 ते 4.30 वाजेपर्यंत मध्यंतर )

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मध्यंतरानंतर**

**सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी**

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे

सह सचिव : तालिका सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सोमवार, दिनांक 11 एप्रिल, बुधवार दिनांक 13 एप्रिल व शुक्रवार, दिनांक 15 एप्रिल 2011 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहासमोर ठेवीत आहेत.

**तालिका सभापती** : दिनांक 11 एप्रिल, 13 एप्रिल आणि 15 एप्रिल 2011च्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहासमोर ठेवण्यात आल्या आहेत.

(प्रेस : येथे सोबत जोडलेल्या याद्या जोडाव्यात)

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

19-04-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3G-2

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. भास्कर जाधव (नगर विकास राज्यमंत्री) : तालिका सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचा सन 2009-2010चा लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 16:30

**पृ.शी./मु.शी.**: सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे

श्री. हेमंत टकले (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सार्वजनिक उपक्रम समितीचा चौथा व पाचवा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**तालिका सभापती** : सार्वजनिक उपक्रम समितीचा चौथा व पाचवा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

----

**नियम 93 अन्वयेच्या सूचनांबाबत**

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, 93च्या सूचना केव्हा घेण्यात येतील.

**तालिका सभापती** : 93च्या सूचना उद्या घेण्यात येतील.

श्रीमती शोभा फडणवीस : मी दिलेल्या 93च्या सूचनेसंबंधी आज मंत्री महोदय निवेदन करणार होते. मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित आहेत.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांची नियम 93 अन्वयेची सूचना उद्या चर्चेला घेण्यात येईल.

----

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक

**मु.शी.**:

L.C. BILL NO. II OF 2011

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LOKAYUKTA AND UPA-LOKAYUKTAS ACT, 1971.)

AND MOTION FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE

(चर्चा पुढे सुरु...)

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, जिल्हा परिषदेच्या सदस्यांना दिलेले अधिकार मर्यादित आहेत. काल मी असे सांगितले होते की, फक्त मिटींग मध्ये बोलण्याचे, मतदान करण्याचे आणि ठराव करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेच्या सदस्यांना आहेत आणि अंमलबजावणी करण्याचे अधिकार हे प्रशासनाच्या अधिका-यांना आहेत. या राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. यशवंतराव चव्हाण यांनी 1962मध्ये सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा निर्णय घेतला. ग्रामीण भागातील सर्वसामान्य शेतक-याला त्यावेळच्या सचिवालयात, आताचे मंत्रालय, यावे लागू नये, त्यांची कामे तालुक्याच्या ठिकाणी झाली पाहिजेत म्हणून जिल्हा परिषदेची स्थापना करण्यात आली. 1978 पर्यन्त ही परिस्थिती होती. परंतु 1978 नंतर विकेन्द्रीत झालेल्या सत्तेचे केन्द्रीकरण करण्याचे काम राज्य शासनाने विविध जी.आर.च्या आणि विधेयकाच्या माध्यमातून केलेले आहेत. शासनाने अधिकार स्वत:कडे केन्द्रीत करण्याचे काम केलेले आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, अनेक खाती आहेत. प्रसिध्दी खाते हे पूर्वी जिल्हा परिषदेकडे होते. कृषी खाते हे पूर्णपणे जिल्हा परिषदेकडे होते. बांधकाम खात्याचे पूर्ण काम जिल्हा परिषदेकडे होते. आज जिल्हा परिषदेकडे ती खाती राहिलेली नाहीत. आज या खात्यांचे केंद्रीकरण झालेले आहे. सोयीप्रमाणे जी कामे अडचणीची आहेत, ज्या कामांमध्ये टक्केवारी मिळत नाही, ज्या कामांमध्ये फायदा नाही, ती कामे जिल्हा परिषदेकडे द्यावयाची अशी पध्दत सध्या सुरु झालेली आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी जिल्हा परिषदेमध्ये काम केलेले आहे. त्यावेळची जिल्हा परिषद आणि आताची जिल्हा परिषद यामध्ये मोठा फरक दिसतो. माजी जिल्हा परिषद सदस्याला, पंचायत समिती सदस्याला जिल्हा परिषदेत गेल्यानंतर दुःख होते. पूर्वी या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सभासदांना जे अधिकार होते, ते अधिकार आता अधिका-यांनी घेऊन टाकले आहेत. जिल्हा परिषदेतील आजी, माजी सदस्य अधिकाऱ्यांना अधिकार मिळाल्यामुळे हतबल झालेले आहेत, या गोष्टीचा विचार या कायद्यात कोठे दिसून येत नाही. आम्हा लोकप्रतिनिधींना फक्त कायद्याच्या कचाटयात पकडणार आहात, लोकप्रतिनिधी गुन्हेगार आहेत अशा भावनेतून शासनाने हे विधेयक आणलेले आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, मी या ठिकाणी एक उदाहरण सांगू इच्छितो. माननीय मंत्री महोदयांनी कायद्याचा पूर्णपणे अभ्यास केला पाहिजे. शासनाने आता खाजगी कारखाना काढण्यास सुरुवात केली आहे. शासनाने अनेक सहकारी कारखाने काढले आहेत. आज सहकार क्षेत्रामध्ये काम करण्यास कोणी तयार नाही. मी सहकार चळवळीत काम केलेले आहे. सहकार क्षेत्राची आज अतिशय वाईट परिस्थिती आहे. सहकार क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते खाजगीकरणाकडे चालले आहे. मी कोणाला दोष देत नाही. चांगले काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना कायद्याच्या कचाटयात घेऊन वेगळा प्रकारचा आक्षेप घेत आहात आणि म्हणून स्वच्छ काम करणारे कार्यकर्ते आहेत ते कार्यकर्ते आज सहकार क्षेत्रापासून दूर चालले आहेत. त्याचे कारण असे आहे की, या कार्यकत्यांचे अधिकार अधिकाऱ्यांकडे गेलेले आहे. बॉयलर पेटविण्यासाठी सुध्दा फॅक्टरी इन्स्पेक्टरला पैसे द्यावे लागतात. अशा गोष्टींकडे शासनाने गांभीर्याने लक्ष घातले पाहिजे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, मी कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचा 15 वर्षे संचालक होतो. माननीय श्री.बंटी उर्फ सतेज पाटील हे या सभागृहात सभासद म्हणून आता आले. एम.एस.सी.बँकेच्या माध्यमातून 15 वर्षे कोल्हापूर येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत नेहमी जात होतो. सहकार क्षेत्र असो वा अन्य क्षेत्र असो, आपण प्रामाणिक असलो तर कोणत्याही गोष्टीला घाबरण्याचे कारण नाही. आज सहकार क्षेत्रात जी परिस्थती निर्माण झाली आहे, तशीच परिस्थिती जिल्हा परिषदांवर व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांवर येणार आहे...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

आज आपण हे हसण्यावारी घेत आहोत. केवळ 1931 कोटी रुपये मिळविण्यासाठी शासन ही तरतूद करीत आहे. याचे दूरगामी परिणाम काय होणार आहेत याचा बोध घेतला पाहिजे.

सभापती महोदय, सहकार क्षेत्रात पेण अर्बन सहकारी बँक कार्यरत आहे. या बँकेचे जनरल मॅनेजर आणि चेअरमन यांनी 1200 कोटी रुपयांचा घोटाळा केला. संचालक मंडळाच्या मागील पाच वर्षाच्या सह्या दोन महिन्यापूर्वी कागदपत्रांवर करुन घेतल्या, त्यामुळे आज संपूर्ण संचालक मंडळ जेलमध्ये गेले असून त्यांना जामीन मिळत नाही. ही पध्दत पूर्णत: चुकीची आहे. शासन ही सहकारातील पध्दत स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आणू पहात आहे. आज सहकार क्षेत्रातील निवडणूक लढवायला कोणी तयार होत नाही. उद्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवायला कोणी पुढे येणार नाही. शासन या संस्था गुंड, पुंड आणि माफियांच्या ताब्यात देणार आहे का? चळवळीतील कार्यकर्ते, वैचारिक बैठकीचे कार्यकर्ते, समाजसेवक आणि आपल्या गावाचा किंवा तालुक्याचा ध्येयवादी पध्दतीने विकास करणारी जी टीम होती ती आज नामशेष होत चालली आहे. म्हणून या विधेयकाला आमचा विरोध आहे. मी देखील सगळ्या प्रकारच्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काम केलेला एक कार्यकर्ता आहे. आज या संस्थांमधील कामाच्या पध्दतीचे दिवसेंदिवस केंद्रीकरण होत चालले आहे.

सभापती महोदय, स्व.राजीव गांधी यांनी 73 व्या घटना दुरुस्तीच्या निमित्ताने स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार दिले. केंद्र सरकारचा निधी डायरेक्ट ग्रामपंचायतीपासून जिल्हा परिषदांपर्यंत पोहोचविण्याचा क्रांतीकारी निर्णय घेतला. जिल्हा नियोजन समित्यांची पुनर्रचना केली. जिल्हा नियोजन समितीमध्ये लोकप्रतिनिधींचा सदस्य म्हणून समावेश केलेला आहे. परंतु त्या नियुक्तीबद्दल कोणी खूश दिसत नाही. कारण त्या समितीच्या सर्व अधिकारांचे पालकमंत्र्यांनी केंद्रीकरण केले आहे. आम्ही राजकारणात काम करीत असताना निधीची कधी पर्वा केली नाही. निधी मिळेल आणि अधिकार मिळेल म्हणून आम्ही या ठिकाणी आलेलो नाही. आमचा निधी आणि आमचे अधिकार आमच्या हिंमतीवर मिळविण्याची आमच्यात धमक आहे. कोणाच्या मेहेरबानीने कोणाकडे निधी मागायला आम्ही कधी गेलो नाही. चळवळीच्या आणि जनतेच्या पाठिंब्यावर निधी आणण्याची आणि विकासाची कामे करण्याची हिंमत आमच्यामध्ये आहे. दोन वर्षाचा अपवाद

SGB/ 16:40

श्री.जयंत प्र.पाटील....

वगळता मागील 50 वर्षे विरोधी पक्षातून राजकारण करीत आम्ही या ठिकाणी आलो आहोत. आम्ही कधी कोणाकडे आमचे काम करा म्हणून सांगायला गेलो असे एकही मंत्री सांगू शकत नाही. तो आमचा पिंड नाही.

नंतर 3 जे.1...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील..........

जिल्हा नियोजन व विकास समितीची बैठक म्हणजे अगोदर आणि नंतरचा एक प्रकारे चर्चेचाच विषय ठरतो. मी नुकतीच रायगड जिल्हा नियोजन व विकास समितीची बैठक पार पाडून आलो आहे. या बैठकीत कोणीच काही बोलत नाही. कारण आज अशी परिस्थिती आहे की, फक्त पालक मंत्र्यांच्याच मतदारसंघातील कामांचा विचार होतो व त्याला कोणीच विरोध करीत नाही. मी परवा जवळपास 7 ते 8 आठ तास ही बैठक चालविली. आज मात्र अशी परिस्थिती आहे की, आमदारांना मिळणाऱ्या स्थानिक विकास निधीत सुध्दा नियोजन अधिकाऱ्यांची टक्केवारीप्रमाणे मागणी असते. उप जिल्हाधिकाऱ्याची टक्केवारी वेगळी असते. अगदी कळस म्हणजे आता तर जिल्हा कोषागार अधिकारी सुध्दा एक टक्क्याची मागणी करायला लागला. सभागृहात बसलेल्या सत्तारुढ पक्षाच्या सर्वच सन्माननीय सदस्यांना मी बोलतो ते पटते पण नाईलाजाने त्यांना बोलता येत नाही. ही बाब सभागृहाच्या निदर्शनास आलीच पाहिजे म्हणून मी वस्तुस्थिती सांगत आहे.

महोदय, या विधेयकाच्या अनुषंगाने शासन जी तरतूद करीत आहे त्यामुळे लोकशाहीमध्ये सुध्दा आपण समाज कार्य करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पदाधिकाऱ्यांनाच दोषी ठरवून आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करीत आहोत की काय, अशी शंका यायला लागली आहे, म्हणून या विधेयकाला माझा विरोध आहे. येत्या एक दोन दिवसात आपण महिलांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 50 टक्के आरक्षण देण्यासंबंधीचा कायदा करीत आहोत. पण उद्या स्थानिक स्वराज्य संस्थांवर अशा प्रकारे 50 टक्के महिला निवडून आल्यानंतर काय परिस्थिती निर्माण होणार आहे याचा विचार करणे आवश्यक आहे. हेच अधिकारी उद्या या महिला पदाधिकाऱ्यांना सुध्दा ब्लॅक मेलिंग करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सभापती महोदय, हे सर्वोच्च सभागृह असून आपण येथे राज्यातील जनतेसाठी, तिच्या हितासाठीचे कायदे बनविण्याचे काम आपण सर्वानुमते करतो. पण अशा प्रकारचे कायदे करुन त्याचे परिणाम उद्या काय होतील याचा विचार न करता शासन असे कायदे बनवित असेल तर त्यालाच माझा विरोध आहे. अर्थात माझी या सभागृहात तशी संसदीय ताकद कमी आहे पण कायदा बनवितांना त्यावर सर्वंकष चर्चा झालीच पाहिजे. पूर्वीच्या काळात याच सदनात विरोधी पक्षाचे फक्त 35-40 इतकेच आमदार निवडून येत होते. तरी देखील अशा महत्वाच्या कायद्याच्या

....2.....

श्री. जयंत प्र. पाटील.........

विधेयकांवर प्रदीर्घ व अर्थपूर्ण चर्चा होत होती. ती चर्चा आम्ही प्रेक्षक गॅलरीत बसून ऐकत होतो. सन्माननीय मंत्री श्री. बबनराव पाचपुते हे सुध्दा जनता दलातून निवडून आलेले होते, त्यांनाही ही परिस्थिती माहिती आहे. आज मात्र सभागृहात कायदे करण्याच्या प्रक्रियेमध्ये फरक पडलेला दिसतो असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. तीच परिस्थिती जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या बैठकीची झालेली आहे. त्या बैठकीत सुध्दा नियोजनावर कोणतीच चर्चा होत नसते. मग डीपीडीसी कशासाठी असते तर दोन खात्यांचा निधी एकाही आयटेमवर खर्च होऊ नये याची दक्षता घेण्यासाठी ही डीपीडीसी असते, असेच चित्र पहायला मिळते. अशा प्रकारे उदाहरण सांगायचे तर आमच्या डीपीडीसीचा] संपूर्ण जिल्ह्यासाठी असलेला निधी डीपीडीसीतील सदस्यांची परवानगी न घेता 3 कोटीचा निधी माननीय पालक मंत्र्यांनी आपल्याच मतदारसंघात नेला.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील....

हे केंद्रीकरण आहे की, विकेंद्रीकरण आहे असा आम्हाला प्रश्न पडलेला आहे. अशा पध्दतीची बंधने आपण आणणार असाल तर त्याला आमचा विरोध राहणार आहे. केंद्राकडून स्थानिक स्वराज्य संस्थांना मोठया प्रमाणात निधी येत असतो.

काम करीत असतांना मी कार्यकर्त्यांना सांगतो की, मला आपण जर एका गावाचा सरपंच केला तर पाच वर्षात त्या गावातील एक सुध्दा काम मी शिल्लक ठेवणार नाही एवढया मोठया प्रमाणात केंद्राचा निधी येत असतो. कामाचे नियोजन व्यवस्थित केले तर पाच वर्षात ग्रामपंचायतीमधील एकही काम शिल्लक राहणार नाही एवढया मोठया प्रमाणात केंद्राचा निधी येत असतो. परंतु आज चित्र असे आहे की, लोकप्रतिनिधी लाचारी पत्करुन अधिका-यांच्या दारामध्ये उभे राहत आहेत. महापालिकेत सुध्दा हीच परिस्थिती आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण उपस्थित आहेत, त्या नगरसेविका आहेत त्यांच्या वॉर्डमध्ये त्या काम करु शकतात का हे त्यांनी सांगावे. परंतु त्यांना यासंदर्भात उत्तर देता येणार नाही. कमिशनरला व वॉर्ड ऑफिसरला भेटल्याशिवाय लोकप्रतिनिधीला कोणतेही काम करता येत नाही ही वस्तुस्थिती आहे. वॉर्ड ऑफिसरची संपत्ती बघितली तर आपले डोळे पांढरे होतील एवढी त्यांच्याकडे संपत्ती आहे. पश्चिम महाराष्ट्रातील एका जिल्हा अधिका-याचे 800 कोटी रुपये मार्केटमध्ये फिरत आहेत, ते स्वत:ला छत्रपती समजात. त्या जिल्हाधिका-याचे नाव काय आहे ते मी वेळ आल्यावर सांगेन. सर्व सामान्यांचे काम मी करु शकत नाही याचे मला दु:ख आहे.

काल स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संदर्भात प्रश्न उपस्थित झाल्यानंतर मी सांगितले की, ठाणे जिल्हयातील शिक्षण संस्थेच्या प्लॉटची एनओसी देण्यासाठी 5.5 कोटी रुपये मागितले जातात व त्यामध्ये ग्रामसेवक मध्यस्थी करतो. यामध्ये सरपंच आणि ग्रामपंचातीची बॉडी 5.50 कोटी रुपये मागत आहे. 3 कोटी ग्रामपंचायतीसाठी व स्वत:साठी 2.50 कोटी रुपये असे त्यांनी नियोजन केलेले आहे. त्यामुळे यासंदर्भात ख-या अर्थाने प्रबोधन होण्याची आवश्यकता आहे. हे सर्व संभाषण मी स्वत: मोबाईलमध्ये टेप केलेले आहे. आपल्या अधिकाराचा वापर कसा केला जात आहे हे सुध्दा पाहण्याची वेळ आलेली आहे. या ठिकाणी जे विधेयक आणलेले आहे त्याचा योग्य विचार, योग्य



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील....

अभ्यास करुन या ठिकाणी आणले गेले नाही एवढे मला या निमित्ताने सांगावेसे वाटते. मंत्री मंडळामध्ये विधेयकाच्या संदर्भात योग्य प्रकारे चर्चा होत नाही असा माझा आक्षेप आहे. ज्या सदस्यांना आमच्या डोंगर कपारीच्या गावातील प्रश्न माहिती नाहीत त्यांनी आमच्या गावातील प्रश्नाच्या संदर्भातील विधेयक मांडावे याचे आम्हाला दु:ख आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील..

हे प्रश्न मांडतांना किंवा ते सोडवितांना मोठया प्रमाणावर अडचणी येतात . तेव्हा या सगळया गोष्टीचा विचार करुन हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यात यावे अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, या विधेयकावर बोलत असताना मी कालसुध्दा हेच सांगितले होते की हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविले तर त्या ठिकाणी चांगल्या प्रकारे सविस्तर चर्चा होऊ शकते. दोन्ही सभागृहातील विचारवंत सन्माननीय सदस्य त्या समितीमध्ये येतात व त्या ठिकाणी विधेयकाच्या फायदे तोटयाची चर्चा होत असते. मला दोन वेळा या समितीमध्ये काम करण्याची संधी मिळाली होती. त्या समितीचा काय फायदा होतो हे मला माहीत आहे आणि त्या विधेयकामध्ये आवश्यक तो बदल देखील या समितीच्या माध्यमातून करुन घेण्यात आला होता.

सभापती महोदय, सहकार खात्याशी संबंधित वैजनाथ समितीचे विधेयक या ठिकाणी मंजूर केले जात होते परंतु ते विधेयक आम्ही रोखून धरले आणि दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीकडे ते विधेयक पाठविले होते. त्या समितीचे कामकाज सहा महिने चालले होते. या समितीमध्ये चर्चा करुन त्या विधेयकामध्ये वेगवेगळे बदल करुन घेण्यात आले होते.जवळजवळ साडे तेरा हजार कोटी रुपयांचा निधी आपण त्यावेळा आणला होता अजूनही साडेचार हजार कोटी रुपये यावयाचे आहेत .आता मांडण्यात आलेले विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याचा विचार कोणी केलेला दिसत नाही. सर्व सन्माननीय सदस्यांना माझे म्हणणे मान्य आहे परंतु पक्षाच्या आदेशामुळे त्यांना काही बोलता येत नाही. सन्माननीय सदस्य श्री हुसेन दलवाई यांना मी सांगू इच्छितो की जैतापूर प्रकरणाचे सर्वात जास्त दु:ख आपल्याला झालेले आहे,जैतापूरच्या बाबतीत सर्वात जास्त प्रभावीपणे तुम्हीच बोलू शकता परंतु पक्षाचे बंधन असल्यामुळे तुम्हाला बोलता येत नाही.

श्री.माणिकराव ठाकरे (बसून): विधेयकावर बोलण्यासाठी कोणावरही पक्षीय बंधन नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सन्माननीय सदस्य श्री माणिकराव ठाकरे यांनी खुलासा केल्यामुळे मला आनंद झाला आहे. मला जे काही पटते ते मी बोलत असतो. माझ्या विचाराशी बांधिलकी ठेवूनच मी काम करीत असतो.माझी बांधिलकी आणि माझी दिशा मी ठरवलेली आहे.सन्माननीय सदस्य श्री विनायकराव मेटे यांना हे माहीत आहे की, मी दिशा कधी बदलत नाही एखादा शब्द दिला असेल तर त्या प्रमाणेच मी वागतो. या विधेयकामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेचे

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील..

खच्चीकरण करण्यात येत आहे. ते थांबविण्याचे काम शासनाने करावे अशी माझी शासनाकडून अपेक्षा आहे

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांनी काय केले होते ? 400 वर्षा पूर्वी त्यांनी खरी लोकशाही आणली होती. एका शेतक-यांची जमीन छत्रपती शिवाजी महाराजांचे पंतप्रधान घेत होते म्हणून त्यांना बडतर्फ केले होते. सन्माननीय सदस्य श्री विनायक मेटे यांनी माझ्या पेक्षा जास्त छत्रपती शिवाजी महाराजांचा अभ्यास केलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन आपण राज्य करीत आहोत या विधेयकाच्या निमित्ताने मात्र लोकशाहीची गळचेपी केली जात आहे ती थांबविण्यात येणार आहे काय हा खरा महत्वाचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये काम करीत असतांना आम्हाला वेगवेगळे अनुभव आलेले आहेत ते अनुभव तसेच वेगवेगळे चढउतार आणि फायदे तोटे या विधेयकाच्या निमित्ताने मी येथे मांडले आहेत. सभापती महोदय, या विधेयकामध्ये काही त्रुटी आहेत तसेच या विधेयकाचे काही फायदे देखील आहेत. मी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये काम केलेले असल्यामुळे मी या सभागृहात विविध विषयावर बोलू शकतो. स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये काम करणारा कार्यकर्ता कोठेही कमी पडू शकणार नाही असे मला वाटते. अशा प्रकारे चांगले कार्यकर्ते घडविण्याची मोठी संधी माननीय यशवंतराव चव्हाण यांनी 1962 साली ख-या अर्थाने दिली होती. त्यांचे नाव घेऊन व त्यांचा विचार घेऊन राज्य कारभार केला जातो तेव्हा हे विधेयक आणल्यामुळे त्यांच्या आत्म्याला काय वाटेल याचा विचार शासनाने केला पाहिजे असे मला सांगावयाचे आहे. त्यांच्या आत्म्याला क्लेश होतील अशा प्रकारची विधेयके सभागृहात आणू नका . हे विधेयक आणून स्थानिक स्वराज्य संस्थेचे अस्तित्वच नष्ट करण्याचे काम ख-या अर्थाने शासनाने केले आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

मी आपणास या ठिकाणी सांगत आहे की, पुढील पाच-सहा वर्षानंतर सहकारी संस्थेमध्ये एकही व्यक्ती निवडणूक लढवायला तयार नाही होणार हे आपण पहावे. तीच परिस्थिती जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांमध्ये होणार आहे.

सभापती महोदय, मला महानगरपालिकेचा अनुभव नाही, माननीय सदस्यांना जर अनुभव असेल तर त्यांनी सांगावे. मी काल अकोला महानगरपालिकेच्या नगरसेवकांबरोबर बोललो, त्यांचे दुःख मी ऐकून घेतले, त्यांना जी वागणूक मिळत आहे ती योग्य नाही याचे मला दुःख होत असल्यामुळे ती मी काल या ठिकाणी मांडली आहे. त्या ठिकाणी काय चालले आहे, त्याचा केंद्रबिंदू कोठे आहे? त्याचा केंद्रबिंदू या ठिकाणी आहे. कुणाला कुठे कमिशनर म्हणून नेमायचे आणि कुणाला कुठे सेक्रेटरी म्हणून ठेवायचे यामध्ये ज्यांचे वजन जास्त त्याला चांगली महानगरपालिका मिळते, अशाप्रकारे काम चालते. मुंबई महानगरपालिका कुणाच्या ताब्यात आहे याच्याशी मला देणे घेणे नाही परंतु तेथील लोकप्रतिनिधींवर नियंत्रण ठेवणारे कमिशनर जर दिल्लीहून येणार असतील तर ते ठीक नाही, त्याचे मला दुःख होत आहे. तुमचे मंत्रिमंडळ कशासाठी आहे, तुम्ही तुमचे नियंत्रण ठेवा. अधिकाऱ्यांचे नियंत्रण ठेऊन तुम्ही तुमचे अधिकार अधिकाऱ्यांकडे कशासाठी देत आहात? शासन म्हणून तुम्हाला मिळालेले अधिकार जर तुम्ही अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करणार असाल आणि त्यामधून जर तुम्ही लोकशाहीची गळचेपी करणार असाल तर ते बरोबर नाही असे मला याठिकाणी सुचवावयाचे आहे. या करिता आपण हे विधेयक चिकित्सा समितीकडे पाठवावे. त्या समितीमध्ये दोन्ही सभागृहातील माननीय सदस्यांची नियुक्ती करण्यात यावी. तोपर्यन्त हे विधेयक मंजूर करण्यात येऊ नये. हे विधेयक चिकित्सा समितीकडे पाठविण्याबाबतची मागणी एकमताने मंजूर करावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश देशमुख ( परभणी तथा हिंगोली स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काम करीत असतांना आपल्याला निरनिराळया प्रकारचे अनुभव येत असतात, हे अनुभव गेल्या 30 वर्षापासून मला पहावयास मिळाले आहेत. या विधेयकाच्या कक्षेमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर सदस्यांचा अंतर्भाव करण्याकरिता ही सुधारणा मांडण्यात आली आहे त्या बाबतीत माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून आपले विचार व्यक्त केले आहेत. माझ्या जिल्ह्यातील जिल्हा परिषद व नगर परिषदा त्यांच्या शेतकरी कामगार पक्षाच्या ताब्यात होत्या. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय श्ंकरराव चव्हाण साहेबांच्या काळात श्री. शेषराव देशमुख यांनी नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढविली होती, त्यावेळी जिल्हा परिषदेच्या कार्यप्रणालीमध्ये बदल घडविण्यात आला होता. त्यावेळी माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांच्या ताब्यात रायगड जिल्हा परिषद होती. आज सुध्दा त्या ठिकाणी फार जोरात काम सुरु आहे. या विधेयकाचे समर्थन करीत असतांना मी विनंती वजा सूचना करतो की, आपल्याला पदाधिकाऱ्यांसोबत अधिकाऱ्यांना सोबत घेऊन काम केले पाहिजे तसा विचार सरकारने केला पाहिजे. आज जिल्हा परिषदेमध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष या पदाधिकाऱ्यांबरोबर मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी हे अधिकारी नेमण्यात आले आहेत. यामध्ये अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे वेगळा कार्यभार सोपविण्यात आला आहे. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा कधीच मेळ बसत नाही. जर मेळ बसला तर हे अधिकारी ती जिल्हा परिषद साफ करुन टाकतात ही वस्तुस्थिती आहे. माननीय सदस्य श्री. पाटील साहेबांनी सांगितलेल्या गोष्टीमध्ये तथ्य आहे.आदरणीय कै. यशवंतराव चव्हाण यांचा आदर्श डोळयापुढे ठेवून आपण सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याचे काम केले. परंतु आपण म्हटल्याप्रमाणे आज स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये फार वाईट परिस्थिती पहावयास मिळत आहे. त्याला अधिकारी आणि पदाधिकारी दोघेही जबाबदार असून त्यामध्ये अधिकाऱ्यांचा वाटा जरा जास्त आहे. या यंत्रणेला वेगळे वळण लावण्याचे काम राज्यामध्ये सुरु आहे त्यामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, या विधेयकाचे समर्थन करीत असतांना मी फक्त दोनच गोष्टी या ठिकाणी सांगणार आहे. या विधेयकामध्ये आपण पदाधिकाऱ्यांना जेवढे जबाबदार धरले आहे तेवढेच अधिकारी सुध्दा जबाबदार असल्यामुळे त्यांचा देखील यामध्ये समावेश करणे आवश्यक आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 17:05

श्री.सुधाकर देशमुख . . ..

तसेच जर काही दोष असेल तर तो अधिकारी आणि पदाधिकारी या दोघांवर समान प्रमाणात लागला पाहिजे. आता स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी 50 टक्के आरक्षणाचे विधेयक लागू होणार आहे. अशा वेळी अधिकाऱ्यांना दोषातून सोडून द्यावयाचे आणि पदाधिकारी म्हणून कदाचित माझी भगिनी उपाध्यक्ष असेल किंवा अध्यक्ष असेल, त्यांना बऱ्याच गोष्टींची माहिती होऊ देणार नाही. त्यामुळे अधिकारी आणि पदाधिकारी यांच्यावर ही जबाबदारी फिक्स करावी. याठिकाणी जे विधेयक मांडण्यात आले आहे त्याचे मी समर्थन करतो. धन्यवाद.

-----

. . . .3 एन-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर (विधानसभेव्दारा निर्वाचित ) : सभापती महोदय,महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोकआयुक्त अधिनियम 1961 च्या सुधारणा विधेयकावर बोलत असताना सर्वप्रथम आजच्या या विधेयकाबाबत आदरणीय सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे, त्याचे मी समर्थन करणार आहे.

सभापती महोदय, तेराव्या वित्तीय आयोगाच्या अहवालानुसार महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती मधील पदाधिकाऱ्यांच्या आणि सदस्यांच्या विरुध्द आणलेले हे बिल आहे. खरे म्हणजे ज्यांच्या विरुध्द विधेयक आणावयास पाहिजे होते, त्यांच्या विरोधात हे बिल नाही. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्ये मी देखील काम केले आहे. मी पंचायत समितीचा सदस्य होतो आणि तीन वेळा जिल्हा परिषदेचा सदस्य होतो. सभागृहामध्ये विरोधी पक्षाची आणि सत्तारुढ पक्षाची भूमिका देखील मी वठविलेली आहे. पण हे विधेयक आणत असताना खरे म्हणजे राजकीय हेतूने आणलेले हे विधेयक आहे, त्याचा मुळामध्ये विचारच केलेला नाही. यामध्ये भ्रष्टाचार आणि कु-प्रशासन हे दोन मुद्दे महत्वाचे आहेत. आता भ्रष्टाचार कोण करणार आहे आणि कु-प्रशासन कोण करणार आहे? प्रशासकावर वचक ठेवणे हे लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या सदस्यांचे काम आहे. पण प्रशासन चालविणारे हे प्रशासकीय अधिकारी आहेत. एक साधे उदाहरण द्यावयाचे तर समजा एखादे बिल काढावयाचे असेल तर त्याबाबत नोटशीट तयार केली जाते आणि त्यावर सभापती आणि अध्यक्ष यांची नुसती सही असते आणि त्याला मान्यता दिली जाते. शेवटी जे बिल काढले जाते त्याबाबत सांगावयाचे तर जो लेखापाल किंवा अकाऊंटन्ट असेल त्याच्या माध्यमातून हे प्रकार होत असतात. यामध्ये भ्रष्टाचार कुठे होणार आहे हे या विधेयकामधून स्पष्ट होत नाही.

सभापती महोदय, या विधेयकातील 2 क्रमांकाच्या कलमामध्ये प्रत्येक ठिकाणी जिल्हा परिषदेचा अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सदस्य तसेच पंचायत समितीचे सभापती, उप सभापती आणि सदस्य, नगरपरिषदेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य, महानगरपालिकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि कौन्सिलर या सर्वांनाच यामध्ये गुंडाळलेले आहे. विधानसभेमध्ये महिलांसाठी 50 आरक्षण ठेवण्या संबंधातील विधेयक मंजूर झाले आहे आणि आता ते विधान परिषदेमध्ये देखील मांडण्यात येणार आहे म्हणजे महिला आणि पुरुष यांच्यावर समानतेने अन्याय होणार आहे. याठिकाणी जी शंका निर्माण करण्यात आली की, निवडणुकीमध्ये कोण सहभागी होणार आणि कोण सहभागी होणार नाही हे पुढील काळच ठरविणार आहे. परंतु हे विधेयक आणत असताना खरे म्हणजे प्रशासनावर





श्री.केशवराव मानकर . . ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

वचक ठेवणारे जे अधिकारी आहेत, त्यांच्यासाठी आपण कोणते नियम करण्यात आले आहेत याचा विधेयकामध्ये कुठेही उल्लेख नाही. जर मी एखाद्या पंचायत समितीचा सदस्य असेल तर मला कोणते अधिकार आहेत ? मला एवढाच अधिकार आहे की, दर महिन्याला जी बैठक होते, त्यासाठी उपस्थित रहावयाचे, त्यामध्ये सहभाग घेऊन आपले विचार व्यक्त करावयाचे, आपल्या मतदार संघामधील कामे सुचवावयाची, ती मंजूर करुन घ्यावयाची या व्यतिरिक्त संबंधितांना कोणता अधिकार आहे? तीच परिस्थिती जिल्हा परिषदेचा जो कौन्सिलर आहे, सदस्य आहे त्याची आहे.त्याने देखील दर महिन्याला विविध समित्यांच्या बैठकीसाठी जावयाचे. तीन महिन्यातून एकदा संपूर्ण जिल्हा परिषदेची जी बैठक होते, त्यामध्ये आपले विचार व्यक्त करावयाचे आणि बैठकीमध्ये जे विषय असतील त्याला अनुमोदन द्यावयाचे.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ प्रथम सौ. रणदिवे.... 17:10

श्री. केशवराव मानकर....

त्यांच्या हातात आर्थिक व्यवहार कोणतेच नाहीत. तीच अवस्था नगरपालिका आणि महानगरपालिका सदस्यांची आहे. असे असताना स्थानिक स्वराज्य संस्थाच्या सदस्यांना कां घेतले हे मंत्री महोदयांनी सांगितले पाहिजे. या सदस्यांवर कोणती अट घातलेली आहे, ते कोणते कुप्रशासन करणार आहेत आणि कोणता भ्रष्टाचार करणार आहेत, हे या बिलाच्या अनुषंगाने कळले पाहिजे. सदस्यांना अमुक हे आर्थिक अधिकार आहेत आणि यातून भ्रष्टाचार होणार आहे, किंवा ही त्यांची प्रशासकीय जबाबदारी आहे आणि ती प्रशासकीय जबाबदारी पूर्ण केली नाही तर त्यांच्यावर कारवाई होणार आहे या संदर्भात या विधेयकात कुठेही उल्लेख करण्यात आलेला नाही त्यामुळे या विधेयकात कोणतीही सुसंगती दिसत नाही.

सभापती महोदय, खरे म्हणजे 13 व्या वित्त आयोगाच्या अनुषंगाने हे विधेयक आलेले आहे. पण त्याच्या आधी 10, 11 आणि 12 वा वित्त आयोग मी बघितलेला आहे. जिल्हा परिषदेच्या कार्यप्रणालीची मला माहिती आहे. महिला व बाल कल्याण विभागाच्या माध्यमातून, समाजकल्याण विभागाच्या माध्यमातून किंवा स्थायी समित्यांच्या माध्यमातून खरेदीचे अनेक व्यवहार होतात. खरेदीचे व्यवहार कसे होतात? तर याबाबत शासनाचे रेट कॉन्ट्रॅक्ट असतात. सभापती महोदय, शासनामध्ये असलेली आर.सी. ही दुर्दैवी घटना आहे. आर.सी. च्या दराप्रमाणे खरेदी करण्याचे बंधनकारक असते. पण मार्केटमध्ये असलेले दर आर.सी. च्या दारापेक्षा अल्प असतात. आर.सी. प्रमाणे करण्यात येणाऱ्या खरेदीच्या संदर्भात उदाहरण द्यावयाचे झाले तर आज आर.सी. च्या दराप्रमाणे संगणकाचा दर 44 हजार ते 45 हजार रुपये आहे. बाजारात चांगल्या प्रकारचा संगणक 18 ते 22 हजार रुपयात मिळतो.

सन्माननीय आमदारांना जो स्थानिक निधी देण्यात आलेला आहे, या निधीच्या माध्यमातून मी माझ्या मतदासंघात अनेक बोअरवेल घेतलेल्या आहेत. मी देखील शेतकरी आहे. मी माझ्या शेतात नुकतीच एक बोअरवेल घेतलेली आहे. कमर्शिअल पंप लावून देखील त्या बोअर वेल साठी मला 60 हजार रुपयापेक्षा जास्त खर्च आला नाही. पिण्याच्या पाण्यासाठी जी बोअर वेल घेण्यात येते तिचा रेट कॉन्ट्रॅक्ट 92 हजार व काही रुपये आहे. हा केवढा मोठा भ्रष्टाचार आहे. समजा बोअरवेल साठी मी एवढा निधी दिला तर आमदार म्हणून मी दोषी आहे काय, माझ्यावर कारवाई करणार काय? रेट कॉन्ट्रॅक्ट शासनाचा असतो. या विधेयकामध्ये सन्माननीय आमदारांना तसेच

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

श्री. केशवराव मानकर.....

सन्माननीय खासदारांना घ्यावयास पाहिजे होते. आम्ही देखील लोक प्रतिनिधी आहोत. मग आम्हाला का घेतले नाही, विधेयकामध्ये ग्राम पंचायतीच्या सरपंचाला आणि सदस्यांना कां घेण्यात आले नाही? खरे म्हणजे हे विधेयक ग्रामपंचायतीचे सरपंच, उप सरपंच आणि ग्राम सेवकाच्या संदर्भात यावयास पाहिजे होते. कारण ते डायरेक्ट आर्थिक व्यवहार करतात. त्यांना तसे अधिकार आहेत. त्यांच्या सही शिवाय बँकेतून पैसे काढता येत नाहीत. ते ज्या योजना करतात त्या योजनांवर खर्च करण्याचा त्यांना पूर्ण अधिकार आहे. पण पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका यांच्या सदस्यांना, अध्यक्षांना, उपाध्यक्षांना कुठलेही आर्थिक अधिकार नाहीत. त्यांच्या सहीने कुठलेही पैसे काढता येत नाहीत, मग हे दोषी कसे, हा खरा प्रश्न आहे.

सभापती महोदय, मी या ठिकाणी काही उदाहरणे देऊ इच्छितो. भ्रष्टाचाराच्या संबंधात मी नुकतीच एक तक्रार मुख्य सचिवांकडे आणि बांधकाम विभागाच्या सचिवांकडे केलेली आहे. जिल्हा परिषद, गोंदिया येथे एक प्रभारी कार्यकारी अभियंता आहेत. त्यांच्या विरुध्द मी तक्रार केलेली आहे. वर्तमानपत्रात त्यांच्या संदर्भात बातमी छापून आलेली आहे. नऊ वर्षा पासून हा अधिकारी जिल्हा परिषद, गोंदिया येथे आहे. या अधिकाऱ्याच्या संदर्भात नुकतीच एक घटना घडलेली आहे. या विभागातील सभापतीने त्याचे कपाट फोडून पूर्ण कागदपत्रे स्वतःच्या ताब्यात घेतलेले आहेत. या अधिकाऱ्याने शासनाची सर्व मंजूर कामे दहा टक्के ते पंधरा टक्के पैसे घेऊन विकून टाकलेली आहेत. या अधिकाऱ्याच्या संदर्भात अनेक तक्रारी आहेत. तो उप अभियंता होता पण त्याच्याकडे प्रभारी कार्यकारी अभियंत्याचा चार्ज आहे. राजकीय पाठबळामुळे तो गोंदिया जिल्हयात आहे. मी या सभागृहात मागणी करतो की, या अधिकाऱ्याच्या संपत्तीची चौकशी करण्यात यावी. तसेच या अधिकाऱ्याची या जिल्हयातून तत्काळ बदली करण्याची आवश्यकता आहे. नऊ-नऊ वर्षे तो एका जिल्हयात एका ठिकाणी राहतो. आमगाव येथेही हा उप अभियंता होता.

यानंतर श्री. बरवड...

अमुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर ...

इतका मोठा भ्रष्टाचारी अधिकारी असेल त्याच्या बाबतीत या कायद्यामध्ये कोणताही उल्लेख नाही. जे प्रशासकीय अधिकारी असतील, ज्यांच्या हातामध्ये अधिकार आहेत त्यांच्या बाबतीत या कायद्यामध्ये कोणताही उल्लेख नाही. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी जे सांगितले ते खरे आहे. आपण जिल्हा नियोजन मंडळाची जी कामे देतो किंवा जिल्हा नियोजन मंडळाची कामे असतील, जिल्हा परिषदेची कामे असतील, पंचायत समितीची कामे असतील, शासनाची कामे असतील त्या ठिकाणी दिल्या-घेतल्याशिवाय काहीही होत नाही, असा माझा स्पष्ट आरोप आहे. लक्ष्मीदर्शन केल्याशिवाय किंवा वजन ठेवल्याशिवाय काम देण्यापासून ते बिल काढण्यापर्यंत कोणतेही काम होत नाही. हा भ्रष्टाचार कोठे तरी थांबला पाहिजे यासाठी खऱ्या अर्थाने बिल आणण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मी दुसऱ्या एका अधिकाऱ्याचे उदाहरण सांगतो. आमच्याकडे लघुसिंचन विभागाचे आधीचे जे कार्यकारी अभियंता होते ते सुध्दा प्रभारी होते. त्यांनी पैसे घेऊन कामे वाटली. आता जे नवीन कार्यकारी अभियंता आले आहेत त्यांनी ती सर्व कामे रद्द केली. अशा प्रकारचा कारभार करणाऱ्या अधिकाऱ्यावर काय वचक ठेवणार, हा खरा प्रश्न आहे. या ठिकाणी जो भ्रष्टाचार आणि जे कुप्रशासन आलेले आहे त्या संदर्भात या बिलामध्ये तरतूद केली पाहिजे. म्हणून हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठवून त्यावर सखोल विचार करुन परत सभागृहासमोर बिल आले पाहिजे. हे बिल खऱ्या अर्थाने पदाधिकाऱ्यावर अन्याय करणारे आहे. यामध्ये सुसंगती नाही. आपण त्यांना फाशी देणार किंवा कोणती शिक्षा देणार या बाबत बिलामध्ये उल्लेख केला पाहिजे. तुम्ही जर हा गुन्हा केला, जर तुम्ही एखाद्या प्रस्तावाला अनुमोदन दिले आणि त्यामध्ये जर भ्रष्टाचार झाला तर त्यासाठी तुम्हाला किती दंड होईल, किती महिन्यांची सजा होईल, तुम्हाला कोणत्या कोर्टात जावे लागेल, या बाबत या बिलामध्ये काहीही दिलेले नाही. या बिलामध्ये लोक आयुक्तांना आणि उप लोक आयुक्तांना अधिकार देण्याबाबत उल्लेख केला आहे. आपण त्यांना कोणते अधिकार देणार आहात, हे आम्हाला कळले पाहिजे. समजा मी महानगरपालिकेचा सदस्य आहे आणि माझ्या विरोधात एखादी तक्रार झाली तर माझ्यावर काय कारवाई करणार आहात, याचा

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. केशवराव मानकर .....

उल्लेख सुध्दा या बिलामध्ये झाला पाहिजे. ते या बिलामध्ये कोठेही सुस्पष्ट होत नाही.

जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका चालवित असताना खऱ्या अर्थाने अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. हे खरे आहे की, भ्रष्टाचाराचे मूळ खालून रुजलेले आहे. ग्रामपंचायतीपासून थेट संसदेपर्यंत हे सर्व चालते हे सर्वांना विदित झालेले आहे. त्यामुळे आदरणीय श्री. अण्णा हजारे यांच्या सारख्या सामाजिक कार्यकर्त्याला आंदोलने करावी लागतात, हेही खरे आहे. पण यातून कोणता तरी चांगला मार्ग निघाला पाहिजे. असे बिल आणून जर ते बहुमताने मंजूर केले तर नगरपालिका, महानगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषदेतील अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सदस्य यांना त्याचे परिणाम भोगावे लागतील आणि भविष्य काळामध्ये कोणीही राजकीय क्षेत्रामध्ये येऊ इच्छिणार नाही, समाजसेवा करु इच्छिणार नाही. म्हणून हे बिल आणत असताना याची संपूर्णपणे शहानिशा केली पाहिजे, सखोल अभ्यास केला पाहिजे. आपण हे बिल आणल्यानंतर त्याचे नियम कसे तयार करणार आहोत, कोणते नियम कोणाला लागू राहतील, पंचायत समितीला कोणते नियम लागू राहतील, जिल्हा परिषदेला कोणते नियम लागू राहतील, नगरपरिषदेला कोणते नियम लागू राहतील, महानगरपालिकेला कोणते नियम लागू राहतील हे कळले पाहिजे. कारण प्रत्येक संस्थेची आर्थिक बाजू एकसारखी नसते. पंचायत समितीला मिळणारा निधी अल्प असतो. एका जिल्ह्यामध्ये आठ दहा पंचायत समित्या असतात. जिल्हा परिषदेचा निधी वेगळा असतो. नगरपालिका आणि महानगरपालिकेच्या निधीमध्ये सुध्दा फार मोठी तफावत असते. अशा ठिकाणी आपण किती लाख रुपयांच्या कामावर किती दंड आकारणी करणार आहात, त्याला किती शिक्षा देणार आहात या संदर्भातील विवेचन या ठिकाणी देणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, माझे असे मत आहे की, हे बिल खऱ्या अर्थाने परत घेतले पाहिजे आणि सखोल विचार करुन पुन्हा सुधारित बिल सभागृहासमोर आणले पाहिजे. हे बिल आणत असताना ते संपूर्ण विवेचनासह मांडले पाहिजे. माननीय मंत्री महोदयांनी बिल मांडताना या ठिकाणी उद्देश व कारणाच्या बाबतीत स्पष्ट विवेचन केले पाहिजे. ते थोडक्यात विवेचन करतात आणि अल्पशा चर्चेनंतर आपण विधेयक मंजूर करतो, हे आपले दुर्दैव आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर...

खरे म्हणजे या विधेयकावर सखोल चर्चा होण्याची आवश्यकता आहे. महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांचा कारभार करीत असताना त्या संस्थातील निवडून आलेल्या सदस्यांना कोणत्याही प्रकारचे अधिकार नाहीत याची जाणीव शासनाला देखील आहे. जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीच्या विविध समित्यांच्या सभापतींना देखील असलेले अधिकार सीमित आहेत. जिल्हा परिषदेतून एखादे बिल घ्यायचे असेल तर त्यासाठी किती तरी टेबलावर पाठपुरावा करावा लागतो. अगदी चपराशी पासून ते थेट कार्यकारी अभियंत्या पर्यंत 14-15 टेबलावरुन त्या बिलाचा प्रवास होतो. प्रत्येक टेबलावर शंभर रुपये द्यायचे झाले तरी कंत्राटदाराला 2 हजार रुपया पेक्षा जास्त खर्च करावे लागतात. वरच्या अधिका-यांना वेगळे पैसे द्यावे लागतात तो भाग वेगळा. या निमित्ताने मला हे सांगावयाचे आहे की, आपली प्रशासनिक कार्यप्रणाली बदलली पाहिजे. एखादे बिल क्लार्कने बनविल्यानंतर आणि ते जेईने पास केल्यानंतर कॅफोने त्यास मंजुरी दिली असे कधी होत नाही. अनेक टेबलावरुन त्या बिलाचा प्रवास होतो. म्हणून या पध्दतीमध्ये आमुलाग्र बदल करण्याची आवश्यकता आहे. जेवढी टेबले कमी असतील तेवढा भ्रष्टाचार कमी होईल. भ्रष्टाचार थांबविण्यासाठी हे विधेयक आणलेले आहे असे विधेयकाच्या उद्देश आणि कारणे यामध्ये नमूद केलेले आहे. म्हणजे भ्रष्टाचार होतो हे शासनाने कबूल केलेले आहे.

माझे म्हणणे असे आहे की, या विधेयकाची व्याप्ती केवळ महानगरपालिका, नगरपालिका व जिल्हा परिषदा यांच्या पदाधिका-यांपुरती सीमित आहे. ही व्याप्ती वाढवून त्यामध्ये त्या त्या संस्थांच्या मुख्य अधिका-यांचा देखील समावेश केला पाहिजे. उदा. जिल्हा परिषदेच्या संदर्भात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना या विधेयकाच्या कक्षेत आणावयास पाहिजे. ग्रामपंचायतीचा कारभार करीत असताना आपण ग्राम सेवकाला जबाबदार धरतो त्या प्रमाणे त्या त्या संस्थांच्या प्रमुख अधिका-यांना जबाबदार धरले गेले पाहिजे. दुसरे असे की, भ्रष्टाचारासंबंधी शिक्षा करायची झाली तर ज्याने प्रत्यक्ष भ्रष्टाचार केलेला आहे त्यालाच शिक्षा व्हावयास पाहिजे. भ्रष्टाचाराच्या बाबतीत त्या संस्थेच्या सदस्याला दोषी ठरवून काही उपयोग होणार नाही. लोकशाही प्रक्रियेमध्ये लोकांनी निवडून दिल्यानंतर आपल्या मतदारसंघाचा विकास करणे एवढेच निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीचे काम असते. हे विधेयक दोन्ही सभागृहाच्या 40 सदस्यांच्या संयुक्त





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर...

समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्यासाठी पाठविण्याचा जो प्रस्ताव दिलेला आहे त्याला समर्थन देऊन मी माझे भाषण संपवितो.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2011चे वि.प.वि. क्रमांक 2, महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या विधेयच्या संदर्भात मी काही सूचना करु इच्छितो. आपल्या लोकशाही राज्य पध्दतीमध्ये देशात केन्द्र शासन, राज्यात राज्य शासन, शहरामध्ये महानगरपालिका किंवा नगरपालिका आणि ग्रामीण भागामध्ये जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्राम पंचायती अशी व्यवस्था करण्यात आलेली आहे. केन्द्र शासन राज्य शासनाच्या कारभारावर निगराणी ठेवते आणि राज्य शासन महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती यांच्या कारभारावर निगराणी ठेवते. मी जिल्हा परिषदेचा सदस्य होण्यापूर्वी बल्लारपूर नगरपरिषदेचा अध्यक्ष होतो. मी या ठिकाणी एक उदाहरण देतो. माझा एक मित्र दारु पित होता. त्याचा 17-18 वर्षाचा मुलगा सुध्दा दारु पित होता. माझा मित्र आपल्या मुलाला दारु सोडण्यास सांगत होता मात्र स्वत: दारु पित होता. मी त्याला समजावले की, जर तू दारु पित असशील तर तुझ्या मुलगा दारु कशी काय सोडेल ? त्याने मला सांगितले की, मी 50 पेक्षा जास्त वर्षे जगलो आहे, मी दुनिया पाहिलेली आहे, माझा मुलगा लहान आहे त्यामुळे त्याने दारु पिता कामा नये. मी त्याला सांगितले की, तू दारु पितोस हे पाहून तुझा मुलगा दारु पिण्यास शिकला..

...नंतर श्री. गिते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.शिगम 17:25

श्री.जैनुद्दीन जव्हेरी....

परंतु राज्य शासनामध्ये सर्व उलट प्रकार सुरु झालेला आहे. यांना दोनापेक्षा अपत्ये असतील तर त्यांना नगरपरिषदेच्या निवडणुकीत उभे रहाता येत नाही. मात्र आमदाराला दोन, चार, सहा, आठ, बारा अपत्ये असतील तरी त्यांना हा कायदा लागू नाही. पर्यायाने त्या आमदारांचे सभासदत्व देखील जात नाही. आपल्याला कायदा करण्याचे अधिकार आहेत म्हणून आपण स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी आपण कायदा आणला. मी दारु पितो, परंतु माझ्या मुलाने दारु प्यावयाची नाही. आता आमदारांनी काहीही केले तरी चालते. त्यांना दोन पेक्षा जास्त अपत्य असली तरी त्यांना हा कायदा लागू होत नाही. केंद्रात तर आमचे श्री.लालुप्रसाद यादव आहेत म्हणून लोकसभेत तर खासदारांसाठी हा कायदाच लागू होणार नाही. आमच्या वडिलांचे आम्ही काही सांगू शकत नाही. आमच्या आजोबांचे काही सांगू शकत नाही. वडील आणि आजोबा या महान व्यक्ती आहेत. आपण या सभागृहाच्या माध्यमातून कायदा बनवितो, राज्यातील जनतेसाठी तसेच मोठया व्यक्तींना आदर्श वाटवा असा कायदा या सभागृहात केला गेला पाहिजे. प्रथम वडील, आजोबा यांनी आदर्श ठेवला पाहिजे आणि त्यानंतर त्यांनी आदर्शाचे गुण आपल्या मुलाला सांगितले पाहिजे. मी इंजिनिअर होतो, चांगली नोकरी करीत होतो. तू देखील चांगले काम कर असे सांगितले पाहिजे. परंतु सध्या सर्व उलट चालले आहे. ग्रामपंचायत, नगरपालिका, जिल्हा परिषदे या स्थानिक स्वराज्य संस्थेतील सभासदांसाठी कायदा लागू करीत आहात, परंतु आमदारासाठी हा कायदा का नाही ? आमदारांची आणि खासदारांची या कायद्याच्या बाबतीत काहीही तक्रारी नाहीत. त्यांना या कायद्याच्या कार्यकक्षेत घेतले गेलेले नाही.

मी नगरपरिषदमध्ये अध्यक्ष होतो. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी या विधेयकाच्या अनुषंगाने विचार मांडले. आम्ही लोकप्रतिनिधी असल्यामुळे सकाळी आम्ही झोपेतून उठून दात घासत नाही तोवर लोक आमच्याकडे गाऱ्हाणे मांडण्यासाठी येतात. त्यात अनेक महाभाग असे येतात की, साहेब, अमुक अमुक एरियामध्ये डुक्कर मेले आहे. त्याला नगरपालिकेचे कर्मचारी गावाबाहेर घेऊन जात नाहीत. म्हणून आपण नगरपालिकेतील सफाई कामगारांना काही तरी आदेश द्यावेत. दुसरा व्यक्ती गाऱ्हाणे सांगते की, साहेब, शौचालयाची टाकी पूर्णपणे भरुन गेलेली आहे. तेथे सफाई कर्मचारी येत नाही. आपण सफाई कामगारांना ती टाकी साफ करण्यासाठी आदेश द्यावेत. ही कामे लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही करावयाची. आम्हाला दुसरी

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी...

विकासाची कामे नाहीत काय ? खासदारांना विकासाची कामे नाहीत काय ? गावातील दिवाबत्ती करणे, रोडची सफाई करणे, ही प्राथमिक कामे नगरपरिषदेतील आणि जिल्हा परिषदेतील कर्मचारी करीत असतात. आमदार काय करतात, खासदार काय करतात ? खासदाराला विकास कामांसाठी 5 कोटी रुपये स्थानिक विकास निधी दिला जातो आणि आमदाराला 2 कोटी रुपये स्थानिक विकास निधी दिला जातो.

मी नगराध्यक्ष होतो, त्यावेळी नगरपरिषदेची आर्थिक स्थिती मी अतिशय जवळून बघितली आहे. नगरपरिषदेतील कर्मचाऱ्यांना पगार देण्यासाठी पैसे नसतात. माझी नगराध्यक्ष म्हणून निवड झ ाली, त्यावेळी नगरपरिषदेतील कर्मचारी बंधू मोठ मोठे हार घेऊन माझा सत्कार करण्यासाठी आले. मी अतिशय खुश झालो, त्यांनी हार घालून माझा सत्कार केला. त्यानंतर त्या कर्मचाऱ्यांचे एक डेलिगेशन मला भेटण्यासाठी आले. त्यांनी मला सांगितले की, आमचे मेडीकल बिल पेंडींग आहेत. मी नवीन अध्यक्ष होतो, पेन हातात घेतला आणि त्यांच्या निवेदनावर लिहिले की, मुख्याधिकारी, या कर्मचाऱ्यांचे मेडीकल बिल मंजूर करावे. अनेक डेलिगेशन मला भेटू लागली. मी त्यांच्या निवेदनावर मंजूर म्हणून लिहित गेलो. त्यानंतर त्यांनी बोनसची मागणी माझ्याकडे केली. मी नगरपरिषदेतील मुख्याधिकारी आणि अधीक्षक यांना बोलाविले. त्यांनी सांगितले की, शासनाने सांगितले तर आपण कर्मचाऱ्यांना बोनस देऊ शकतो. तुम्ही सभागृहाच्या निर्णयास अधीन राहून बोनस मंजूर करुन टाका, असे निवेदनात लिहून टाका. त्याप्रमाणे मी कर्मचाऱ्यांच्या निवेदनावर लिहिले की, सभागृहाच्या निर्णयाच्या अधीन राहून बोनस देण्यात यावा. त्या अधिकाऱ्यांनी दुस-याच दिवशी बोनसचा चेक तयार करुन बँकेतून पैसे विड्रा केले. नगरपरिषदेकडे पेपर मिलचा ॲडव्हान्स 11 लाख रुपये आला होता. त्यातील 10 लाख 75 हजार रुपयांचा चेक त्यांनी काढून टाकला. मी एका महिन्यानंतर बँकेत गेलो, तर बॅकेत नगरपरिषदेचे पैसेच शिल्लक नव्हते. त्यानंतर मी सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांचे समवेत बैठक घेतली आणि त्यांना सांगितले की, मी निवडणुकीस उभा होतो, त्यावेळी लोकांना हात जोडून सांगितले की, मी गावात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करीन. वीज पुरवठा देईन, शाळेची व्यवस्था चांगल्या प्रकारची करेन. गावात चांगले रोड बनविणार. मला असे आठवत नाही की, मी हात जोडून लोकांना सांगितले की, मी

2...



ABG/ प्रथम श्री.शिगम 17:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन झवेरी...

गावात गटाराची कामे करणार नाही, रस्त्यांची कामे करणार नाही. गावातील सफाईची कामे करणार नाही.

सध्या नगराध्यक्षाची परिस्थिती अतिशय वाईट झाली आहे, तशीच आमदारांची परिस्थिती इ ाालेली आहे. आम्ही आमच्या मतदार संघात मोठया गर्वाने सांगतो की, आम्ही विकासाची कामे मोठया प्रमाणात करु. परंतु या ठिकाणी पाहिले तर 1.50 लाख करोडचे बजेट आहे. त्यातील 1.25 लाख करोड रुपयांचा निधी आमचेच बंधू घेऊन जातात. आम्हाला जो निधी उपलब्ध करुन दिला जातो, त्यावर मोठया प्रमाणात कपात लावली जाते ?

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 17:30

श्री.जैनुद्दीन जव्हेरी.......

शासनाने लोक आयुक्त कायद्यात सुधारणा करण्याचे ठरविले आहे, जरुर हे विधेयक मंजूर करावे. परंतु केंद्र शासनाकडून 1931 कोटी रुपये मिळवित असताना केंद्र सरकारने प्रथमत: अशी तरतूद करावी असे कळवावे. केंद्राच्या पातळीवर असा कायदा करावा, त्यानंतर राज्य पातळीवर आम्ही कायदा करतो असे सांगावे. उलटी गंगा वहात आहे. कुटुंब नियोजनाचा कायदा स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी लागू केला. महिलांना 50 टक्के आरक्षण देणारा कायदा स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी लागू करण्यात येत आहे. पूर्वी 33 टक्के आरक्षण होते. आता 50 टक्के आरक्षण दिले जाणार आहे. 77 टक्क्यामध्ये देखील अधिकाधिक महिला स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दिसून येत आहेत. हाच कायदा केंद्र स्तरावर का लागू केला जात नाही? लोकसभेत 547 सदस्य संख्या आहे, तेथे 50 टक्के आरक्षण महिलांना लागू केले तर 273 महिला सदस्य निवडून जातील. महिलांना आरक्षण देण्यास आमचा विरोध नाही. त्या आमच्या भगिनी आहेत. परंतु कोणताही कायदा लागू करताना तो प्रथम स्थानिक स्वराज्य संस्थाना लागू केला जातो हे योग्य नाही.

सभापती महोदय, कोणताही कायदा लागू करताना तो प्रथमत: केंद्रीय पातळीवर लागू करावा, त्यानंतर राज्य पातळीवर आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्याची अंमलबजावणी व्हावी. कायदा करणे हे विधिमंडळाचे काम आहे. माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी हे नगरविकास विभागाचे राज्यमंत्री होते. त्यांना आठवत असेल, त्यांच्या मंत्री पदाच्या काळात आमच्या नगरपरिषदेचे अध्यक्ष श्री.नाकोडे हे होते. तुम्ही नालायक आहात, काम करीत नाही अशा प्रकारची नोटीस त्यांना पाठविण्यात आली होती. तुमचे काम बरोबर नाही, तुम्ही काम करण्यास लायक नाही असे त्यात म्हटले होते. मी जास्त विद्वान होतो. मी वृत्तपत्रात बातमी छापून आणली. आमचे नेते नालायक आहेत. लायक नाही म्हणजे नालायक असा त्याचा मतितार्थ होता. आज लोक आयुक्त कायद्यात सुधारणा करीत असताना अधिकारी म्हणणार, लोकप्रतिनिधी नालायक आहेत. भ्रष्टाचार झाला असेल तर पैसे भरा म्हणून सांगणार. हे विधेयक जरुर मंजूर करा. परंतु मला एक सूचना करावयाची आहे. केंद्रात आमच्या पक्षाचे सरकार आहे. राज्य शासनाने केंद्र शासनाला एक शिफारस करावी की, कुटुंब नियोजनाचा कायदा ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदांना लागू केला, महिलांना 50 टक्के आरक्षण देणारा कायदा ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदांना लागू केला जात आहे. आणखी एक नवीन कायदा लागू केला आहे.

..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी.......

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ऑडिट पॅरा उपस्थित झाला आणि तो क्लिअर झाला नाही तर पैसे भरावे लागणार आहेत. संबंधित लोकप्रतिनिधी मृत झाल्यास त्याची प्रॉपर्टी त्याच्या मुलाला मिळणार नाही, कारण त्यातून ती रक्कम वसूल केली जाणार आहे. नगर परिषदेचे अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष पदाच्या काळात ऑडिट पॅरा उपस्थित झाला आणि तो पॅरा आयुक्त किंवा संचालकांनी क्लिअर केला नाही तर पैसे भरा अन्यथा प्रॉपर्टी जप्त केली जाणार आहे. आम्ही पदावरुन पायउतार झाल्यानंतर आमची कशी बदनामी होते हे मी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, नगरपरिषद आणि जिल्हा परिषदेमध्ये बरेच वादविवाद होत असतात. मी नगराध्यक्ष असताना नगर परिषदेला सिमेंट खरेदी करायचे होते. बाजारात सिमेंटचा दर 100 रुपये होता. जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय नगर परिषदेला सिमेंट खरेदी करता येत नाही. मी जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी मागितली. त्यांनी परवानगी दिली, परंतु अमुक माणसाकडून सिमेंट खरेदी करावे असे सांगितले. त्या पुरवठादाराला 100 रुपये प्रती बॅग या दराने पैसे देण्यात आले. 1000 सिमेंटच्या बॅग खरेदी करु शकता असे लेखी पत्र देण्यात आले होते. आमच्या मुख्याधिकाऱ्यांनी चेक दिला. परंतु कालांतराने जिल्हाधिकाऱ्यांचे पत्र फाईलमधून गायब केले गेले. शासनाने संबंधित कर्मचाऱ्याना सेवेतून निलंबित केले होते. परंतु फाईलमधून जिल्हाधिकाऱ्यांचे पत्र गायब झाले आणि जिल्हाधिकाऱ्यांनी सिमेंट खरेदी करण्यास मंजुरी दिलेली नाही असा ऑडिट पॅरा उपस्थित झाला.

नंतर 3टी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी .........

मी यासंदर्भात विभागीय आयुक्तांकडे स्वत: गेलो आणि त्यांच्या निदर्शनास आणून दिले की या कामाचे पेमेंट सी.ओ. यांनी काढले, यात माझा काहीच संबंध नाही तरी देखील माझ्यावर ऑडिटचा संबंध कसा आला. पण आयुक्त एक चांगला अधिकारी होता. त्यांनी ताबडतोब सी.ओ. यांना बोलावून घेतले. अशा प्रकारे कोण करणार आणि शिक्षा कोणाला असा प्रकार होऊ नये अशा अनेक गोष्टींचा विचार शासनाने हे विधेयक आणताना करणे आवश्यक आहे. त्यात आवश्यक त्या सुधारणा सुध्दा कराव्यात. वास्तविक चांगल्या लोकांना सुधारण्याची गरज नसते पण अगोदर आजोबांनी म्हणजेच भारत सरकारने हा कायदा करावा, त्यानंतर वडिलांनी म्हणजेच विधानसभेने आमदारांसाठी हा कायदा करावा आणि त्यानंतर मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांचा विचार करावा असे मी प्रकर्षाने मंत्री महोदयांना सांगू इच्छितो. शेवटी आपल्या हातात सत्ता असल्याने आपण काहीही करु शकता. लहानातल्या लहान कार्यकर्त्यांच्या मनात अशीच भावना यामुळे निर्माण होणार आहे. शेवटी पुन्हा विनंती करतो की, हे विधेयक चांगले आहे पण त्यात आवश्यक असलेल्या काही सुधारणा करुनच ते मंजूर करावे, असे सांगतो व माझे भाषण संपवितो.

जय हिंद. जय विदर्भ.

------

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे ( विधानसभेने निवडलेले ) : महोदय, सन 2011 चे विधान परिषद विधेयक क्रमांक-2, महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, 1971 मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी शासनाने हे विधेयक सभागृहाच्या मान्यतेसाठी आणलेले आहे. त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

(**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**)

महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी या विधेयकावर जी सुधारणा सुचविली आहे त्या सुधारणेचे समर्थन मी करणार आहे. हे विधेयक वाचल्यानंतर "चोराला सोडून संन्याशाला फाशी" ही एक म्हण मला आठवते. महोदय, मी दोन वेळा जिल्हा परिषदेवर सदस्य म्हणून निवडून आलो होतो. एक काळ जिल्हा परिषदेच्या विरोधी गटाचा नेता म्हणून काम केले आणि नंतरच्या कारकिर्दीत जिल्हा परिषद उपाध्यक्ष म्हणून काम केले. या विधेयकाच्या निमित्ताने मला ही बाब शासनाच्या निदर्शनास आणावयाची आहे की, हा कायदा करुन शासन जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका व महानगरपालिका अशा स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पदाधिकाऱ्यांचे एक प्रकारे ऑडिट करण्याचा प्रयत्न करीत आहे की काय अशी शंका येते. जिल्हा परिषदेच्या सदस्यांना त्यांच्या मतदारसंघात फिरण्यासाठी महिन्याला 2 हजार रुपये मानधन मिळत होते. वास्तविक या जिल्हा परिषदेचा सदस्य म्हणून निवडणुकीला उभे राहण्यापूर्वी त्याला काय काय प्रमाणपत्रे सादर करावी लागतात याचा उल्लेख मी प्रामुख्याने करणार आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सदस्याला निवडणुकीला उभे रहावयाचे असेल तर प्रथम घरात शौचालय असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागते. त्यानंतर तीन अपत्य ठराविक वर्षापूर्वीची जन्म झालेली असली पाहिजेत, संपत्तीबाबतचे प्रमाणपत्र आणि टॅक्स क्लिअरिंग सर्टिफिकेट सादर केल्यानंतरच पुढील सोपस्कार पूर्ण होतात. हीच परिस्थिती नगरपालिका, महानगर पालिका व ग्राम पंचायत सदस्यांसाठी देखील आहे. पण या कायद्याच्या कार्यकक्षेत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना समाविष्ट करीत असताना प्रथम त्यांची अवस्था काय आहे याचा विचार करणे आवश्यक आहे. मी पहिल्यांदा ज्यावेळेस जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आलो तेव्हा एक जिल्हा परिषद सदस्य त्यांच्या मतदारसंघातील व्यथा सांगत होते, विविध अडचणी सांगतांना बोलत होते की..............

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे .....

विरोधी पक्षाचा सदस्य म्हणून त्यांनी सलग 5 वर्षे निघून गेली परंतु त्यांला त्यांच्या मतदार संघात 5 लाख रुपयांच्या विकासाचे सुध्दा काम करता आले नाही अशी जिल्हा परिषदेच्या सदस्याची अवस्था आहे. आज पचांयत समिती सदस्याची यापेक्षा वेगळी अवस्था नाही. अशा परिस्थितीमध्ये या विधेयकाद्वारे आपण चोर सोडून सन्याशाला फाशी देण्याचे काम करीत आहात त्यामुळे या विधेयकाच्या संदर्भात सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी जी सुधारणा सुचवली आहे त्याचा विचार या विधेयकात होणे आवश्यक आहे. ही सुधारणा झाल्याशिवाय हे बिल पास झाले तर ग्रामीण भागामध्ये किंवा नगरपालिकेच्या हद्दीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून कोणीही काम करु शकणार नाही. जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये सभागृहाची इच्छा असतांना एखादे काम सभागृहाच्या संमतीने करावयाचे असेल तर जिल्हा परिषदेचे अधिनियम ते करु शकत नाही अशी परिस्थती आहे. सीईओ सचिवाच्या मार्फत सांगतो की, अशा पध्दतीचा ठराव तुम्हाला घेता येत नाही हे व असा ठराव घेतलाच तर सीईओ हा ठराव कॅन्सल करण्यासाठी कमिशनरकडे पाठवत असतात आणि कमिशनर सभागृहात सर्वानुमते पास झालेला ठराव कॅन्सल करतात अशी जिल्हा परिषदेच्या व पंचायत समिती सदस्यांची लायकी आहे. त्यामुळे यासंदर्भात आपल्याला थोडासा विचार करावा लागणार आहे. 2000 रुपयाच्या मानधनामध्ये जिल्हा परिषदेचा सदस्य म्हणून थोडासा मान आहे.

मधल्या काळात एक चांगली गोष्ट झाली की, जिल्हा परिषदेच्या सदस्याच्या माध्यमातून जिल्हा नियोजन समितीमध्ये समितीचे सदस्य म्हणून जिल्हा परिषदेचे सदस्य आणि नगरसेवक घेण्यात आले. परंतु आज त्यांची काय अवस्था आहे ? जिल्हा परिषद सदस्याला जिल्हा नियोजन समिती मधून 5 लाख रुपये घेण्यासाठी पालक मंत्र्यांच्या दारावर चपला घासाव्या लागतात अशी परिस्थिती आहे. अनेक जिल्हयात जिल्हा नियोजन समितीमधील जिल्हा परिषदेचे सदस्य, नगरसेवक निधी मिळावा म्हणून उपोषणास बसलेले आहेत ही वस्तुस्थिती आहे. असे असतांना आपण या विधेयकाच्या माध्यमातून या सदस्यांवर संशयाच्या अनेक गोष्टी आणणार आहोत. सदस्यत्व रद्द करण्याचा अधिकार सुध्दा या विधेयकात सुचविलेला आहे. लोकशाहीचा गाभा

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे .....

जर संशयाच्या भोव-यात फसला तर पुन्हा म्हणून ग्रामीण भागात किंवा शहरामध्ये निवडणूकीसाठी उभे राहण्यासाठी कोणी तयार होणार नाही अशी वाईट अवस्था निर्माण होईल.

माझ्या अगोदरच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणात नगरपालिकेच्या काळातील, काहींनी पंचायत समितीच्या काळातील विषय मांडलेला आहे. जिल्हा परिषदेचा सदस्य, पंचायत समितीचा सदस्य काम सुचविण्यापलीकडे दुसरे कोणतेही काम करु शकत नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जव्हेरी साहेबांनी सांगितलेले अनुभव प्रत्येकाला आलेले आहेत. त्यांनी नगरपालिकेच्या हद्दीतील अनुभव सांगितलेले आहेत. जिल्हा परिषद सदस्याला, पंचायत समिती सदस्याला गावातील ट्रान्सफॉर्मर जळाला तर तो बसविण्यापासून काम करावे लागत असते. गावातील वीज गेली तर सरपंच पहिल्यांदा पंचायत समिती सदस्याकडे व जिल्हा परिषद सदस्याकडे जात असतो. काही ठिकाणी जिल्हा परिषदेची अवस्था अत्यंत वाईट झालेली आहे. 50 टक्के निधी हा डायरेक्ट ग्रामपंचायतीकडे गेल्यामुळे जिल्हा परिषदेमध्ये आता काहीच राहिलेले नाही. केंद्राचे पैसे डायरेक्ट ग्राम पंचायतीकडे जातात व ते पैसे राहिलेच तर ते प्रोजेक्ट ऑफिसरकडे जातात व प्रोजेक्ट ऑफिसर सुध्दा त्याच्या नियमात जे बसते तेच करतो. पुर्वी एमआरईजीएस, एसजेआरवायची कामे जिल्हा परिषदेचे सदस्य सुचवित असत. ही कामे नियमात बसत असेल तर प्रोजेक्ट ऑफिसर ती कामे करीत असत. परंतु आता जी कामे नियमात बसत नाही अशी कामे प्रोजेक्ट ऑफिसर, सीईओ करीत असतात परंतु त्यांच्यावर कसल्याही प्रकारची कारवाई होत नाही ही वस्तुस्थिती आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुडे ..

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिका-याना प्रतीक्षा यादीवरील चार लोकांना जिल्हा परिषदेमध्ये नोकरीस लावावयाचे असेल तर तो अधिकार त्यांना आहे.मात्र जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांना कोणत्याही प्रकारचे अधिकार देण्यात आलेले नाहीत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 2 महाराष्ट्र लोक आयुक्त व उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक 2011 विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहाच्या 40 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्याच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे असा प्रस्ताव दिलेला आहे.तेव्हा हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यात यावे अशी मी या चर्चेच्या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, आज जे काही वातावरण निर्माण करण्याचे काम चालू आहे ते राजकारण्यांना बदनाम करण्यासाठीच चालू आहे. तसेच लोकशाहीच्या विरोधात हे काम चालू आहे जर लोकशाहीचा सर्वात मोठा गाभा बदनाम झाला तर राजकारणी म्हणून आपण सर्वसामान्य माणसाच्या समोर कोणते तोंड घेऊन जाणार आहोत याचा विचार करावा. सध्या आहे त्या विधेयकाला संमती देत असतांना सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी त्याचा विचार करावा अशी पुन्हा एकदा विनंती करतो तसेच सन्माननीय सदस्य श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी जो प्रस्ताव दिला आहे त्याला पाठिंबा देतो आणि हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठवावे असे सांगून मी माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री एस.क्यू. .जमा यांचे हिंदी भाषण

श्री एस. क्यू जमा ( महाराष्ट्र विधान सभा द्वारा निर्वाचित ) : सभापति महोदय, इस बिल का समर्थन करने के लिए मैं यहां पर खड़ा हुआ हूं. यह बिल सन् 1971 का है और उसी से संबंधित एक आर्डिनेंस सरकार ने 10 मार्च को निकाला है. अब इस बिल में कुछ सुधार करने के लिए पर यह बिल यहां पर लाया गया है. इस बिल को पास किया जाना चाहिए. इस बिल पर बहुत सारे माननीय सदस्यों ने अपने विचार यहां पर रखे हैं. उन विचारों को सुनने के बाद ऐसा लगता है कि पंचायत समिति, जिला परिषद, म्युनिसिपल कारपोरेशन इत्यादि संस्थाओं के लिए चुने हुए माननीय सदस्यों को बदनाम करने के लिए ही यह बिल लाया गया है.

परन्तु बिल के उद्देश्य और कारणों में बताया गया है कि 13 वें वित्त आयोग ने इस बार ज्यादा पैसा लोकल बॉडीज को दिया है. उन संस्थाओं में किसी तरह का भ्रष्टाचार न होने देने के उद्देश्य से ही उन्होंने इस बिल में एक क्लाज डालने के लिए महाराष्ट्र सरकार से कहा है.

महाराष्ट्र में सन् 1971 में लोक आयुक्त और उप लोक आयुक्त का यह एक्ट पास हुआ था. माननीय मुख्यमंत्री को छोड़कर बाकी सभी मंत्री इस एक्ट के अंतर्गत आते हैं. मैं कहना चाहूंगा कि सन् 1971 में यह एक्ट पास होने के बाद भी भ्रष्टाचार पर ज्यादा रोक नहीं लग पायी है. उस भ्रष्टाचार में अधिकारी ज्यादा शामिल हैं या पदाधिकारी ज्यादा शामिल हैं, यह एक अलग विषय है और इस पर विस्तृत चर्चा की जा सकती है. माननीय अण्णा हजारे साहब ने जो आंदोलन शुरु किया है उससे एक अलग वातावरण हमारे देश में बना है.

माननीय सदस्य श्री जैनुद्दीन जव्हेरी साहब अपने भाषण में लोकपाल बिल पास करने की बात कर रहे थे. मेरा कहना है कि लोकपाल बिल अभी संसद में पास नहीं नहीं हुआ है, लेकिन हमारा महाराष्ट्र राज्य बहुत ही प्रगतिशील राज्य होने की वजह से हमारे यहां पर यह लोक आयुक्त और उप लोक आयुक्त बिल सन् 1971 में ही पास कर दिया गया था. जहां तक इसको अमल में लाने की बात है उस संबंध में मैं कहना चाहूंगा कि भ्रष्टाचार रोकने के बारे में यह बिल ज्यादा प्रभावकारी साबित नहीं हुआ है. इसलिए मेरा कहना है कि आर्जिनल बिल में जो प्रावधान किए गए हैं, उसमें बहुत बदलाव करने की आवश्यकता है. पार्लियामेंट में जो लोकपाल बिल लाया जाने वाला है, उस बारे में एक कमेटी बनायी गयी है और उस कमेटी में उस बिल के बारे में चर्चा हो रही है. वह बिल वहां पर अगले सेशन में आएगा या उसके बाद में आएगा

...3

श्री जमा.....

उस बारे में निश्चित तौर पर अभी कुछ नहीं कहा जा सकता है. लेकिन यहां पर जो लोक आयुक्त बिल लाया गया है इसमें बहुत ज्यादा बदलाव करने की जरुरत है. है. पुराने लोक आयुक्त बिल में भी जिला पंचायत और पंचायत समिति को कवर किया गया है. अब 13 वें वित्त आयोग ने हमको इस बिल में कुछ बदलाव करने के लिए कहा है, इसीलिए सरकार ने इस संबंध में एक आर्डिनेंस निकाला है और उस आर्डिनेंस को एक्ट में बदलने के लिए यह बिल यहां पर लाया गया है.

सभापति महोदय, लोकपाल बिल बहुत ही सेंसिटिव है, यह बिल करप्शन खत्म करने के बारे में है. आज पूरे देश की भावना यही है कि करप्शन पर रोक लगनी चाहिए. भ्रष्टाचार को खत्म करने के उद्देश्य से जब माननीय अण्णा हजारे जी दिल्ली में अनशन पर बैठे तो बड़े पैमान पर आम जनता का समर्थन उनको प्राप्त हुआ है.

सभापति महोदय, ऐसा तो नहीं कहा जा सकता कि चुना हुआ कोई भी जन प्रतिनिधि अच्छा नहीं है या सभी लोक प्रतिनिधि भ्रष्ट हैं. दिल्ली में जो ज्वाइंट कमेटी बनी है वह इस बात पर ध्यान दे रही है कि पार्लियामेंट या विधानमंडल को कानून बनाने का जो हक प्राप्त है, वह हक समाप्त न हो और लोकपाल बिल भ्रष्टाचार को रोकने में कारगर सिद्ध हो.

आर्डिनेंस निकालने के बाद ही यह लोक आयुक्त और उप लोक आयुक्त बिल हमारे इस सदन में लाया गया है, इसलिए यह बिल यहां पर पास किया जाना चाहिए. परन्तु जो संशोघन अभी इस बिल में किए जा रहे हैं उनको देखकर मुझे नहीं लगता कि भ्रष्टाचार को रोकना इस बिल के माध्यम से संभव हो सकेगा. क्योंकि हमारे यहां पर एन्टी करप्शन एक्ट भी है. लेकिन भ्रष्टाचार समाप्त करने के संबंध उससे भी कुछ फायदा नहीं हो पा रहा है. इसलिए मैं कहना चाहूंगा कि इसको ज्यादा असरदार बनाने के लिए इस एक्ट को बहुत ही कॉंप्रिहेंसिव बनाने की जरुरत है.

जब केन्द्र के अंदर लोकपाल बिल पास हो जाएगा तो उस एक्ट को देखकर हमें अपने इस एक्ट में और सुधार करने में जरुर मदद मिल सकेगी. केंद्र सरकार के बिल के आधार पर इस एक्ट में बाद में संशोधन किए जाने चाहिए. इन्हीं शब्दों के साथ मैं इस बिल का समर्थन करता हूं और अपनी बात समाप्त करता हूं. धन्यवाद.

-0-

अशुद्धित प्रत / प्रकाशनार्थ नहीं

प्रा. फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये चर्चेकरिता असलेल्या विधेयकाबाबत आदरणीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस, माननीय सदस्य सर्वश्री. संजय केळकर, जयंत प्र. पाटील, केशवराव मानकर, जैनुद्दीन जव्हेरी, धनंजय मुंडे, एस. क्यू. जमा इत्यादी माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले आहेत.

या विधेयकावर चर्चा करीत असतांना त्यामधून एक वस्तुस्थिती समोर आणण्यात आली ती म्हणजे या सिस्टीममध्ये आपल्याला काही तरी बदल करणे आवश्यक आहे. कोणतीही सिस्टीम राबवीत असतांना त्यामध्ये प्रॉब्लेम येत असतात हे सर्वांना मान्य आहे. परंतु ते प्रॉब्लेम दूर करणे जास्त गरजेचे आहे अशा प्रकारचा एक सूर सर्व माननीय सदस्यांच्या विचारामधून समोर आलेला आहे. सर्व माननीय सदस्यांनी लोकायुक्तांच्या या सुधारणा विधेयकामध्ये लोकप्रतिनिधींचा समावेश आहे तर मग अधिकाऱ्यांचा समावेश कां करण्यात आला नाही, या विधेयकाच्या कार्यकक्षेमध्ये अधिकाऱ्यांना कां आणले नाही? अशाप्रकारचे विचार व्यक्त केले. हे विचार व्यक्त करीत असतांना त्याला अनुसरुन त्यांनी आणखी काही मुद्दे उपस्थित केले. सभापती महोदय, या निमित्ताने मला असे सुचवावयाचे आहे की, मूळ जे ओरिजिनल विधेयक आहे त्यामध्ये अधिकारी, सेक्रेटरी, स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकारी, कर्मचारी या सर्वांचा समावेश आहे. त्या मूळ विधेयकाच्या क्लॉज 2(1) आणि 2(के)(4) मधील वाक्य रचना वाचल्यानंतर आपल्या लक्षात येईल. त्या तरतुदीमध्ये सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचे, महानगरपालिकांचे अधिकारी व कर्मचारी, महामंडळ, सहकारी संस्था, कंपन्यामधील अधिकारी व कर्मचारी, तसेच सचिव पातळीवर अधिकाऱ्यांचा सुध्दा समावेश आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 17:55

श्रीमती फौजिया खान . . ..

त्यामुळे सर्वांनी मनातून एक गोष्ट काढून टाकावी की, यामध्ये अधिकाऱ्यांचा उल्लेख नाही. ॲक्टप्रमाणे लोक आयुक्तांच्या कार्यक्षेत्रामध्ये अधिकाऱ्यांचा समावेश आहे आणि त्यासाठी अनेक नोटीफीकेशन देखील काढण्यात आलेली आहेत. याठिकाणी मी दोन-तीन नोटीफीकेशन बाबत उल्लेख करु इच्छिते. 11 नोव्हेंबर 2003 मध्ये जे नोटीफीकेशन काढण्यात आलेले आहे, त्यामध्ये कॉर्पोरेशनचे सर्व अधिकारी व कर्मचारी आणलेले आहेत. तसेच 14 मे 2010 रोजी महाराष्ट्र रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशनसाठी नोटीफीकेशन काढण्यात आलेले आहे. 10 मार्च 2011 रोजी सर्व जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर परिषदांमधील अधिकारी व कर्मचारी यांना लोक आयुक्त यांच्या कार्यक्षेत्रामध्ये आणलेले आहेत आणि तशा प्रकारचे नोटीफीकेशन काढण्यात आलेले आहे.

सभापती महोदय, मी सुरुवातीला सांगितले की, याठिकाणी हे विधेयक आणण्याचे कारण असे आहे की, 13 व्या वित्त आयोगाच्या शिफारशी प्रमाणे 2011 ते 2015 या पाच वर्षाच्या कालावधीसाठी आपल्याला केंद्र शासनाकडून निधी मिळणार आहे आणि त्यासाठी त्यांनी केवळ एक अट टाकलेली नाही तर नऊ अटी टाकण्यात आल्या आहेत. त्यांच्या वेगवेगळया कंडीशन्स् आहेत. त्यातील एक अट अशी आहे की, आपण लोकल बॉडी एन्फोर्समेंट करावे किंवा जी एक्झीस्टींग यंत्रणा आहे, त्यांना स्ट्रेन्थदन करुन त्याच्या कार्यक्षेत्रामध्ये मघाशी ज्याचा उल्लेख केलेला आहे, त्या सर्व लोकल बॉडीच्या सर्व सदस्यांना देखील आणावे. कारण यामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सर्व विषयांचे सभापती आहेतच, फक्त सदस्यांना यामध्ये समाविष्ट करण्याबाबत उल्लेख आहे.

सभापती महोदय, दुसरी जी कंडीशन आहे, त्याबाबत सांगू इच्छिते. यामध्ये अर्बन लोकल बॉडी आणि पंचायत राज इन्स्टीट्युशनमध्ये डबल एन्ट्री अकाऊंटींग सिस्टीम असावी, प्रॉपर्टी टॅक्ससाठी बोर्ड सेटअप करण्यात यावे. सर्व पंचायत राजच्या बॉडीज् मध्ये डायरेक्टर ऑफ लोकल फंड अकाऊंटसबाबत ऑडीट करण्यात यावे. तसेच दिनांक 31-03-2012 पर्यंतचे स्थानिक स्वराज्य संस्थांचे जे सर्व्हीस लेव्हल आहे, ते नोटीफाय करावे. फायर हजार्ड रिस्पॉन्स आणि मिटीगेशन प्लॅन करावे. त्याशिवाय स्टेट फायनान्शिअल कमिशनसाठी मेंबर्स्ची क्वॉलिफीकेशन निश्चित करुन त्यासाठी कायदा करावा. स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी जी सप्लीमेंटरी बजेटरी प्रोव्हीजन आहे. वेगवेगळे विभाग आहेत, त्यासाठी स्टेट बजेट मध्ये पब्लीश आणि सबमिट करण्याचे काम करावे असे म्हटलेले आहे. यामध्ये एक कंडीशन अशी आहे की, स्थानिक पातळीवर पारदर्शक आणि चांगला कारभार असावा. कारण आपले सगळे इन्फ्रास्ट्रक्चर सुधारण्यासाठी दोन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान . . ..

हजार कोटी रुपये मिळणार आहेत. अशावेळी काही त्रुटी किंवा कमतरता राहू नये यासाठी सदस्यांचा त्यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.जमा साहेबांनी सांगितल्याप्रमाणे याच्या कार्यक्षेत्रामध्ये सर्व मंत्री आहेत. तसेच सचिव, सर्व अधिकारी, कर्मचारी घेण्यात आलेले आहेत. फक्त स्थानिक स्वराज्य संस्थाच्या सदस्यांना यामध्ये घेण्याचे प्रावधान या सुधारणेच्या माध्यमातून केलेले आहे.

सभापती महोदय, येथे अनेक प्रकारची चर्चा झाली. याठिकाणी सर्वांनी भ्रष्टाचाराबाबत, सिस्टीममध्ये बदल करण्याची कशी आवश्यकता आहे याबाबतही चर्चा झाली. सध्या कोणते चित्र आहे याबाबतही चर्चा झाली.अधिकाऱ्यांच्या संपत्तीबाबत चर्चा झाली.डी.पी.डी.सी.मध्ये आमदार निधीच्या माध्यमातून होत असलेल्या भ्रष्टाचाराबाबत उल्लेख झाला आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान.....

सन्माननीय सदस्य श्री. केळकर यांनी सांगितले की, स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्टेटमेंट ऑफ अकाउन्टस ऑडिट ऑडिटरकडून व्हावे पण ते होत नाही. तसेच या ठिकाणी सांगण्यात आले की, आज आर्थिक टर्न ओव्हर खूप जास्त वाढलेला आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी सांगितले की, नगरपरिषदेमध्ये हेड चेंज करुन घेण्यात येते. तसेच सर्व सन्माननीय सदस्यांनी आणि खासकरुन सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब यांनी श्री. अण्णा हजारें यांच्या आंदोलनाला जोडून या विधेयका बाबत सांगण्याचा प्रयत्न केला. ते असे म्हणाले की, आम्ही सगळे आरोपी आहोत का, आम्ही चोर आहोत काय, या कार्यक्षेत्रामध्ये लोकप्रतिनिधी कशासाठी हवेत? सभापती महोदय, मला या ठिकाणी असे मांडावयाचे आहे की, कायदा फक्त चोरांसाठी नसतो. कायद्याच्या कार्यक्षेत्रामध्ये आपण सर्व असतो. आयपीसी, सीआरपीसी या कायद्याच्या कार्यक्षेत्रात आपण येत नाही काय? म्हणजे आपण सगळे खूनी आहोत, गुन्हेगार आहोत असे नाही. कायद्याच्या कार्यक्षेत्रात येणे म्हणजे आपल्याला आरोपी किंवा दोषी समजण्यात येते असे अजिबात नाही. आपला कारभार फक्त पारदर्शक असला पाहिजे. आज अधिकाऱ्यांच्या बाबतीत कायद्यामध्ये तरतूद आहे. त्या अनुषंगाने पब्लीक सर्व्हंटस्च्या बाबतीत डिसिप्लीनरी ॲक्शन घेऊ शकतो. त्यांच्या बाबतीत डिसिप्लीनरी ॲक्शन्स रुल्स आहेत. ऑल इंडिया सर्व्हिस रुल्स आहेत. स्टेट रुल्स आहेत. त्यांना डिसमिस करण्यापर्यंत ॲक्शन घेण्याची लिगल प्रोव्हीजन आहे. पण लोकप्रतिनिधीच्या बाबतीत अशी कुठलीही लिगल प्रोव्हीजन नाही. त्यांच्यावर आरोप झाला किंवा खरोखरच त्यांचा काही दोष असेल तर लिगल प्रोव्हीजन कायद्यात नाही.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती ॲड. उषा दराडे )**

श्री. जयंत प्र. पाटील :जिल्हा परिषदेच्या ॲक्टमध्ये या संदर्भातील तरतूद आहे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, जरी एक्झिस्टिंग सिस्टिम असली तरी उदाहरणार्थ ॲन्टी करन्प्शन ब्युरो आहे. पण ॲन्टी करप्शन ब्युरोमध्ये एक मर्यादा आहे. यामध्ये एक अधिकारीच चौकशी करतात. म्हणून वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांच्या बाबतीत किंवा वरिष्ठ पातळीवरील लोकप्रतिनिधींच्या बाबतीत जरी सिस्टिम असली तरी मर्यादा येतात. लोक आयुक्त हे अधिकारी

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान..

नाहीत. हायकोर्टातील सेवानिवृत्त जज्ज हे लोक आयुक्त आहेत किंवा त्या पातळीवरची व्यक्ती लोक आयुक्त असणार आहे. आपण त्यांच्या कार्यक्षेत्रात आलो तर ती अपमानाची गोष्ट आहे, असे मला स्वत:ला वाटत नाही. आपण असे मानण्याचे काही कारण नाही की, आपण दोषी आहोत, आपण आरोपी आहोत, आपल्या बद्दलची भावना वेगळी आहे, त्यामुळे आपल्याला त्या कार्यक्षेत्रात आणण्याचे काम करण्यात येत आहे, असे अजिबात नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी या ठिकाणी उल्लेख केला की, अशा प्रकारचा कायदा करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. लोक आयुक्तांचा कायदा करणारे महाराष्ट्र हे अवश्य पहिले राज्य आहे. पण इतर राज्यामध्ये या पेक्षा अधिक कडक स्वरुपाचे लोक आयुक्तांचे कायदे आहेत, त्यांची यंत्रणा आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान .....

केरळ, हरियाणा, कर्नाटक या राज्यामध्ये आपल्यापेक्षा जास्त कडक कायदा आहे. सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यु.जमा यांनी सांगितले की, लोकपाल बिल आल्यानंतर त्याचा अभ्यास करुन तसेच बाकीच्या राज्यांचे जे कडक कायदे आहेत त्यांचा अभ्यास करुन भविष्यामध्ये आपल्याला या ठिकाणी लोकआयुक्तांची कॉम्प्रिहेन्सिव्ह यंत्रणा, शक्तिमान यंत्रणा उभारण्याबाबत आपण विचार करु शकतो. गुजरात, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश, आसाम, पश्चिम बंगाल आणि अन्य अनेक राज्यांमध्ये स्टेट व्हिजिलंस कमिशन आहे आणि लोकआयुक्त सुध्दा आहेत आणि त्यांचा कायदा आपल्यापेक्षा खूपच जास्त कडक आहे. बाकीची राज्ये जर हे मान्य करत असतील आणि आपल्या कायद्यापेक्षा बाकीच्या राज्यांचा कायदा जास्त कडक असेल तर आपल्याला कशाची भीती आहे ? आपण काही गुन्हा करीत नाही किंवा चुकीचे काम करीत नाही. आपण फक्त यंत्रणा कडक करण्याचे काम केले तर त्याला काही हरकत नाही, असे मला वाटते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी सांगितले की, भ्रष्टाचार रोखणे आवश्यक आहे आणि त्यासाठी बिल आणणे गरजेचे आहे. त्यांनी असेही सांगितले की, या यामध्ये आमदार का नाहीत, ग्रामपंचायतीचे सदस्य का नाहीत ? चुकीच्या पध्दतीने कसा कारभार होतो याची एकदोन उदाहरणे त्यांनी दिली. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि कारवाई करण्यासाठी काय करणार या बाबत त्यांनी विचारले. त्यांनी जी उदाहरणे दिली त्या बाबत अवश्य कारवाई होणे गरजेचे आहे आणि ती होईल. पण आपण जो उल्लेख केला त्या प्रमाणे या यंत्रणेची आवश्यकता आहे आणि तीच आवश्यकता पूर्ण करण्याचे काम आपण करीत आहोत. यानंतर ही यंत्रणा अधिक सक्षम आणि मेकॅनिझम विथ टीथ या पध्दतीची आपल्याला उभी करावयाची असेल तर तो विचार सुध्दा आपल्याला करता येईल. माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, या पध्दतीचा विचार करण्यामध्ये आपण संकोच करु नये. भविष्यामध्ये आपण या पध्दतीचा विचार अवश्य करावा. कारण लोकपाल बिल आल्यानंतर त्याच्या कार्यक्षेत्रामध्ये कोणाकोणाला आणत आहेत हे आपल्याला कळेल. दुसऱ्या राज्यामध्ये वॉरंट काढण्याचे, सिझर करण्याचे आणि बाकीचे किती तरी अधिकार लोक आयुक्तांना आहेत. त्यामुळे भ्रष्टाचार असो किंवा दुसरे काही प्रश्न असो

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

प्रा. फौजिया खान ....

त्यावर नियंत्रण आणण्यासाठी शक्तीमान मेकॅनिझम उभारण्याचे काम दुसऱ्या राज्यांनी केलेले आहे आणि हे आवश्यक आहे असे मला वाटते. आपल्याला जर पारदर्शक आणि गुड गव्हर्नन्स करावयाचे असेल तर माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण या बिलाला पाठिंबा द्यावा. या बिलाबद्दल आपण मनामध्ये भीती ठेवू नये. सभागृहाने सर्वसंमतीने हे विधेयक मंजूर करावे अशी मी विनंती करते. तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांना मी विनंती करते की, त्यांनी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत जो प्रस्ताव मांडलेला आहे तो मागे घ्यावा.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्रीमती शोभा फडणवीस ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदया, हा प्रस्ताव मांडत असताना आमचा उद्देश असा होता की, सदस्य या कोणत्याही भानगडीमध्ये नसतात. बँकेचा जो कायदा आला त्यामध्ये बँकेच्या डायरेक्टर बरोबर ज्यांचा बँकेशी डायरेक्ट संबंध नसतो अशा लोकांनी बैठकीला हजर राहून जर सही केली आणि उद्या जर बँकेमध्ये फ्रॉड झाला तर त्या सदस्याची किंवा डायरेक्टरची इस्टेट सुध्दा सीझ केली जाते. त्यामुळे आज बँकेच्या निवडणुकीमध्ये सुध्दा उभे राहण्याबाबत लोकांच्या मनात मोठ्या प्रमाणावर भीती निर्माण झालेली आहे. ग्रामपंचायत असेल, पंचायत समिती असेल, जिल्हा परिषद असेल, नगरपालिका असेल, महानगरपालिका असेल त्या ठिकाणच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती यांना घेतले आहे त्याबद्दल आमचे काही म्हणणे नाही. आमचे म्हणणे सदस्यांबद्दल होते. सर्वसाधारण सदस्यांचा कोठेच संबंध नसतो. अशा वेळी त्यांना आपण यामध्ये गोवण्याचा प्रयत्न करीत आहात. बँकेच्या कायद्याचा आता सगळीकडे प्रचार झालेला आहे त्याप्रमाणे उद्या ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये लोक उभे राहण्यास तयार होणार नाहीत. म्हणून माझी अशी सूचना होती की, यामध्ये सदस्यांना घेऊ नये. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, कायदा हा सर्वांसाठी असतो. कायदा करीत असताना तो कायदा केवळ बदमाशांसाठी असतो असे कोणी सांगितले ? कायदा हा कायदा असतो. कायदा आपल्याला जसा न्याय देण्याकरिता असतो तसा अन्याय करण्याकरिता सुध्दा असतो.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

कायदा केला म्हणून बदमाश आहोत असे नाही. कायदा हा सुरक्षेसाठी असतो. परंतु हा कायदा आमच्या सुरक्षेसाठी नाही. कायद्यांच्या सगळया गोतावळ्यामध्ये हा कायदा टाकलेला आहे हे योग्य वाटत नाही. राज्य मंत्री महोदयांनी केलेल्या विनंती नुसार मी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव मागे घेत असताना एवढेच सांगू इच्छिते की, या कायद्यातून सर्वसामान्य जनतेला चांगला मॅसेज जाणार नाही.

तालिका सभापती महोदया, हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी मी जो प्रस्ताव दिलेला आहे तो मागे घेण्यास मी सभागृहाची अनुमती मागते.

सभागृहाच्या अनुमतीने प्रस्ताव मागे घेण्यात आला.

**तालिका सभापती** : आता मी विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्न मतास टाकते.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

प्रा. फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : तालिका सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.प.वि. क्रमांक 2 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडते.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2011चे वि.प.वि. क्रमांक 2 संमत झाले आहे.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**वि.स.वि.क्रमांक 1 बाबत**

**तालिका सभापती** : आता वि.स.वि.क्र.1जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) विधेयक चर्चेसाठी घेण्यात येईल.

डॉ. नीलम गो-हे : तालिका सभापती महोदया, माननीय विरोधी पक्षनेते तसेच शिवसेना पक्षाचे गटनेते सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे सदर विधेयकाच्या संदर्भात माननीय सभापतींकडे चर्चा करण्यासाठी गेलेले आहेत. ती चर्चा चालू आहे. तेव्हा हे विधेयक आता लगेच घेऊ नये अशी माझी विनंती आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : या विधेयकाला सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी सुधारणा सुचविलेली आहे. ते आता सभागृहामध्ये नाहीत. त्यांना सुधारणा मांडावी लागणार आहे. या विधेयकावरील चर्चेला आता लगेच सुरुवात होईल याची त्यांना कल्पना नाही. तेव्हा 5 मिनिटासाठी सभागृहाची बैठक तहकूब करावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी तहकूब करण्यात येत आहे.

(सायंकाळी 6.14 ते 6.24 पर्यन्त सभागृहाची बैठक स्थगित झाली.)

----

**स्थगितीनंतर**

**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**

यानंतर 4 C-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>स्थगितीनंतर</u>**

**<u>सभापतीस्थानी माननीय उप सभापती</u>**

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महानगरपालिका आणि नगरपरिषदा (दुसरी सुधारणा) विधेयक.

**मु.शी.**:

L.A. BILL NO. XI OF 2011

( A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक 11 मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक 11 मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, हे ऐतिहासिक अशा प्रकारचे विधेयक आहे. देशामध्ये महाराष्ट्र राज्य हे महिलांना 33 टक्के आरक्षण देणारे पहिले राज्य ठरले. ज्यावेळी महिलांना 33 टक्के आरक्षण देण्यात आले त्यावेळी अनेक प्रकारच्या शंका कुशंका उपस्थित केल्या गेल्या होत्या. लोकशाहीमध्ये आपण संसदीय कार्यप्रणाली स्वीकारली असल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ज्या निवडणुका होतील त्या निवडणुकांमध्ये महिलांना 33 टक्के आरक्षण दिले तर तेथील कारभार महिला सक्षमपणे करु शकतील का अशा प्रकारची शंका उपस्थित केलेली होती. परंतु त्या शंकेला छेद

..2..

श्री.भास्कर जाधव......

देऊन महिला भगिनींनी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये उत्तम प्रकारे कारभार करुन दाखविला आहे.

**उप सभापती** : आजचे कामकाज संपेपर्यंत सभागृहाच्या कामकाजाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, यंदाचे वर्ष हे राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून साजरे होत आहे. या वर्षामध्ये केंद्र सरकारने सुध्दा महिलांना 50 टक्के आरक्षण देण्याचा विचार केलेला आहे, परंतु त्याला अंतिम स्वरुप येऊ शकलेले नाही. महाराष्ट्र राज्याने नेहमीप्रमाणेच एक पाऊल पुढे टाकण्याचा निर्णय घेतला.

नंतर 4डी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

आणि आता थेट निवडणुकीने भरण्यात येणाऱ्या एकूण पदांपैकी महिलांना 50 टक्के आरक्षण ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. महोदय, कामकाज पत्रिकेवर दाखविलेले विधेयक क्र. 11 व विधेयक क्र. 10 ही दोन्ही विधेयके महिलांना आरक्षण देण्याच्याच बाबतीत असल्याने ती दोन्ही एकत्रित चर्चेला घ्यावीत, अशी माझी विनंती आहे. त्यात फरक एवढाच आहे की, विधेयक क्र. 11 हे नगरपालिका व महानगरपालिका म्हणजेच नागरी क्षेत्रातील महिलांसाठी आहे तर विधेयक क्र. 10 हे जिल्हा परिषदा, पंचायत समित्या तसेच ग्रामपंचायत यांच्यासाठीचे आहे. खालच्या सभागृहात यातील एक विधेयक माननीय ग्रामविकास मंत्र्यांनी मांडले तर दुसरे विधेयक नगरविकास मंत्रालयाकडून मांडण्यात आले.

महोदय, हा निर्णय दि. 7 डिसेंबर, 2009 रोजीच्या बैठकीत घेण्यात आला असून त्यासंबंधीचे पत्र 1 जानेवारी, 2010 रोजी पाठविण्यात आलेले आहे. महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात महिलांचा सन्मान करण्यासाठी शासनाने हा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे या आरक्षणाच्या कायद्याप्रमाणे महिलांना केवळ सदस्यत्वासाठीच आरक्षण राहणार नाही तर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निर्माण होणाऱ्या पदांसाठी देखील 50 अक्के आरक्षण अशा अर्थाने हे विधेयक आणले आहे. आज आपल्या राज्यात पाहिले तर "अ" "ब" "क" "ड" वर्ग नगरपालिका व नगर पंचायती धरुन एकूण 226 इतकी संख्या आहे. तसेच "अ" "ब" "क" "ड" मिळून एकूण 23 महापालिका आहेत. अशा एकंदर 249 संस्थांमधील आरक्षण बघितले तर महापालिकांमध्ये एकूण 2212 वॉर्ड्स आहेत. त्यामध्ये सध्याच्या 1/3 या रेश्योप्रमाणे 744 महिलांसाठी आरक्षण होते. पण हेच आरक्षण या 50 टक्क्याप्रमाणे पाहिले तर 2212 च्या निम्मे 1106 वॉर्ड्समध्ये महिलांना आरक्षण मिळणार आहे. त्याच प्रमाणात पदाधिकारी सुध्दा होतील. दुसरी गोष्ट अशी की नगरपालिकांमध्ये देखील 50 टक्के महिला सदस्य म्हणून आणि पदावर सुध्दा त्याच रेश्योमध्ये जाऊ शकतील. तसेच हा कायदा अंमलात आल्यानंतर त्यात रोष्टर पध्दतीचा अवलंब करणे क्रमप्राप्त होईल तसेच इतरही समस्या निर्माण होतील त्यांचाही विचार करावा लागेल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव....

काही ठिकाणी 17 सदस्य संख्या आहे त्या सदस्य संख्येपेक्षा 50 टक्के कसे करावयाचे याचे सुध्दा सुत्र ठरवावे लागणार आहे. काही ठिकाणच्या पंचायत समितीमध्ये 5 सदस्य आहेत त्याचेही सूत्र ठरवावे लागणार आहे. निवडणुकी करिता वॉर्ड रचना कशी करावयाची हे सुध्दा ठरवावे लागणार आहे या सर्वांचा विचार पुढील काळात करावा लागणार आहे.

या विधेयकाच्या संदर्भात खालच्या सभागृहात चांगल्या प्रकारची चर्चा झालेली आहे व त्यासंदर्भातील विस्ताराने माहिती समोर आलेली आहे त्यामुळे अधिकची माहिती देऊन सभागृहाचा वेळ घेत नाही. या विधेयकाला सर्वांची मान्यता असल्यामुळे मी फार काही बोलणार नाही. परंतु आपण ब-याच वेळा बोलतो की, पुरुष प्रधान संस्कृती असल्यामुळे पुरुष महिलांना संधी देत नाही, पुरुष महिलांना पुढे जाऊ देत नाही. परंतु या सभागृहात पुरुष किती आहेत व महिला किती आहेत हे आपण बघावे. सभागृहात पुरुषांची संख्या जास्त असतांना सुध्दा आम्ही महिलांकरिता आरक्षण करीत आहोत. याचा अर्थ पुरुषांचा किती उदार दृष्टीकोन आहे हे आमच्या भगिनींनी समजून घ्यावे. आम्ही जसे आपल्याकरिता काही विचार करतो तसा आमच्या करिताही आपण विचार करावा. आपल्या देशाची संस्कृती ही साधू-संतापासून ऋषी-मुनींपासून आहे. महिलांना पुरुषांच्या बरोबरीनेच खूप मोठया मानाचे, खूप मोठया सन्मानाचे, अधिकाराचे व बरोबरीचे स्थान सातत्याने ठेवले आहे. आपली ही संस्कृती आहे, आपले हे संस्कार आहेत. त्या संस्काराचे व संस्कृतीचे पुन्हा पुन्हा दर्शन घडते आहे व त्याची सर्वांना प्रचिती येते आहे व त्या अर्थानेच हे विधेयक आणले आहे. पुढील काळात या विधेयकाच्या रुपाने आमच्या भगिनींना 50 टक्के आरक्षण मिळणार असल्यामुळे आम्ही मनापासून आनंद व्यक्त करतो व या विधेयकाला सभागृहाने एक मताने मान्यता द्यावी अशा प्रकारची विनंती करतो व माझे विचार थांबवतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक 11. मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठीच्या विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, महिलांना 33 टक्के आरक्षण मिळालेले आहे. महिला काम करु शकतील का असा सुरुवातीला संशय घेण्यात आला होता. परंतु महिलांनी स्वत:च्या कर्तृत्वाने मोठया प्रमाणात आघाडी घेतली. या विधेयकानुसार महिलांचे प्रमाण 33 टक्क्यावरुन 50 टक्क्यापर्यंत नेलेले आहे. आम्हाला ज्यावेळेस 33 टक्के आरक्षण मिळाले होते तेव्हा आमच्यापुढे कोणत्या अडचणी होत्या त्यावेळी आम्हाला कोणी विचारले नव्हते. यासंदर्भात आम्ही ज्या अडचणी मांडल्या होत्या त्यावर सुध्दा कोणी विचार केलेला नव्हता. 33 टक्के आरक्षण होते त्यावेळेस आम्हाला जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाचे पद रिझर्व्हेशनमध्ये मिळत असे व एक महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीचे पद मिळत असे. आता या विधेयकाच्या निमित्ताने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना 50 टक्के आरक्षण मिळणार आहे. त्यामुळे अध्यक्ष पुरुष असेल तर उपाध्यक्षाचे पद महिलेचे असले पाहिजे. अध्यक्ष महिला असेल तर उपाध्यक्ष पुरुष असला पाहिजे. 4 जिल्हा परिषदेच्या सभापतीमध्ये 2 जिल्हा परिषदेचे सभापती पद महिलांना 50 टक्क्यामध्ये मिळाले पाहिजे. आपण महिलांना 50 टक्के आरक्षण दिले परंतु आपण डिक्लेअर केलेले नाही की, 50 टक्के पदे आम्ही तुम्हाला देऊ असे सुध्दा म्हटलेले नाही. छुपेरुस्तम सारखे 50 टक्के दिल्यानंतर आम्ही खुश होऊन जाऊ. तिकडे मात्र आम्हाला अधिकार मिळणार नाहीत, असे व्हावयास नको आहे. त्यामुळे 50 टक्के पद आम्हाला सुध्दा मिळण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ..

या अगोदर महिलांना 33 टक्के आरक्षण देण्यात आले होते त्यावेळी काही महिला ग्रामपंचायतीच्या सरपंच झाल्या, पंचायत समितीच्या सभापती झाल्या आणि जिल्हा परिषदेच्या अध्यक्षासुध्दा झाल्या परंतु त्यांच्या संरक्षणाच्या संदर्भात कायद्यामध्ये कोणत्याही प्रकारची तरतूद करण्यात आली नाही. माझ्या भागातील एका ग्रामपंचायतीच्या महिला सरपंचाला सचिवांनी आमसभेमध्ये थोबाडीत मारली होती तेव्हा त्या सचिवाला कायद्यात अडकविण्यासाठी कोणती तरतूद आहे हे शोधण्यासाठी संपूर्ण रात्रभर आम्ही पोलीस स्टेशनमध्ये बसलो होतो. परंतु कायद्यात तरतूद नसल्यामुळे पोलिसांनी फक्त एन.सी.नोंदवली.महिलांचा सन्मान करण्यासाठी 33 टक्के आणि 50 टक्के आरक्षण दिले जाते परंतु दुस-या बाजूला मात्र एखाद्या सचिवांने वा एखाद्या कर्मचा-याने त्या महिलेच्या थोबाडीत मारल्यानंतर त्या आरक्षणाला काही अर्थ राहणार आहे काय ? असा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, 50 टक्के आरक्षण देण्यापूर्वी महिलांना संरक्षण देण्यासबंधी कायद्यामध्ये तरतूद करण्यात यावी असे मला सांगावयाचे आहे.जर एखादी व्यक्ती महिलांचा अपमान करीत असेल, शिवी देत असेल किंवा मारत असले तर त्याच्यावर कडक कारवाई करण्याची तरतूद कायद्यामध्ये असली पाहिजे. असे मला सांगावयाचे आहे. काही दिवसानंतर असेही म्हटले जाईल की, महिलांना 50 टक्के आरक्षण देण्यात आले आहे तेव्हा आता महिलांनी स्वतंत्रपणे लढवय्ये धोरण ठेवले पाहिजे. अशा प्रकारे जर लढवय्ये धोरण घरापासून सुरु झाले तर तुम्ही सुध्दा अडचणीत याल. तेव्हा 50 टक्के आरक्षण देत असताना संरक्षणाची जर तरतूद करण्यात आली तर त्याचा फायदा महिलांना मोठया प्रमाणावर होऊ शकेल.

सभापती महोदय, पूर्वी 33 टक्के आरक्षण देण्यात आले होते परंतु महानगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतीमध्ये महिलांची कोणत्याही प्रकारची व्यवस्था केलेली नव्हती.त्या ठिकाणी स्वच्छतागृहे नाहीत. काही ठिकाणी 33 टक्के महिलांसाठी फक्त एकच स्वच्छतागृह आहे.आता महिलांसाठी 50 टक्के आरक्षण ठेवण्यात आलेले असल्यामुळे स्वच्छतागृहांची संख्या वाढविण्यात आली पाहिजे. त्याचबरोबर दुपारच्या वेळी पाच दहा मिनिटे कोठेतरी बसावयाचे म्हटले तर त्याकरता हॉलची सोय नाही. त्यामुळे महिलांसाठी स्वतंत्र हॉल बांधण्यात आला पाहिजे.

सभापती महोदय, महिला हक्क व कल्याण समितीची मी सदस्या होती त्यावेळी राज्यातील

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ..

विविध महानगरपालिका, नगरपालिका जिल्हा परिषदा मध्ये जात होते . बाल कल्याण समितीच्या सभापती जरी महिला असल्या तरी तिला पाच ते दहा टक्के निधी द्यावयास पाहिजे होता परंतु हा निधी न देता आरोग्य खाते तो निधी खर्च करीत होते.अशा प्रकारे तिला पुरेसा निधी दिला जात नव्हता तसेच तिला अधिकारही दिले जात नव्हते असे मला त्यावेळी आढळून आले होते.म्हणून महिलांच्या अधिकारात वाढ करण्याची आवश्यकता आहे असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, सुरुवातीला मी नागपूर महानगरपालिकेमध्ये गेले होते तेव्हा माझ्या असे लक्षात आले होते की,महिला व बाल कल्याण समितीच्या महिला सभापतींना बसण्यासाठी स्वतंत्र केबिनच नव्हती. नंतर ती केबिन तयार करण्यात यावी असे आम्ही सबंधित अधिका-यांना सांगितले होते.त्याचबरोबर त्या ठिकाणी स्वच्छतागृह नव्हते आम्ही सांगितल्यानंतर स्वच्छतागृह बांधण्यात आले होते परंतु पुरुष आणि महिलांच्या स्वच्छतागृहासाठी एकच दरवाजा ठेवण्यात आला होता. अशा प्रकारची व्यवस्था महिलांसाठी जर करण्यात येत असेल तर ते योग्य नाही. असे मला म्हणावयाचे आहे.

सभापती महोदय, महिलांसाठी 50 टक्के आरक्षण देण्यात आलेले आहे असे जेव्हा सांगितले जाते तेव्हा महिलांसाठी संपूर्णपणे व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे असे मला सांगावयाचे आहे.त्याचबरोबर महिलांना 50 टक्के अधिकारसुध्दा देण्यात आले पाहिजेत. महिला व बाल कल्याण समितीच्या महिला सभापतींना सचिव देखील देण्यात आलेला नाही. त्या ठिकाणी एखादा डीआरडीएचा प्रोजेक्ट ऑफिसर किंवा दुसरा कोणता तरी अधिकारी तात्पुरत्या स्वरुपात दिला जातो. मिटींग झाल्यानंतर तो निघून होतो तेव्हा महिलांना जर काम करावयाचे असेल तर त्यांना स्वतंत्रपणे कायम स्वरुपाचा अधिकारी दिला पाहिजे. एखाद्या समितीचे सभापती म्हणून पुरुषांना जे अधिकार दिले जातात तेच अधिकार महिलांना देखील देण्याची आवश्यकता आहे. असे मला सांगावयाचे आहे. पुरुष प्रधान पध्दतीमध्ये महिलांना 50 टक्के आरक्षण देण्यात आले असून आम्ही तुमचा सन्मान करतो असे मघाशी सांगितले गेले परंतु या विधेयकामध्ये असा वास येतो की महिलांना 50 टक्के आरक्षण देत असतांना एखाद्या घरातील पुरुषाला जर निवडणुकीला उभे राहता येत नसेल तर त्याच्या ऐवजी त्याच्या घरातील महिला उभी राहील. पती ऐवजी जर पत्नी निवडणुकीला उभी राहत असेल तर चांगल्या कार्यकर्त्यांना स्थान मिळणार नाही.

नंतर श्री.सरफरे

अधोरेखित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

या ठिकाणी 50 टक्के महिला राजकारणात आल्या तर स्वच्छ आणि चांगले राजकारण होऊ शकते यावर सर्वांचा विश्वास आहे. दुसरी गोष्ट अशी की, महिला या पानठेल्यावर जात नाहीत, हॉटेलमध्ये जात नाहीत, त्यांना बाहेरचे कोणतेही उद्योग नसतात त्यामुळे या सभागृहामध्ये पूर्णवेळ बसण्याची जबाबदारी त्या पार पाडीत असतात. अशा प्रकारे या विधेयकावर बोलत असतांना किंवा त्या संबंधीच्या कायद्यामध्ये दुरुस्ती करीत असतांना आपल्याला महिलांना सक्षम करण्याची आवश्यकता आहे. महिलांना आपण 33 टक्के आरक्षण दिले परंतु त्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली काय, महिलांना कायद्याचे पूर्ण प्रशिक्षण दिले काय? ते प्रशिक्षण त्यांना मिळणे अतिशय गरजेचे आहे. आपल्याला कोणते अधिकार आहेत हे जोपर्यन्त महिलेला समजणार नाही तोपर्यन्त ती आपल्या पदाचा वापर करु शकणार नाही. म्हणून महिलांना राजकारणामध्ये निवडून आल्यानंतर प्रशिक्षण देण्याची गरज आहे, त्यांना कायद्याचे ज्ञान देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, ग्रामपंचायतीच्या सभेमध्ये ग्राम सचिवांचे पहिले काम हे शासकीय कागदपत्रे वाचनाचे असते परंतु ती कागदपत्रे त्याच वेळी सरपंच महिलेला दाखविली जातात. ग्रामपंचायतीमध्ये करण्यात आलेल्या महिनाभराच्या खर्चाचा ताळेबंद आठ दिवस अगोदर सरपंचाला दाखविणे आवश्यक आहे. त्या सरपंच महिलेने त्याचा अभ्यास केल्यानंतर तो ग्राम सभेमध्ये मांडण्यात आला पाहिजे. तो ताळेबंद सुध्दा महिला सरपंचाला आठ दिवस अगोदर न दाखविता त्याच वेळी तिच्यासमोर ठेवला जातो. तेव्हा ही माहिती त्या महिला सरपंचाला आठ दिवस अगोदर मिळाली तर तिला आपले अधिकार त्या ठिकाणी वापरता येतील. ते अधिकार मिळण्याकरिता या 50 टक्के आरक्षणाबरोबर तिला प्रशिक्षण देण्याची देखील आपण व्यवस्था करावी, महिलांना सक्षम करण्याची व्यवस्था करावी. तसे केले तरच खऱ्या अर्थाने या महिलांचे राजकीय, सामाजिक सक्षमीकरण होईल. जिल्हा परिषदांमध्ये, नगरपालिकांमध्ये महत्वाची पदे उपभोगतांना त्यांना प्रशिक्षण मिळाले तर त्या सक्षम होतील आणि हे विधेयक आणल्याचे महत्व आपल्याला पटेल. आपण हे विधेयक आणल्याबद्दल शासनाला धन्यवाद देऊन मी माझे विचार संपविते.धन्यवाद.

**उप सभापती** : अगोदर ठरल्याप्रमाणे या विधेयकावर पुरुष सदस्यांनी न बोलता फक्त महिला सदस्यांनीच बोलावयाचे आहे. एक जरी माननीय सदस्य बोलले तरी सर्व माननीय सदस्यांना बोलण्याची संधी द्यावी लागेल. आता माननीय समिती, प्रमुख विशेष हक्क समितीचा प्रस्ताव मांडतील.

-----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे

श्री. अरुण गुजराथी (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी प्रस्ताव प्रस्तुत करतो की, महाराष्ट्र विधानपरिषद विशेष हक्क समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,

1) श्री. पांडुरंग फुंडकर, मा. विरोधी पक्षनेते, विधानपरिषद यांनी श्री. श्रीनिवास कर्वे, सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण,

2) श्री. पांडुरंग फुंडकर, मा. विरोधी पक्षनेते, विधानपरिषद यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण,

या दोनही प्रकरणांवरील विशेष हक्क समितीचे अहवाल सादर करण्याकरिता म.वि.प. नियम 178(1) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यन्त मुदत वाढवून देण्यात यावी.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या विशेष हक्क समितीवर एक सदस्य म्हणून मी काम करीत आहे. त्याचप्रमाणे माननीय सदस्य श्री. संजय केळकर हे देखील काम करीत आहेत. सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत त्यांना मला सांगावयाचे आहे की, श्री. कर्वे नावाचे अधिकारी इतके मगरुर आहेत की, त्यांची कुठेही बदली झाली तरी ते हायकोर्टामध्ये जाऊन त्याला स्थगिती मिळवितात. इतकेच नव्हेतर विशेष हक्क समितीने त्यांना बोलाविल्यानंतर देखील ते समितीपुढे येण्यास तयार होत नाहीत, ते विशेष हक्क समितीचा अशाप्रकारे अवमान करतात. तेव्हा अशाप्रकारच्या अधिकाऱ्यामध्ये वाढलेल्या प्रवृत्तीला आळा घालावयाचा असेल तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. हा अधिकारी मागासवर्गीय लोकांच्या बाबतीत वेगळया पध्दतीने त्यांच्याकडे पहातो, त्यांच्याशी वागतो आणि म्हणून या अधिकाऱ्याला शासन म्हणून त्याची दुसरीकडे बदली झाली पाहिजे. त्याची झालेली बदली स्थगित करण्याचे काम तो वेगवेगळया माध्यमातून करतो. त्याला मदत करणारे काही अधिकारी आपल्याकडे आहेत. तेव्हा यामध्ये आपण जातीने लक्ष घालावे अशी मी विनंती करतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . .. 18:50

**पृ.शी.**: सुझलॉन एनर्जी प्रा.लि.च्या वतीने महाराष्ट्र विधान परिषदेच्या कामकाजावर टीकाटिप्पणी करणारा मजकूर प्रसिध्द करणे

**मु.शी.**: सुझलॉन एनर्जी प्रा.लि.च्या वतीने महाराष्ट्र विधान परिषदेच्या कामकाजावर टीकाटिप्पणी करणारा मजकूर प्रसिध्द करणे याबाबतचा विशेष हक्क समितीचा अहवाल विचारात घेणे व अहवालास अनुलक्षून प्रस्ताव

श्री.अरुण गुजराथी (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "दिनांक 10 जून 2009 रोजी विधान परिषदेत झालेल्या चर्चेनंतर दैनिक लोकसत्ताच्या दिनांक 12 जून 2009 रोजीच्या अंकात सुझलॉन एनर्जी प्रा.लि.च्या वतीने काढण्यात आलेल्या प्रसिध्दी पत्रकात सुझलॉनचे आजवरचे यश हे केवळ आमच्या पवन ऊर्जा क्षेत्रातील आकडयांचे नसून एकूणच जागतिक उद्योग-व्यवसाय क्षेत्रात एक कर्तव्यदक्ष व सामाजिक जाणिवेचे भान असलेली कंपनी असा सुझलॉनचा सार्थ लौकिक आहे.असे असतांनाही काही असामाजिक प्रवृत्ती आपल्या क्षुद्र वैयक्तिक स्वार्थापोटी कंपनीवर बिनबुडाचे आरोप करु पाहत आहेत असा महाराष्ट्र विधान परिषदेच्या कामकाजावर टीकाटिप्पणी करणारा मजकूर प्रसिध्द केल्यामुळे उद्‌भवलेल्या महाराष्ट्र विधान परिषद सदस्यांच्या विशेषाधिकार भंगाच्या व सभागृहाच्या अवमानाच्या प्रकरणा संदर्भातील विशेष हक्क समितीचा अहवाल विचारात घेण्यात यावा."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : अहवाल विचारात घेण्यात आला आहे. आता माननीय मुख्यमंत्र्यांनी प्रस्ताव मांडावा.

श्री.पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी प्रस्ताव मांडतो की,"दिनांक 10 जून 2009 रोजी विधान परिषदेत झालेल्या चर्चेनंतर दैनिक लोकसत्ताच्या दिनांक 12 जून, 2009 रोजीच्या अंकात मे.सुझलॉन एनर्जी प्रा.लि.च्या वतीने काढण्यात आलेल्या प्रसिध्दी पत्रकात सुझलॉनचे आजवरचे यश हे केवळ आमच्या पवन ऊर्जा क्षेत्रातील आकडयांचे नसून एकूणच जागतिक उद्योग-व्यवसाय क्षेत्रात एक कर्तव्यदक्ष व सामाजिक जाणिवेचे भान असलेली कंपनी असा सुझलॉनचा सार्थ लौकिक आहे. असे असतानाही काही असामाजिक प्रवृत्ती आपल्या क्षुद्र ......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण . . . .

वैयक्तिक स्वार्थापोटी कंपनीवर बिनबुडाचे आरोप करु पाहात आहेत"असा महाराष्ट्र विधान परिषदेच्या कामकाजावर टीकाटिप्पणी करणारा मजकूर प्रसिध्द केल्यामुळे उद्‌भवलेल्या महाराष्ट्र विधान परिषद सदस्याच्या विशेषाधिकार भंगाच्या व सभागृहाच्या अवमानाच्या प्रकरणा संदर्भातील विशेष हक्क समितीचा अहवाल विचारात घेतल्यानंतर हे सभागृह सदर अहवालातील निष्कर्षांशी सहमत असून असा ठराव करीत आहे की,"मे.सुझलॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. कंपनीने प्रांजळपणे मान्य केलेली चूक व व्यक्त केलेली निसंदिग्ध दिलगिरी तसेच ज्या वृत्तपत्रात कंपनीने आक्षेपार्ह मजकूर असलेले पत्रक प्रसिध्द केले होते त्याच वृत्तपत्रात जाहीरपणे ठळक व नि:संदिग्ध दिलगिरी व्यक्त केल्याची बाब व भविष्यात असा प्रकार घडणार नसल्याची दिलेली ग्वाही विचारात घेता सभागृहाने औदार्य दाखवून हे प्रकरण येथेच संपवावे."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ प्रथम सौ. रणदिवे.... 18:50

**पृ.शी.**: महानगरपालिका आणि नगरपरिषदा (दुसरी सुधारणा) विधेयक.

**मु.शी.**:

L.A. BILL NO. XI OF 2011

( A BILL LFURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

( चर्चा पुढे सुरु )

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, ऐतिहासिक अशा महिलांच्या आरक्षणाच्या संदर्भात एक विधेयक सभागृहात चर्चेसाठी आले आहे. ऐतिहासिक अशा प्रकारचे हे विधेयक आहे. भविष्यात या विधेयकात काही सुधारणा करण्यात येणार नाहीत किंवा यासंदर्भातील नवीन विधेयक येण्याची शक्यता नाही. त्यामुळे भविष्यात असे होऊ नये की, या विधेयकाच्या संदर्भात पुरुषांची काही नाराजी होती की काय म्हणून पुरुष सदस्य या सदनामध्ये या विधेयकावर काही बोलले नाहीत आणि महिला सदस्यांनीच हे विधेयक पारित करुन घेतले..

श्री. जयंत प्र. पाटील : महिलांच्या सन्मानार्थ या विधेयकावर केवळ महिला सदस्यांनी चर्चेत भाग घ्यावा असे सभागृहात ठरलेले आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : महिलांच्या सन्मानार्थ आपण असा निर्णय घेतला असला तरी हा सन्मान रेकॉर्डवर आला नाही तर उद्या पाचशे वर्षानंतर असे म्हटले जाईल की, महिला विधेयकाच्या बाबतीत पुरुषांनी नाराजी दाखविली होती. सभापती महोदय, आजच्या महिला विधेयकाच्या संदर्भातील सगळे क्षण ऐतिहासिक क्षण म्हणून जमा होणार आहेत.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांना मी एवढेच सांगू इच्छितो की, सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊनच हा निर्णय सभागृहात घेण्यात आलेला आहे. आज सभागृहात महिला आरक्षणाच्या विधेयकावर चर्चा होणार असल्यामुळे महिलांचा तो सन्मान आहे, त्याला आपण सर्वजण कारणीभूत आहोत. त्यामुळे त्यांच्या सन्मानार्थ फक्त त्यांनाच भाषणे करु द्यावीत, अशा प्रकारचा निर्णय घेण्यात आला आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, या विधेयकावर मला बोलावयाचे आहे.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**उप सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांना या विधेयकावर बोलावयाचे आहे काय?

अनेक सन्माननीय सदस्य : होय.

**उप सभापती** : ठीक आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आज सगळया भगिनींना या विधेयकावर त्यांचे विचार मांडू द्यावेत. त्यानंतर हे विधेयक ऑन लेग ठेवण्यात यावे आणि ज्या सन्माननीय पुरुष सदस्यांना या महिला विधेयकाच्या बाबतीत शुभेच्छा द्यावयाच्या आहेत, त्यांना आपल्या शुभेच्छा देण्यासाठी किमान अर्धा-तास वेळ उद्या देण्यात यावा आणि उद्याच हे विधेयक मंजूर करण्यात यावे.

**उप सभापती** : हे विधेयक उद्यावर ढकलण्यात येणार नाही. जी चर्चा करावयाची आहे ती आजच करण्यात यावी.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, या विधेयकाच्या संदर्भात मला या ठिकाणी एक विनंती करावयाची आहे. अत्यंत ऐतिहासिक असे हे विधेयक आहे. मुळात हा समाजाचा प्रश्न आहे. केवळ स्त्रियांचा प्रश्न नाही. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी म्हटल्याप्रमाणे या विधेयकाला सन्माननीय पुरुष सदस्यांनी सुध्दा पाठिंबा दिला पाहिजे. सन्माननीय पुरुष सदस्य कमी वेळात बोलणार असतील तर आमची त्याला काही हरकत नाही. पण निदान महिला सदस्यांना बोलण्यासाठी अधिक वेळ दिला पाहिजे, अशी माझी विनंती आहे. पाच ते दहा मिनिटात या विधेयकावर बोलणे शक्य होणार नाही.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, गुलामाला गुलामीतून मुक्त करण्यात येत असताना मी तुला गुलामीतून मुक्त केले आहे, अशी सारखी जाणीव करुन दिली जात होती. सभापती महोदय, तशा पध्दतीने या गुलामीच्या भावनेतून या आरक्षण विधेयकाकडे बघितले जात नाही.

मी सर्व प्रथम दोन्ही सदनाचे, सर्व पक्षाचे सन्माननीय गट नेते, सन्माननीय मुख्यमंत्री,सन्माननीय उप मुख्यमंत्री, माननीय सभापती, माननीय अध्यक्ष, शिवसेनेचे सन्माननीय नेते, भारतीय जनता पक्षाचे सन्माननीय नेते या सगळयांचे मन:पूर्वक आभार मानते.

श्री. भास्कर जाधव : आमचे देखील आभार मानावेत.

डॉ. नीलम गोऱ्हे :सभापती महोदय, मी सन्माननीय राज्य मंत्र्यांचे देखील आभार मानणार आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्हाला माननीय मंत्री महोदयांचे आभार मानावयाचे नाहीत. त्याचे कारण असे की, या सभागृहामध्ये प्रा. वर्षा गायकवाड व प्रा. फौजिया खान अशा दोन महिला मंत्री आहेत. आपण त्यांना मोठ्या मनाने हे विधेयक मांडण्याचा अधिकार द्यावयास पाहिजे होता. एरवी एखादे मंत्री उपस्थित नसताना इतर कोणत्याही मंत्र्यांना विधेयक मांडण्यास सांगतो तसा मोठेपणा आपण दाखवू शकला नाहीत.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, देणे आणि घेणे या दोन गोष्टींमध्ये अंतर आहे आणि मिळविणे ही गोष्ट सुध्दा यामध्ये आहे. सगळ्यात प्रथम मी कृतज्ञता आणि आभार व्यक्त करीन. आतापर्यंत जागतिक महिला आंदोलनापासून महाराष्ट्रापर्यंत आणि एका छोट्या खेड्यातील सरपंच महिलेच्या जीवनामध्ये जे जे बदल झाले ते जर आपण पहावयास लागलो तर जरी खूप तपशिलात गेलो नाही तरी काही घोषणा आणि स्त्रियांच्या मनातील काही आकांक्षा गेल्या 35 वर्षामध्ये स्पष्ट होत गेल्या. महिला सरपंच झाल्यावर किंवा महापौर झाल्यावर स्त्रियांची अपेक्षा होती की, दिल्ली, मुंबईत आमचे सरकार आणि आमच्या गावामध्ये आम्हीच सरकार. आमच्या गावामधील कारभार, आमच्या शहरामधील कारभार आम्हाला बघता यावा, या दृष्टीकोनातून मोठ्या प्रमाणामध्ये स्त्रिया निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ लागल्या. त्यासोबत दुसरी अपेक्षा अशी आहे की, महिलांना प्रशिक्षण आवश्यक आहे. महिला असो किंवा पुरुष असो, सभागृहात कसे वागावयाचे, अजेंडा कसा वाचावयाचा, काम कसे करावयाचे, वक्ता म्हणून कसे बोलावयाचे, गावामध्ये गेल्यावर तेथील प्रश्न कसे सोडवून घ्यावयाचे, विरोध झाला तर त्याचा मुकाबला कसा करावयाचा, निधी कसा वापरावयाचा, अशा अनेक प्रश्नांसाठी प्रशिक्षण अत्यावश्यक असते याची आपल्याला जाणीव आहे. ज्यावेळेला एकतृतीयांश आरक्षण आले तेव्हापासून मोठी वाटचाल पूर्ण करुन आपण 50 टक्के आरक्षणापर्यंत आलेलो आहोत. परंतु काही वेळा असा प्रश्न पडतो की, स्त्रियांना आरक्षण पाहिजे, आम्ही आरक्षण मागतो, निर्णय प्रक्रियेत महिलांची संख्या वाढत आहे, पण त्यातून स्त्रियांच्या प्रश्नांचा अजेंडा किती प्रमाणात पुढे जात आहे याचा देखील विचार करण्याची वेळ आलेली आहे.

पंचायती राज व्यवस्था किंवा महानगरपालिका असतील, जिल्हा परिषदा असतील त्यांच्या अधिकारांचा संकोच होत असताना, त्या बाबतीत बंधने येत असताना, विशेषत: ज्या महिला निवडून

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

डॉ. नीलम गोऱ्हे .....

येत आहेत त्यामध्ये मला दोनतीन प्रकारच्या स्त्रिया दिसतात. एक म्हणजे सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी उल्लेख केल्याप्रमाणे ज्यांच्या कुटुंबामध्ये काही राजकीय वारसा आहे अशा स्त्रिया मोठ्या प्रमाणात राजकारणात आलेल्या दिसतात. खरे सांगावयाचे तर आमच्याकडे पश्चिम महाराष्ट्रामध्ये अशी पध्दतच झाली आहे की, कोणी खासदार असेल तर त्यांची पत्नी नगराध्यक्ष असते. असा एक पॅटर्नच तयार झालेला आहे. खासदार पत्नी, आमदार पत्नी नगराध्यक्ष होतात, अशा पध्दतीने सगळी वाटचाल चाललेली आहे. त्याचा परिणाम असा झाला की, राजकीय पक्षांना सुध्दा मोठ्या प्रमाणामध्ये आपल्या पक्षाची पुनर्रचना करणे भाग पडले आणि त्यामध्ये राजकीय वारसा असलेल्या स्त्रियांना जसे स्थान दिले त्याचप्रमाणे ज्यांना राजकीय वारसा नाही अशा स्त्रियांना जर स्थान दिले नाही तर ज्या सामान्य कार्यकर्त्या आहेत त्यांच्या मनामध्ये कोठे तरी दुजाभाव निर्माण होईल आणि तशी भावना वाटत राहील.

सभापती महोदय, स्त्रियांना आरक्षण मिळाले म्हणजे एका अर्थाने सर्व अडथळ्यांमधून मुक्तता मिळाली असे अजिबात म्हणता येणार नाही. हिंसाचार, पैशाच्या अडचणी आणि चारित्र्यहनन या तीनही गोष्टींमधील बरेचसे प्रश्न अनेक स्त्रियांना जाणवतात. परंतु मला सांगितले पाहिजे की, उपेक्षा, उपहास आणि आत्मसात करणे या तीनही गोष्टींमधून हे महिला आरक्षणाचे विधेयक आलेले आहे. सुरुवातीच्या काळात जेव्हा महिला काम करावयाच्या तेव्हा नेहमीच त्या विनोदाचा विषय राहिलेल्या आहेत. आज सुध्दा त्यांच्या अज्ञानाबद्दल बरीच टीकाटिप्पणी होत असताना बघतो. मध्यंतरी एक सर्वेक्षण झाले, अभ्यास झाला. त्या अभ्यासकाला विचारले की, महिलांना आरक्षण मिळाल्यावर महिलांमध्ये काय फरक झाला ? त्या अभ्यासकाने जे सांगितले त्या बाबत आपले मतभेद असू शकतात पण त्या अभ्यासकाने त्याचे असे मत मांडले की, स्त्रिया आरक्षण मिळेपर्यंत फुलपाखरासारख्या होत्या आणि आरक्षण मिळाल्यानंतर सापासारख्या झाल्या. म्हणजे समाजामध्ये लोकांचा असा एक दृष्टीकोन झालेला आहे की, जी स्त्री स्वत:च्या अधिकाराबद्दल बोलते ती जणूकाही सापासारखी आहे आणि महिलांना जोपर्यंत आरक्षण मिळाले नव्हते तोपर्यंत त्या फुलपाखरासारख्या होत्या. आयएसएसटी, बंगलोर या ठिकाणी लोकांची जी मने समजून घेत आहेत त्यामध्ये तसे आलेले आहे. म्हणजे लोकांना आरक्षण मिळाल्यावर ...

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. दिवाकर रावते : महाराष्ट्रामध्ये असे कोणी म्हणाले नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे : महाराष्ट्रामध्ये असे कोणी म्हणाले नाही परंतु सांगण्याचा मुद्दा असा आहे की, बऱ्याच लोकांना महिलांचे आरक्षण पसंत नाही. अनेक वेळेला महिलांच्या निर्णय प्रक्रियेला मर्यादा असतात. अनेक वेळेला त्यांना माहिती नसते तसेच त्यांच्या अज्ञानाचा दुरुपयोग करुन घेतला जातो. इतकेच नव्हे तर काही वेळा त्यांची फसवणूक सुध्दा केली जाते. म्हणून मला या ठिकाणी असा मुद्दा मांडावासा वाटतो की, स्त्रियांना जे आरक्षण मिळाले आहे ते आरक्षण स्त्रियांना विकासासाठी संधी मिळावी यासाठी जसे आहे तसेच मला नेहमी असे वाटते की, पुरुषांच्या मनात कोठे तरी असुरक्षितता निर्माण व्हावी किंवा पुरुषांना असे वाटावे की, आता आमचे काय होणार, हा त्याचा हेतू नाही. म्हणून सुरुवातीच्या काळात जरी उपेक्षा झाली असली तरी नंतरच्या काळात उपहासाला तोंड देत देत आज बऱ्याच ठिकाणी स्त्रिया चांगली कामे करीत आहेत.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. बरवड 19:00

डॉ. नीलम गो-हे....

एक गोष्ट मान्य करायला पाहिजे की, पत्नी सरपंच असेल तर तिच्या सोबत येणा-या पती बद्दल बरेच काही बोलले जाते. पुणे महानगरपालिकेमध्ये मध्यंतरी अशी चर्चा झाली की, नगरसेवक महिला असो अथवा पुरुष असो ते कार्यालयात आले तर त्यांना बसायला खुर्ची मिळते. परंतु नगरसेविके बरोबर तिचा पती आला तर त्याला बसायला खुर्ची मिळेलच असे नाही. त्यामुळे त्यासंबंधीचा जीआर काढण्याची वेळ आली. प्रत्येक वेळी नगरसेविकेबरोबर तिचा पती येऊन कारभार करणार असेल तर त्याबाबतीत बंधन घालण्याची वेळ आलेली आहे. दुसरे चित्र असे दिसते की, गावामध्ये पती आपल्या सरपंच असलेल्या पत्नीला सायकलवरुन आणताना दिसतो त्यावेळी त्याबाबतीत वाईट हेतूने बोलले जाते. महिलांसाठी आरक्षण करताना त्या त्या पक्षाची जबाबदारी वाढलेली आहे. राजकीय पक्षांनी स्त्रियांचे प्रशिक्षण करण्याबरोबरच कोणता निर्णय चुकीचा होऊ शकतो, कोणता निर्णय बरोबर असतो, लोकसभेमध्ये कोणते निर्णय घेतले जातात, राज्यसभेमध्ये कोणते निर्णय घेतले जातात, त्याचप्रमाणे विधानसभा आणि विधानपरिषदेमध्ये कोणते निर्णय घेतले जातात याची माहिती महिलांना देणे आवश्यक आहे. स्त्रियांना जेव्हा पदे दिली जातात त्यावेळी त्यांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. अनेक गावामध्ये महिला सरपंचाना झेंडा वंदन करु दिले जात नव्हते. त्या ठिकाणी उप सरपंच झेंडा वंदन करीत होते. त्याबाबतीत शासनाला जी.आर. काढावा लागला होता. महिला पदाधिका-यांवर चुकीच्या पध्दतीने अविश्वासाचे ठराव आणले जातात. स्त्रियांची अनेक ठिकाणी नाकेबंदी करण्यासाठी या अविश्वासाच्या प्रस्तावाचा हत्यार म्हणून वापर केला जातो. याबाबतीत तत्कालीन मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी आणि त्यानंतरचे मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी वेळोवेळी निर्णय घेतलेले आहेत की, अशा प्रकारे महिला पदाधिका-यांवर अविश्वासाचे ठराव आणले जाणार नाहीत.

सभापती महोदय, महानगरपालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुकांमध्ये मतदारसंघाचे आरक्षण करताना रोस्टर पध्दतीचा अवलंब केला जातो. एससी, ओबीसी, सर्वसाधरण महिला, सर्वसाधारण पुरुष असे मतदारसंघाचे आरक्षण होत असताना त्यामध्ये सतत बदल घडत असतात. त्यामुळे कोणत्या मतदारसंघामध्ये कुणाला तिकीट द्यायचे हे पक्षश्रेष्ठी सुध्दा ठरवू शकत नाहीत. कारण निवडणुकीच्या आधी तीन-चार महिने हे आरक्षण जाहीर होते. स्टेशनला ट्रेन आल्यानंतर

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे....

कोणता डबा कोठे लागणार याची माहिती नसली की धावपळ करुन पटकन डबा पकडावा लागतो त्याप्रमाणे आरक्षण लागल्यानंतर पक्षाना उमेदवाराच्या बाबतीत घाईघाईने निर्णय घ्यावे लागतात. ज्या महिला चांगल्या त-हेने काम करतात त्यांच्यासाठी मतदारसंघाचे आरक्षण नसेल तर त्यांना संधी मिळत नाही. गेल्या 18 वर्षामध्ये लक्षावधी महिला सरपंच, महापौर झाल्या. परंतु त्यामधील किती जणींना राजकारणामध्ये टिकण्याची संधी मिळाली हे पाहिले तर त्यातील 50 टक्के सुध्दा स्त्रिया राजकारणामध्ये टिकू शकलेल्या नसल्याचे दिसून येते.

स्त्रियांच्या आरक्षणासंबंधी चर्चा सुरु झाली त्यावेळी स्त्रियासंबंधीचा राजकारणातील विरोध वाढत गेला. याचे कारण असे आहे की, विधानसभा, विधानपरिषद त्याचप्रमाणे लोकसभा आणि राज्यसभा यामध्ये आरक्षण आले तर आजची महापौर असणारी महिला, जिल्हा परिषदेची अध्यक्ष असलेली महिला पुढे विधानसभेत आणि लोकसभेत जाईल असा एक विचार त्या विरोधाच्या पाठीमागे असतो. मग एखादी महत्वाकांक्षी आणि चांगले काम करणारी महिला असेल तर तिला सर्व स्तरावर विरोध करुन, तिची नाकेबंदी करुन तिला जमीनदोस्त कसे करता येईल असे देखील प्रयत्न केले जातात. आपल्या राज्यामध्ये मोठ्मोठया पदांवर स्त्रियांनी कामे केलेली आहेत. त्या पैकी किती स्त्रियांना पुनश्च संधी मिळालेली आहे ? सांगायला अतिशय वाईट वाटते की, ज्या कर्तृत्ववान महिलांनी त्या काळामध्ये काम केले त्यांच्या अनुभवाचा फायदा घेतला गेला नाही. याचे कारण महिलांसाठीचे आरक्षण विधेयकात केले परंतु त्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था मात्र केलेली नाही. महिलांसाठी आरक्षण करताना त्यांना संरक्षण देण्याची देखील गरज आहे. मी गावाचे नाव घेणार नाही. पण त्या गावच्या नगराध्यक्ष खूप चांगले काम करीत होत्या, त्या स्थानिक नेत्यांचे ऐकत नव्हत्या. त्यामुळे तेथील स्थानिक पुढा-यांनी त्या महिला नगराध्यक्षांचे चारित्र्यहनन करण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारची अनेक उदाहरणे देता येतील. विरोधकांकडून थोबाडीत मारणे हा वेगळा प्रकार आहे.

अशुध्दप्रत/प्रसिध्दीसाठी नाही

...नंतर श्री. गिते...

ABG/ प्रथम श्री. शिगम 19:10

डॉ.नीलम गोऱ्हे...

परंतु स्वत:च्या पक्षामध्ये महिलेची कोंडी करणे अशी उदाहरणे मी ऐकली आहेत. अशी उदाहरणे मी स्वत:च्या डोळयांनी बघितली आहेत. अशा वेळी महिलांना कशी मदत करतो हा एक प्रश्न पडतो. फलटण तालुक्यात खुंटे नावाचे गाव आहे. तेथे झेंडावंदनाच्या दिवशी गावातील वादामधून महिला सरपंचास चप्पलेने मारण्याचा प्रसंग घडला. खरे तर महिला सरपंच, ग्रामपंचायत सदस्य या शासकीय प्रतिनिधी आहेत. अशा घटना घडतात, त्यावेळी पोलिसांनी स्वत:हून संबंधितांवर गुन्हे दाखल केले पाहिजे. पण यासाठी महिलांना फार मोठी वाटचाल करावी लागते. हा दिवस रडगाणे गाण्याचा नाही. मला असे वाटते की, महिलांना आरक्षण मिळाल्यावर अधिकाराची तसेच वक्कृत्व कौशल्य, लिखाण, वाचन या संदर्भातील आवड जर निर्माण झाली तर राजकारणामध्ये त्या तग धरु शकतील. महिलांचा उपयोग केवळ एक संख्या म्हणून केला जातो. महिलांना 33 टक्के आरक्षण होते, ते 50 टक्क्यांपर्यंत केले. महिलांना असे बोलण्यास वाव नाही की, आम्ही थोडया संख्येने होतो. म्हणून आम्हाला निर्णय घेता आला नाही.

सभापती महोदय, लोकसभा, राज्यसभा, विधानसभा आणि विधान परिषद या ठिकाणी कोणत्या पध्दतीने आरक्षण आणावयाचे यासंबंधी वाद असला तरी आज महिलांची संख्या सर्व क्षेत्रात नगण्य आहे असे आपल्याला दिसून येते. ही संख्या फक्त 8 टक्के एवढीच आहे. महिलांना लोकसभा, विधानसभा, राज्यसभा आणि विधान परिषद या ठिकाणी संधी देता येत नाही म्हणून मोबदला म्हणून 50 टक्के आरक्षण दिले आहे की काय असे वाटते. तुम्ही तेवढयापुरतेच थांबा, त्याच्या पलीकडे तुम्ही येवू नका. मी शिवसेना पक्षातील चित्र सांगते की, मुंबई महानगरपालिकेमध्ये 33 टक्क्यांपेक्षा जास्त महिला निवडून आलेल्या आहेत. सर्वसाधारण जागेवर सुध्दा अनेक महिलांना तिकीटे द्यावी लागली. त्याचे कारण असे आहे की, त्या महिला नगरसेविकांचे कार्य असे होते की, सर्वसाधारण जागेवर त्यांना तिकिटे दिली तर त्या महिला निवडून येतील. मुंबई, संभाजीनगर या महानगरपालिकांमध्ये 40 ते 50 टक्क्यांपर्यंत महिलांना निवडणुकीची तिकिटे दिली गेली. महिलांची वाटचाल ही 50 टक्क्यांकडे चाललेली होती. मला असे सांगावयाचे आहे की, या सगळया पार्श्वभूमीवर महिला विरुध्द पुरुष असा लढा नाही. मघाशी माननीय राज्यमंत्री श्री. भास्करराव जाधव असे म्हणाले की, तुम्ही आमचा उल्लेख करा. मी तर यापुढे जाऊन म्हणेन की, हा मानव मुक्तीचा प्रश्न आहे. त्या दृष्टीकोनातून पुरुष वर्गाचे सहकार्य घेतल्या शिवाय महिला

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

राजकारणात काम करु शकत नाहीत. परंतु ज्या वेळेला हितसंबंधाचा संघर्ष येतो, त्यावेळेला जशी दलित,दलितेत्तरामध्ये जात निघते, तशी त्या महिलेची महिला म्हणून जात निघते, ही वस्तुस्थिती आहे. म्हणून मला या ठिकाणी सांगावयाचे आहे की, पुरुषांचे सहकार्य आहे. पुरुषांनी जे दिलेले आहे, ते पुरुष म्हणून दिलेले नाही. तुम्ही राजकारणातले नेते म्हणून दिलेले आहे. राजकारणतले नेते म्हणून देत असताना तुम्हाला संख्येचा विचार करावा लागतो की, महिलांची 50 टक्के मते आहेत. म्हणून या प्रेमाबरोबर महिलांच्या प्रेमाच्या सत्तेची जाणीव कुटुंबामध्ये, समाजामध्ये तसेच राजकारणामधील पक्ष ठेवतील, तेवढा त्याचा जास्तीत जास्त उपयोग होईल. महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, प्रबोधनकार ठाकरे यांच्या विचारांनीच महिलांनी काम करावे अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, शेवटी मी एवढेच म्हणेन की, प्रबोधनाच्या परंपरेची जाणीव यामधून आलेल्या महिलांची कशी राहील हे बघणे आवश्यक आहे. एका हॉस्टेलला सावित्रीबाई फुले यांचे नाव दिले होते. त्यावेळी एक महिला दुसऱ्या महिलेला विचारीत होती की, "Who is Savitribai Phule." आणि दुसरी त्या महिलेस सांगत होती की, "She must be relative of Nilu Phule " त्या दोन महिला इंग्रजीमध्ये एकमेकाशी बोलत होत्या. त्याचे मी उदाहरण दिले. त्या दोघी महिलांनी शिक्षण घेतले असले तरी सावित्रीबाई फुले यांच्या कार्यामुळे आपण येथेपर्यंत पोहोचलो याची त्यांना कल्पना नाही. केवळ एक पद नाही, केवळ बिरुद म्हणून महिलांना आरक्षण मिळालेले नाही. महाराष्ट्राच्या प्रबोधनाच्या परंपरेतून हे आरक्षण प्राप्त झालेले आहे, सदर आरक्षणाची माहिती सर्व स्तरावर पोहोचविण्याची सामूहिक जबाबदारी आपणा सर्वांवर आहे. ती आपण पार पाडली पाहिजे, एवढे सांगून मी माझे मनोगत पूर्ण करते.

-------

यानंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय वित्त मंत्र्यांच्या अर्थसंकल्पीय चर्चेच्या उत्तराच्या भाषणावर आम्ही बहिष्कार घातला होता. निधीचे समन्यायी वाटप करण्याच्या संदर्भात माननीय राज्यपालांच्या निर्देशाची प्रत आम्हाला प्राप्त झालेली नव्हती. माननीय संसदीय कार्यमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी सभागृहात जाहीर केले होते की, या संदर्भात जे दोन अधिकारी जबाबदार आहेत त्यांना तात्काळ निलंबित करु आणि सभागृहाला कळवू. अधिवेशनाच्या कामकाजाचे शेवटचे दोन दिवस उरले आहेत. सभागृहात सवडीनुसार सांगितले जाते आणि विरोधी पक्ष विसरले तर विसरले अशी प्रथा सुरु झाली आहे. उद्या सकाळी विधेयकावरील चर्चा सुरु होण्यापूर्वी किंवा विधेयक मंजूर होण्यापूर्वी या संदर्भातील माहिती सभागृहाला अवगत करण्यात यावी. हे दोन अधिकारी कोण आहेत, ज्यांनी विधिमंडळाचा अवमान केला, त्यांच्यावर कोणती कारवाई झाली हे सभागृहाला कळले पाहिजे.

**उप सभापती** : उद्या सायंकाळच्या आत शासनाच्या वतीने या संदर्भातील खुलासा सभागृहात करण्यात यावा असे मी निर्देश देत आहे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, होय.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महानगरपालिका आणि नगरपरिषदा (दुसरी सुधारणा) विधेयक.

**मु.शी.**:

L.A. BILL NO. XI OF 2011

( A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

(चर्चा पुढे सुरु....

श्रीमती दिप्ती चवधरी (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा (दुसरी सुधारणा) विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, पुरोगामी महाराष्ट्राने पुन्हा एकदा आपले पुरोगामीत्व महिलांना 50 टक्के आरक्षण देणारे विधेयक आणून सिध्द केले आहे, त्याबद्दल मी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय महिला व बालकल्याण मंत्री, सर्व राजकीय पक्षाचे आमदार यांचे मनापासून अभिनंदन करते. महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले यांच्या या महाराष्ट्रामध्ये महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 50 टक्के आरक्षण देऊन समस्त स्त्रियांना न्याय दिला त्याबद्दल मी आपले मनापासून आभार मानते.

सभापती महोदय, 1992 साली सर्वप्रथम भारताचे नेते स्व.राजीव गांधी यांनी महिलांना 33 टक्के आरक्षण असावे असा क्रांतीकारी निर्णय घेऊन तो अंमलात आणला. त्या वेळेपासून महिलांची राजकीय कारकीर्द सुरु झालेली आहे. माझ्या पिढीतील ज्या महिला आहेत, त्यांची राजकीय कारकीर्द तेव्हापासून सुरु झाली. आज ज्या काही महिला राजकारणात आहेत, कोणी महापौर असतील, सरपंच असतील, जिल्हा परिषद अध्यक्ष असतील त्यांना 1992 साली घेतलेल्या महत्वपूर्ण निर्णयामुळे राजकारणात येण्याची संधी मिळाली. ज्या पक्षाची मी आमदार आहे त्या

..3..



SGB/ 19:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी.....

काँग्रेस पक्षाने सुदैवाने महिलांना न्याय दिलेला आहे. स्व.इंदिरा गांधी, माननीय श्रीमती सोनिया गांधी यांनी नेतृत्व करीत देशाला प्रगतीपथावर नेले आहे. आदरणीय नेते श्री.शरद पवार असतील, इतर नेते मंडळी असतील त्यांनी फार मोठे योगदान दिलेले आहे. हा आजचा एक ऐतिहासिक क्षण आहे आणि या ऐतिहासिक क्षणाची मी साक्षीदार आहे याचा मला मनापासून अभिमान वाटतो. 1992 साली महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 33 टक्के आरक्षण दिले त्याचा आम्हा सर्व महिलांना फायदा झाला.

सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सांगितल्याप्रमाणे महापालिकेतील महिला लोकप्रतिनिधींबरोबर त्यांचे पतीराज यायचे. अगदी आमच्या सभागृहापर्यंत सोडायला यायचे आणि सर्व कारभार ते पहात होते. परंतु आता परिस्थिती बदलली आहे. महिला स्वत: सर्व कारभार पहात आहेत. संकल्पना मांडून त्या अस्तित्वात आणीत आहेत. महिला स्वत: निर्णय घेऊ लागल्या आहेत. निर्णय प्रक्रियेत सहभागी होत आहेत. कायदा बदलला तरी प्रशासनाची मानसिकता बदलत नाही याचा मी स्वत: अनुभव घेतला आहे. पदावर असलेल्या महिलांना सुध्दा प्रशासन सन्मानाने वागविताना दिसत नाही. त्यांच्या प्रश्नांना, मागण्यांना योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. ही मानसिकता बदलणे हे एक फार मोठे आव्हान आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काम करणे हे मोठे आव्हान आहे, महिलांना तर फार अवघड असते. समाजाची मानसिकता ही आजही पुरुष प्रधान आहे. पुण्यासारख्या पुढारलेल्या शहरामध्ये आम्हाला निश्चितपणे सहकार्य मिळते. परंतु ग्रामीण भागात ज्या महिला काम करतात त्याना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे आपल्याला पहावयास मिळते. आरक्षण दिले म्हणजे सर्व संपले असे समजून चालणार नाही. तर या महिलांना संरक्षण देणे गरजेचे आहे. उदाहरण म्हणून सांगू इच्छिते की, एका महिला सरपंचांनी क्रिकेटची स्पर्धा भरविली होती. मी महापौर असताना त्यांनी मला विनंती केली की, महाराष्ट्र राज्य सुवर्ण क्रिकेट स्पर्धा भरविली आहे, त्या स्पर्धेच्या बक्षीस समारंभाला या. मला अतिशय कौतुक वाटले.

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

नंतर 4एन.1....

श्रीमती दिप्ती चवधरी ........

महिला सरपंचांनी ऑर्गनाईज्ड केलेला कार्यक्रम असल्याने मी मुद्दाम त्या खेड्यात गेले. तेथे गेल्यानंतर मात्र मला स्टेजवर सर्व पुरुष मंडळीच दिसली, महिला कुठेही दिसत नव्हती. हा कार्यक्रम सुरु झाल्यानंतर मी तेथील पुरुषांपैकी एकाला विचारले की, आपण कोण आहात, ते म्हणाले की, मी उप सरपंच आहे. मी म्हणाले की, मला ज्या महिला सरपंचांनी येथे निमंत्रित केले त्या कुठे आहेत, त्यावर तो उप सरपंच म्हणाला की, तो लांबवर 20-25 महिलांचा घोळका बसलेला आहे त्यात सरपंच देखील आहेत. मी त्यांना सांगितले की, जोपर्यंत ती महिला सरपंच माझ्या बाजूच्या खुर्चीत बसत नाही तोपर्यंत हा कार्यक्रम सुरु होणार नाही. अशा प्रकारचे जे आव्हान होते त्यात आता नक्कीच बदल झालेला दिसून येईल. कारण आता महिला स्वतंत्रपणे काम करु लागल्या आहेत. राज्यातील विविध स्थानिक स्वराज्य संस्थांचा अर्थसंकल्प हा "जेंडर बजेट" असला पाहिजे, यादृष्टीने कायदा करणे आवश्यक आहे, अशी मी सूचना करते.

महोदय, महिलांच्या बाबतीत समाजात नेहमीच सांगितले जाते की, महिलांसाठी विशेष अशी तरतूद अर्थसंकल्पात करता आली नाही. कारण जे रस्ते केले त्यावरुन निम्मे महिला सुध्दा जात असतात असे ऐकवून आमचे तोंड बंद केले जाते. याच मानसिकतेला आमचा आक्षेप आहे.

यानंतर महिलांच्या आरोग्याचा व सुरक्षिततेचा प्रश्न तर अतिशय गंभीर आहे म्हणून त्यासाठी विशेष निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे. पिण्याच्या पाण्यापासून तर आरोग्य व्यवस्थेपर्यंत अशा सर्वच बाबींच्या नियोजनात महिलांना सहभागी करुन घेणे आवश्यक आहे, त्याशिवाय तयार होत असलेल्या सुविधा उपयोगी पडणार नाहीत.

महिलांना एस.टी. एस व रेल्वेमध्ये आरक्षण दिलेले आहे पण पुष्कळ वेळा असे होते की, ही जागा महिलांसाठी राखीव आहे असे पुरुषांना सांगावे लागते. एवढे सांगून सुध्दा उद्दामपणे हे पुरुष महिलांकडे बघून हसतात, ही प्रवृत्ती व मानसिकता बदलणे हे एक मोठे आव्हान आहे. या विधेयकाच्या निमित्ताने महिलांना ही एक अनमोल संधी मिळाली असून त्यासाठी अगोदर दिलेल्या 33 टक्के आरक्षणाचे मोठे योगदान आहे व त्याच माध्यमातून हा महिलांचा विजय आहे असेही मला आवर्जून सांगावेसे वाटते. कारण 33 टक्के आरक्षण मिळाल्यानंतर महिलांनी केलेल्या कामाचा ठसा निश्चितच ठळक झालेला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनेक स्त्रीया आज

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी .......

मोठ्या पदांवर आहेत. राज्यात एकूण जवळपास 9 हजार महिला सरपंच, उपसरपंच तसेच इतर समित्यांचे सदस्य अशा वेगवेगळ्या पदावर कार्यरत आहेत. अशा प्रकारे गावोगावी महिलांचा सहभाग अतिशय उल्लेखनीय झालेला आहे. त्याचप्रमाणे विधायक क्षेत्रात महिलांचा पुरुषांच्या बरोबरीनेच नव्हे तर समाज स्वास्थ्यासाठी देखील सहभाग आवश्यक आहे, त्यादृष्टीने सुध्दा हे दालन अतिशय महत्वाचे आहे. विशेष म्हणजे समाजात बऱ्याच महिला आरक्षणाशिवाय पुढे येताना दिसतात. त्याचबरोबर महिलांना व्यवसाय करता यावा म्हणून शासनाने व्यावसायिक धोरण घेतले हे अमान्य करता येणार नाही. त्यानुसार अभियांत्रिकी क्षेत्रात महिलांची संख्या पुरुषांच्या तुलनेत वाढतांना दिसत आहे आणि हा शासनाच्या धोरणाचाच परिपाक आहे असेच म्हणावे लागेल.

महोदय, महिलांसाठी 50 टक्के आरक्षणाचा निर्णय शासनाने घेतला तो अत्यंत स्तुत्य असाच आहे पण त्याचबरोबर खंत वाटते की, महिलांची संख्या मात्र दर हजारी 915 अशी दिवसेदिवस कमी कमी होत आहे, ही गोष्ट मनाला चटका लावणारी आहे. राजकारण हे एक समाजाभिमूख असे क्षेत्र आहे. सामान्य लोकांना स्थानिक प्रशासन माहीत नसते तर स्थानिक लोक प्रतिनिधी म्हणून कोण याची चांगलीच जाण असते. त्यात महिला लोकप्रतिनिधी असेल तर ती जास्तीत जास्त वेळ घरीच असते. तसेच समाजकारणासाठीच आपला अधिक वेळ देण्याचा प्रयत्न करते. अशा कर्तबगार महिलांना समाजकारणासाठी या विधेयकाच्या माध्यमातून निश्चितच एक वेगळे दालन खुले होणार आहे, त्यासाठीच शासनाने हा मार्ग चोखाळलेला आहे. पण वरकरणी हे सोपे वाटले तरी ते स्त्री समाजाला एक मोठे आव्हान आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी...

त्यासाठी मुळात महिलांना प्रतिनिधित्वाची संधी देणे आणि वाव देणे यातील फरक समजून घेतला पाहिजे.

अलीकडेच ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्न्मेंट ने जाहीर केलेला अहवाल महत्वाचा आहे. या अहवालात म्हटले आहे की, शहरी नगरसेवक महिलांपैकी निम्याहून जास्त महिलांना राजकीय पार्श्र्वभूमी आहे. यापैकी अनेकींना स्वतंत्रपणे राजसत्ता चालवण्याची संधी मिळत नाही. त्या पदाचा वापर मात्र त्यांच्या घराण्यातील पुरुष करतात. अर्थात, ही या महिला नगर सेवकांची खत आहे. त्या हे हतबलतेतून सांगताहेत. शहरी नगर सेविंकापैकी अनेक जणी शिकल्या सवरलेल्या आहेत. राजकारणातील संधीचे सोने करण्याची क्षमता त्यांचेकडे आहे. या विधेयकाच्या निमित्ताने महिलांना ज्या संधी मिळालेल्या आहेत त्याचे मार्ग शोधावे लागतील. पात्र उमेदवारांना संधी मिळणे व त्यांना राजकीय प्रशिक्षणाची जोड मिळणे अत्यंत आवश्यक आहे. हे विधेयक आणण्यामागे पुरुष मंडळींनी विशेष कष्ट घेतले आहेत. सर्व पुरुषांनी उदार दृष्टीकोन ठेवलेला आहे त्यामुळे आपल्या सर्वांचे अभिनंदन करते व पुन्हा एकदा सरकारचे अभिनंदन करुन दोन शब्द संपवते.

धन्यवाद...

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त ) सभापती महोदय, निवडणुकीमध्ये महिलांना 50 टक्के आरक्षण मिळाल्यामुळे मला आनंद झाला आहे तसेच आश्चर्य सुध्दा वाटलेले आहे. कारण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना 50 टक्के आरक्षण मिळालेले आहे. सन 1993 मध्ये म्हणजे 17 वर्षापूर्वी 33 टक्के आरक्षण मिळाले होते ते आता 50 टक्क्यापर्यंत आलेले आहे. आज स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये 50 टक्के आरक्षण मिळाले आहे तशाच प्रकारचे 33 टक्क्याचे आरक्षण महिलांना लोकसभेत व विधानसभेत मिळाले पाहिजे. महिलांसाठीचे 33 टक्क्याचे विधेयक राज्यसभेने मंजूर केलेले आहे परंतु लोकसभेने ते अद्याप मंजूर केलेले नाही त्याची आम्हाला खंत वाटते. एकूण लोकसंख्येच्या 50 टक्के महिला असल्यामुळे महिलांना समान संधी मिळालीच पाहिजे. स्वातंत्र्य मिळाल्यापासून म्हणजे 64 वर्षानंतर महाराष्ट्रामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून महिलांना 50 टक्क्याची समान संधी उपलब्ध झालेली असल्यामुळे मी महाराष्ट्र शासनाचे आभार मानते. महिलांच्या चळवळीचा इतिहास बघितला तर महिलांना कोणीही रोखलेले नाही.

भारताचा सबंध इतिहास बघितला तर भागवत संप्रदायातील संत परपंरेत संत मुक्ताबाई, संत जनाबाई अशा संत महिलांनी महिलांचे एक वेगळे स्थान निर्माण केले होते. इतर स्त्रियांबरोबर विचार करतो तेव्हा शिवबाला ज्या महिलेने घडविले मग ती जिजाऊ दे किंवा त्यानंतरच्या राजकारणात आलेल्या ज्या स्त्रिया आहेत त्यामध्ये ताराबाई, चांदबीबी, ताई तेलीण, ऊमाबाई दाभाडे, अहिल्याबाई, राणी लक्ष्मीबाई अशा अनेक पराक्रमी महिलांनी आपल्या कर्तृत्वाने इतिहासावर ठसा उमठवलेला आहे. हीच परंपरा 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले या स्त्री सुधारकांनी या कामाला गती दिली. आपण जेव्हा महिला चळवळीचा इतिहास बघतो तेव्हा डॉ. ॲनि बेझंट या 1917 मध्ये कॉंग्रेसच्या अध्यक्षा झाल्या. महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्य लढयात असंख्य स्त्रियांनी सहभाग घेतला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समतेच्या लढयात अनेक गोरगरीब, कष्टकरी, अशिक्षित अशा अनेक स्त्रियांचा सहभाग होता.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ..

या थोर परंपरेमध्ये श्रीमती अहिल्या रांगणेकर, श्रीमती मृणालताई गोरे, श्रीमती प्रमिला दंडवते व श्रीमती रोहिणी गवाणकर यांचा समावेश होतो. त्यांनी चांगल्या प्रकारे अभ्यास केला व महिलांनी आपल्या कर्तृत्वाने पुढे यावे याकरिता अनेक उपक्रम राबविले. त्यांनी समाजामध्ये होणाऱ्या अन्यायाविरुघ्द अनेक लढे दिले. त्यावेळी महिलांना आरक्षण नव्हते. परंतु आज महिलांना आरक्षण मिळाले आहे. महिलांना सर्व क्षेत्रात समान संधी मिळाली पाहिजे. महिलांना राजकारणात देखील समान संधी मिळाली पाहिजे. महिला राजकारणात काय करु शकतील किंवा राजकारण हे महिलांचे क्षेत्रच नव्हे, असे म्हटले जाते. मात्र मी त्यांना सांगू इच्छिते की, महिला स्थानिक स्वराज्य संस्थांमधील राजकारणात येतात, त्या वेळी सर्वसामान्यांचे प्रश्न त्या अधिक जवळून समजू शकतात. पाण्याचा प्रश्न असो, रेशनिंगचा प्रश्न असो, शौचालयाचा प्रश्न असो, किंवा मुलांच्या आजारपणाचा प्रश्न असो हे प्रश्न महिलांना जेवढे भेडसावत असतात तेवढे ते पुरुषांना भेडसावत नाहीत, असे मला वाटते. महिलांवरील अत्याचाराची तीव्रता जेवढी एखाद्या महिलेला जाणवते तेवढी ती पुरुषांना जाणवत असेल असे मला वाटत नाही. महिला राजकारणात पुढे आल्या तर पाण्याच्या प्रश्नापासून इतर अनेक प्रश्नांच्या संदर्भात लोकांना हक्क मिळवून देण्याकरिता त्या जेवढया प्रखरतेने आपले विचार मांडू शकतात, तेवढे पुरुष करु शकतात, असे मला वाटत नाही. सभापती महोदय, ग्रामीण भागातील महिला भले अशिक्षित असतील. मात्र आपले हक्क मिळवणे, तसेच अन्याया विरुध्द लढणे हे महिलांच्या रक्तातच आहे.

सभापती महोदय, मी या ठिकाणी एक छोटेसे उदाहरण देऊ इच्छिते. एखादा पती आपल्या पत्नीला महिन्याला घरखर्चाकरिता पगारातील पैसे देतो व तिला सांगतो की, एवढया पैशामध्ये तू घरखर्च कर. त्यावेळी बाहेर किती महागाई वाढलेली आहे, वस्तूंचे भाव किती वाढलेले आहेत हे त्याला माहीत नसते. अशा वेळी ती महिला त्याच रकमेमध्ये मुलांच्या शाळेची फी भरते, किराणा सामान व धान्य आणते, भाजीपालाचा खर्च बसवते. कमी पैशामध्ये देखील ती हे सर्व खर्च उत्तम प्रकारे बसवू शकते. म्हणजेच महिला अर्थकारण देखील चांगल्या प्रकारे समजू शकतात. महिलांना आपल्या दैनंदिन जीवनामध्ये अशा प्रकारच्या अनेक प्रसंगांना जवळून सामोरे जावे लागत असते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ..

त्यांना अशा प्रकारच्या अनेक गोष्टी स्वत: फेस कराव्या लागत असतात. त्यामुळे अनेक प्रश्नांची जाणीव महिलांना अधिक चांगल्या प्रकारे असते. अशा प्रसंगाच्या वेळी महिला कधीच हार मानत नाहीत. घरातील प्रत्येक गोष्टीला त्यांना तोंड द्यावे लागत असते. त्यामुळे या सर्व गोष्टी त्यांच्या अंगवळणी पडलेल्या असतात. जेव्हा एखाद्या मुलीचा जन्म होतो, तेव्हा पासून प्रत्येक गोष्ट तिला नाकारली जाते. त्यामुळे अशा नकारातून सकारात्मक काम करण्यासाठी त्या पुढाकार घेत असतात. विरोधाला न जुमानता त्या सतत पुढे जाण्याचा प्रयत्न करीत असतात. या महिला समाजासाठी उत्तम काम करु शकतात. महिलांना समाजामध्ये काम करण्याची संधी प्राप्त झाली तर त्या अतिशय चांगल्या प्रकारचे काम करुन मिळालेल्या संधीचे सोने करतील, असे मी आपणास सांगू इच्छितो.

सभापती महोदय, मला या ठिकाणी सांगण्यास अतिशय अभिमान वाटतो. सन 1993 मध्ये माननीय श्री. शरद पवार महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री होते. त्या वेळी त्यांनी महिला आरक्षणाच्या धोरणाच्या संदर्भात वेळ देऊन ते समजून घेतले होते. महिलांना पुढे आणले पाहिजे, या करिता त्यांनी बारकाईने अभ्यास केला. यानंतर त्यांनी ते करुन दाखविले. आज महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 50 टक्के आरक्षण मिळत आहे, तो त्याचाच एक परिणाम आहे.असे मला वाटते. महिलांना लोकसभेमध्ये, विधानसभेमध्ये देखील आरक्षण मिळाले पाहिजे. आपल्या देशामध्ये बिहार राज्याने सर्वात प्रथम महिला आरक्षण लागू केले. त्यानंतर हे धोरण लागू करणारे महाराष्ट्र राज्य देशातील सहावे राज्य आहे. आता लवकरात लवकर महिलांना लोकसभा व विधानसभेमध्ये आरक्षण मिळण्याच्या संदर्भात प्रयत्न केले पाहिजेत. माननीय श्रीमती सोनिया गांधी या युपीए पक्षाच्या अध्यक्षा आहेत, त्यांच्याकडून आमच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत. महाराष्ट्र राज्यातील महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 50 टक्के आरक्षण दिलेले आहे. त्याचप्रमाणे लोकसभेमध्ये व विधानसभेमध्ये महिलांना किमान 33 टक्के आरक्षण लवकरात लवकर लागू करावे, अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवते. धन्यवाद

---

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, या विधेयकाला पाठिंबा देत असतांना मी काही गोष्टींची साक्षीदार असल्यामुळे त्यांचा ऊहापोह या ठिकाणी करणार आहे. महिलांना राजकारणामध्ये आणून बसविण्याचे भाग्य ज्यांनी आम्हाला दिले त्यांच्या नावाचा उल्लेख मी या ठिकाणी केला नाही तर मी कृतघ्न ठरेन. कै. राजीव गांधी यांनी महिलांना आरक्षण देण्यास संपूर्ण देशामध्ये सुरुवात केली. त्याचप्रमाणे माननीय श्री. शरद पवार साहेबांनी 1993 साली महाराष्ट्रामध्ये तशा प्रकारचा प्रस्ताव आणला होता. आमच्या नेत्या श्रीमती सोनिया गांधी यांनी लोकसभेमध्ये आणि राज्यसभेमध्ये विधेयक आणून संपूर्ण देशामध्ये महिलांना 33 टक्के आरक्षण मिळाले पाहिजे अशी मागणी केली आहे. सदरचे विधेयक राज्यसभेमध्ये मंजूर झाले आहे व लोकसभेमध्ये ते पटलावर आहे. कालपरत्वे ते विधेयक सुध्दा लोकसभेमध्ये मंजूर होईल.

सभापती महोदय, मला एका गोष्टीचे आभार मानले पाहिजे की, 1973 साली कॉंग्रेस पक्षाचे नेते बॅरिस्टर रजनी पटेल यांनी माझ्यासारख्या बारक्या जीवाला बोलावून महानगरपालिकेचे तिकीट दिले. त्यामुळे मी 1973 साली मुंबई महानगरपालिकेमध्ये जाऊन बसले. त्या ठिकाणी मला कै. अहिल्याताई रांगणेकर यांच्यासारख्या गुरु भेटल्या. त्यांचे मार्गदर्शन मला मिळाल्यामुळे मी 1992 सालापर्यंत मुंबई महानगरपालिका संभाळू शकले. सभापती महोदय, या राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये अशाप्रकारचे एक ऐतिहासिक विधेयक सभागृहामध्ये मांडण्यात आले आहे त्यावर चर्चा करण्यास माझ्यासारख्या व्यक्तिला आंनद होत आहे मुंबई महानगरपालिकेला 1973 साली 100 वर्षे पूर्ण झाली त्यावेळी माझ्यासारख्या दोन-तीन महिला त्या ठिकाणी निवडून गेल्या होत्या त्या क्षणाचेही साक्षीदार मला व्हायला मिळाले याचाही मला आनंद होत आहे. पुरुष प्रधान संस्कृती असलेल्या राजकारणामध्ये टिकून रहावयाचे असेल तर काही गोष्टींचा विचार करणे अत्यंत गरजेचे आहे. मी या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेतले नाही तर कृतघ्न ठरेन. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जेव्हा या चर्चेमधून पाहिले की, राजकारणामध्ये, समाजकारणामध्ये स्त्रियांची स्थिती वेगळया स्तरावर आहे त्यावेळी त्याचे कायद्यात रुपांतर करण्यासाठी त्यांनी हिंदू कोड बिल तयार केले. परंतु त्यावेळच्या सनातन लोकांनी ते विधेयक लोकसभेमध्ये मंजूर करण्यास विरोध केला. त्यावेळी पंडित जवाहरलाल नेहरु हे ठामपणे उभे राहिले असतांना सर्व स्त्रीवादी संघटना त्यांच्या पाठीशी उभ्या राहिल्या. कुणीही पुरुषवादी संघटना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्रीमती अलका देसाई...

त्यांच्या पाठीशी उभी राहिली नाही. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ते विधेयक संमत करुन स्त्रियांना सन्मानाने जगण्याचा हक्क दिला. म्हणून या विधेयकाच्या निमित्ताने मी त्यांची अत्यंत ऋणी आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई . . ..

सभापती महोदय, याठिकाणी मला आपल्यासमोर थोडे विचार मांडावयाचे आहेत. 1945 ते 1975 हा काळ आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावरील अनेक घडामोडींचा साक्षीदार आहे. या काळामध्ये 1975 मध्ये आपण सर्वांनी आंतरराष्ट्रीय महिला वर्ष साजरे केले. त्यामध्ये आपण स्त्रियांच्या एकूणच प्रश्नाविषयी सजग झालो आणि त्यानंतर मग स्त्रियांच्या शिक्षणाचा दर्जा असेल, त्यांच्या आरोग्याचा दर्जा असेल, त्यांच्या मान-सन्मानाचा दर्जा असेल किंवा त्यांच्या राजकीय प्रणालीचा दर्जा असेल यामध्ये त्यांना पुढे आणण्यासाठी जातीने प्रयत्न करावयास लागलो. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी जे सांगितले ती वस्तुस्थिती आहे आणि आपण यासंबंधातील परिस्थिती बदलू याचा आत्मविश्वास तुमच्यामध्ये, माझ्यामध्ये आणि येणाऱ्या सगळया स्त्रियांमध्ये असेल हे मला येथे सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, मला याठिकाणी सुरुवातीलाच सांगावयाचे आहे की, महिला आरक्षण विधेयक पास होणार आहे आणि 50 टक्के भगिनी याठिकाणी येऊन बसणार आहेत. लोकसभेमध्ये आणि विधानसभेमध्ये आम्ही तशी मागणी करीत आहोत. परंतु . . ..

(सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील खाली बसून बोलतात.)

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना सांगू इच्छिते की, त्यांनी मध्ये डिस्टर्ब करु नये. नाहीतर मग मला तुमच्यावर रिॲक्ट होऊन बोलावे लागेल. आपण जरा शांत बसावे आणि मी जर रिॲक्ट होऊन बोलले तर तुम्हाला सभागृह सोडून बाहेर जावे लागेल.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील, आता सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी दुर्गेचा अवतार धारण केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, आज आपण येथे महिलांसाठी 50 टक्के आरक्षण ठेवण्यासंबंधीचे विधेयक पास करणार आहोत, त्याबद्दल मी शासनाची ऋणी आहे. पण एक गोष्ट सांगू इच्छिते की, जेव्हा तुम्ही स्त्रियांना आरक्षण द्याल ते कमीतकमी दहा वर्षाचे ठेवण्यात यावे. याचे कारण मी देशामध्ये, महाराष्ट्रामध्ये आणि मुंबई शहरामध्ये काय सुरु आहे हे डोळसपणे पहात असते. हे आरक्षण कायम स्वरुपी देऊ नये. तसे केले तर गोंधळ संपणार नाही. परंतु आपण एका मतदार संघामध्ये स्त्रियांना कमीतकमी दहा वर्षाचे आरक्षण द्यावे. तसे जर दिले नाही तर बऱ्याच वेळेला असे विचार मनामध्ये येण्याची शक्यता आहे की, उद्या माझा मतदार संघ रहाणार आहे की



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई . . ..

नाही कोण जाणे किंवा माझ्या मतदार संघामध्ये बदल होणार आहे काय ? असा विचार आल्यानंतर मग आपली त्या ठिकाणी कामाची गती थोडी कमी होते आणि असे झाल्यानंतर पर्यायाने आपल्याला तेथून निवडून येण्याच्या बाबतीत बंधन येते. म्हणून आपण हे आरक्षण कमीतकमी दहा वर्षाचे ठेवावे अशी मी माननीय मंत्री महोदयांना सभागृहाच्या माध्यमातून सूचना करते.

सभापती महोदय, माझी आणखी एक सूचना आहे की, ज्या कार्यकर्त्या स्त्रिया असतील त्या बाबतीत प्रत्येक पक्षाने डोळसपणे पहावे, नाहीतर घरच्याच लोकांना तिकीट दिले गेले तर आपल्याला या माध्यमातून फारसे काही चांगले करता येईल असे माझे मत नाही. म्हणून कार्यकर्ते शोधावेत, मग शिवसेना असू दे, भारतीय जनता पार्टी असू दे, काँग्रेस पक्ष असू दे किंवा राष्ट्रवादी पक्ष असू दे,तर घरच्या लोकांना तिकीट न देता कार्यकर्त्यांना तिकीट द्यावे. नाहीतर कार्यकर्ता पोस्टर आणि बॅनर लावत आहेत आणि घरातील लोकच निवडून येत आहेत असे सध्या चित्रे दिसते. सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी बरोबर सांगितले की, असे चित्र दिसता कामा नये, तर कार्यकर्ता पुढे आला पाहिजे.

सभापती महोदय, महाराष्ट्र सरकारने महिलांसाठी 50 टक्क्याचे आरक्षण आणले याचे स्वागत करीत असताना काही गोष्टी आपल्यासमोर मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. स्त्रियांचा दर्जा म्हणजे समाजातील कुटुंबाचे स्थान असून त्याच्याकडे संख्यात्मक दृष्टीकोनातून पाहिले पाहिजे उदाहरण द्यावयाचे तर स्त्रियांना त्यांच्या योग्यतेनुसार शिक्षण, रोजगार उपलब्ध करुन देता आला पाहिजे असे मला सुचवावयाचे आहे. तसेच स्त्रियांना गुणात्मक प्रमाण दिले नाही तर जेव्हा आपण राजकीय प्रवाहामध्ये जातो, तेव्हा राजकारणामध्ये सुध्दा कुठेतरी थांबावे लागते. पण मुळामध्ये तसे थांबावे लागता कामा नये. याचे कारण म्हणजे आज भारतभर आणि महाराष्ट्रामध्ये शिक्षणाची दालने मोठया प्रमाणात निर्माण झालेली आहेत. आपण आपल्या मुला-मुलींना परदेशामध्ये शिक्षणासाठी पाठवितो. आज आपण पाहिले तर दिसेल की, इंजिनिअरींग असेल, मेडीकल असेल किंवा लेक्चरशीप असू दे, यामध्ये स्त्रिया अत्यंत जबाबदारीने वावरताना दिसतात. आज कदाचित निष्णात पुरुष डॉक्टर कमी दिसतील.

यानंतर कु.थोरात . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ प्रथम सा. रणदिवे..... 19:40

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रामनाथ मोते )**

श्रीमती अलका देसाई...

पण स्त्रिया निष्णात डॉक्टर म्हणून नावारुपाला येताना दिसतात. आपण डॉ. आनंदीबाई जोशींचे उदाहरण घेऊ या. त्यावेळी त्या परदेशात जाऊन डॉक्टर होऊन आल्या आणि या देशाला आणि महाराष्ट्राला त्यांनी मदत केली. सावित्रीबाई फुले यांचे आपण उदाहरण घेऊ या. महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपल्या घरातून सुधारणेला सुरुवात केली. त्यांनी सावित्रीबाई फुले यांना पहिल्यांदा घराच्या बाहेर काढले आणि स्त्रियांच्या प्रश्नावर काम करण्यासाठी प्रवृत्त केले एवढेच नाही तर या महाराष्ट्रातील आणि भारतातील पुरुष प्रधान संस्कृतीला छेद देऊन त्यांना पुढे आणले आणि या समाजात काम करण्याची त्यांना संधी दिली.

सभापती महोदय, आज वर्तमानपत्र उघडल्यानंतर आपल्याला त्यामध्ये एक प्रकारची हिंसा दिसून येते. काल-परवाच वर्तमानपत्रात अशी बातमी आली होती की, एका स्त्रीला तिच्या घरच्या लोकांनी छळले म्हणून तिने आपल्या मुलाला ढकलून दिले आणि स्वत:ही आत्महत्या केली. याचा अभ्यासात्मक सर्व्हे करणे गरजेचे आहे. तो सर्व्हे राजकीय कारणासाठी नाही तर मानसिकता सुदृढ करण्यासाठी करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, केवळ शहरातील स्त्री राजकारणात येऊन चालणार नाही. शहरातील स्त्रीकडे शिक्षण आहे, आर्थिक सुबत्ता आहे, ती कदाचित जीममध्ये जाणारी स्त्री असेल, सकाळच्या मॉर्निंग वॉकला जाणारी स्त्री असेल, ती वर्तमानपत्र वाचणारी स्त्री असेल किंवा आणखी काही अभ्यास करणारी स्त्री असेल, ती स्त्री जरुर पुढे जाईल कारण तिला आपले बरे-वाईट, राजकारण हे सगळे कळते. पण ज्यावेळी खेडयाकडील शेतावर काम करता-करता राजकारणात येऊन पोहचणारी जी स्त्री आहे तिला सांभाळणे आपली नैतिक जबाबदारी आहे. ही नैतिक जबाबदारी पार पाडण्यासाठी त्यांना ट्रेनिंगची जरुर गरज आहे. याचे कारण असे की, जेव्हा स्त्रियांना 33 टक्के आरक्षण लागू करण्यात आले आणि काही भगिनी निवडून आल्या तेव्हा आम्हाला आनंद झाला. आतापर्यंत जिल्हा परिषद, नगरपरिषद किंवा महानगरपालिकेतील सभागृहात दोन-तीन स्त्रियांचे चेहरे दिसत होते पण आता या सभागृहात 27 ते 28 महिलां दिसतील असे आम्हाला वाटले.परंतु ज्यावेळी त्या स्त्रियांच्या मागून पुरुष त्यांच्या कामामध्ये हस्तक्षेप करताना दिसले त्यावेळी माझ्या सारख्या स्त्रीला असे वाटले की, "हेची फळ का मम तपाला" असे होता कामा नये.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई.....

कामा नये. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी सांगितल्या प्रमाणे मी थोडया वेळापूर्वी सांगितले की, श्रीमती अहिल्या रांगणेकर या माझ्या राजकीय गुरु आहेत. त्याचप्रमाणे आंदोलन करुन लोकांचे प्रश्न कसे सोडवावेत मग तो रेशनिंगचा प्रश्न असो, पाण्याचा प्रश्न असो याबाबतीत डॉ. दत्ता सामंत हे माझे राजकीय गुरु आहेत. मी मुंबई महानगरपालिकेत नगरसेविका असताना व्ही. टी. स्टेशनला उतरुन समोरच असणाऱ्या महानगरपालिकेत जात होते. त्यावेळी गाडी-घोडे असा दिमाख नव्हता. 1973 ते 1992 पर्यत मी मुंबई महानगरपालिकेत होते. तेव्हा मी रेल्वेने प्रवास करीत होते. व्ही. टी. रेल्वे स्टेशनवर उतरुन रस्ता ओलांडून महानगरपालिकेत जात होते.

सभापती महोदय, मला या ठिकाणी सांगावेसे वाटते की, मी एका मोठया शाळेमध्ये नोकरी करीत होते. शाळेचा रिझल्ट लागल्यानंतर शाळेला सुट्टी लागली होती. त्यानंतर बस पकडून मला रेल्वे स्टेशनवर जावयाचे होते.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई ...

त्या वेळेला माझ्या घराकडून डबलडेकर बस जात होती त्यानंतर ती सिंगलडेकर करण्यात आली. मी शेवटून दुसऱ्या स्टॉपला बसले. कंडक्टर तिकीट-तिकीट करीत आला. त्यावेळी आताचे माझे जे वय आहे त्या वयाची एक महिला आणि तिच्याबरोबर एक छोटी बेबी होती आणि आणखी एक महिला होती. त्या बसमध्ये बसल्या. बसवर बाहेर अंधेरी रेल्वे स्टेशनचा बोर्ड होता. त्यांना अंधेरीला जावयाचे होते. त्या महिलेकडे कंडक्टर आला आणि तिकीट घ्या असे म्हणाला. त्यांनी अंधेरी रेल्वे स्टेशनचे तिकीट मागितले. त्यावेळी विक्रोळी स्टेशनला जाण्यासाठी दोनच स्टॉप शिल्लक राहिले होते. तो कंडक्टर त्या महिलेला उर्मटपणे म्हणाला की, तुम्हाला बसचा नंबर जर ओळखता येत नसेल तर तुमचा माणूस तुम्ही कसा ओळखाल ? त्याने हे वेगळ्या शब्दात विचारले. त्यावेळी मी माझी पर्स आणि बाकीचे पेपर्स सिटवर ठेवले आणि त्या कंडक्टरचे शर्ट धरुन एक कानफाटात वाजवून दिली. त्याचे कारण असे की, स्त्रियांच्या बाबतीत जर एखादा पुरुष अशा पध्दतीने अत्याचार करण्यासारखे बोलत असेल तर समोरच्या स्त्रीने दात काढावयाचे नाही तर रिॲक्ट व्हावयाचे असते, हे माझ्या गुरुने मला शिकविले. मुंबईच्या बेस्ट बसेस चार दिवस बंद होत्या. संपूर्ण हिंदुस्थानने त्या संपाची नोंद घेतली. त्यानंतर बेस्टचे कंडक्टर कधी स्त्रियांच्या वाटेला गेले नाहीत. त्यानंतर बेस्टचे कंडक्टर स्त्रियांना असे कधीही उलटून बोलले नाहीत. माझ्या घरावर मोर्चा आला. त्यालाही मी तेवढ्याच ताकदीने मागे परतविले. याचे कारण असे की, राजकीय शिक्षण घेत असताना आपल्याला जबाबदारी सुध्दा ओळखता आली पाहिजे, असे मला सांगावयाचे आहे. म्हणून या बिलाला पाठिंबा देत असताना मी जे दोन तीन मुद्दे मांडले त्यांचा आपण जरुर विचार करावा. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**पृ. शी.** : सैन्य दलातील महाराष्ट्र राज्यातील अधिवासित शौर्यपदक व सेवापदक धारकांना महाराष्ट्र गौरव पुरस्कार योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या एकरकमी अनुदानात करण्यात आलेली वाढ

**मु. शी.** : सैन्य दलातील महाराष्ट्र राज्यातील अधिवासित शौर्यपदक व सेवापदक धारकांना महाराष्ट्र गौरव पुरस्कार योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या एकरकमी अनुदानात करण्यात आलेली वाढ यासंबंधी संसदीय कार्य राज्यमंत्री यांचे निवेदन

श्री. भास्कर जाधव ( संसदीय कार्य राज्यमंत्री ) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे )

---

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. बरवड 19:55

**पृ.शी.**: महानगरपालिका आणि नगरपरिषदा (दुसरी सुधारणा) विधेयक
**मु.शी.**:

L.A. BILL NO. XI OF 2011

( A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT,1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

(चर्चा पुढे सुरु...)

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, अहिल्याबाई होळकर, जिजामाता आणि छत्रपती शिवाजी महाराज या सर्वांना अभिवादन करुन आजच्या या सुधारणा विधेयकावर माझे मत व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, मी सुरुवातीलाच खंत आणि नाराजी व्यक्त करते की, या विधेयकावर महिलांव्यतिरिक्त कोणी बोलायचे नाही अशी जी चर्चा येथे झाली त्याचे अत्यंत दु:ख वाटले. खरे म्हणजे महिलांचा प्रश्न हा सामाजिक प्रश्न असतो आणि त्या प्रश्नावर सामाजिक चर्चा घडवून आणली पाहिजे. महिलांचे प्रश्न महिलांनीच मांडले पाहिजेते ही पध्दत तितकीशी बरोबर नाही. हा व्यवहारिक दृष्टीकोन झाला. व्यवहाराच्या संदर्भात सुरेश भट असे म्हणतात

सारेच हे उमाळे आधीच योजिलेले
सारेच हे जिव्हाळे आधीच बेतलेले
आता कुणाकुणाचे मी घाव आठवावे
येतात जे दिलासे तेही उगारलेले

50 टक्के आरक्षणाची सुधारणा तुम्ही आम्हाला करुन देत आहात. पण त्याबाबत देखील अत्यंत अनास्थेने आपण चर्चा करीत आहोत. या सुधारणेच्या संदर्भात बोलत असताना....

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, आमच्या भगिनी सन्माननीय सदस्या ॲड. उषाताई दराडे यांनी असे विधान केले की आपण अत्यंत अनास्थेने या विधेयकाची चर्चा करीत आहोत. या विधेयकाबाबत सर्वांनाच आस्था आहे. त्यामुळे त्यांनी आपल्या भाषणात दुरुस्ती करावी अशी माझी त्यांना विनंती आहे.





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे : या विधेयकाच्या संदर्भात आपण अनास्थेने चर्चा करीत आहोत असे सन्माननीय सदस्या ॲड उषाताई दराडे यांनी सांगितले. कृपया त्यांचे हे शब्द रेकॉर्डवरुन काढावे अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्या ॲड. उषाताई दराडे याच त्यांच्या भाषणामध्ये बदल करु शकतील.

डॉ. नीलम गो-हे : सभागृहामध्ये शांतता ठेवली तर या विधेयकावर अनास्थेने चर्चा होत आहे असे त्यांना वाटणार नाही. म्हणून सन्माननीय सदस्यांनी सभागृहामध्ये शांतता ठेवावी अशी माझी विनंती आहे.

ॲड. उषा दराडे : डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातील महिलांना, दलितांना जगण्याचा श्वास मिळवून दिला. माझ्या देशातील महिला डॉ. बाबासाहेब आंबेडकरासाठी गीत गातात. नुकतीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी झाली. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा कायदा होत असताना काही महिला मराठवाड्याच्या हर्सूल कारागृहामध्ये होत्या. त्या सर्व मागासवर्गीय महिला आंदोलनामध्ये रस्त्यावर आल्या होत्या. त्यावेळी त्या भीमबाबासाठी गाणं म्हणत होत्या की,

माझ्या भिमाच्या अंगातल पाणी
आहे का कुणाच्या अंगात
जस उठून दिसावे
सोन मातीच्या कणात

बंधुरे शिपाया तू दे रे दे रुपया
जयवंतीच्या सणाला रे चोळीच्या खणाला

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बद्दल आमच्या देशातील महिलांच्या मनामध्ये ही भावना आहे.

...नंतर श्री. गिते..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**

ॲड. उषा दराडे...

अण्णाभाऊ साठे असे म्हणतात की,

" जग बदल घालूनी घाव
मज सांगूने गेले भिमराव"

भीमरावांनी जो आदर्श दिला की,

" तो स्वत: झालासी दगड
घाव टाकीचा सोसला
अरे स्वत:मध्ये त्याले देव दिसला दिसला "

असे बहिणाबाई चौधरी यांनी सांगितले आहे. बाकीचे घाव ज्योतिबा फुले, स्वावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सोसले आणि म्हणून आम्हाला आजचा दिवस बघावयास मिळाला. खरे म्हणजे नामवंत संसदपटू ग्रंथमालिका 12 असे एक पुस्तक आहे. त्यामध्ये डॉ.भीमराव रामजी आंबेडकर घटना समितीतील समारोपाचे भाषण मुद्रीत केलेले आहे. या समारोपाच्या भाषणामध्ये म्हटलेले आहे की, "देशातील राजकीय सत्ता ब-याच काळापर्यंत शेलक्या लोकांची मक्तेदारी होती. ही गोष्ट नाकारण्यात अर्थ नाही. बहुसंख्य लोक केवळ भारवाहक होते. इतकेच नव्हे तर ते या लोकांचे भक्ष्यही होते. या मक्तेदारीमुळे बहुसंख्याकांना आपली स्थिती सुधारण्याची संधीही उरली नव्हती आणि त्यांच्या जीवनाला काही अर्थही उरला नव्हता. हे पददलीत वर्ग आता सत्तेखाली रहायला कंटाळले आहेत. ते स्वयंशासनाला उत्सुक आहेत. अब्राहम लिंकन याने म्हटल्याप्रमाणे दुभंगलेले घर फार दिवस उभे राहू शकत नाही, या जाणीवेने आपण जितक्या लवकर बहुसंख्याकाच्या आकाक्षांना वाव देऊ शकू तितके अल्पिष्ठाच्या दृष्टीने चांगले, देशाच्या दृष्टीने चांगले, स्वातंत्र्य टिकाऊ होण्याच्या दृष्टीने चांगले आणि लोकशाही संरचना टिकून रहाण्याच्या दृष्टीनेही चांगलेच म्हणावे लागेल. समता आणि बंधुभाव या तत्वांना जीवनाच्या सर्वच क्षेत्रात स्थिर केल्यानेच हे साधता येईल."





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे..

डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या याच भाषणामध्ये म्हटले आहे की, "समता जर नसेल तर स्वातंत्र्य म्हणजे अल्पिष्ठांची बहुतांशावरील अधिसत्ता म्हणावी लागेल. स्वातंत्र्या शिवाय समता व्यक्तीच्या उपक्रमशीलतेला मारक ठरेल. बंधुता जर नसेल तर स्वातंत्र्य आणि समता हयाही नैसर्गिकपणे संभवणार नाहीत."

या ठिकाणी डॉ.बाबासाहेबांचा उल्लेख सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी केला. त्यांनी असे सांगितले की, हिंदू कोड बिल चार विभागात पास करावे लागले. महिलांना अधिकार देण्यासाठी 1955 पर्यंत झटावे लागले आणि त्यानंतर चार विभागात हिंदू कोड बिल पास झाले. पण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वत:चा लढा पुढे चालूच ठेवला. त्याचे कारण दलितांचे सक्षमीकरण, शोषितांचे सक्षमीकरण त्याच बरोबर महिलांचे सक्षमीकरण. ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वप्न पाहिले होते आणि त्या दृष्टीने आपणही तो विचार केला पाहिजे. तसेच आपल्या शासनाने सुध्दा डॉ.बाबासाहेबांचे मार्गदर्शन मान्य केलेले आहे.

सभापती महोदय, 2009-10 या वर्षाचा आर्थिक पाहणी अहवाल पाहिला तर स्त्री सक्षमीकरण मापन यामध्ये असे म्हटले आहे की, राजकीय सहभाग आणि निर्णय प्रक्रियेतील अधिकार जो लोकसभा, विधिमंडळ, जिल्हा परिषद जागांमधील शेकडा प्रमाण, लोकसभा निवडणुकीतील राष्ट्रीय पक्षातील उमेदवारातील शेकडा प्रमाण, लोकसभा निवडणुकीत मतदारांचा हक्क बजावणा-या मतदारांचे शेकडा प्रमाण यावरुन मोजण्यात येतो. आमचे महिलांचे सक्षमीकरण आणि महिलांचे स्थान या कुटुंबामध्ये काय आहे आणि समाजामध्ये काय आहे यासंबंधी अनेक मापने आहेत. राजकारणात आमचे स्थान किती आहे, पंचायत राजमध्ये आमचे स्थान किती आहे? राजकारणातील स्थान हा एक महत्वाचा फॅक्टर आहे. महिलांचे समाजामध्ये काय स्थान आहे याचे मेजरमेंट करण्यासाठी स्त्रियांचा दर्जा ठरवित असताना कुटुंबातील स्थान, शिक्षण, रोजगार यातील प्रमाण, लिंगगुणोत्तर आर्युमान आणि राजकीय निर्णय प्रक्रियेतील सहभाग, संचार, स्वातंत्र्य, संसाधनाची उपलब्धता या सगळयांचा विचार आपल्याला करावा लागेल.

यानंतर श्री. भोगले..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 20:05

ॲड.उषा दराडे....

1970 च्या दशकामध्ये जागतिक पातळीवर स्टेटस ऑफ वुमन काय आहे याची चर्चा सुरु झाली. त्याच काळात आपल्या देशात सुध्दा जागतिक पातळीवरुन ही विचारणा झाली की, आपल्या देशातील महिलांचे स्टेटस काय आहे. त्यासाठी संसदेने एक समिती स्थापन केली. या देशातील स्त्रियांचा दर्जा काय आहे याची चर्चा पहिल्यांदा 1975 मध्ये राज्यसभेमध्ये आणि 1976 मध्ये लोकसभेमध्ये झाली. महिलांचा दर्जा सुधारण्याचा प्रयत्न आपल्या देशामध्ये सुरु झाला. 1975 मध्ये आंतरराष्ट्रीय वर्ष साजरे झाले. त्या पाठोपाठ आपण स्त्री-पुरुष विषमता दूर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले. पंचवार्षिक योजनांचा विचार केला तर पहिली आणि दुसरी योजना महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने पूर्णत: फेल ठरली. नंतरच्या सातव्या योजनेपर्यंत कल्याणकारी योजना म्हणून काही योजना आमच्यापर्यंत पोहोचल्या. शैक्षणिक, आरोग्य विषयक, सामाजिक, राजकीय, आर्थिक या सर्व बाबींमध्ये दर्जा उंचावण्यासाठी कल्याणकारी योजनांचा आधार घ्यायला सुरुवात झाली. आठव्या, नवव्या, दहाव्या आणि त्या नंतरच्या पंचवार्षिक योजनांचा कालावधी हा पूर्णपणे क्रांतीकारक कालावधी ठरला. महिलांना निर्णय प्रक्रियेत सामावून घेण्याच्या दृष्टीने फार महत्वाचा निर्णय घेणारा कायदा झाला.

सभापती महोदय, मला काही गोष्टींचा उल्लेख करावयाचा आहे. महाराष्ट्र हे क्रांतिकारी राज्य आहे. शाहू, फुले, आंबेडकर, ज्ञानेश्वर माऊली, संत तुकोबांच्या महाराष्ट्रामध्ये महिलांच्या सक्षमीकरणासाठी वेळोवेळी पावले उचलली गेली. 33 टक्के आरक्षणाचे बिल केंद्र सरकारने पारित केले, त्याची अंमलबजावणी करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य होते. 1994 साली या राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री.शरद पवार यांनी महिला धोरण आणले. ज्या धोरणामध्ये त्यांनी उल्लेख केला होता की, फक्त कायदा असून उपयोगाचे नाही, त्याची अंमलबजावणी करण्याची मानसिकता असली पाहिजे. त्या मानसिकतेतून आलेले धोरण म्हणजे महिलांच्या हक्काची पहिली सनद. या देशात पहिल्यांदा आपल्या राज्याने महिला आर्थिक विकास महामंडळ स्थापन केले. राज्यात बचत गटांना चालना दिली. 73 आणि 74 व्या घटना दुरुस्तीची अंमलबजावणी करणारे कायदे राज्य सरकारने केले. त्यामध्ये महिलांना रोजगाराची संधी मिळाली. डोमेस्टिक व्हायलन्स ॲक्ट, मालमत्तेमध्ये अधिकार देणारा कायदा या गोष्टी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी इतर हक्कामध्ये आणल्या. नंतर कायद्यामध्ये दोन वेळा दुरुस्ती झाली आणि आता आम्हाला भावाप्रमाणे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे....

समान अधिकार मिळाला. लक्ष्मी योजना, घर दोघांचे, महिलांचा शेतीतील सहभाग, अंगणवाडी मदतनीसाचे काम, नोकरीतील आरक्षण असेल ही सर्व आयुधे आहेत. पण महिलांचे या समाजामधील स्थान उंचावण्याच्या दृष्टीने कायदे, न्यायसंस्था आणि शासन व्यवस्था ही महिलांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणारी व्यवस्था आहे आणि ती महाराष्ट्राने यशस्वीपणे पूर्ण केली म्हणून मला महाराष्ट्राचे अभिनंदन करावयाचे आहे.

सभापती महोदय, मला आणखी एका गोष्टीचा उल्लेख करावयाचा आहे. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये माजी मुख्यमंत्री स्व.यशवंतराव चव्हाण यांचे खूप मोठे नाव आहे. त्यांचे महिलांविषयी असे मत होते की, कोणताही विचार हा क्रियाशील होण्यापूर्वी भावनांना समजून घ्यावे लागते. भावना अपुरी असेल तर त्यातून येणारा निर्णय, त्यातून येणारा विचार अपुरा आणि चुकीचा असण्याची शक्यता असते. म्हणून अवेअरनेसची आवश्यकता आहे. तेव्हा समाजामध्ये अवेअरनेस निर्माण करावयाचा असेल तर त्यासाठी आमच्या भावना ओळखून घेणे गरजेचे आहे. परंतु दुर्दैवाने आमच्या भावना ओळखून घेण्याचा कोणी प्रयत्न करीत नाही. या संदर्भात मला आशाताई भोसले यांनी गायलेले एक भावगीत आठवते.

नंतर 4एक्स.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे ....

या निमित्ताने प्रसिध्द कवी श्री. सुरेश भट यांची कविता मला आठवली. ते म्हणतात की,

"माझीया मना, जरा थांबना,
पाऊली तुझ्या माझिया खुणा,
तुझे धावणे अन् मला वेदना
माझिया मना जरा ऐक ना.
माझीया मना जरा ऐक ना,
ओळखू कसे मी हे तुझे ऋतू,
एकटी न मी सोबतीस तू
ओळखू कशा मी तुझ्या भावना.

अशा प्रकारे स्त्रीच्या भावना समजून घेणे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेली सामाजिक समता अस्तित्वात असणे आवश्यक आहे. जून 1994 मध्ये माननीय शरद पवार यांनी महिला धोरण आखले होते. त्याच्या प्रस्तावनेत लिहिले होते की, सन 1994 मध्ये महाराष्ट्र शासनाने राज्यातील महिलांच्या सर्वांगीण विकास आणि उन्नतीचे लक्ष्य डोळ्यासमोर ठेवून हे महिला धोरण आखले असून या धोरणान्वये जीवनाच्या सर्वच क्षेत्रात स्त्रियांना प्रत्यक्ष अधिकार, निर्णय अधिकार, सत्तेत प्राधान्य आणि सहभागाच्या संधी उपलब्ध करुन देण्याची तसेच त्यांच्या जीवनमानाचा गुणात्मक दर्जा उंचावण्यास सहाय्यभूत होण्याची बांधिलकी शासनाने स्वीकारली आहे.

या निमित्ताने मी काही गोष्टींचा जरुर उल्लेख करणार आहे की, अनेक बाबतीत स्त्रीयांना गृहीत धरले जाते, दु:ख सहन करणे हा आमचा जसा अधिकारच आहे, त्यागाची मूर्ती म्हणून स्त्रियांकडे बघितले जाते परंतु आमचे दु:ख आता खऱ्या अर्थाने रस्त्यावर आणण्याची गरज आहे.

रंगुनी रंगात माझ्या, रंग माझा वेगळा,
गुंतूनी गुंत्यात साऱ्या, पाय माझा मोकळा,
राहती माझ्या सवे ही, आसवे गीतापरी,
हे कशाचे दु:ख ज्याला, लागला माझा लळा,
माणसांच्या मध्यरात्री हिंडणारा सूर्य मी,
माझियासाठी न माझा पेटण्याचा सोहळा.

अशी या देशातील सर्व महिलांची परिस्थिती आहे, ती परिस्थिती बदलण्याची गरज आहे.

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे .......

या संदर्भात मला असे सांगावयाचे आहे अशा पध्दतीने न पेटणाऱ्या महिलांना पेटविणे आणि सामाजिक सक्षमीकरणासाठी सामाजिक सहभागामध्ये तिचा सहभाग वाढविणे आणि तिच्या अस्तित्वाला वेगळा अंकुर निर्माण करुन देणे यासाठी या देशात व राज्यात एक महत्वाचे पाऊल शासनाने उचलले आहे.

यासंदर्भात अनेक कायदे महत्वाचे आहेत. त्यातील इंग्रजांच्या काळातील काही कायदे आहेत आणि त्यानंतर काही कायदे आपण केले आहेत. त्यात इंग्रजांच्या काळातील कायदे म्हणजे सन 1829 चा सती बंदी कायदा, सन 1856 चा विधवा पुनर्विवाह कायदा, सन 1891 चा संमती वयाचा कायदा, सन 1829 चा बालविवाह प्रतिबंधक कायदा आणि सन 1937 सालचा हिंदू स्त्रीच्या मालमत्तेच्या हक्काविषयीचा कायदा, हे स्वातंत्र्यापूर्वीचे कायदे आहेत. स्वातंत्र्यानंतर आपण द्विभार्या प्रतिबंधक कायदा, वारसा हक्काचा कायदा, गर्भजलचिकित्सा प्रतिबंधक कायदा असे अनेक कायदे आपण केले. त्यानुसार आपण न्यायव्यवस्था, शासन व्यवस्था आणि समाजव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

हे करीत असताना आपण कुठेतरी कमी पडतो की काय म्हणून "ज्ञानज्योति सावित्रीबाई फुले" असे एक पुस्तक प्रा. विजया इंगोले यांनी लिहिलेले आहे. त्यांनी त्यात पीए.डी. केली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, "भारतीय हिंदू विचार परंपरेने स्त्री-शुद्रांना एकाच दावणीला बांधून गुलामी नियमांच्या दास्य शृंखला त्यांच्या पायात बांधून त्यांना शिक्षणापासून व स्वतंत्र विचारापासून हजारो कोस लांब ठेवले होते. दैववाद, कर्मकांड, संपूर्ण परावलंबन व टोकाची मानसिकता व सामाजिक गुलामगिरी धर्माच्या आधाराने लादली होती. या गुलामगिरीमुळे स्त्रियांना मुक्या जनावराप्रमाणे जीवन जगावे लागत होते. परंतु महात्मा फुले, माई सावित्रीबाई यांनी स्त्रीयांना शिक्षणाचे दान करुन स्त्री मुक्तीचाच नव्हे तर मानव मुक्तीचा पाया घातला स्त्रीच्या स्वातंत्र्याचा पाया घातला." असा मानव मुक्तीचा मार्ग म्हणून स्त्रीला अर्धवट राहून कसे चालेल असा माझा प्रश्न आहे.

...3...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे .......

महोदय, विधिमंडळांचा इतिहास पाहिला तर सन 1952 पासून सन 2009 पर्यंत फक्त 135 महिलांनीच या सभागृहांचे प्रतिनिधीत्व केलेले आहे. त्या सर्व महिलांचे प्रश्न कसे मांडू शकतील. तसेच त्या केवळ महिलांचेच प्रश्न नव्हे तर आपली कर्तबगारी सिध्द करण्याचा प्रसंग आला तरी चांगल्या प्रकारे काम करु शकतात. जगाचा विचार केला तर जगात वेगळी परिस्थिती नाही. एकूण लोकसभेची सदस्य संख्या 33981 एवढे पुरुष आणि त्यात फक्त 4512 इतक्याच स्त्रिया, केवळ 9 टक्के ग्रुप लिडर्स महिला सदस्य होऊ शकल्या. सन 1991 मध्ये वर्ल्डवाईड कॅबिनेट मिनिस्टर्स मध्ये हे प्रमाण फक्त 3.05 टक्के आहे. अशा प्रकारे 3 ते 8 टक्के लोकसभा आणि राज्यसभेच्या पर्सेंटेजची महिलांची टक्केवारी आहे, त्यापुढे ती टक्केवारी जाऊ शकली नाही. आणि पाकिस्तानसारख्या देशात तर हे प्रमाण केवळ 0.05 टक्के इतकेच आहे. हे चित्र आपल्याला कोणत्याही परिस्थितीत बदलावे लागेल.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे...

स्त्रियांकडे माझा समाज उपभोगाची वस्तू म्हणून बघत असतो. स्त्रियांमध्ये स्वतंत्र अस्तित्व म्हणून काम करण्याची स्वतंत्र वैचारिक, बौध्दिक व शारीरिक काम करण्याची क्षमता आहे परंतु असा विचार तिच्या मनावर आणि त्याच्याही मनावर कधी बिंबवला गेला नाही. खरे म्हणजे मी कुणासाठी, याचा आरसा महिलेला सुध्दा तिला दिसला नाही. मी मुलासाठी, मी नव-यासाठी, मी नातवंडासाठी, पण नॉट फॉर मी. मला लाल रंगाची साडी आवडत असेल तर संक्रातीला मी कधीही असे म्हणत नाही की, "कारभारी मला तुम्ही लाल रंगाची साडी आणा". त्यांनी आणलेली हिरव्या रंगाची साडी मी नेसते परंतु हे मी व्यक्त करीत नाही, की "मला ही साडी आवडलेली नाही". मी त्यांना असे सांगते की, तुम्ही आणलेली साडी मला खूप आवडली" व सा-याच मैत्रिणींना सांगत सुटते की, "आमच्या हयांनी साडी आणली, आमच्या हयांनी साडी आणली" व त्यामध्ये आम्ही खुश असतो. खरे म्हणजे आम्हाला आमच्यासाठी काहीच करायचे नसते. मला ना.धो.महानोरांची काव्य पंक्ती आठवते ते असे म्हणतात की,

"राजसा जवळ जरा बसा, जीव हा पिसा,
तुम्हा वीन बाई
कोणता करु सिनगार सांगा तरी काही
राजसा."

सभापती महोदय, राजसासाठी शिणगार करावयाचा आहे परंतु स्वत:साठी शिणगार करावयाचा नाही. माझ्या स्त्री वर्गाला स्वत:साठी जगण्याचे आम्ही कधी शिकवलेच नाही.

"नटले तुमच्यासाठी" या लावणीमध्ये सुध्दा मी कुणासाठी तरी नटलेली आहे असेच दाखवलेले आहे.

सभापती महोदय, अजूनही स्त्रियांना असे सांगून भुरळ घातली जाते की, वा काय तू सुंदर आहेस, तुझे नाक चाफेकळी सारखे आहे, तुझी चाल माधुरी सारखी आहे, तुझे डोळे हेमा मालिनीसारखे आहेत, पदर किती छान घेते पायाचा अंगठा सुध्दा दिसू देत नाहीस, आमची सून तर बोलतच नाही. त्यागाची मूर्ती आणि सौंदर्य म्हणून स्त्रियांना कधी चंद्राची उपमा दिली जाते,

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे...

कधी ता-याची उपमा दिली जाते तर कधी पाखराची उपमा दिली जाते. मला गालिबचा शेर आठवतो, ते म्हणतात की,

"हिनाय दस्तने अब्रु सियासे मोती बरसाया,
बरसकर हट गया बादल मेहताब नजर आया".

सभापती महोदय, मिर्झा गालिब रस्त्यावरुन जात असतांना त्यांना गॅलरीतून एक महिला दिसली, ती त्याला चंद्रासारखी वाटली. चंद्राची उपमा वर्षानुवर्षे आम्हाला साहित्यकांनी दिलेली आहे. त्यामुळेच आमची पुरुष प्रधान संस्कृती सांभाळण्यामध्ये स्त्रियांनी काम केलेले आहे. आम्हाला मानवतेचा विचार पाहिजे, माणूस माणसावर प्रेम करणारा असला पाहिजे. मानवता वादाच्या संदर्भात अभंगाच्या काही ओळी आहेत.

"माझे माहेर पंढरी,
आहे भिवरेच्या तीरी,
माझी बहीण चंद्रभागा,
करीतसे पाप भंगा,
नामा म्हणे आता लोपला दिनकर,
बाप ज्ञानेश्वर समाधिस्थ."

सभापती महोदय, माझे माहेर पंढरी आहे. मी विठ्ठलाला माझ्या माहेरचे माणूस समजते, तो माझ्यासाठी कुणीतरी आहे. जन्माने नाते निर्माण होत नाही तर कृतीने नाते निर्माण होत असते. महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वरांनी, संत तुकारामांनी, संत नामदेवानी क्रांतिकारक विचार दिलेले आहेत. अशा महाराष्ट्रात आज आम्ही जगत आहोत. उशिरा का होईना हे जे बिल आणलेले आहे ते सुवर्णाक्षरांनी लिहिले जाणारे आहे. त्यामुळे या संदर्भातील पार्श्वभूमी व्यक्त करणे ही काळाची गरज आहे.

सभापती महोदय, "स्वामी" या कादंबरीत माधवराव पेशवे अस्थिपंजर झाले, मृत्यूला टेकले, खाटेवर झोपलेले आहेत, त्यांची पत्नी त्यांच्या जवळ येते आणि हळूच सांगते, "स्वामी मी सती

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे...

जाण्याचा निर्णय घेतलेला आहे." त्यावेळेला स्वामी असे म्हणतात की, "वा, मी आता निवांतपणे मरु शकतो कारण तू सती जाण्याचा निर्णय घेतलास". माझ्या मृत्यूनंतर बायकोचे काय होईल, तिच्या चारित्र्याचे काय होईल याचा धाक मृत्यूशय्येवर पडलेल्या माधवराव पेशव्यांना पडलेला होता. म्हणजे स्त्री फक्त उपभोगाची वस्तू आहे हा विचार त्यांच्या डोक्यामधून जावयास तयार नव्हता. सीतेच्या बाबतीत सुध्दा हीच परिस्थिती आहे. सीतेला कमजोर दाखवली परंतु त्यापेक्षा ती किती तरी सशक्त होती. सीतेचे हरण झाल्यानंतर सीता अशोक वनात राहिली, तिच्या अंगाला रावण कधीही हात लावू शकला नाही.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे ..

द्रौपदीमध्ये सुध्दा तेवढीच शक्ती होती.उर्मिलेच्या संदर्भात मला असे सांगावयाचे आहे की,

"चौदा वर्षे पतीविना राहिली उर्मिला,
हाच खरा वनवास म्हणोन
चुकले काहो चुकले काहो
आकाशाला भास म्हणालो
भास म्हणालो "

खरा वनवास सीतेचा होता, रामाचा होता, लक्ष्मणाचा होता की उर्मिलेचा होता ? म्हणजेच

"अंबारीचा हत्ती नसे अंबारीचा स्वामी,
लक्ष्मणाची रेघ आली उर्मिलेच्या कामी "

वास्तविक सीतेसाठी रेघ मारली होती परंतु ते बंधन उर्मिलेने पाळले. अशा प्रकारे महिलांना बंधनामध्ये अडकून घेण्याची सवय पुरुष प्रधान संस्कृतीने लावली होती म्हणूनच आता आम्हाला 50 टक्के आरक्षण दिले असल्यामुळे मोकळा श्वास घ्यावयास मिळेल.

श्रीकृष्णाने.रुकिमणी आणि सत्यभामा या दोघींसाठी पारिजातकाचे झाड लावले होते परंतु झाड एकीच्या दारात आणि फुले मात्र दुसरीच्या दारात पडत असल्यामुळे दोधीही जणी आपसात भांडत बसत.परंतु दोघींचाही जीव श्रीकृष्णावरच होता.धृतराष्ट्र जो काही निर्णय घेईल तो निर्णय गांधारी डोळयावर पट्टी लावून मान्य करीत असे. स्वत:मध्ये किती शक्ती प्राप्त केलेली आहे हे दाखविण्यासाठी दुर्वास ऋषींनी कुंती नावाच्या कुमारिकेला माता बनवले होते त्यामुळे जन्मभर कुंतीला कर्ण हा माझा मुलगा आहे हे सांगता आले नाही. अहिल्यादेवी होळकरांचे उदाहरण देखील या ठिकाणी देता येईल. पती वारल्यानंतर सती न जाता त्यांनी राज्य केले इतकेच नव्हे तर त्यांनी महिलांच्या सशस्त्र तुकडया तयार केल्या आणि झालेले बंड मोडून काढले होते. अशा प्रकारची हिंमत अहिल्यादेवी होळकरांनी त्यावेळी दाखवली होती.माता जिजाऊचा जर या ठिकाणी उल्लेख केला नाही तर या विषयाला न्याय दिल्यासारखे होणार नाही म्हणून मी त्यांचा उल्लेख या ठिकाणी करु इच्छिते. माता जिजाऊच्या संदर्भात अग्निरेखा नावाची एक कादंबरी

2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे ..

आहे. स्वत: जिजाऊ माता मनोगत व्यक्त करीत आहेत अशा प्रकारची ती कादंबरी आहे. काही ठिकाणी असा उल्लेख केला आहे की जिजाऊ माता एकांतात स्वत:शी बोलत बसलेल्या आहेत आणि त्या स्वत:ला असा प्रश्न विचारत आहेत की, स्वारी पातशाहीच्या दरबारात का राहिली असेल, हिंदू पदपातशाही निर्माण करावी, हिंदूचे साम्राज्य निर्माण करावे हे काही स्वारीला कळत नाही काय ? स्वारीमध्ये तेवढी समर्थता आहे तरी सुध्दा स्वारी आदिलशाहीकडे का राहते, एवढे सगळे करीत असतांना स्वारींनी त्यांचा संभाजी नावाचा मुलगा होता आणि तो मारला गेला होता त्याला पातशाहीच्या मोहिमेवर कशासाठी पाठविले असेल ? पण जेव्हा जेव्हा शहाजीराजे आले होते तेव्हा तेव्हा मॉ जिजाऊंनी हे प्रश्न शहाजीराजे यांना कधीही विचारले नाहीत ते प्रश्न त्यांनी मनामध्ये ठेवले होते. महिला कधीही आपले दु:ख सांगत नाहीत त्या फक्त दु:ख सोसत राहतात व त्यामध्ये खुश राहतात. सुरेश भट यांच्या कवितेतील काही ओळी मला येथे सांगावयाच्या आहेत. त्या ओळी पुढील प्रमाणे आहेत :-

" भोगले जे दु:ख त्याला, सुख म्हणावे लागले,
एवढे मी भोगले की, मज हसावे लागले,.
ठेविले आजन्म डोळे आपुले मी कोरडे,
पण दुज्यांच्या आसवांनी, मज भिजावे लागले
गवसला नाहीच मजला चेहरा माझा कधी
मी कसा होतो मलाही आठवावे लागले //

समाजाने या महिलांची अशी परिस्थिती निर्माण केलेली असली तरी सुध्दा जिजामातांनी सईबाई, सोयराबाई यांना सांभाळले, अनेक लग्ने लावून नातेवाईक जमा केले आणि हिंदवी स्वराज्याचे स्वप्न पाहिले. एवढेच नव्हे तर घोडयावर मांड टाकून शिवबा बरोबर त्या मोहिमेवर सुध्दा गेल्या तसेच शिवबांच्या गैरहजेरीमध्ये राज्याचा राज्य कारभारसुध्दा पाहिला. एखाद्या महिलेला जर संधी मिळाली तर ती सुध्दा सशक्त असू शकते हे यावरुन दिसून येईल.माता सावित्रीला ज्योतिबांनी सहकारी म्हणून संधी दिली होती व त्यांनी क्रांतीची ज्योत पेटवली होती. महात्मा ज्योतिबा फुले नसते, सावित्रीबाई नसत्या व डॉ.बाबासाहेब आंबेडकर नसते तर बीड जिल्हयातील

3..



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ॲड.उषा दराडे ..

एखाद्या डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या शेतामध्ये डझन भर लेकरे घेऊन मी खुरपायला गेले असते येथे सभागृहात येऊन भाषणे करीत असतांना दिसले नसते, हे मी आपल्याला खात्रीने सांगते. हे सर्व श्रेय महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना जाते.

सभापती महोदय, शेवटी मला एका गोष्टीचा उल्लेख करावयाचा आहे. टी.व्ही. आणि सिनेमा बधा, रेडिओ ऐका, हेच समाजाला आम्ही शिकवतो काय ?. आज जे काही अंक प्रसिध्द होतात त्यामध्ये महिलांचे असे चित्रण दाखवले जाते की, ती व्याभिचारी असते किंवा महिला महिलांवर अत्याचार करते .एक महिला दुस-या महिलेवर कधीही अन्याय करीत नाही, पुरुष महिलांवर अन्याय करीत नाही, तर पुरुष प्रधान संस्कृती महिलांवर अन्याय करीत असते त्यामुळे लज्जा व अकुर सारखे चित्रपट निघणे अधिक गरजेचे आहे. या चित्रपटामध्ये सीता असे विचारते की, मी एकटी अग्निपरीक्षा देणार नाही तर रामा तू सुध्दा अग्निपरीक्षा दिली पाहिजे. सभापती महोदय, या निमित्ताने मी अधिक बोलणार नाही. परंतु महिलांसाठी 50 टक्के आरक्षण देण्यासंबंधीचे जे विधेयक मांडण्यात आलेले आहे त्यामुळे आम्हाला थोडा मोकळा श्वास घेता येईल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची घटना आमच्या बाजूने आहे. त्यामुळे आमच्यामध्ये जगण्याची हिंमत आलेली आहे. त्यामुळे मला तुतारी फुंकण्याची उभारी देखील आलेली आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे...

"दुभंगलेल्या उरात माझ्या किती सूर्य झेप घेती,
चुकून हे रक्त पेटण्याची कधी मधी दाखवी तयारी,
असंख्य माझ्या पराभवांचे चिणून मी टाकले इरादे,
मधेच मी बंडखोर गीते उफाळूनी फुंकीतो तुतारी !"

याच संदर्भात मला शेवट असा करावयाचा आहे की,

"आम्ही जीवंत राहू, आम्ही जीवंत राहू,
आम्हीच ते उद्याचे आकाश रंग पाहू !
आम्ही असू अडाणी आम्हा न रितीभाती,
आम्ही असेच राहू मातीमधील माती,
हे सोसणे युगांचे थोडे अजून साहू !
जेव्हा आम्हा भडाग्नी
त्यांच्या जगास देऊ,
एकेक आसवांचा तेव्हा हिशेब घेऊ,
खांद्यावरुन तेव्हा सूर्य चंद्र वाहू !"

एवढे बोलून मी माझे भाषण संपविते. धन्यवाद.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : मंत्री महोदयांनी उत्तराचे भाषण सुरु करावे...

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, मला थोडक्यात विचार व्यक्त करावयाचे आहे.

**उप सभापती** : विधेयकाच्या चर्चेला सुरुवात करतांना या विधेयकावर फक्त महिला सदस्य बोलतील असे ठरले होते.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, या विधेयकावर कुणीही पुरुष सदस्य बोलले नाही असे रेकॉर्डवर राहू नये या करिता आम्हाला संधी मिळाली पाहिजे.

**उप सभापती** : मी सुरुवातीलाच संपूर्ण सभागृहाला सांगितले होते की, या विधेयकावर प्रत्येक माननीय सदस्यांनी बोलण्याची इच्छा व्यक्त केली तर त्याला माझी हरकत नाही. या विधेयकावर पुरुष बोलले नाहीत असे समजण्याचे कारण नाही. या विधेयकावर चर्चा सुरु करीत असतांना विधानसभेमध्ये भरपूर चर्चा झाली असल्यामुळे या सभागृहात फक्त महिला सदस्य बोलतील असे ठरले होते. आपण जरी या विधेयकावर बोलला नाहीत तरी विधेयक मंजूर करीत असतांना आपली उपस्थिती सभागृहामध्ये आहे. याचाच अर्थ न बोलता प्रेमापोटी काही कामे आपल्याला करता येतात हे दिसून येते.

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, मला फक्त एकच मुद्दा मांडावयाचा आहे...

**उप सभापती** : मी जर आपल्याला संधी दिली तर इतरांना देखील द्यावी लागेल.

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, मला एक अत्यंत महत्वाचा मुद्दा या ठिकाणी उपस्थित करावयाचा आहे....

प्रा. वर्षा गायकवाड (महिला व बाल विकास मंत्री) : सभापती महोदय, मला विधानसभेमध्ये बोलण्याची संधी मिळालेली नाही त्यामुळे मला बोलण्याची संधी मिळाली पाहिजे...

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, या विधेयकावरील चर्चेमध्ये अत्यंत अभ्यासपूर्ण भाषणे झाली आहेत....

**उप सभापती** : आपण जर ऐकत नसाल तर मी आता सर्वच माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देईन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विशेषत: माननीय सदस्या ॲड. उषा ताई दराडे यांचे भाषण अतिशय अभ्यासपूर्ण झाले त्याचप्रमाणे सर्वच माननीय सदस्यांची भाषणे अभ्यासपूर्ण झाली आहेत. या विधेयकाच्या बाबतीत मला सांगितले पाहिजे की, अगदी पहिल्यांदा स्वर्गीय इंदिराजींनी या करिता एक समिती नेमली होती. 1975 साली आंतरराष्ट्रीय महिला वर्ष साजरे करण्यात आले. त्या अनुषंगाने स्वर्गीय राजीव गांधी यांनी महिलांना 33 टक्के आरक्षण लागू करण्याचा प्रस्ताव आणला. ते 33 टक्के आरक्षण आणीत असतांना त्याचा फायदा समाजातील सर्व स्तरावरील लोकांना मिळेल याची त्यांनी काळजी घेतली. उदा. दलित समाजातील स्त्रिया असतील, ओ.बी.सी. मधील स्त्रिया असतील, त्यामध्ये केवळ समाजाच्या वरच्या स्तरावरील स्त्रियांनाच नाहीतर सर्व समाजातील स्त्रियांना या आरक्षणाचा फायदा मिळाला आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई . . . .

जर अशा प्रकारचे आरक्षण आले नसते तर केवळ वरच्या स्तरातील स्त्रिया राजकारणात दिसल्या असत्या. आज देखील मी जबाबदारीने बोलू इच्छितो की, आरक्षणाबद्दल बोलत असताना आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, वरिष्ठ जातीतील महिलांना आरक्षणाची गरजच नाही. कारण त्यांच्या संख्येच्या मानाने त्यांचा सहभागही तेवढयाच प्रमाणात आहे. या विधेयकामुळे धनगर समाजातील स्त्रिया, गवळी समजातील स्त्रिया पुढे आल्या. हे सगळे आरक्षणामुळे घडलेले आहे हे आपण सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे. म्हणून मला या बिलाचे कौतुक आहे. तसेच याबाबतीत कमिटीने असे सुचविले होते की, हे आरक्षण स्थानिक पातळीवर ठेवावे, त्यापेक्षा वरच्या स्तरापर्यंत आणू नये. एवढेच मला सांगावयाचे आहे.

----

. . . .5बी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पडांगळे (नामनियुक्त) : सभापती महोदय, प्रथम मी परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राजश्री छत्रपती शाहू महाराज आणि सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करतो.

सभापती महोदय, या बिलाला पाठिंबा देत असताना मी विधानसभेचे अभिनंदन करतो. कारण त्या सदनाने परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या आदल्या दिवशी म्हणजे 13 तारखेला हे विधेयक एकमताने मंजूर करुन विधान परिषदेमध्ये पाठविले. त्या सभागृहाने चांगल्या दिवशी हे काम केलेले आहे, त्यामुळे मी त्या सभागृहाचे आणि तेथील सर्व सन्माननीय सदस्यांचे मनापासून अभिनंदन करतो. मी या विधेयकाला पाठिंबा देत असताना राजश्री शाहू महाराज . ..

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.राम पडांगळे यांनी सांगितले होते की, त्यांना फक्त एक सूचना करावयाची आहे. त्याप्रमाणे ती करावी.

श्री.राम पडांगळे : सभापती महोदय, मी राजश्री शाहू महाराजांना अभिवादन करतो. कारण आरक्षणाच्या बिलाचे ते जनक आहेत. या संपूर्ण देशामध्ये जर सर्वप्रथम कोणी आरक्षण आणले असेल तर राजश्री शाहू महाराजांनी आणले. म्हणून मी या सदनामध्ये राजश्री शाहू महाराजांना वंदन करतो आणि यापुढे असा राजा पृथ्वीतलावर होणार नाही असे मला वाटते. याठिकाणी 50 टक्के आरक्षणाचे विधेयक आणताना मी आदरणीय श्री.शरद पवार साहेबांचे देखील अभिनंदन करतो. आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी जाणीवपूर्वक घोषणा केली की, या राज्यातील महिलांसाठी 50 टक्के आरक्षण लागू करण्यात येईल. यासंबंधातील विधेयक लोकसभेमध्ये प्रलंबित आहे.आपल्याला वाईट वाटत असेल, पण आपण ऐकून घ्यावे. मी माननीय श्री.शरद पवार साहेबांचे अभिनंदन करतो की, त्यांनी याबाबतीत घोषणा केली आणि माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांचे देखील अभिनंदन करतो. कारण माननीय श्री.शरद पवार साहेबांनी घोषणा केल्यानंतर या सदनामध्ये अशा प्रकारचे विधेयक आणण्याचे काम कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने केलेले आहे. मला एकच सूचना करावयाची आहे की, 33 टक्के आरक्षणामुळे राज्यातील महिलांना काम करण्याची संधी उपलब्ध झाली. विशेषत: राज्यातील दलित महिला आहेत, त्यांना आपण कधीही महापौर झाल्याचे पाहिले नसते. पण केवळ आरक्षणामुळे अनेक राज्यातील महानगर पालिकांमध्ये दलित महिला महापौर झाल्याचे पहाताना आम्हाला आनंद झाला. महिलांसाठी आरक्षण आहेच परंतु त्यामध्ये दलित महिलांना आरक्षण मिळाले, न्याय मिळाला आणि कर्तबगारीने काम करण्याची जी संधी मिळाली ती अतिशय अभिनंदनीय आहे.





श्री.राम पडांगळे . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, या बिलाच्या बाबतीत देखील मी अशाच प्रकारची सूचना करणार आहे. प्रथम या बिलाचे स्वागत करतो, परंतु त्यामध्ये महिलांसाठी 50 टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे त्यामध्ये दलित महिलांची जी टक्केवारी आहे, त्याचा देखील गांभीर्याने विचार करावा आणि त्यांच्या साठी त्याप्रमाणे टक्केवारी ठेवली जाईल या दृष्टीने देखील विचार करावा अशी मी विनंती करतो. मी पुन्हा एकदा या विधेयकाला सक्रिय पाठिंबा देतो. तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण आणि काव्यमय विचार मांडले त्याबद्दल देखील मी त्यांचे अभिनंदन करतो. तसेच सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी देखील या बिलाला पाठिंबा देत असताना चांगले विचार मांडले त्या बद्दल मी त्यांचे देखील अभिनंदन करतो आणि माझे भाषण संपवितो. जय महाराष्ट्र, जय भीम.

----

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ( मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, एक ऐतिहासिक विधेयक या ठिकाणी मंजूर होत आहे, त्या आनंदात सहभागी होण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये किमान 50 टक्के जागा आज महिलांसाठी आपण आरक्षित करीत आहोत. आपण खूप उशिरा हा निर्णय घेतला. महाराष्ट्रात महिलांच्या 33 टक्क्याच्या आरक्षणाचा निर्णय सर्वात पहिल्यांदा झाला होता. 50 टक्क्याच्या आरक्षणाच्या संदर्भातील अंमलबजावणी मात्र आपण सर्वात उशिरा करीत आहोत, याबद्दल जरुर खंत आहे. पण उशिरा का होईना या राज्याने ही भूमिका स्वीकारली याचा आनंद आहे.

सभापती महोदय, जगभरचा इतिहास असे सांगतो की, या दुनियेमध्ये पहिल्यांदा स्त्री राज्यकर्ती होती, तिने नांगराचा शोध लावला, शेतीचा शोध लावला. तिच्याकडे निर्मिती क्षमता होती म्हणून पुरुष स्त्रीलाच पूजत होते. पण ज्या दिवशी शस्त्राचा शोध लागला, त्या दिवशी पुरुषाने आपली सत्ता प्रस्थापित केली, असा जगभरचा इतिहास सांगतो. त्यानंतर स्त्रीच्या दमनाला सुरुवात झाली, ती आज पर्यंत थांबली नाही. पुरुषाच्या हातात ज्या दिवशी शस्त्र आले त्या दिवशी स्त्रीचे दमन आणि शोषण या दोन्ही प्रक्रिया सुरु झाल्या. त्या थांबविण्यासाठी अनेक प्रयत्न झाले. ते आजचे प्रयत्न नाहीत. गावोगावच्या देवता आपल्याला तेच सांगतात. गावाच्या बाहेर रखूमाई, म्हळसाई असते या सगळया देवता स्त्रीसत्ताक इतिहासाची प्रतिके आहेत. पण त्या देवी बनलेल्या आहेत. लोक त्यांची पूजा करतात. महालक्ष्मीच्या गाभाऱ्यामध्ये जाण्याची काल-परवा पर्यंत स्त्रियांना परवानगी नव्हती. देवीला साडी नेसवण्याचे काम पुरुषाने करावयाचे, पण स्त्रियांना आतमध्ये येऊ द्यावयाचे नाही, इतका कब्जा या सगळया व्यवस्थेतील पुरुषांनी घेऊन ठेवला होता. तो कब्जा आणि तो तुरुंग फोडण्याचे काम आता होऊ लागले आहे, ही सुरुवात आहे. राजा राम मोहन रॉय यांनी आपली वहिनी सती जाताना तिच्या किंकाळया ऐकल्यानंतर ब्रिटिश सत्तेसमोर आवाहन केले, त्यातून सती बंदीचा कायदा झाला. राजा राम मोहन रॉय यांच्यानंतर महात्मा फुले यांनी महाराष्ट्रामध्ये शिक्षणाची ज्योत पेटवली आणि खऱ्या अर्थाने स्त्री मुक्तीची सुरुवात झाली. या दोघांनाही याचे श्रेय आवर्जून दिले पाहिजे. ॲड. उषा ताई दराडे यांनी आहिल्याबाईंचे उदाहरण दिले. त्या सती गेल्या नाहीत. जिजामाताही सती गेल्या असत्या तर कदाचित शिवाजी महाराजांचा इतिहास इतका चांगला लिहिला गेला नसता. हा महाराष्ट्र सती प्रथेचे कधीही समर्थन न करणारा

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील.....

होता. स्वामींची परंपरा वेगळी आहे, ते स्कूल वेगळे आहे. पण बहुजनांच्या इतिहासामध्ये स्त्री कधीही सती गेली नव्हती तिने सती जाणे नाकारले, म्हणूनच एक वेगळा इतिहास महाराष्ट्रामध्ये घडू शकलेला आहे.

सभापती महोदय, ताराबाई शिंदे यांचे नाव मला या ठिकाणी आवर्जून या निमित्ताने घ्यावेसे वाटते. स्त्री-पुरुष समतेचा पहिला उद्‌गार ताराबाई शिंदे यांनी काढला. आधुनिक भारताच्या निर्मात्यांच्या संदर्भातील एक पुस्तक रामचंद्र गुहा यांनी अलीकडेच प्रकाशित केलेले आहे. त्या पुस्तकामध्ये ज्यांनी हा आधुनिक भारत घडविला त्यांच्या बद्दलचा इतिहास त्यांनी सांगितला आहे. त्या पुस्तकामध्ये एक सबंध प्रकरण ताराबाई शिंदे यांच्या बद्दल लिहिलेले आहे. ताराबाई शिंदे आम्हाला काल-परवा पर्यंत माहीत नव्हत्या. सावित्रीबाई फुले यांचा फोटो सुध्दा आपण काल-परवा पर्यंत लावत नव्हतो. दहा वर्षापूर्वी महाराष्ट्र सरकारने सावित्रीबाई यांचा फोटो शोधला आणि तो प्रकाशित केला त्यामुळे ज्या स्त्रीने पहिली शाळा सुरु केली त्या सावित्रीबाई फुले या देशाला माहीत झाल्या. सनातन्यांचा आणि समाजाचा सगळा राग व अन्याय सहन करत, लोक दगड मारत होते, घाण फेकत होते पण सावित्रीबाई फुले हटल्या नाहीत. सावित्रीबाईंच्या सोबतीने फातिमा शेख सुध्दा जात होत्या. त्या सुध्दा आपल्याला माहीत नाहीत. या दोन स्त्रियांनी जे काम केले, त्यामुळे या देशातील सगळया स्त्रिया शिकू शकल्या आहेत. म्हणून या दोघींची आणि ताराबाई शिंदे यांची आठवण मला या ठिकाणी आवर्जून कराविशी वाटते.

सभापती महोदय, स्त्रियांना 50 टक्के आरक्षण दिले याचा अर्थ ताबडतोब लिंगभेद संपेल आणि लगेच उद्या लिंग समभाव सुरु होईल असेही मानण्याचे कारण नाही. कारण 33 टक्क्याचे आरक्षण आल्यानंतरही सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी या ठिकाणी आवर्जून उल्लेख केला की, बाप्याची बायको तेथे. म्हणजे मी नाही तर माझ्या पत्नीला निवडणुकीसाठी उभे करतो. पत्नी नसेल तर माझ्या मुलीला उभे करतो, हे काही काळ होईल. हा काही काळ संक्रमणाचा काळ आहे. तो काही काळानंतर बदलेल.

यानंतर श्री. बरवड...

अध्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ पूर्वी कु. थोरात 20:40

श्री. कपिल पाटील .....

ही गोष्ट खरी आहे की, ज्या ठिकाणी स्त्री सरपंच झाली त्या ठिकाणी उप सरपंच अधिक कारभार करतो. त्या स्त्री सरपंचाला व्यासपीठावर सुध्दा घेण्यास तयार नसतो. तिला दूर ठेवतो आणि सह्या घेण्यासाठी किंवा आंगठे घेण्यासाठी तिच्या घरी पुस्तक पाठवितो. ही स्थिती आजही आहे. पण ही स्थिती सुध्दा बदलेल. कायदा नव्हता तेव्हा स्त्रियांना जवळही येऊ दिले जात नव्हते आणि आता कायदा झाल्यानंतर तिची सही किंवा आंगठा घेतला जातो, ही परिस्थिती आहे. पण ही परिस्थिती आज ना उद्या बदलेल. ही परिस्थिती लगेच बदलेल या भ्रमातही आपण राहण्याचे कारण नाही. पण ही परिस्थिती उद्या बदलणार आहे एवढा विश्वास या बिलाच्या निमित्ताने निर्माण होईल, याबद्दल माझ्या मनामध्ये शंका नाही.

सभापती महोदय, अनेक क्षेत्रांमध्ये आज स्त्री मागे आहे. त्या क्षेत्रातील बदलांचे काय, हा महत्वाचा प्रश्न आहे. मी इतिहासात जाऊ इच्छित नाही. पण पुढच्या काळामध्ये आपण जो इतिहास घडविणार आहोत त्यावेळी स्त्री प्रत्येक क्षेत्रामध्ये पुढे जाईल याची व्यवस्था सुध्दा शासनाने केली पाहिजे. शाळांच्या संदर्भात श्री. नितीशकुमार यांनी मुलींना सायकली देण्याचे काम केले. आपल्या राज्यामध्ये अजूनही मुलींना पायपीट करावी लागते. पायपीट करावी लागते म्हणून मुलींना लांब पाठवावयाचे नाही असा निर्णय कुटुंब घेते आणि म्हणून आजही मुली महाविद्यालयात जाऊ शकत नाहीत. सभापती महोदय, सिंधुदुर्ग हा एकमेव जिल्हा असा आहे की, ज्या ठिकाणी स्त्रियांची संख्या पुरुषांपेक्षा जास्त आहे. आम्ही ज्यावेळी दोडामार्गला कॉलेज सुरु केले तेव्हा पहिल्या दिवशी फक्त एक मुलगी कॉलेजला आली. मी विचारले की, ज्या जिल्ह्यामध्ये स्त्रियांची संख्या जास्त आहे त्या ठिकाणी कॉलेजमध्ये एकच मुलगी का आली ? मुलींना दूरच्या ठिकाणी पाठवावे लागते म्हणून बारावीनंतर मुलींना शिकवावयाचे नाही असे त्यांनी आधीच ठरविलेले असते. आज ती परिस्थिती बदलली आहे. आज त्या महाविद्यालयामध्ये मुलांपेक्षा मुलींची संख्या जास्त आहे. पण हे बदलावयाचे असेल तर आपल्याला अनेक क्षेत्रांमध्ये जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतील. दुसऱ्या बाजूला शिक्षणाने हे बदलेल असेही मी मानत नाही. परिस्थितीने बदलेल असेही मी मानत नाही. कारण ज्या ठिकाणी मध्यमवर्ग आहे, ज्या ठिकाणी सुशिक्षितपणा आहे, माणसे पुढारलेली आहेत त्या ठिकाणी स्त्रियांचे प्रमाण कमी आहे. महाराष्ट्रामध्ये दर एक हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण सगळ्यात कमी आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याचा एक अपवाद सोडला तर बहुतेक सगळ्या जिल्ह्यांमध्ये दर

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. कपिल पाटील ....

एक हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण 900 पेक्षा खाली आहे. किंबहुना 835 ते 860 असे प्रमाण आहे. ही जर परिस्थिती असेल तर आपण आरक्षणाचे बिल मंजूर करीत असताना दुसऱ्या बाजूला आपण जाणीवपूर्वक स्त्रियांची संख्या कमी करीत आहोत. त्यांना जन्मालाही येऊ देत नाही. पोटात स्त्री जन्माला येत आहे असे कळल्यानंतर तो गर्भ तिथल्यातिथेच मिटविला जातो, ही स्थिती महाराष्ट्रात आहे आणि ग्रामीण भागापेक्षा सुध्दा पुढारलेल्या शहरांमध्ये जास्त आहे. पूर्वी ग्रामीण भागामध्ये स्त्री जन्माला आल्यानंतर तिला दुधात बुडवून मारले जावयाचे अशी कथा आपण ऐकलेली आहे पण आता साधने आणि आधुनिक तंत्रज्ञान एवढे पुढे गेलेले आहे की, स्त्री जन्माला येण्याआधीच तिची कळी मिटवून टाकावयाची असा उद्योग शहरांमधून सुरु आहे. त्यामुळे स्त्रीला जन्म देण्याचा सुध्दा तिला अधिकार मिळाला पाहिजे. आज त्यामध्ये आपल्याला अपयश आले आहे. महाराष्ट्रामध्ये आपण अनेक कायदे केले, अनेक व्यवस्था केल्या पण त्यामध्ये आपल्याला यश मिळालेले नाही.

मुंबईमध्ये सुध्दा स्त्री जन्माचे प्रमाण फार कमी आहे. मुंबईत पुरुषांच्या संख्येच्या मानाने स्त्रियांची संख्या किती आहे त्या बाबत मी बोलत नाही पण स्त्री-पुरुष जन्माच्या प्रमाणातील जी विषमता आहे ती विषमता दूर करण्यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेऊन जाणीवपूर्वक काही प्रयत्न केले पाहिजेत. अन्यथा आम्ही 50 टक्के आरक्षण दिले आहे, स्त्रियांना मोकळे रान दिले आहे, असे आपण सहज बोलून जातो. मघाशी आपण सहज प्रतिक्रिया दिल्या की, या विधेयकावर फक्त महिला सदस्यच बोलतील. फक्त महिला सदस्यच का बोलतील ? हा केवळ महिलांचा विषय नाही किंवा त्यांना काही देण्याचा विषय नाही. कालपर्यंत आम्ही बळकावून ठेवलेला जो विषय होता ते त्यांच्या हक्काचे देणे आज आम्ही त्यांना परत देत आहोत. त्यामध्ये इतका उशीर झाला त्याची आम्ही खंत बाळगली पाहिजे. इतका उशीर झाला याची शरम आम्ही बाळगली पाहिजे. या भावनेने आपण हे बिल मंजूर केले पाहिजे. आम्ही तुम्हाला काढून देत आहोत ही भावना जर मनामध्ये असेल तर ती चुकीची आहे.

मघाशी या बिलावर चर्चा सुरु असताना माननीय मंत्री महोदयांनी एक निवेदन केले आणि घोषणा केली. सैन्य दलातील ज्यांना वीरचक्र मिळाले आहे, परमवीरचक्र मिळाले आहे त्यांना देण्यात येणारे अनुदान आपण वाढविले.

यानंतर श्री. शिगम...

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ 20:45

श्री. कपिल पाटील...

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

ज्यांनी या देशासाठी बलिदान दिले, ते गेल्यानंतर त्यांच्या विधवा पत्नींचे काय ? आपण विधवांना किती निवृत्ती वेतन दिले त्याचा आकडा मी सांगतो. मेन्शन इन डिस्पॅच यांच्या विधवांना दरमहा 1 हजार रुपये, व्हिक्टोरिया क्रॉस यांच्या विधवांना दरमहा 1 हजार रुपये निवृत्ती वेतन दिलेले आहे. ...(अडथळा)...मंत्री महोदय बसून बोलत आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रश्नांना उत्तर देता येत नाही. परंतु त्यांनी त्यांचे शब्द मागे घ्यावेत अशी माझी त्यांना विनंती आहे. कारण परमवीर चक्र आणि अशोक चक्र मिळविणारा एखाद दुसरा असतो. ज्या सामान्य सैनिकांनी प्राणार्पण केले, ज्यांनी या देशासाठी बलिदान दिले त्यांच्या विधवांसाठी हे शासन 1 हजार रुपये देऊन त्यांना जगा असे सांगणार असेल तर हे अनुदान त्यांना देऊ नका. त्या स्वाभिमानाने जगत आहेत. तुम्हाला द्यायचे असेल तर ते सन्मानाने द्या.

स्त्रियांना देण्याचा विषय आला की, त्यांना आपण काही तरी देतोय असे वाटते.उपकाराची भावना कशासाठी ? मंत्री महोदयांनी सांगितले की ते निवेदन सुरुवाती पासून वाचावे. सुरुवातीला त्या निवेदनामध्ये परमवीर चक्र धारकाच्या विधवाना 12500 रुपये निवृत्ती वेतन देण्यात येणार असल्याचे सांगितले आहे. परंतु महाराष्ट्रामध्ये परमवीरचक्र आणि अशोक चक्र प्राप्त केलेले किती जण आहेत ? ज्या सर्वसामान्य सैनिकांनी आपले बलिदान दिले त्यांच्या विधवा स्त्रियांनी काय पाप केले, ज्यांनी आपले कुंकू दिले, ज्यांनी आपला पती या देशाला दिला त्यांच्या बद्दल काय ? निदान आज तरी हे निवेदन करायला नको होते. हे निवेदन उद्या केले असते तरी चालले असते. एका बाजूला आपण महिलांना 50 टक्के आरक्षण देण्याची तरतूद करीत आहोत आणि दुस-या बाजूला स्त्रीला सन्मानाने जगण्याचा अधिकारही नाकारत आहोत. स्त्रियांना देण्याची वेळ आली की, हिशेब काढला जातो हे काही बरोबर नाही....(अडथळा) स्त्रियांना 50 टक्के आरक्षण दिले म्हणजे काही त्यांच्यावर उपकार केले नाही. कौतुक कसले करायचे. हे आरक्षण महाराष्ट्रात इतक्या उशिरा दिले गेले याची खंत आहे. हे आरक्षण देऊन आम्ही प्रायश्चित घेत आहोत असे म्हणणे योग्य ठरेल. या विधवांच्या निवृत्ती वेतनामध्ये मंत्री महोदय आज किंवा उद्या तरी निश्चितपणे सुधारणा करतील आणि त्यासाठी ते मंत्रिमंडळापुढे जातील अशी मला खात्री आहे. इतके लज्जास्पद निवृत्ती वेतन दिले जात आहे हे काही बरोबर नाही. त्या विधवा स्त्रियांनी देशासाठी असीम त्याग केलेला आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

त्या त्यागाची किंमत हजार रुपयामध्ये करु नका. आज माणसाला जीवन जगण्यासाठी जे किमान उत्पन्न लागते, ज्याचे निकष केन्द्राने आणि राज्याने ठरविलेले आहेत तेवढे तरी निवृत्ती वेतन तुम्ही देणार आहात की नाही ? त्यांनी तुमच्या पुढे लाचारीने अर्ज घेऊन यायचे काय ?

सभापती महोदय, विधेयकावर बोलण्यासाठी वेळ कमी आहे याची मला जाणीव आहे. एका बाजूला या विधेयकाला पाठिंबा देत असताना या राज्यामध्ये महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी जी क्रांतीची ज्योत पेटवली या सगळयांचे काम या पुढच्या काळात अधिक दृग्गोचर व्हायचे असेल, अधिक वाढवायचे असेल तर प्रत्येक स्त्रीला सन्मानाने जगता येईल, तिला नव-यावर अवलंबून न राहाता, दुस-या कोणत्याही पुरुषावर अवलंबून न राहाता ती आपल्या कुटुंबाची धनी होईल अशी व्यवस्था आपण केली पाहिजे. या आरक्षणाचे श्रेय हे माननीय श्री. शरद पवारांना आहे याबद्दल वाद नाही. माननीय शरद पवार यांनी जी घोषणा केली होती तिचे विस्मरण त्यांच्या अनुयायांना झालेले आहे. मालमत्तेत मुलीला समान वाटा दिला जाईल अशा प्रकारची घोषणा त्यांनी केली होती. रेशन कार्डावर तिचे पहिले नाव का नको ? आईचे नाव लावण्यासंबंधीचा निर्णय आपण घेतला. या निर्णयाची अंमलबजावणी आपण कशी केली ? याबाबतीत राज्यकर्ते आणि प्रशासनातील लोक देखील फार हुशार आहेत. स्त्रीचे नाव शेवटच्या कोप-यात ठेवले. आईचे नाव लावण्याची परवानगी दिली. पण चौथा रकाना करुन आईचे नाव कोप-यात ठेवले. तिला समान हक्काने नाव लावता येत नाही. तिला कुटुंबामध्ये जमिनीच्या, घराच्या आणि मालमत्तेच्या संदर्भात जो समान अधिकार द्यायचा होता तो देखील आम्ही दिलेला नाही. आरक्षण हे केवळ राजकीय आरक्षण नाहीतर तिला घरात, दारात आणि समाजामध्ये तिला तिचा अर्धा वाटा सन्मानाने मिळेल या संदर्भात आपण पावले उचलावीत अशी मागणी या निमित्ताने करतो आणि माझे भाषण संपवितो.

----

...नंतर श्री. गिते.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यातील महिलांना 50 टक्के आरक्षण देण्याच्या संदर्भातील सुधारणा विधेयक सभागृहात चर्चेसाठी आलेले आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी या दुरुस्ती विधेयकाचे वर्णन ऐतिहासिक विधेयक म्हणून केले आहे. विधानसभेचे आणि विधान परिषदेचे जे सदस्य आहेत, त्यांना मनापासून एक समाधान वाटले आहे की, समानतेचा न्याय आपण आपल्या माता आणि भगिनींना देऊ शकलो. इतिहासामध्ये अशा प्रकारची संधी पूर्वी कधी मिळाली नाही व या पुढे सुध्दा मिळणार नाही असा प्रकारचा हा ऐतिहासिक क्षण आहे.

जगामध्ये, देशामध्ये महिलांना कशा प्रकारचे स्थान मिळते या बाबतीत अनेक वेळा वेगवेगळया माध्यमातून चर्चा केली जाते. इंग्लंडमध्ये लोकशाही 12 व्या शतकामध्ये आली आणि महिलांना अधिकार 19 व्या शतकात दिले गेले. ज्या देशामध्ये 700 ते 800 वर्षे लोकशाही राहिली, त्या देशात महिलांना अधिकार देण्याकरिता 800 वर्षे लागली. भारत देशात स्वातंत्र्य प्राप्ती नंतर महिलांना अतिशय वेगाने न्याय देण्याचा प्रयत्न झाला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्य घटना लिहिली. या देशात सामाजिक समता सर्वत्र यावी म्हणून वेगवेगळया माध्यमातून प्रयत्न केले गेले. घटना दुरुस्ती करुन, वेगवेगळे कायदे करुन सामाजिक समता आणण्याचा प्रयत्न केला आहे. आज महिलांना आरक्षण देण्याच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी बाहेर चर्चा करीत असताना शंका उपस्थित केली. महिलांना जबाबदारी दिल्यावर त्या जबाबदारी सांभाळू शकतील काय अशीही शंका काही सन्माननीय सदस्यांकडून उपस्थित केली गेली. महिलांना 33 टक्के आरक्षण देतांना देखील या सभागृहात बरीच चर्चा झाली होती.

ग्रामपंचायतींमध्ये महिला सभासद झाल्या, ग्रामपंचायतीमध्ये सरपंच झाल्या, पंचायत समितीमध्ये सभापती झाल्या, जिल्हा परिषदेमध्ये अध्यक्ष झाल्या. महाराष्ट्रामध्ये 1 लाख महिलांना 33 टक्के आरक्षणामुळे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. त्यावेळी काही उणिवा सुध्दा दिसून आल्या. महिला बैठकीस जातात, त्यावेळी त्यांचे पती सोबत असतात. त्या बैठकांमध्ये पुरुष वर्गाकडून हस्तक्षेप होतो आहे. कामकाज करीत असताना महिलांवर वेगवेगळया पध्दतीने अन्याय होतो आहे. या सर्व गोष्टी नजरेसमोर येत गेल्या. परंतु कालांतराने प्रशासकीय कामकाजात मोठया प्रमाणात बदल झालेला आपल्याला दिसून येत आहे. ज्या ज्या महिलांना प्रतिनिधित्व करण्याची

2...

श्री.माणिकराव ठाकरे...

संधी मिळाली होती, त्यांनी अतिशय चांगल्या पध्दतीने कामकाज हाताळले आणि आपल्या संस्था योग्यपणे चालविण्याचा देखील त्यांनी प्रयत्न केला ही बाब आपणास नाकारता येणार नाही. एक मोठे अंतर होते ते महिलांनी पार केले आहे आणि लोकांमध्ये विश्वास निर्माण केला. राजकीय क्षेत्रात महिलांनी यशस्वी प्रतिनिधीत्व केल्यामुळे त्यांच्याकडे महिला बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक जबाबदारी सोपविली. बचत गटात महिलांनी अतिशय चांगले पाऊल टाकले आहे. महिला बचत गटाच्या माध्यमातून बँकेकडे पैशांचा भरणा केला जातो, बँकेत कर्जाची परतफेड केली जाते. अनेक महिला बचत गटानी 90 टक्के बँकेच्या कर्जाची परतफेड केलेली आहे. काही महिला गटांनी तर 100 टक्के बँकांच्या कर्जाची परतफेड केलेली आहे असे आपणास दिसून येईल. महिला बचत गटाकडून बँकांचे व्यवहार अत्यंत चांगल्या प्रकारे केले जात आहे. आम्ही महिला सक्षम आहोत ही बाब राज्यातील जनतेला दाखवून दिली आहे. घटनेत 73 व 74 वी दुरुस्ती झाली, त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना मोठया प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळाले.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे........

इतकेच नव्हे तर 33 टक्क्यावरुन आपण पुढे गेलो पाहिजे अशा प्रकारचा निर्णय केंद्र स्तरावर झाला आणि 2009 मध्ये केंद्रीय कॅबिनेटमध्ये 33 टक्क्यावरुन आरक्षणाचे प्रमाण 50 टक्के करण्याचा निर्णय घेतला गेला. त्यानंतर देशातील चार-पाच राज्यांनी या निर्णयाप्रमाणे त्यांच्या राज्यातील कायद्यात दुरुस्ती केली. डिसेंबर, 2010 मध्ये श्रीमती सोनिया गांधी यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवून महाराष्ट्र राज्यामध्ये महिलांना 50 टक्के आरक्षण देणारे विधेयक मंजूर केले पाहिजे असे कळविले. माननीय मुख्यमंत्री यांनी कोल्हापूर येथे महिलांचे जे शिबीर झाले त्या ठिकाणी स्पष्टपणे सांगितले होते की, श्रीमती सोनिया गांधी यांनी डिसेंबर, 2010 मध्ये मला पत्र पाठवून महिलांना 50 टक्के आरक्षण देणारे विधेयक संमत करण्याबाबत कळविले आहे आणि त्यानुसार अर्थसंकल्पीय अधिवेशनात आरक्षणाविषयीचे विधेयक आणण्याची भूमिका त्यांनी स्वीकारली. त्या शिबीराच्या कार्यक्रमाची सीडी देखील उपलब्ध आहे. देशातील सर्व राज्यांनी ही भूमिका स्वीकारावी म्हणून श्रीमती सोनिया गांधी यांनी सातत्याने प्रयत्न केले. ज्या राज्यांमध्ये असा कायदा झाला नसेल त्या राज्यांना पत्र पाठवून महिलांना 50 टक्के आरक्षण देणारा कायदा संमत करण्याविषयी त्यांनी विनंती केली.

सभापती महोदय, आज 50 टक्के आरक्षण दिले असले तरी आपण आणखी पुढे गेलो पाहिजे. जेणेकरुन जिल्हा परिषदांमध्ये पूर्णपणे महिला दिसतील, महिला प्रशासन चालवित आहेत असे दिसले पाहिजे. 50 टक्के आरक्षण देत असताना 15 वर्षापर्यंत ज्या महिला स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रतिनिधीत्व करतील तेथे 15 वर्षानंतर पुरुषवर्ग निवडणुकीला उभे राहण्याची हिंमत करणार नाही. किमान 25 ते 30 टक्के महिला पुरुषांच्या ठिकाणी निवडून येतील आणि प्रत्यक्षपणे महिलांचे प्रमाण 70 ते 80 टक्क्यापर्यंत दिसून येईल. महिलांनी चांगले काम केले तर भविष्यात त्यांना प्रतिनिधीत्व मिळू शकते.

सभापती महोदय, एका बाजूला महिलांना आरक्षण देत असताना दुसरीकडे मुलींची संख्या कमी होत चालली आहे. 1000 पुरुषांमागे महिलांचे प्रमाण 800 ते 850 इतके कमी झालेले आहे. हे प्रमाण आपल्याला विचार करावयास लावणारे आहे. या प्रश्नावर सामाजिक बदल अपेक्षित आहेत. केवळ कायदे करुन भागणार नाही. समाजामध्ये प्रचार आणि प्रसार होणे ही काळाची गरज आहे. महिलांना 50 टक्के आरक्षण देत असताना महिलांची संख्या दिवसेंदिवस कमी होत

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे........

आहे. या दृष्टीने पुढील काळात बंधने घातली पाहिजेत अन्यथा समाज आपल्याला माफ करणार नाही. त्यासाठी कडक कायदा झाला पाहिजे अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करतो. बोलण्यासारखे खूप विषय आहेत. महिलांना सवलती देण्याच्या बाबतीत तसेच प्रत्येक क्षेत्रात महिलांसाठी काय केले पाहिजे या संदर्भात बोलता येईल. परंतु या सदनामध्ये आज ऐतिहासिक अशा प्रकारचे विधेयक चर्चेला आले आहे. त्या विधेयकावरील चर्चेमध्ये मला सहभागी होण्याची संधी आपण उपलब्ध करुन दिली त्याबद्दल आभार मानून माझे भाषण संपवितो.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी</u>**

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, उल्हासनगरमध्ये अनधिकृत इमारती, धोकादायक इमारती पडण्याचा सिलसिला सुरुच आहे. मध्यंतरी एक इमारत पडली होती. आज पुन्हा एकदा उल्हासनगर कॅम्प नं.2 मध्ये शिशमहल नावाच्या इमारतीचा चौथा मजला पूर्णपणे कोसळला. या दुर्घटनेमध्ये 8 ते 9 लोकांचा मृत्यू झाला असून अनेक लोक जखमी झाले आहेत. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या दुर्घटनेची शासनाला माहिती उपलब्ध झाली असल्यास नक्की काय परिस्थिती आहे, अपघातग्रस्तांना मदत करण्याच्या संदर्भात आणि या परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्याच्या संदर्भात, गरजूंना मदत करण्याच्या संदर्भात शासनाने काय भूमिका स्वीकारली आहे हे स्पष्ट झाले पाहिजे. विधिमंडळाचे अधिवेशन चालू असल्यामुळे सभागृहाला या घटनेची माहिती मिळण्याच्या संदर्भात आपण शासनाला निर्देश द्यावेत अशी माझी विनंती आहे.

नंतर 5एच.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहात माननीय गृह मंत्री उपस्थित असल्याचे दिसत नाहीत. म्हणून उपस्थित मंत्री महोदयांनी सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी उल्हासनगर येथे इमारतीचा काही भाग कोसळल्याची घटना घडली ही बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली आहे. त्यासंबंधीची सविस्तर माहिती उपस्थित मंत्री महोदयांनी माननीय गृह मंत्र्यांना द्यावी. तसेच त्यांनी शक्य झाल्यास आज एक तासात किंवा उद्या सभागृहात या विषयाची सविस्तर माहिती द्यावी, असे मी निदेश देतो.

------

....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : महानगरपालिका आणि नगरपरिषदा (दुसरी सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XI OF 2011

( A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

( चर्चा पुढे सुरु.......

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : महोदय, या विधेयकाच्या निमित्ताने जो कायदा पास होत आहे त्या कायद्याच्या आधारे राज्यात नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रात महिलांना 50 टक्के आरक्षण दिले जाणार आहे. हा निर्णय घेण्यास थोडा उशीर झाला पण तरी देखील ही गोष्ट अभिनंदनाची आहे. तसेच अशा ऐतिहासिक निर्णयाच्या प्रसंगी आम्ही या सभागृहाचे सदस्य आहोत याचा आम्हाला अभिमान वाटतो. या निमित्ताने मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, राष्ट्रपिता महात्मा गांधींना परदेशातील पत्रकारांनी एकदा विचारले होते की, आपल्या देशाला स्वातंत्र्य कशासाठी हवे आहे, स्वराज्यातून आपल्याला काय अभिप्रेत आहे, त्यावर राष्ट्रपित्यांनी उत्तर दिले होते की, मला या देशाच्या पंतप्रधान पदावर भारतातील महिलेला पहावयाचे आहे. त्यादृष्टीनेच शासनाने टाकलेले हे एक भरीव पाऊल आहे, असा मी जाणीवपूर्वक उल्लेख करतो.

महोदय, या विधेयकाला मंजुरी दिल्यानंतर आपणा सर्वांची जबाबदारी संपते अशातला भाग नाही तर खऱ्या अर्थाने तुमची आमची व सर्वांचीच जबाबदारी यापुढे वाढणार आहे, याकडेही मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. एखादा कायदा पारित झाल्यानंतर आपण कृतकृत्य झालो म्हणून हात झटकून बाजूला गेलो तर त्याचे परिणाम चांगले होण्याऐवजी वाईटच झाल्याचे दिसून येतील. म्हणून या निमित्ताने माझी अशी विनंती आहे की, राज्यात तसेच समाजात प्रथम स्त्री-पुरुष समानता यादृष्टीने शासनाने एक विशेष मोहीम राबविण्याची गरज आहे. कारण स्त्रीयांच्या अंतर्मनावर

...3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे....

आजही पुरुषी प्राबल्याचाच पगडा आहे, तो दूर करणे हे आपण सर्वांचे काम आहे. दुसऱ्या बाजूला एक विशेष मोहीम शासनाने राबविली पाहिजे की, "सोशल ॲमल्गमेशन" म्हणजे सामाजिक एकता, पण त्यापेक्षाही "सोशल होमोजेनिटीक" म्हणजेच सामाजिक एकजिनसीपणा असेच समाजाचे चित्र या कायद्याच्या माध्यमातून अभिप्रेत आहे. ते चित्र समाजात निर्माण करण्याच्या दृष्टीने शासनाने विशेष उपक्रम राबविले आणि विशेष पावले टाकली तर ज्या उदात्त हेतूने 50 टक्क्याचे आरक्षण आपण आणले तो हेतू सफल झाला असे होईल. त्यादृष्टीनेच शासनाने पहिले पाऊल उचलणे आवश्यक आहे. श्रेयवादाच्या राजकारणापेक्षा महत्वाचे म्हणजे माझी व तुमची, सर्वांची सामुदायिक जबाबदारी आहे व त्यासाठी आपल्याला आपली जीवनशैलीच बदलावी लागेल. मग राजकीय पक्षांना आपल्या पक्षाची पदे देखील महिलांना द्यावी लागणार आहेत. तसेच 50 टक्क्यानुसार समाजाच्या प्रत्येक थरात महिला कशा येतील यासाठी त्यांना प्रेरणा देणे, त्यांच्यात जागरुकता निर्माण करणे, यादृष्टीने विविध उपक्रम राबवावे लागतील. यापेक्षाही सर्वात महत्वाचा उपक्रम म्हणजे महिलांना प्रतिनिधीत्व देणारा आहे. त्यांना सत्ता प्रदान करणारा तसेच सत्तेत त्यांचा सहभाग वाढविणारा अशा प्रकारच्या जाणीवेतून त्यांची जबाबदारी दाखविणे, त्यांच्यामध्ये कर्तव्याची जाणीव निर्माण करणे, असे विविध उपक्रम राबवावे लागतील. त्यात मग लोक शिक्षण करणे हा विषय असेल, प्रसंगी शालेय शिक्षण अभ्यासक्रमात देखील बदल करण्याचा विषय असेल, अशा काही खास योजना तयार करुन एक अभियान राबविणे आवश्यक आहे. त्यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत, अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

-------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : महानगरपालिका आणि नगरपरिषदा (दुसरी सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XI OF 2011

( A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

( चर्चा पुढे सुरु.......

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, महिला आरक्षण विधेयक पर मैं भी बोलना चाहता था. लेकिन हमारी पार्टी के माननीय अध्यक्ष महोदय अभी इस विधेयक पर बोले हैं. इसलिए मैं अब इस बिल पर बोलना नहीं चाहता. लेकिन मैं निवेदन करना चाहता हूं कि यहां पर अलग-अलग पक्षों के माननीय सदस्यों को बोलने का जो समय दिया जाता है उस बारे में कुछ ठोस निर्णय लिया जाना बहुत आवश्यक है. यहां पर बोलते समय कुछ माननीय सदस्य समय सीमा का ध्यान नहीं रखते और काफी समय तक अपना भाषण करते हैं. जिसकी वजह से काफी माननीय सदस्यों को अपनी बात कहने के लिए बहुत कम समय मिलता है. इस बारे में मेरी स्ट्रांक ग्रीवेन्स है.

सभापति महादेय, आप सर्वोपरि हैं. इसलिए इस बारे में आप निर्णय लें या बीएसी की मीटिंग में इस बारे में कुछ निश्चित निर्णय लिया जा सके तो बहुत अच्छा होगा. मेरा इतना ही निवेदन है कि सभी माननीय सदस्यों को बोलने के लिए उचित समय मिलना चाहिए. यह समय पार्टी के हिसाब से देना है या दूसरे किस तरीके से देना है. इस बारे में आपका निर्णय ही सर्वोपरि है.

सभापति महोदय, एक बात मुझे यह कहनी है कि रुल 46 के अंतर्गत माननीय राज्य मंत्री जी ने एक सर्कुलर यहां पर पढा. यह सर्कुलर माजी सैनिकों को मुआवजा देने के संबंध में है. यह बात ठीक है कि यहां पर चर्चा नहीं हो सकती. लेकिन मैं कुछ प्रश्न यहां पर पूछना चाहता हूं और मैं माननीय मंत्री जी से अनुरोध करना चाहता हूं कि....

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापति** : जमा साहब, अभी यहां पर महानगर पालिका से संबंधित बिल पर चर्चा हो रही है. आप जो प्रश्न पूछना चाहते हैं, वह प्रश्न अलग है. आपका प्रश्न माजी सैनिकों को महाराष्ट्र सरकार द्वारा दिए जाने वाले रिवार्डस तथा पेंशन इत्यादि के संबंध में हैं. उस बारे में हम ऐसा करेंगे कि, before the Hon. Minister of State Shri Bhaskar Jadhav starts his reply, I will allow him a minute or two to explain this.

श्री एस.क्यू. जमा : धन्यवाद महोदय. मैं कहना चाहूंगा कि माजी सैनिकों का सम्मान करने के लिए जीएडी का सर्कुलर 3..7.2000 और 8.2.2000 को निकाला गया है. यह महाराष्ट्र गौरव पुरस्कार देने संबंधी है. अभी आपने दिनांक 1 मई 2011 से यह मदद बढ़ायी है. मैं यहां पर दो प्रश्न पूछना चाहता हूं....

**सभापति** : जमा साहब, राज्य मंत्री जाधव साहब ने यहां पर कुछ समय पहले माजी सैनिकों के बारे में जो कुछ डिक्लेयर किया है, It was totally different issue. अभी यहां पर जो चर्चा चल रही है, यह चर्चा महानगर पालिका में महिलाओं को आरक्षण देन के संबंध में है.

श्री एस. क्यू. जमा : महोदय, मुझे इस बिल पर कुछ नहीं बोलना है.

**सभापति** : ठीक है, थेंक यू.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : महानगरपालिका आणि नगरपरिषदा (दुसरी सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XI OF 2011

( A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

( चर्चा पुढे सुरु.......

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, या विधेयकाच्या संदर्भात मला एक संदर्भ द्यावयाचा आहे, एक शंका उपस्थित करावयाची आहे व एक सूचना करावयाची आहे. या बिलाच्या दृष्टीने संदर्भ महत्वाचा असा आहे की, राजे राजारामांचे निधन झाल्यानंतर तारा राणी गादीवर बसल्या व करवीर संस्थान स्थापन झाले त्याला आता 300 वर्ष पूर्ण होत आहेत. एक अतिशय कर्तबगार राज्यकर्त्या महिलेच्या पार्श्वभूमीवर हे विधेयक येत आहे त्यामुळे एका अर्थाने मी सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, या विधेयकाच्या संदर्भात माझ्या मनात एक शंका आहे. नोव्हेंबर महिन्यात 182 नगरपंचायतीच्या निवडणूका आहेत. यांसदर्भात माझी माहिती चुकीची असेल तर मंत्री महोदयांनी ती दुरुस्त करावी अशी विनंती आहे. हे बिल पास केल्यानंतर त्याला माननीय राष्ट्रपतींची परवानगी लागणार असेल तर, सावकार संबंधिचे बिल माननीय राष्ट्रपतींकडे गेल्या दोन वर्षापासून पडलेले आहे. त्यामुळे हे विधेयक नोव्हेंबरच्या आधी व्यवहारात आणले जाणार आहे काय ? या बिलाच्या संदर्भात जी असंदिग्धता आहे ती दूर करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या आरक्षणामुळे इन बॅलन्स होणार आहे. एका बाजूने महिलांना 50 टक्के आरक्षण मिळणार आहे परंतु या विधेयकामुळे ओपन कॅटेगरीच्या पुरुषांची संख्या अतिशय नॅरो होणार आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या वॉर्डाची संख्या वाढविता येईल काय ?

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील.....

सभापती महोदय, माझी तिसरी सूचना अशी आहे की, पुरुषांना शिक्षण नसले तरी एक्सपोजर खूप मिळाले त्यामुळे शिक्षण कमी असले तरी पुरुष चांगल्या प्रकारचे काम करु शकले. महिलांना एक्सपोजरच मिळाले नाही आता त्या राजकारणात जाणार असल्यामुळे महिलांना मिनिमम प्रशिक्षणाची सक्ती या विधेयकाच्या अनुषंगाने केली जाणार आहे काय ? तसेच त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे अशी सूचना करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार ( विधान सभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या ठिकाणी मांडण्यात आलेल्या विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी 50 टक्के आरक्षण देण्यासंबंधीचे विधेयक या सभागृहात मंजूर होत असतांना आम्हाला त्याचे साक्षीदार होता आले, त्या चर्चेमध्ये सहभागी होता आले या ऐतिहासिक क्षणाचा आनंद प्रथम मला व्यक्त करावयाचा आहे. वास्तविक वेळ खूप झालेला असल्याने मी थोडक्यात बोलणार आहे. या विधेयकाच्या निमित्ताने अनेक सन्माननीय सदस्यांनी अतिशय उत्तम असे विचार मांडले असून या सभागृहामध्ये विचारमंथन केलेले आहे.

सभापती महोदय, एखादा कायदा होत असतांना वा त्या संबंधीचे विधेयक मांडत असतांना भविष्यात स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये आमच्या माता भगिनींना जी संधी मिळणार आहे ती अधिक व्यापक आणि विस्तृत व्हावी, विधान सभा आणि लोक सभेपर्यंत ही संधी मिळावी अशा प्रकारची भावना अनेक सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली आहे. या ठिकाणी मला बाळासाहेब भारदे यांचे एक वाक्य आठवते. या देशामध्ये समान संधी आणि समानता तसेच स्त्री पुरुष समानता ही कधी प्राप्त होईल ? या बाबत त्यांनी असे वाक्य उच्चारले होते की, "पुरुषांचा अहंगड आणि स्त्रियांचा न्यूनगंड जेव्हा नष्ट होईल तेव्हा ख-या अर्थाने समानता येईल." कायदा हा भाग वेगळा आहे तसेच विधेयक हे सुध्दा खूप वेगळे आहे. परंतु याच्या माध्यमातून समाजाची मानसिकता जोपर्यंत बदलत नाही तोपर्यंत कायद्याला अर्थ प्राप्त होत नाही. या विधेयकावरील चर्चेच्या निमित्ताने अनेक सन्माननीय सदस्यांनी अनेक विचार व्यक्त केले आहे. भारतामध्ये या गोष्टी फार नवीन आहेत अशातला भाग नाही. अनेक आदिवासी समाजामध्ये स्त्रियांना अधिक महत्व आहे.एवढेच नव्हे तर महिलेला आपला पती निवडण्याचासुध्दा संपूर्ण अधिकार आहे.त्याच्या बरोबर राहून नंतर लग्न करण्याचा अधिकार तिला मिळालेला आहे. भारत याबाबतीत मागे आहे असे नाही. त्याचबरोबर आसाम पासून शिलॉग पर्यंतचा जो पट्टा आहे त्या पट्टयामध्ये आजही स्त्री प्रधान कुटुंब व्यवस्था आहे.त्या ठिकाणी लग्न झाल्यानंतर नवरा स्त्रीच्या घरी नांदावयास जातो. त्यामुळे आपण फार मागे आहोत अशातला भाग नाही परंतु असे असले तरी सुध्दा या ठिकाणी बोलतांना सन्माननीय सदस्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांची उदाहरणे दिली आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार ....

सभापती महोदय, ताराबाई शिंदे यांचा उल्लेख केल्याबद्दल मी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांचे मुद्दाम अभिनंदन करतो. हा उल्लेख अत्यंत महत्वाचा आहे असे मला सांगावयाचे आहे. सावित्रीबाई फुले यांच्या बरोबर त्या काळामध्ये अल्पसंख्याक समाजाच्या फातिमा शेख नावाच्या एक महिला खांद्याला खांदा लावून उभ्या राहिल्या होत्या. त्या महिलेने शैक्षणिक क्रांतीमध्ये सावित्री बाई फुले यांच्या बरोबर काम केले होते. या निमित्ताने मी मुद्दाम या ठिकाणी सांगू इच्छितो की, सावित्री बाईंना शाळेसाठी जागा देण्याचे काम भिडे नावाच्या एका ब्राम्हण गृहस्थाने केले होते. अशा प्रकारच्या अनेक क्रांतिकारक गोष्टी महाराष्ट्रात घडल्या होत्या. म्हणून जाती, उप जाती याचा विचार न करता किंवा त्या संदर्भात अधिक टोकाची भूमिका न घेता सामाजिक समता कशी प्राप्त होईल याकडे या विधेयकाच्या रुपाने पाहणे खूप गरजेचे आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, या ठिकाणी अहिल्यादेवी होळकरांचे उदाहरण देण्यात आले होते त्याप्रमाणे मी जनाबाईचे उदाहरण देखील देऊ शकेन. दासी असली तरी 700 वर्षापूर्वी जनाबाईनी नामदेव महाराजांबरोबर खांद्याला खांदा लावून काम केलेले आहे. "डोईचा पदर पडला खांद्यावरी, भर बाजारात जाईन मी " अशी बंडखोर क्रांती जनाबाईनी 700 वर्षापूर्वी केली होती. मुक्ताबाईंनी "ताटी उघडा ज्ञानेश्वरा " असा अभंग लिहिला होता. संत ज्ञानेश्वर जेव्हा दार बंद करुन बसले होते तेव्हा 14 वर्षाच्या मुक्ताबाईनी हा अभंग लिहिला होता आणि मग ज्ञानेश्वरांनी दार उघडले होते. महिलांमध्ये केवढे सामर्थ्य होते हे यावरुन दिसून येईल. महिलांमध्ये काही कमी सामर्थ्य नाही.कान्होपात्रासुध्दा संत झाल्या. या देशामध्ये संतत्वाचे अधिकार भागवत संप्रदायामध्ये सर्वांना दिले आहेत. झाशीच्या राणीचा देखील या ठिकाणी उल्लेख करण्यात आला त्याचबरोबर जिजाऊ आणि अहिल्याबाई होळकर सती गेल्या नाहीत.परंतु मी अत्यंत नम्रपणे सांगू इच्छितो की अहिल्यादेवीनी सती जाऊ नये अशी विनंती मल्हारराव होळकरांनी केली होती त्यावेळी मल्हारराव होळकरांनी अहिल्यादेवीना असे सांगितले होते की, " तू सती जाऊ नकोस, तुला जगण्याचा अधिकार आहे." त्यामुळे आपल्या भारतीय अभिजात संस्कृतीमध्ये समानता आणि समान भूमिका या पूर्वीच रुजलेली आहे.

3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही





श्री.उल्हास पवार ....

सभापती महोदय, मी या ठिकाणी बाळासाहेब भारदे यांच्या भाषेमध्ये अत्यंत नम्रपणे निवेदन करतो की, "ऋषीमुनींची संस्कृती होती तेव्हा समानता होती, तेव्हा जातीयवाद नव्हता परंतु ऋषीमुनींच्या संस्कृतीनंतर  पंडित संस्कृती आली आणि नंतर सगळी गडबड झाली." या सगळया गोष्टींचा छेद देणे आणि त्यावर मात करणे हे खरे म्हणजे क्रांतिकारक काम आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री माणिकराव ठाकरे यांनी जो उल्लेख केला आहे तो बरोबर आहे. आपण इंग्लडला लोकशाहीची माता म्हणतो त्या ठिकाणी महिलांना मताचा अधिकार मिळण्यासाठी 1910 साल उजाडावे लागले ...

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार...

रशियामध्ये महिलांना 1911 सालापर्यंत बुरखा काढण्यासाठी आंदोलन करावे लागले. अशा कितीतरी गोष्टी घडलेल्या आहेत. मला आपल्याला नम्रपणे विनंती करावयाची आहे की, आपण आपल्या मनामधील अहंगंड काढून टाकू या. माझ्या भगिनींना मला सांगावयाचे आहे की, आपण आपल्या मनातील न्यूनगंड काढून टाका. या जगामध्ये यूनोची स्थापना झाली त्यावेळी पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या भगिनी श्रीमती विजयालक्ष्मी पंडित या यूनोच्या पहिल्या महिला सेक्रेटरी झाल्या हे या देशाने करुन दाखविले आहे. आपण इंग्लंडला लोकशाहीची आई म्हणतो, आमच्या स्वर्गीय इंदिराजी गांधी या 17 वर्षे पंतप्रधान होत्या. श्रीमती मार्गरेट थ्रेचर पंतप्रधान झाल्या. बेनझीर भुत्तो पंतप्रधान झाल्या. हसिना वाजेद खालिद झिया पंतप्रधान झाल्या. मॅनमारामध्ये ऑनस्केल क्यू या पंतप्रधान झाल्या. कुमारचंद्रिका या श्रीलंकेच्या पंतप्रधान झाल्या. इस्त्रायलमध्ये श्रीमती गोल्डा मायर या पंतप्रधान झाल्या. परंतु त्याचा आदर्श स्वर्गीय इंदिराजी गांधी यांनी पूर्वीच घालून दिला. ज्यावेळी या देशामध्ये उत्तुंग व्यक्तिमत्वे होती, ज्या व्यक्तिमत्वांना सर्वजण घाबरत होते अशा सर्व नेत्यांना वैचारिक क्रांतीमधून, निर्णयातून, कर्तृत्वातून आणि नेतृत्वातून नमविण्याचे काम स्वर्गीय इंदिराजी गांधी यांनी करुन दाखविले आहे. त्यांचेच पुत्र स्वर्गीय राजीव गांधी यांनी 33 टक्के आरक्षणाचा निर्णय घेऊन या देशामध्ये सामाजिक क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्या सर्व गोष्टींचे आज या ठिकाणी मुद्दामहून आपण स्मरण केले पाहिजे.

मी हे एवढयासाठी सांगत आहे की, आपण नेहमी म्हणत असतो रशिया आपल्यापुढे गेला, चीन आपल्यापुढे गेला, अमेरिका आपल्यापुढे गेला. या अमेरिकेमध्ये 300 वर्षाच्या कालखंडामध्ये आजपर्यंन्त एकही महिला उपाध्यक्ष तर सोडा अध्यक्ष सुध्दा झालेली नाही. तसेच, आजपर्यन्त रशियामध्ये एकही महिला पंतप्रधान झालेली नाही व अध्यक्ष देखील झालेली नाही. चीनमध्ये ज्या माओने क्रांती केली त्या माओला आपण सर्वजण मानतो आणि ते खरेच आहे. त्या ठिकाणी पुरोगामी विचारसरणी, समाजवादी विचारसरणी आहे, त्या ठिकाणी असलेली सर्व विषमता मोडून काढून सर्व समानता मानली जाते असे आपण म्हणतो तो चीन सुध्दा आपल्यापुढे गेला, रशिया आपल्यापुढे गेला, अमेरिका आपल्यापुढे गेली. परंतु ज्या माओने क्रांती केली त्याची मुलगी जेव्हा राजकारणामध्ये येऊ लागली तेव्हा त्या ठिकाणी असलेल्या सर्व कम्युनिस्ट नेत्यांनी तिला पॉलिट ब्यूरोमधून बाहेर काढले. अशा या चीनचा नाही तर भारताचा आदर्श जगाने घ्यावा अशा प्रकारच्या क्रांतिकारक गोष्टी या देशामध्ये घडल्या आहेत. त्या क्रांतिकारक गोष्टींपैकी ही एक क्रांतिकारक गोष्ट आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. उल्हास पवार.....

सभापती महोदय, आज स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना 50 टक्के आरक्षण मिळत आहे. परंतु आरक्षण, कायदा, रिझर्व्हेशन हे शब्द अत्यंत फसवे आहेत. याचे कारण असे की, जोपर्यन्त आपली मानसिकता बदलत नाही तोपर्यन्त या कायद्याला अर्थ उरत नाही. म्हणून माझी या सर्व माता-भगिनींना विनंती आहे की, एकदा 50 टक्के आरक्षण लागू झाले की, आपल्यामध्ये एक शैथिल्य, उदासीनता, नैराश्य येते. आता आपल्याला 50 टक्के आरक्षण मिळणार आहे, परंतु त्यामधून स्वर्गीय इंदिराजी गांधी घडणार नाहीत, त्यामधून अहिल्याबाई घडणार नाहीत, त्यामधून चांदबीबी घडणार नाहीत. त्याचप्रमाणे या देशामध्ये सुचेता कृपलानी यांनी आदर्श घालून दिला आहे. 1962 साली उत्तर प्रदेश अखंड असतांना त्या राज्याच्या मुख्यमंत्री झाल्या होत्या . त्यावेळी आचार्य कृपलानी समाजवादी पक्षामध्ये होते तर सुचेता कृपलानी काँग्रेसमध्ये होत्या. नंदिनी सत्पथी ओरिसाच्या मुख्यमंत्री झाल्या, मैमुना तैमूर या मुस्लिम महिला आसाममध्ये मुख्यमंत्री झाल्या. आपण जगाला आदर्श घालून देत असतांना या सर्व घटना घडल्या आहेत. या सर्व घटनांची वाटचाल करीत असतांना आपली मानसिकता आणि आपले समाजमन बदलत नाही हे आजच्या लोकशाहीचे दुर्दैव आहे असे मी मानतो.

या ठिकाणी होणारी सार्वत्रिक कुजबूज अत्यंत धोक्याची असते. आम्ही या सभागृहामध्ये टाळया वाजविणार आणि विधेयक संमत करणार. त्यानंतर या सभागृहाच्या बाहेर प्रांगणामध्ये गेल्यानंतर खाजगीत संभाषण करणार, हे फार विचित्र झाले आहे. ही सार्वत्रिक कुजबूज समाजाला अत्यंत धोकादायक असते. माणसाला दोन मने आहेत, एक अंतर्मन आणि दुसरे बाह्यमन आहे. लोकशाहीमध्ये माणूस अंतर्मनामधून बोलत नाही तर तो बाह्यमनामधून बोलतो. जोपर्यन्त तो अंतर्मनातून न बोलता बाह्यमनामधून बोलतो तोपर्यन्त या विधेयकाला अर्थ प्राप्त होणार नाही. याकरिता आपण आपले मन बदलण्याकरिता शिकले पाहिजे. नाही तर या ठिकाणी माईकवर खोटे बोलायचे आणि बाहेर खाजगीत खरे बोलायचे, आपल्या मनामध्ये जे आहे ते बोलायचे असे चालणार नाही. इथे आपण जे बोलतो तेच खाजगीत बोलले पाहिजे. तरच या विधेयकाचे खऱ्या अर्थाने आपण स्वागत केल्यासारखे् होईल. पुन्हा एकदा महाराष्ट्र शासनाने घेतलेल्या या निर्णयाबद्दल मी मनापासून शासनाचे अभिनंदन करतो आणि या ठिकाणी मी ज्यांचा ज्यांचा उल्लेख केला त्यांच्या पावन स्मृतींना अभिवादन करुन माझे भाषण संपवितो.

-------

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनीष जैन (जळगाव स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, याठिकाणी जे विधेयक मांडण्यात आले आहे, त्याच्या समर्थनार्थ मी बोलणार आहे.

सभापती महोदय, माझ्या अगोदर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. तसेच यापूर्वी सन्माननीय सदस्य श्री.उल्हासदादा पवार बोलले आहेत. खरे म्हणजे त्यांचे भाषण झाल्यानंतर मी बोलताच कामा नये. मला सन्माननीय सदस्य श्री.उल्हासदादा पवार यांचे मनापासून फार आभार मानावेसे वाटत आहेत. तसेच मी त्यांचे अभिनंदन देखील करतो. याठिकाणी आपण जे विधेयक आणले आहे, त्याबाबत सांगावयाचे तर माझ्या माहितीप्रमाणे हा महाराष्ट्र म्हणजे खरोखर महा राष्ट्रच आहे. माझ्या माहितीप्रमाणे भारतातील हे पाचव्या क्रमांकाचे राज्य असेल की जेथे आपण महिलांना, आपल्या आई-बहिणींना 50 टक्के आरक्षण देत आहोत आणि तशा प्रकारचे आरक्षण द्यावयास हवे होते असे अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले आणि माझेही तसेच मत आहे. पण आपण यासाठी फार उशीर केला आहे. आता आपण 33 टक्क्यावरुन 50 टक्क्यापर्यंत आलो आहोत. आपण सध्या फक्त जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिकांमध्ये महिलांना 50 टक्के आरक्षण दिलेले आहे. परंतु त्याशिवाय शासकीय कार्यालयां मध्ये आणि निम शासकीय कार्यालयांमध्ये सुध्दा महिलांना अशा प्रकारचे रिझर्वेशन द्यावयास पाहिजे.आपल्या राज्यामध्ये महिला चीफ सेक्रेटरी का होत नाही ? आपल्या शासकीय कार्यालयां- मध्ये ज्या महिला आहेत, त्यांना प्रमोशन का दिले जात नाही? त्यांना त्यांच्या हक्काचा दर्जा का दिला जात नाही ? एक महिला अधिकारी समोर आली तर त्यांना योग्य प्रकारे वागणूक दिली जात नाही. त्यांच्याबरोबर योग्य प्रकारे बोलले जात नाही. कारण त्यांना समजणार नाही, त्यांना कळणार नाही त्यामुळे तुम्ही दुसऱ्यांना बोलवावे असे सांगितले जाते. असे का केले जाते? यामध्ये सुध्दा बदल करावयास पाहिजे. जोपर्यंत आपण महाराष्ट्रामध्ये परिस्थिती बदलत नाही, आपले या संबंधातील विचार बदलत नाही तोपर्यंत काहीच बदल होणार नाही.

सभापती महोदय, आता माननीय श्री.माणिकरावजी ठाकरे म्हणाले की, 1000 पुरुषांच्या तुलनेमध्ये महिलांचे प्रमाण 800-900 पर्यंत आहे आणि आपण महिलांना 50 टक्के आरक्षण देत आहोत, परंतु केवळ 50 टक्के नाही तर माझ्या हिशोबाप्रमाणे हे आरक्षण 55 किंवा 60 टक्केच होणार आहे आणि ही फार मोठी उपलब्धी आहे.आपण याठिकाणी 50 टक्क्याचा उल्लेख करीत आहोत पण प्रत्यक्षात आरक्षण तेवढेच रहाणार नाही,जास्त होईल.आपण आकडेवारी पहावी म्हणजे आपल्याला कळेल की, तुम्ही अजून पुढे जाऊ शकता.महाराष्ट्र राज्याने अशा प्रकारचे आरक्षण दिले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनीष जैन . . . .

आरक्षण दिले त्याबद्दल मला अभिमान आहे. मी येथे सर्व महिलांचे मनापासून अभिनंदन करतो आणि मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

----

. . . .5 एल-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



APR/ 21:20

प्रा.वर्षा गायकवाड (महिला व बालविकास मंत्री) : सभापती महोदय, खरेतर मी मंत्री या नात्याने बोलता कामा नये. पण महिलांच्या संदर्भातील हा विषय असून मी महिला व बालविकास विभागाची मंत्री आहे. माननीय सभापती महोदय आपण मला या विषयाच्या संदर्भात बोलण्यासाठी विशेष परवानगी दिली, त्याबद्दल मी आपल्या सर्वांचे आभार मानते.

सभापती महोदय, खरे सांगावयाचे तर या सदनामध्ये माझ्या भगिनींनी आणि बंधुंनी या विषयाच्या संदर्भात भाषणे केली आहेत.पण मला याबाबतीत फक्त एवढेच सांगावयाचे आहे की, महाराष्ट्र हे पुरागामी राज्य आहे. महाराष्ट्र म्हटल्यानंतर शाहू, फुले, आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांचा महाराष्ट्र म्हटला जातो.त्यामुळे याठिकाणी महिलांसाठी 50 टक्के आरक्षणाचे विधेयक मांडण्यात आले आणि त्यावर आपले विचार व्यक्त करताना सन्माननीय सदस्यांनी विविध समस्या सांगितल्या, विविध प्रश्न मांडले, तसेच शासनाचे याबाबतीत अभिनंदन देखील केले. परंतु असे असले तरी या आरक्षणाच्या बाबत काही सन्माननीय सदस्य साशंक आहेत तर काही सन्माननीय सदस्यांनी लोकांच्या मानसिकतेच्या बाबतीत चर्चा उपस्थित केली. परंतु याविषयी बोलत असताना याठिकाणी आपल्याला सर्वांना याचा घटनाक्रम सांगणे हे सुध्दा महत्वाचे आहे असे मला वाटते. म्हणूनच मला हे सांगण्यास आनंद वाटतो की, 3 जानेवारी 2011 रोजी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती होती, त्या निमित्ताने माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर बैठकीमध्ये सांगितले होते की, आम्ही राज्यामध्ये महिलांना 50 टक्के आरक्षण देण्याच्या बाबतीत बिल आणणार आहोत. 8 मार्च रोजी जागतिक महिला दिवस असतो, तसेच महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे, विधीमंडळाचे अमृत महोत्सवी वर्ष आहे आणि या अनुषंगाने 9 मार्च रोजी कॅबिनेटची बैठक झ ाली होती.

सभापती महोदय, मी सदनाच्या निदर्शनास एक गोष्ट आणून देऊ इच्छिते की, त्या कॅबिनेटच्या बैठकीमध्ये याबाबत ऐनवेळचा विषय मांडण्यात आला. मी, माननीय मुख्यमंत्री माननीय ग्रामविकास मंत्री श्री.जयंत पाटील साहेब यांनी दहा मिनिटामध्ये प्रस्ताव मांडला आणि जागतिक महिला दिवस आहे आणि या दिवशी महिलांना एक सप्रेम भेट दिली पाहिजे म्हणून कॅबिनेटच्या बैठकीमध्ये महिलांना 50 टक्के आरक्षण देण्याच्या संबंधातील विधेयक मंजूर करण्यात आले.याठिकाणी हे सांगण्याचे तात्पर्य असे की,14 एप्रिल रोजी डॉ.परमपूज्य महामानव संविधान रचयिता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती होती. त्याच्या अगोदर म्हणजे 13 तारखेला हे बिल मांडण्यात आले आणि त्यादिवशी बरोबर पावणे बारा वाजेपर्यंत या बिलावर चर्चा



प्रा.वर्षा गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

झाली. हे सांगण्याचे तात्पर्य असे की, शाहू, फुले,आंबेडकर यांचा महाराष्ट्र आहे असे आपण नेहमी म्हणतो. त्यामुळे महाराष्ट्राची प्रतिमा ही बाकीच्या राज्यांपेक्षा थोडी वेगळी आहे. प्रत्येक राज्य स्वायत्त आहेत, त्यांना देखील आरक्षण देण्याच्या बाबतीत अधिकार आहेत आणि त्या दृष्टीकोनातून हे पाऊल उचलण्यात आलेले आहे. मी सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानते कारण प्रत्येकांने आपापले विचार मांडले.

सभापती महोदय, मला एक गोष्ट सांगितली पाहिजे की, कॅबिनेटच्या बैठकीच्या वेळेस सर्व पुरुष होते आणि मी एकमेव महिला होते. परंतु सर्व पुरुषांनी मला एकमताने पाठिंबा दिला की, हे आरक्षण विधेयक आजच्या आज सदनासमोर आले पाहिजे आणि महिलांना 50 टक्के आरक्षण द्यावयास पाहिजे. याबाबतीत विधान सभा असो किंवा विधान परिषद असो, दोन्ही ठिकाणी हा प्रस्ताव एकमताने मंजूर केलेला आहे. याचाच अर्थ असा होतो की, शेवटी पुरुष आणि महिला ही गाडीची दोन चाके आहेत.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ प्रथम सौ. रणदिवे... 21:25

प्रा. वर्षा गायकवाड.....

दोन्ही चाके बरोबर चालली तर ती गाडी बरोबर चालते. कौटुंबीक जीवन असो, सामाजिक काम असो किंवा राजकीय क्षेत्रातील निर्णय असोत या सगळया प्रक्रियेमध्ये पुरुष आणि महिलांचे महत्व सारखेच आहे. असे म्हणतात की, एखाद्या देशाची प्रगती पहावयाची असेल तर तेथील महिलांची प्रगती किती झाली आहे हे पाहिले पाहिजे. जेवढी महिलांची प्रगती झाली तेवढीच त्या देशाची प्रगती झाली, असा आज निकष लावला जातो. म्हणूनच काही देशांची आपण जेव्हा प्रगती पाहतो तेव्हा आपण असे पाहतो की, त्या देशातील महिलांची आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक प्रगती किती झालेली आहे, त्या नुसार त्या महिलांचे सक्षमीकरण किती प्रमाणात झालेले आहे, त्या किती प्रमाणात पुढे आलेल्या आहेत. मला आनंद आहे की, राजकीय क्षेत्रात महिला येणार आहेत. मी याबद्दल जास्त बोलणार नाही, कारण मी स्वत: एका राजकीय कुटुंबातून आले आहे. पण या माध्यमातून इतरही अनेक महिलांना संधी मिळणार आहे. आज मला या ठिकाणी उल्लेख केला पाहिजे की, विधानसभा असो अथवा विधान परिषद असो या दोन्ही सभागृहातील महिलांचे प्रमाण दहा टक्क्याच्या वर कधीच गेलेले नाही. फक्त एकदाच विधानसभेमध्ये महिलांचे प्रमाण 19 टक्के होते. मागच्या वेळी मी निवडून आले त्यावेळी हे प्रमाण 12 टक्के होते आणि यावेळी मी निवडून आले त्यावेळी हे प्रमाण 11 टक्के आहे. जो पर्यंत महिलांना आरक्षण मिळणार नाही, तोपर्यंत महिला त्या प्रमाणात या ठिकाणी येणार नाहीत. किंवा महिलांना त्या प्रमाणात संधी मिळणार नाही. निवडणुकीच्या वेळी माझ्या विरुध्द पुरुष निवडणूक लढवितात, पैसे खर्च केले जातात. पण आज माझ्या दृष्टिकोनातून आनंदाचा क्षण असा आहे की, याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. मनिष जैन यांनी केला आणि ती फॅक्ट आहे. महिलांसाठी 33 टक्के आरक्षण दिले असले तरी 38 टक्के महिला जिल्हा परिषदांमध्ये किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आहेत. महिलांसाठी 50 टक्के आरक्षण दिल्यानंतर महिलांचे प्रमाण निश्चितपणे वाढणार आहे, हे सत्य आहे. पण या माध्यमातून 50 टक्के महिला येतील. कायदेमंडळात सुध्दा महिला आल्या पाहिजेत अशी त्या पाठीमागची शासनाची भावना आहे.

सभापती महोदय, या संदर्भात विविध विषयावर या ठिकाणी चर्चा झालेली आहे. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, विधानसभेमध्ये आणि लोकसभेमध्ये 33 टक्के जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या जात नाहीत. पण असे बिलकुल नाही. जशी पुरुषांची मानसिकता

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड..

बदलली पाहिजे तशी महिलांची सुध्दा मानसिकता बदलली पाहिजे. आता फरक फक्त एवढाच झालेला आहे की, यापूर्वी महिला पुरुषांसाठी मतदान करीत होत्या आता पुरुष महिलांसाठी मतदान करतील. तेवढी मानसिकता समाजाची झालेली आहे. पूर्वी असे म्हटले जायचे की, काही क्षेत्रे फक्त महिलांचीच आहेत. ॲड. उषा दराडे यांनी या ठिकाणी खूप चांगले भाषण केलले आहे. आजही महिलांच्या सौंदर्याच्या बाबतीत बोलले जाते, असे त्यांनी सांगितले. आपली संस्कृती अशी आहे की, आपण असे म्हणतो की, पुरुषाचे सामर्थ्य हेच त्याचे सौंदर्य आहे. स्त्रीचे सौंदर्य हे तिचे सामर्थ्य आहे. पण आता ही परिस्थिती बदललेली आहे. प्रत्येक महिला बदलेली आहे. तिचे प्रत्येक सामर्थ्य तिने सिध्द केलेले आहे. यापूर्वी शिक्षण, नर्सिग अशी क्षेत्रे स्त्रीची मानली जात होती. पण आज सगळया क्षेत्रामध्ये महिलांनी आपले अस्तित्व सिध्द केलेले आहे.

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा सांगून मी माझे भाषण संपविणार आहे. मला असे वाटते की, आमच्या नेत्या सोनियाजी गांधी यांचे जे स्वप्न होते, राजीवजी गांधी यांचे जे स्वप्न होते, इंदिराजी यांच्या माध्यमातून या देशाला पोलादी नेतृत्व मिळाले होते. माझी अपेक्षा अशीच आहे की, या विधेयकाच्या माध्यमातून आमच्या भगिनी राजकीय क्षेत्रात येतील, सामाजिक क्षेत्रामध्ये काम करतील आणि जास्तीत जास्त प्रमाणात महिलांना न्याय देतील, अशा दृष्टिकोनातून मी सभापती महोदय, आपले मनापासून आभार मानते. महिलांच्या दृष्टिकोनातून हे सर्वात महत्वाचे विधेयक आलेले आहे. एकमुखाने आणि एक मताने हे विधेयक मंजूर केल्या बद्दल मी सर्वांचे आभार मानते. धन्यवाद.

----

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदया प्रा. वर्षा गायकवाड या ठिकाणी बोलल्या पण कॅबिनेटमधील कामकाज या सभागृहात सांगता कामा नये. कॅबिनेटमध्ये आयत्या वेळी हा विषय आला आणि तो घेतला गेला, अशा प्रकारचे त्यांनी जे वक्तव्य केलेले आहे ते रेकॉर्डवरुन काढले पाहिजे. मंत्री महोदया, ओघाने बोलल्या असतील पण कॅबिनेटमध्ये झालेल्या कुठल्याही कामकाजा बद्दल बाहेर बोलण्याचा त्यांना अधिकार नाही. कॅबिनेटमधील सर्व कामकाज गुप्त असते.

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील

तशी शपथ त्यांनी घेतलेली असते. महिलांना 50 टक्के आरक्षण मिळत आहे म्हणून आनंदाच्या भरात त्या या ठिकाणी ओघाने बोलल्या असतील पण ते रेकॉर्डवरुन काढले पाहिले अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी या ठिकाणी उपस्थित केलेला मुद्दा अत्यंत महत्वाचा आहे. मंत्री मंडळातील सदस्यांनी गुप्ततेची शपथ घेतलेली असते. म्हणून माननीय मंत्री महोदया, प्रा. वर्षा गायकवाड यांनी या अनुषंगाने जे वक्तव्य केलेले आहे ते कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत असताना देशातील या प्रमुख राज्याने महिलांना 50 टक्के आरक्षण देण्याचा जो निर्णय घेतलेला आहे अशा या ऐतिहासिक निर्णयाचे जे विधेयक या सभागृहामध्ये आलेले आहे त्या विधेयकाचे स्वागत करीत असताना, खऱ्या अर्थाने या सभागृहाचा सदस्य म्हणून या बिलावरील चर्चेत सहभागी होत असताना मला अत्यानंद होत आहे. या राज्यातील केवळ महिलावर्गासाठीच नाही तर राज्यातील सर्व जनतेसाठी हा एक आनंदाचा सोहळा आहे, आनंदाचा क्षण आहे आणि सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवावा असा हा आजचा दिवस या विधान परिषदेच्या चर्चेच्या माध्यमातून राज्यातील जनतेला पहावयास मिळणार आहे. आज या विधेयकाच्या बाबतीत बोलत असताना खऱ्या अर्थाने जिजाऊमाता, सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले यांचे स्मरण होणे अत्यंत आवश्यक आहे. कारण या सर्वांनी या देशातील सर्व जनतेला आरक्षणाच्या माध्यमातून असेल, त्यांच्या हक्कांच्या माध्यमातून असेल, त्यांना खऱ्या अर्थाने न्याय मिळवून देऊन, त्यांची प्रगती व्हावी यासाठी आपले उभे आयुष्य खर्ची घातले आहे.

सभापती महोदय, या देशामध्ये महिलांना काही काम करावयाचे असेल, काही बोलावयाचे असेल तर सात पडद्यांच्या मागे राहावे लागत होते अशी इतिहासामध्ये नोंद आहे. पण आज या राज्यामध्ये आपण महिलांना 50 टक्के आरक्षण देऊन या राज्यातील महिलांना चांगल्या प्रकारची संधी देण्यासाठी त्यांचा सन्मान केलेला आहे. मला मुद्दाम नमूद करावेसे वाटते की, सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून केलेले कार्य, जिजाऊ मातेने छत्रपती शिवाजी महाराजांच्या माध्यमातून स्थापन केलेले हिंदवी स्वराज्य आणि पुण्यश्लोक महाराणी अहिल्यादेवी होळकर यांनी 280 वर्षापूर्वी या देशामध्ये केलेले कार्य हे खरोखर वाखाणण्याजोगे आहे. मला पुन्हा एकदा सांगावेसे वाटते की, आज आपण या राज्यामध्ये महिलांना 50 टक्के आरक्षण देत असताना मला अजून आठवते की, या राज्यामध्ये तत्कालीन मुख्यमंत्री श्री. शरदचंद्रजी पवार साहेबांनी महिलांना 33 टक्के आरक्षण देण्याचे धोरण राबविण्यासाठी तत्कालीन राष्ट्रपती महोदयांना या ठिकाणी आमंत्रित केले होते आणि नेहरु सेंटरमध्ये कार्यक्रम झाला होता. या राज्यामध्ये महिलांना आरक्षण

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. रमेश शेंडगे .....

देण्याचे धोरण पहिल्यांदा राबविण्यास सुरुवात केली. ही संधी या राज्यामध्ये महिलांना दिल्यानंतर महिलांनी चांगल्या प्रकारे कार्य करुन आपला ठसा उमटविलेला आहे. मला मुद्दाम या ठिकाणी सांगावेसे वाटते की, 33 टक्के आरक्षण दिल्यानंतर 33 टक्के महिला मिळतील की नाही, महिला काम करु शकतील की नाही अशी शंका या राज्यातील लोक वर्तवित असताना मागच्याच महिन्यामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या माध्यमातून आम्ही वाशी येथे पंचायती राज परिषद भरवली होती. त्या ठिकाणी मराठवाड्यातील जिल्हा परिषदेच्या सदस्य असलेल्या महिला भगिनीने भाषण करताना आदरणीय श्री. शरदचंद्र पवार साहेबांना आणि मंत्रिमंडळातील सदस्यांना विनंती केली. त्यांनी एकच मागणी केली की, आम्ही ज्यावेळी काम करतो मग पंचायत समितीमध्ये निवडून आलेल्या महिला असतील, नगरपालिकेमध्ये निवडून आलेल्या महिला असतील किंवा ग्रामपंचायतीमध्ये निवडून आलेल्या आमच्या महिला भगिनी असतील, ती महिला ज्यावेळी काम करावयास जाते तेव्हा तिच्याबरोबर तिचा पती किंवा प्रतिनिधी असतो. त्यामुळे त्या महिलेला काम करावयास मिळत नाही तर तिच्या पतीमार्फत किंवा प्रतिनिधीमार्फत काम केले जाते. त्या महिला भगिनीने आदरणीय श्री. शरदचंद्र पवार साहेबांना आणि सगळ्यांना अशी विनंती केली की, येथून पुढे काम करीत असताना असा एखादा कायदा आणा की, ज्या कायद्यामध्ये असे नमूद केले असेल की, ती महिला भगिनी काम करीत असताना तिचा पती किंवा प्रतिनिधी तिच्याबरोबर जावयास नको, तिला स्वत:च्या मनाने काम करता आले पाहिजे, तिला तिच्या स्वत:च्या मनाने कारभार चालविता आला पाहिजे.

म्हणून मला या ठिकाणी असे नमूद करावेसे वाटते की, आज आपण या ठिकाणी लोकप्रतिनिधी असू किंवा आपापल्या कार्यामध्ये यशस्वी झालेले पुरुष मंडळी असू, मला असे वाटते की, 10 ते 15 टक्के सदस्य असे असतील की, जे स्वकर्तृत्वाने यशस्वी होतात. पण प्रत्येक यशस्वी झालेल्या पुरुषाच्या मागे एक स्त्री उभी असते. ती स्त्री म्हणजे त्याची धर्मपत्नी असते, आई असते किंवा भगिनी असते आणि त्या स्त्रीच्या धूर्तपणामुळे, तिच्या चांगल्या कामकाजामुळेच तुम्ही आम्ही यशस्वीपणे या ठिकाणी आलेलो असतो. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे प्रत्येक स्त्रीने मार्केटमध्ये आणलेले यशस्वी प्रॉडक्ट आपण असतो आणि त्या यशस्वीतेच्या मागे ती स्त्री भगिनी

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे ....

उभी असते. म्हणून मी पुन्हा एकदा आदरणीय मंत्री महोदयांचे आणि शासनाचे अभिनंदन करतो. आपण एक चांगल्या प्रकारचे विधेयक आणलेले आहे. या विधेयकाचे स्वागत करुन सर्व 50 टक्के महिला भगिनींना त्यांच्या पुढील आयुष्यामध्ये चांगल्या प्रकारे काम करण्याची संधी मिळो अशा पुन्हा एकदा शुभेच्छा देऊन मी माझे भाषण संपवितो.

----

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये 50 टक्के आरक्षण देण्याच्या संदर्भातील विधेयक या सभागृहामध्ये मांडले गेले. सर्वसाधारणपणे जेव्हा मंत्री महोदय विधेयक मांडतात त्यावेळी ते त्या विधेयकाचा हेतू सांगत असतात. मी हे विधेयक मांडताना विधेयकाचा हेतू विस्ताराने सांगितला नाही. याचे कारण असे होते की, या विधेयकाला सर्व पक्षाचा आणि सर्व लोकप्रतिनिधींचा पाठिंबा आहे हे स्पष्ट झालेले आहे. त्यानंतर या विधेयकाच्या चर्चेच्या वेळी सभापतीस्थानी असलेले माननीय उप सभापती यांनी असा निर्णय घेतला होता की, हे महिलासंबंधीचे विधेयक असल्यामुळे या विधेयकावर महिलांनी बोलावे. महिलांना सन्मान देणारा असा निर्णय त्यांनी घेतला होता. नंतर काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या विधेयकावर आम्ही बोललो नाही तर ते चुकीचे होईल. आपण स्त्री शक्तीचा किती आदर करतो, सन्मान करतो याचे मी वर्णन करण्याची आवश्यकता नाही. हे विधेयक मंजूर होत असताना सभापतीस्थानी माननीय सभापती बसलेले आहेत आणि दुस-या बाजूला या सभागृहामध्ये माननीय उप सभापती आपल्या जागेवर बसलेले आहेत. जेव्हा या सभागृहामध्ये अत्यंत महत्वाची चर्चा होत असते अशा वेळी सभापतीस्थानी सभापती आणि सभागृहामध्ये उप सभापती आपल्या जागेवर बसलेले असतात. म्हणजे या विधेयकाचा सन्मान किती होत आहे हे मला येथे सांगायचे आहे. हे एक ऐतिहासिक अशा प्रकारचे विधेयक या सभागृहामध्ये मंजूर होत असताना आपणा सर्वांना त्यामध्ये सहभागी होण्याची संधी मिळत आहे. अत्यंत पवित्र आणि उदात्त भावनेने प्रत्येक सन्माननीय सदस्य या ठिकाणी उपस्थित आहेत. सभापतीस्थानी माननीय सभापती आहेत. तसेच उप सभापती हे देखील सभागृहामध्ये आपल्या जागी बसलेले आहेत. यावरुन या विधेयकाचा किती सन्मान आणि स्वागत केले जात आहे हे दिसून येते.

सभापती महोदय, या विधेयकावरील चर्चेला सन्माननीय सदस्य श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी सुरुवात केल्या नंतर सन्माननीय सदस्य सर्वश्रीमती उषा चवधरी, विद्या चव्हाण, अलका देसाई, ॲड. उषा दराडे, डॉ.नीलम गो-हे, सन्माननीय सदस्य सर्वश्री. हुसेन दलवाई, राम पंडागळे, कपिल पाटील, माणिकराव ठाकरे, एस.क्यू.जमा आणि अन्य अनेक सन्माननीय सदस्यांनी या विधेयकावरील चर्चेमध्ये भाग घेतला. तसेच वेळेअभावी जे सन्माननीय सदस्य चर्चेमध्ये भाग घेऊ शकले नाहीत त्यांचाही या विधेयकाला पाठिंबा आहे हे स्पष्ट झालेले आहे. भारतीय घटनेच्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. बरवड 21:35

श्री. भास्कर जाधव...

74व्या घटना दुरस्तीमध्ये अनुच्छेद 273 टी मध्ये नागरी स्थानिक संस्थामध्ये महिलांसाठी असलेले आरक्षणाचे प्रमाण 50 टक्के करण्याचा प्रस्ताव केन्द्र शासनाच्या विचाराधीन आहे. केन्द्र स्तरावर त्यास अजून मान्यता मिळालेली नाही. परंतु केन्द्र सरकारने त्यासंदर्भात दिनांक 7 डिसेंबर 2009 रोजी प्रत्येक राज्याला विचारणा केली होती की, महिलांसाठी 50 टक्के आरक्षण लागू करण्याचा विचार असून त्याबाबतीत आपल्या राज्याची भूमिका काय आहे हे कळवावे. केन्द्र शासनाने 7 डिसेंबर 2009 रोजी अशी विचारणा केली आणि 1 जानेवारी 2010 रोजी आपल्या राज्य सरकारने केन्द्र सरकारला, आम्ही महिलांसाठी 50 टक्के आरक्षण लागू करण्यास तयार आहोत, असे कळविले. त्यानंतर 9 मार्च 2011 रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये हा विषय आणून त्यास मंत्रिमंडळाने मान्यता देखील दिली. त्यानंतर पहिल्याच अधिवेशनामध्ये या विधेयकाच्या माध्यमातून महिलांसाठी 50 टक्के आरक्षण लागू करण्याचे काम शासनाने केलेले आहे. याचा अर्थ केवळ चर्चेच्या माध्यमातून महिलांसाठी आम्ही काही तरी करीत आहोत अशा प्रकारची वातावरण निर्मिती न करता प्रत्यक्षपणे कृती करण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतलेला आहे हे आपण सर्वांनी लक्षात घेणे आावश्यक आहे.

या चर्चेच्या निमित्ताने अनेक सन्माननीय सदस्यांनी उत्तम प्रकारचे मार्गदर्शन केलेले आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

अनेक सन्माननीय सदस्यांनी उत्तम दाखले देऊन आमच्या सारख्या नवीन सदस्यांना म्हणा किंवा नवीन मंत्र्यांना म्हणा चांगली माहिती आणून देण्याचा प्रयत्न केला. त्या प्रत्येक सन्माननीय सदस्यांचा मी या ठिकाणी उल्ल्ेख करणार नाही. काही सदस्यांनी इतिहासाचे दाखले दिले, काही सदस्यांनी धर्मग्रंथांचे दाखले दिले. काही सदस्यांनी राजे रजवाडयांचे दाखले दिले. आपल्या लोकशाहीने अनेक घटनांनी जगाला आदर्श घालून दिला त्या संदर्भातली उत्तम उदाहरणे या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी नमूद केलेली आहेत. त्यामुळे मी कोणा सदस्यांचे नाव घेणार नाही. आपण महिलांसाठी 50 टक्क्े रिझर्व्हेशन ठेवतो आहे. रिझर्व्हेशन देऊन आपण महिलांचा सन्मान करतो असे नाही. आज आपल्या देशामध्ये सर्वोच्च पदी असलेल्या राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील सुध्दा आहेत, हे आपण कळत न कळत विसरलो. त्याचाही उल्ल्ेख करणे आवश्यक आहे. आपल्या लोकसभेच्या अध्यक्षा श्रीमती मिरा कुमार हया सुध्दा महिला आहेत ही गोष्ट देखील विसरुन चालणार नाही. लोकसभेच्या विरोधी पक्ष नेत्या श्रीमती सुषमा स्वराज हया देखील महिला आहेत, तसेच आमच्या युपीए शासनाच्या प्रमुख श्रीमती सोनिया गांधी आहेत हे सुध्दा मला या ठिकाणी सांगितले पाहिजे. सगळया स्तरावर महिलांचा सन्मान आपण करतो आहोत.

सभापती महोदय, मागचे दाखले दिले गेले आहेत, त्याचप्रमाणे आजच्या परिस्थितीतील दाखले मला देता येतील. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, महिलांना आरक्षण देत असताना त्यांना बाकीच्या गोष्टींच्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. महिलांच्या वेगवेगळया प्रकारच्या नित्याच्या आणि दैनंदिन गरजा असतात, ज्या नैसर्गिक गोष्टी असतात की, त्या प्रत्येकाला कराव्या लागतात. त्या गोष्टी टाळता येत नाहीत. या गोष्टींचा देखील उल्लेख काही सन्माननीय सदस्यांनी केला. महिला सभापती असतील, पुरुष सभापती असतील, तर महिलांना अधिकार वेगळे राहतील आणि पुरुषांना अधिकार वेगळे राहतील या बाबतीतही काही सन्माननीय सदस्यांनी शंका उपस्थित केली. या संदर्भात मी सांगू इच्छितो की, महिला आणि पुरुषांना वेगवेगळे अधिकार नाहीत. दोघांना अधिकार सारखेच देण्यात आलेले आहेत. सभापती तो सभापती, अध्यक्ष तो अध्यक्ष, सरपंच तो सरपंच अशाच पध्दतीने अधिकार दिलेले आहेत. महिला करिता आणि पुरुषा

श्री. भास्कर जाधव...

करिता वेगवेगळा कायदा नाही. किंबहुना महिलांकरिता एक वेगळया प्रकारची सन्मानजनक वागणूक दिली जावी, महिला प्रतिनिधींकडून अपेक्षा ठेवताना, त्यांचेसोबत वागताना सौजन्याने बोलले जावे, महिलांना कळत न कळत एक संरक्षण देण्याचे काम शासनाच्या माध्यमातून झालेले आहे. महिलांसाठी आणि पुरुषांसाठी वेगवेगळे कायदे नाहीत. मी आमच्या महिला भगिनींना सांगेन की, आता तर आपल्याला 50 टक्के आरक्षण दिलेले आहे. त्यामुळे सर्व विकासाची कामे महिलांनीच स्वत: करुन घ्यावयाची आहेत. त्यात तुम्हाला काहीच अडचणी येणार नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी अतिशय मार्मिक असे मत व्यक्त केले आहे. आपण समजून घेतले पाहिजे की, महिलांना कायद्याने 50 टक्के रिझर्व्हेशन मिळणारच आहे. या 50 टक्क्यांमध्ये आम्ही हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला तर त्याचा काही उपयोग होणार नाही. आपल्या सारखी एखादी कर्तृत्ववान महिला, कामसू महिला, तिने आपल्या कामाच्या जोरावर आपल्या मतदार संघामध्ये स्वतंत्र असे वलय निर्माण केले, एक वेगळी ओळख केली, आपल्या मतदार संघातील लोकांमध्ये एक जबरदस्त आत्मविश्वास निर्माण केला, तर ती महिला पुरुषाच्या जागेवर उभी राहू शकते आणि म्हणून 50 टक्क्यांचे आरक्षणाचे प्रमाण अजून वाढू शकते.

सभापती महोदय, या ठिकाणी दोन मुद्यांचा खुलासा करुन मी माझे भाषण संपविणार आहे. या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी भीती व्यक्त केली की, महिलांना कशा पध्दतीने रिझर्व्हेशन देणार ? या बाबतीत मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपल्या राज्यात 16 महानगरपालिका आहेत. त्यात 2212 वॉर्ड आहेत. आजच्या घडीला त्या ठिकाणी 744 महिला आहेत. या 744 महिलांना वेगवेगळया संवर्गामध्ये आरक्षण दिलेले आहे. 2212 वॉर्डामध्ये आता 1106 एवढया महिलांना प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे. प्रत्येकाच्या मनामध्ये अशी भीती आहे की, 1106 महिला झाल्यानंतर आहे त्या पध्दतीने त्या त्या कॅटेगरीतील लोकांना रिझर्व्हेशन राहील काय ? तसे होणार नाही. आता त्या प्रमाणामध्ये प्रत्येक संवर्गातील व्यक्तीसाठी रिझर्व्हेशनमध्ये वाढ होणार आहे...

यानंतर श्री. भोगले....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव........

सभापती महोदय, राज्यामध्ये अ वर्ग नगरपालिकांची संख्या 14 असून तेथे महिलांकरिता 221 आरक्षणे आहेत. हे प्रमाण पुढील काळात 326 इतके होणार आहे. राज्यात ब वर्ग नगरपालिका 55 आहेत, तेथे महिलांकरिता 507 आरक्षणे आहेत, आता हे प्रमाण वाढून 735 इतके होणार आहे. राज्यात क वर्ग नगरपालिकांची संख्या 126 असून तेथे महिलांकरिता असलेले आरक्षण 786 असून ते उद्याच्या काळात 1120 वर जाणार आहे. त्या पाठोपाठ त्या त्या कॅटेगरीतील लोकांना आरक्षण मिळणार आहे. त्याचबरोबर सभापती पद, नगराध्यक्ष पद, महापौर पद देखील मिळणार आहे. तशा पध्दतीची रचना करण्यात आली आहे.

सभापती महोदय, हे विधेयक राष्ट्रपतींकडे सहीसाठी जाणार आहे काय असा प्रश्न माननीय सदस्यांनी उपस्थित केला होता. सरकारने हा कायदा केलेला असल्यामुळे राष्ट्रपतींच्या सहीसाठी हे विधेयक जाणार नाही. सरकार वाद वाढवित आहे का असाही प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. शासनाकडे 2001 च्या जनगणनेची आकडेवारी उपलब्ध आहे. त्यानुसार महिलांना 50 टक्के आरक्षण द्यावे लागणार असल्यामुळे आपल्याला त्या अनुषंगाने वॉर्डची फेररचना करावी लागेल. त्यानुसार वॉर्डची फेररचना होणार आहे.

सभापती महोदय, सभागृहामध्ये सर्वच माननीय सदस्यांनी या विधेयकाचे स्वागत केले आहे. हे ऐतिहासिक विधेयक आपल्या सर्वांच्या आशीर्वादाने माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला मांडण्याची संधी मिळाली हे मी माझे भाग्य समजतो. या विधेयकामुळे मागासवर्गीय, अनुसूचित जाती-जमाती, ओबीसी यांना 50 टक्केप्रमाणे आरक्षण देणारे हे ऐतिहासिक विधेयक आहे. या विधेयकावरील चर्चेत सर्वच माननीय सदस्यांनी भाग घेतला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या दिवशी रात्री हे विधेयक विधानसभेत मांडण्याची आम्हाला संधी मिळाली हे मी माझे भाग्य समजतो. या विधेयकावरील चर्चेत ज्या माननीय सदस्यांनी भाग घेतला त्यांना मी धन्यवाद देतो. सर्वच माननीय सदस्यांनी उपस्थित राहून या विधेयकाचा सन्मान केला त्या बद्दल त्यांचे अभिनंदन करुन माझे भाषण संपवितो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 6 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक-11 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2011 चे वि.स.वि. क्रमांक-11 संमत झाले आहे.

-----

नंतर 5आर.1...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व
पंचायत समिती (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. X OF 2011

( A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY VILLAGE PANCHAYATS ACT, 1958 AND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYATS SAMITIS ACT, 1961.)

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील (ग्रामविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2011 चे वि. स. वि. क्रमांक 10-मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, 1961 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि. स. वि. क्रमांक 10-मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, 1961 यांमध्ये आणखी दुरुस्ती करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

महोदय, यासंदर्भात मघाशी चर्चा करीत असताना सन्माननीय सदस्यांनी काही महत्वाचे मुद्दे जिल्हा परिषदा व पंचायत समित्या तसेच ग्राम पंचायतींच्या संदर्भात उपस्थित केले आहेत, त्या मुद्यांच्या बाबतीत मी थोडक्यात खुलासा करणार आहे.

महोदय, महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 50 टक्के आरक्षण देण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. पंचायती राज व्यवस्था बळकट करण्याचे काम या राज्यात प्रथम स्व. यशवंतराव चव्हाण यांनी केले. तसेच स्व. राजीव गांधी व इतर सर्वच नेत्यांनी देशात महिलांना जास्तीत जास्त आरक्षण देण्याची भूमिका घेतली होती व वेळोवेळी तसे निर्णय सुध्दा घेतले आहेत. या 50 टक्के आरक्षणामुळे राज्यात एकूण किती महिलांना प्रतिनिधीत्व मिळणार आहे याची मी थोडक्यात आकडेवारी सांगण्याचा प्रयत्न करणार आहे. राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये जवळपास 2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील.......

लाख 27 हजार 812 एवढे एकंदर सदस्य असून सध्याच्या 33 टक्के आरक्षणानुसार 75 हजार 930 एवढी महिलांची संख्या आहे. परंतु 50 टक्के आरक्षणाप्रमाणे ही संख्या आता 1 लाख 13 हजार 906 एवढी होणार आहे. त्यानंतर पंचायत समित्यांमध्ये 1961 महिलांना 50 टक्क्याप्रमाणे प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळणार आहे. जिल्हा परिषदांमध्ये एकूण संख्या 1961 इतकी असून त्यातील 50 टक्के म्हणजेच 981 महिलांना संधी मिळणार आहे. या सर्व गोष्टींचा विचार करुनच हे विधेयक शासनाने आणले आहे.

सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी सांगितले की, महिलांच्या बाबतीत वेगवेगळ्या सुविधा शासनाने उपलब्ध करुन द्याव्यात. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, सातारा, बीड आणि जालना सारख्या जिल्हा परिषदांचे अध्यक्ष म्हणून महिला कार्यरत आहेत. त्या महिला अत्यंत सक्षमपणे काम करताना दिसून येतात. वास्तविक या सर्व महिला अध्यक्षांना कोणत्याही प्रकारची राजकीय पार्श्वभूमी नाही किंवा परंपरा देखील नाही. सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा तर एक आदिवासी भगिनी आहेत. कोल्हापूरच्या जिल्हा परिषद अध्यक्षा या सुध्दा सामान्य घरातील महिलाच आहेत व त्या अत्यंत चांगल्या प्रकारे काम करीत आहेत. अशा प्रकारे 33 टक्के आरक्षणाचा फायदा आतापर्यंत चांगलाच मिळालेला आहे. पण या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आपण 50 टक्के आरक्षण देत असताना आजही आपल्याला "लेक वाचवा अभियान" राबवावी लागत आहे हा एक चिंतेचा विषय आहे. म्हणून किमान या विधेयकाच्या माध्यमातून, या कायद्याची अंमलबजावणी सुरु झाल्यानंतर तरी पुढील भविष्यकाळात, 10-20 वर्षानंतर आपल्याला "लेक वाचवा अभियान" राबविण्याची वेळ येणार नाही अशी अपेक्षा करणे सार्थ ठरेल असे मला सांगावयाचे आहे.

सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी या महिलांना 50 टक्क्यानुसार प्रतिनिधीत्व मिळाल्यानंतर त्यांचा कार्यकाल हा 10 वर्षांचा ठेवावा अशी सूचना केली. मी त्यांना सांगू इच्छितो की, आपण देखील राजकारणात व समाजकारणात असल्याने आपल्याला माहिती असेलच की आरक्षण दर पाच वर्षांनी बदलत असते. त्यामुळे सध्याच्या पदासाठी पुढील पाच वर्षाचे आरक्षण कोणते असेल याची माहिती नसते.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुध्द प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील ....

यासंदर्भात केंद्रशासनाने आता प्रत्येक राज्याकडून प्रस्ताव मागविलेले आहेत. त्यामुळे महाराष्ट्र शासन सुध्दा 5 वर्षाचे आरक्षण 10 वर्षे करण्याचा धोरणात्मक निर्णय घेणार आहे हे मी या निमित्ताने सभागृहाला सांगु इच्छितो.

सभापती महोदय, ग्रामीण भागाचा विकास जिल्हा परिषदा व पंचायत समितीच्या माध्यमातून होत असतो. आताच्या केंद्र शासनाच्या धोरणा प्रमाणे ग्रामपंचायतीला 75 टक्के ग्रँट डायरेक्ट ग्रामपंचायतीला मिळत असते. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला 50 टक्क्या असल्या तर ग्रामीण भागात त्या दृष्टीने चांगल्या प्रकारचे काम होऊ शकेल असा मला विश्वास आहे. आपल्या राज्यात एकंदर 27 हजार ग्रामपंचायती असून त्यांचा भौगोलिक विचार केला तर जवळपास 60 टक्के भाग हा ग्रामीण भागात येतो. महिलांचा सहभाग महाराष्ट्राला भविष्यकाळात निश्चितपणे प्रगतीकडे घेऊन जाईल असा विश्वास या निमित्ताने व्यक्त करतो. या विधेयकाच्या संदर्भात ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले त्यांचे आभार मानतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 18 ( दोन्ही सम्मिलित ) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्र. 10 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2011 चे वि.स.वि.क्र. 10 संमत झाले आहे.

---

**माजी सैनिकांच्या बाबत**

**सभापती** : मी मंत्री महोदय श्री. भास्कर जाधव यांना सांगू इच्छितो की, मघाशी सन्माननीय सदस्य श्री. ज़मा साहेबांची माजी सैनिक वेल्फेअरच्या अनुषंगाने एक शंका व्यक्त केली होती. त्यामुळे या शंकेच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांना आपल्या दालनात बोलून चर्चा केली तर त्यांच्या शंकेचे निरसन होऊ शकेल. ज्या माजी सैनिकांना शौर्य पदके मिळालेली आहेत त्यांना काही सवलती शासनाने जाहीर केलेल्या आहेत. मी अनेक वर्ष माजी सैनिकांचे कल्याण मंत्री म्हणून काम पाहिलेले आहे. या विषयाच्या संदर्भातील संपूर्ण माहिती मी माझ्या दालनात बसून ऐकलेली असल्यामुळे शासनाचे तसेच आपलेही अभिनंदन करतो.

श्री. भास्कर जाधव : माजी सैनिकांचे कल्याण या खात्याची जबाबदारी माझ्याकडे असल्यामुळे या संदर्भातील माहिती सभागृहासमोर मांडण्याची संधी मिळाल्याबद्दल मी आपला व सभागृहाचा आभारी आहे.

**सभापती** : माजी सैनिकांचे कल्याण खात्याची जबाबदारी मी 10 वर्षे सांभाळलेली आहे. आपण माजी सैनिकांच्या कल्याणासाठी जी योजना जाहीर केली त्यासंदर्भात मी सातत्याने प्रयत्न करीत होतो. त्याचे कारण असे होते की, महाराष्ट्रामध्ये माजी सैनिकांची संख्या सुमारे 3 लाख आहे. कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि अलीकडच्या काळात मराठवाडा व विदर्भामध्ये ही संख्या वाढते आहे त्यामुळे त्यांचे वेल्फेअर बघणे गरजेचे आहे. देशाच्या दृष्टीने बघितले तर तामिळनाडू राज्यात यासंदर्भातील सुविधा जास्त प्रमाणात आहेत. त्यानंतर पंजाब व हरियाणा राज्यांचा नंबर लागतो. या निमित्ताने माजी शासनाला एवढीच विनंती आहे की, तामिळनाडू राज्याच्या पाठीमागे आपले राज्य असणे हे काही बरोबर नाही. त्यामुळे या दृष्टीनेही विचार करण्यात यावा.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ..

महाराष्ट्र हा लढवय्यांचा आहे असे आपण म्हणतो तेव्हा लढवय्या महाराष्ट्र हा तामिळनाडू राज्याच्याही मागे असणे ही गोष्ट काही बरोबर नाही म्हणून या संदर्भातसुध्दा शासनाने विचार करावा.

श्री. एस.क्यू जमा : सभापति महोदय, आपने जो भावना व्यक्त की है, उसके लिए मैं आपको धन्यवाद देता हूँ. मेरा एक छोटा सा ऑब्जरवेशन है कि सन् 2000 में पुराने रेट लागू हुए, सन् 2002 में ये रेट रिवाइज हुए और उसके 9 साल के बाद आज ये रिवाइज हो रहे है. दूसरी बात यह है कि महाराष्ट्र गौरव पुरस्कार के लिए कोई नियम होगा, कोई कानून होगा. तीसरी बात यह है कि आपने 1000 रुपए तक के लिए, सेवा पदक के लिए और सैनिक की विधवा को दी जाने वाली अनुदान राशि जो बढ़ाई है, वह किस अनुपात में बढ़ाई है, यह समझ में नहीं आता. इसमें कोई अनुपात नहीं है. आप इस निवेदन में देखिए कि मेन्शन इन डिस्पेच में विधवा के लिए सिर्फ 1000 रुपए पेंशन की है, लेकिन परमवीर चक्र पाने वाले शहीद की विधवा के लिए 12,500 रुपए निश्चित किए हैं. हमारा कहना है कि आपने 1 लाख 72 हजार रुपए की अनुदान राशि को बढ़ाकर 25 लाख रुपए किया तो इसका कोई अनुपात होना चाहिए. इसके बारे में मंत्री महोदय के साथ चर्चा होनी चाहिए.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आपण नेहमीच मला वडिलकीच्या नात्याने आणि वेगळया प्रेमाने अनेक वेळा सल्ला देण्याकरिता वा सूचना करण्यासाठी फोन करीत असता. आपण अनेक वेळा माजी सैनिकांच्या कामाकरिता मला अत्यंत आपुलकीने फोन करीत असता. त्यांना देण्यात यावयाच्या वाढीव रकमेच्या संदर्भात आपण तामिळनाडू, पंजाब या राज्यांचा उल्लेख केला आहे. या संदर्भात उद्या मी पुन्हा आपल्याकडे येऊन चर्चा करीन पण हा निर्णय घेण्यापूर्वी सर्व राज्यांकडून माहिती मागविण्यात आली होती. त्यामध्ये जर काही उणीव राहिली असेल तर ती बाब मी आपल्या निदर्शनास आणून देईन.त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यु.जमा यांनी जी बाब येथे सांगितली आहे ती मला तपासून पहावी लागेल . सन्माननीय सदस्यांनी मेन्शन इन डिस्पॅच च्या अनुदान रकमेच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे, असे मला वाटते. तेव्हा या बाबतीत सुध्दा मी आपल्याकडे येऊन चर्चा करीन.

. . . 5T-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. बुधवार, दिनांक 20 एप्रिल, 2011 रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 1.00 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक घेण्यात येईल. या बैठकीत वि.स.वि.क्रमांक 1 महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण ( सुधारणा व पुढे चालू ठेवणे) विधेयक 2011 चर्चेला घेण्यात येईल.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1 वाजून 15 मिनिटांनी भरेल.

( सभागृहाची बैठक रात्री 10 वाजून 2 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 20 एप्रिल 2011च्या सकाळी 10.00 वाजेपर्यत स्थगित झाली )

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही